
९६६२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २४९५

# भारतातील भूमिहीन

आणि

# भूदान



बाबूलाल गांधी

REFBK-0012304

परंधाम प्रकाशन, पवनार

2
३३८९५
निबंध
१०१५
१८/१०/७५

# भारतांतील भूमिहीन
## आणि
# भूदान

२३०८

लेखक :

**बाबूलाल गांधी**

प्रस्तावना :

**प्रा. धनंजयराव गाडगीळ**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्र
अनुक्रम ३३७६८ वि: निबंध
क्रमांक १४१५ नों: दि: २८:११

परंधाम प्रकाशन, पवनार

प्रकाशक :
भाऊ पानसे
परंधाम प्रकाशन,
पो. पवनार (वर्धा)

प्रथम संस्करण, : १०००
सप्टेंबर १९६२
सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन
किंमत ३ रु.

मुद्रक :
भाऊ पानसे
परंधाम मुद्रणालय,
पो. पवनार (वर्धा)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... विभाग ...
क्रमांक ... 20-10-82
REFBK-0012304

# ले...

काव्य असो, कादंबरी असो किंवा प्रबंध असो, त्याचें महत्त्व किंवा स्वारस्य कळायचें तर कवीची किंवा लेखकाची ओळख असणें अगत्याचें असतें. लिखाण आणि वाचक यांच्यामधला लेखक हा अपरिहार्य दुवा आहे. तो सांधण्यापुरताच परिचय या ग्रंथाचे लेखक श्री. बाबूलाल गांधी यांचा करून देण्याचें मीं योजिलें आहे. भूदान-यज्ञाची चळवळ १९५२ सालीं सुरू होऊन १९५७ साल अखेरपर्यंत तिचा योजनाबद्ध असा एक टप्पा संपला. त्या काळांत महाराष्ट्र-भूदान-यज्ञ-समितीचा मी कार्यवाह होतों आणि त्या नात्यानेंच प्रथम श्री. बाबूलाल यांच्याशीं माझा संबंध आला. तो उत्तरोत्तर वाढत जाऊन 'कार्यकर्ता बाबूलाल' पासून 'व्यक्ति बाबूलाल' पर्यंत त्या परिचयाला अत्यंत निकटत्व आलें, म्हणूनच मी हें परिचयाचें काम करणें उचित समजत आहे.

१९५२ सालीं भूदान-यज्ञाच्या क्रांतिकारी आंदोलनाची पुण्यांतील तरुणांना ओळख करून देऊन त्यांना या कामीं भाग घेण्याचें आवाहन करण्याकरितां एक कार्यक्रम आंखला होता, त्यांत पुणें येथील हिराचंद नेमचंद जैन बोर्डिंगांत श्री. शंकरराव देव यांचें कांहीं निवडक विद्यार्थ्यांपुढें व्याख्यान व प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम ठेवला होता. या बैठकीची व्यवस्था, संचालन आणि तीतील चर्चा यामध्यें एका तरुण मुलाची चमक आणि आस्था दिसून आल्यामुळें आमचें लक्ष त्याच्याकडे वेधलें. स्वातंत्र्यानंतरच्या काळांत आपल्या देशाविषयीं मनापासून प्रेम आणि त्याच्या उन्नतीकरितां झटण्याची तीव्र आकांक्षा शिक्षित तरुणांतून कमी होत चालल्याचा अनुभव येत असतांना ज्याच्यामध्यें हे गुण जोपासलेले दिसले त्या तरुणाकडे चटकन् मन ओढणें स्वाभाविक होतें. भूदान-आंदोलनाचा विद्यार्थी-वर्गांत प्रचार करण्याच्या कामीं या तरुणाचा जेवढा उपयोग होईल तेवढा करून घ्यावा असा विचार येऊन तसा आमचा प्रयत्न सुरू झाला. हा तरुण म्हणजे या ग्रंथाचे लेखक बाबूलाल गांधी हे होत.

बाबूलाल यांची त्यावेळीं भूदानाच्या कामाकडे मनापासून ओढ असली आणि त्या बाबतींत आपल्याकडून होईल तें काम ते करूं लागले असले तरी आपण विद्यार्थी आहोंत ही गोष्ट त्यांना विसरणें शक्य नव्हतें. म्हणून आपल्या कॉलेजच्या अभ्यासांत या कामामुळें पुण्यांत राहिल्यानें व्यत्यय येणारच हें ओळखून त्यांनीं एकाएकीं कोणालाहि नकळत दिल्लीला प्रयाण केलें. तेथील सेंट स्टीफन कॉलेजमध्यें नांव घालून तेथून ते अर्थशास्त्र हा विषय घेऊन बी. ए. ( ऑनर्स ) परीक्षा पास झाले. प्रा. व्ही. के. आर्. व्ही. राव यांच्या सारख्या नाणावलेल्या अर्थशास्त्रपारंगताच्या व्याख्यानांचा लाभ त्यांना मिळाला. परीक्षा होतांच मात्र ते तडक त्याच वेळीं बिहारमध्यें बोधगया येथें भरणाऱ्या सर्वोदय-सम्मेलनाला गेले. तेथें श्री. विनोबांच्या उपस्थितींत जीवनदान अर्पण करण्याचा जो उत्स्फूर्त प्रसंग घडला त्यांत महाराष्ट्रांतील ज्या कांहीं कार्यकर्त्या बंधु-भगिनींनीं जीवनदान दिलें त्यांत श्री. बाबूलाल हे एक होते. अर्थात् प्रासंगिक भावनावेशांत त्यांनीं हें गंभीर शुभकार्य केलें नाहीं. त्या संबंधींचा त्यांचा संकल्प विचारपूर्वक पूर्वींच झालेला असला पाहिजे. परीक्षेच्या निकालाचीहि त्यांनीं वाट पाहिली नाहीं. या गोष्टीला आतां बराच काळ लोटला असला आणि भूदान-आंदोलनाचा जोर व लोकमानसांतील उत्सुकता ओसरली असली तरी तें काम सातत्यानें करीत राहण्यांत जो बुद्धियुक्त ध्येयवादच असावा लागतो तो बाबूलाल यांच्यामध्यें आहे हें अनुभवानें दिसून येतें.

आंदोलन चालू असतांना महाराष्ट्रांत त्याचें संयोजन करणें, विशेषत: तरुण विद्यार्थ्यांत त्याचा प्रचार व्हावा असा प्रयत्न करणें, नेत्यांच्या बरोबर राहून प्रचारकार्यांत भाग घेणें आणि तें करीत असतां डोळे व कान उघडे ठेवून चौकसपणें परिस्थितीचा अभ्यास करणें, जी जबाबदारी सोपविली असेल ती आपलें व्यवहारज्ञान उपयोगांत आणून पार पाडणें अशा प्रक्रियेंतून सार्वजनिक कार्याचें नेतृत्व करण्याची पात्रता आज बाबूलाल यांच्या अंगीं आली आहे असें म्हणायला हरकत नाहीं. प्रदेश भूदान-समितीनें सहा वर्षांच्या काळांत जीं ४२ हजार एकरांचीं दानपत्रें मिळविलीं होतीं त्यांची नीट विल्हेवाट लावून भूमिहीनांना व्यवस्थित रीतीनें जमीन वांटून देण्याचें काम महत्त्वाचें होतें. तें समितीनें बाबूलाल यांच्याकडे सोपविलें.

हें काम अति किचकट, नाना लोकांशीं संबंध, सरकारच्या खात्यांशीं व्यवहार; हें सर्व तंत्र बाबूलाल यांनीं उत्तम प्रकारें संभाळून महाराष्ट्रांतील भूदान-वांटप अशा रीतीनें पूर्ण केलें कीं त्याला भारतांत ख्याति मिळली. तें काम पुरें करीत असतांना त्यांनीं आपल्या अर्थशास्त्रविषयक ज्ञानाचा उपयोग करून आपल्या कामांतील आंकडेविषयक माहिती नोंदून ठेवली, अनुभवहि नोंदून ठेवले आणि पुढें समितीपुढें आपल्या कामाचा अहवाल देतांना चिकित्सक अभ्यासूला उपयुक्त अशा तवत्यांसह सर्व माहिती दिली. हें सर्व काम बाबूलाल यांनीं कसें पार पाडलें याचें द्योतक म्हणजे सदर ग्रंथ आहे. ज्या सुव्यवस्थित पद्धतीनें व आस्थेनें बाबूलाल यांनीं तें पार पाडलें तो कार्यकर्त्यांच्या पुढे एक आदर्श आहे असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति नाहीं.

व्यक्तिशः मला बाबूलाल यांच्याबद्दल कृतज्ञता वाटते ती अशा-करितां कीं १९५७ अखरेपर्यंत केवळ दानपत्रें आम्ही जमविलीं होतीं, कांहीं थोडें वांटप करण्याच्या प्रयत्न केला होता, पण दानपत्रांच्या निकालाचें काम जवळ जवळ तसेंच राहिलें होतें. ज्यांच्याकरितां दानपत्रें जमवून जमिनी मिळविल्या त्या भूमिहीनांना जर त्या मिळाल्या नाहींत तर नुसत्या दानपत्रांची मातब्बरी काय? पण त्या जमिनी भूमिहीनांच्या हातीं देण्याचें समितीचें –म्हणजे एक प्रकारें माझेंच–काम बाबूलाल यांनीं पार पाडून मला जबाबदारींतून मुक्त होण्याला फार मदत केली. ती कृतज्ञता या निमित्तानें मी येथें प्रकट करतों.

पुणें, ता. १-७-६२ **भाऊ धर्माधिकारी**

# निवेदन

अर्थशास्त्राच्या अभ्यासांत शेती हा एक विषय असतो. त्यांत मालाचें उत्पादन, त्याचा विकास वगैरे विषय असतात. जमिनीची मालकी व तिच्यांतील विषमता आणि त्या विषमतेचे झालेले दुष्परिणाम यांचीहि माहिती हा अभ्यास करतांना दिली जाते. परंतु या विषमतेचें मूळ कशांत आहे आणि तें कसें काढून टाकायचें, जमिनीची न्याय्य वांटणी करायची ती कशी वगैरे प्रश्नांचा मूलभूत विचार अर्थशास्त्राचे पंडित किंवा ग्रंथ करीत नाहींत. तो विचार भूदान-यज्ञाच्या चळवळीनें सुरू करून दिला आहे. मला स्वतःला सद्भाग्यानें या चळवळींत भाग घ्यायला मिळाला व पश्चिम महाराष्ट्रांत मिळालेल्या बहुतेक भूदानाचें वांटप आणि निकाल एकहातीं करण्याची संधी मिळली त्यामुळें या प्रश्नाचा माझा सर्वांगीण अभ्यास झाला. वांटपाचें काम जवळ जवळ पूर्ण करून झालेल्या कामाचा अहवाल म. भू. यज्ञ समितीला सादर करावयाचा होता. तो तयार करतांना वांटपांतून जी नाना प्रकारची उद्बोधक आंकडेवार माहिती हातीं लागली ती आणि वांटप करतांना आलेले हृद्य-मानवतेचे अनुभव हे त्या अहवालांत मीं नमूद केले, आणि समितीला तो अहवाल १९६१ सालीं धडगांव येथें सादर केला. समितीला हा अहवाल प्रसिद्ध करून लोकांच्यापुढें मांडायचा होता. तो मांडतांना या आंकडेवारीचें व अनुभवांचें रहस्य असलेल्या संक्षिप्त अहवालावरून लोकांना उमगणार नाहीं व त्यांत त्यांना रसहि कदाचित् वाटणार नाहीं असें समितींतील कांहीं मंडळींना वाटलें आणि त्यांनीं तो अहवाल योग्य रीतीनें वाढवून एका पुस्तकाच्या रूपांत देण्याची मला सूचना केली. जें हस्तलिखित तयार होईल तें तपासून छापण्याच्या दृष्टीनें तयार झालें हें पाहण्याकरितां समितीनें (१) श्री. रावसाहेब पटवर्धन, (२) श्री. भाऊ धर्माधिकारी, व (३) श्री. बाबूलाल गांधी यांची एक कमिटी नेमली.

या सूचनेप्रमाणें विचार करतांना केवळ पश्चिम महाराष्ट्राच्या १२ जिल्ह्यांचा वांटप-कार्यक्रम ही अतिमर्यादित दृष्टि सोडून मी त्याकडे जमीनविषयक विषमतेच्या परिहाराचा एक सार्वत्रिक उपाय या दृष्टीनें पाहूं लागलों; आणि मग त्यांतून जे विषय माझ्या लक्षांत आले ती पार्श्वभूमि धरून या प्रमुख विषयाची मांडणी मीं केली. कारण जमीनमालकीची विषमता सोडविण्याचा प्रश्न फक्त भारतापुढेंच आहे असें नसून तो जगांतील जवळ जवळ सर्व देशांच्या पुढें आहे आणि त्यांनीं तो सोडविण्याचे प्रयत्न सतत चालविले आहेत. या सर्व प्रयत्नांत भूदान-आंदोलनाचें स्थान काय हें पाहणें व या संदर्भात प. महाराष्ट्रांतील भूदान प्राप्ति आणि वांटप यांची चिकित्सा करणें हें अधिक उपयुक्त होईल असें मला वाटलें. त्या दृष्टीनें केलेला प्रयत्न म्हणजे सदर लिखाण उर्फ पुस्तक होय. तो प्रयत्न कितपत बोधक, उपयुक्त व मनोरंजक झाला आहे हें वाचणारांनीं ठरवायचें आहे. मला स्वतःला हें काम करीत असतांना त्यांतून बरीच नवीन माहिती व दृष्टि मिळाली आणि भूदान-आंदोलनाविषयींचा माझ्या विश्वास दृढतर झाला एवढेंच मी सांगूं शकतों.

मी लेखक नाहीं, ग्रंथलेखक तर नाहींच नाहीं. या पुस्तकाच्या रूपानें जें पुढें ठेवलें आहे तें प्रत्यक्ष कामांतून व वडील मंडळींच्या मार्गदर्शनांतून बनलेलें आहे. अर्थशास्त्राच्या अभ्यासूंना आणि जमीनमालकीविषयक प्रश्नाचा आस्थेवाईकपणें विचार करणाऱ्यांना या पुस्तकाचा कांहीं-ना-कांहीं उपयोग व्हावा अशी माझी अपेक्षा आहे. या पुस्तकांत जे आंकडे व माहिती –या देशांतील व परदेशांतील–दिली आहे ती अधिकृत अशा ग्रंथांतून घेतलेली आहे. तेथें तेथें त्या त्या ग्रंथांचा हवालाहि देण्याचा मी प्रयत्न केला आहे. माहितीच्या दृष्टीनें कांहीं चुका कोणा वाचकाला आढळल्या व त्यानें त्या मला कळविण्याची तसदी घेतली तर दुरुस्तीच्या दृष्टीनें बरें होईल. माहिती शक्य तितकी अद्यावत् करण्याचा प्रयत्न केला आहे.

म. भू. यज्ञसमितीनें नेमलेल्या कमिटीनें मंजूर केल्यानंतर आतां हें पुस्तक छापून ग्रामसेवा मंडळ वर्धा यांच्याकडून प्रसिद्ध केलें जात आहे. हस्तलिखित पूर्ण केलें आणि छापायला दिलें यांत कांहीं काळ गेला. तेवढ्या

अवधींत या देशांत कांहीं राज्यांत सीलिंग ठरविण्यासंबंधींच्या ज्या कांहीं घडामोडी झाल्या आणि बाहेर निरनिराळ्या देशांत क्रांत्या होऊन जे फेरफार झाले ते सर्व या पुस्तकांत आणणें शक्य नव्हतें.

पुस्तक पूर्ण करण्यांत श्री. रावसाहेब पटवर्धन व भाऊ धर्माधिकारी यांचा बराच हातभार लागला आहे. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें.

पुस्तकाला प्रस्तावना लिहून देण्यांत प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं जो आपला वेळ आणि स्नेह दिला त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें. त्यांच्या प्रस्तावनेमुळें या पुस्तकाचें महत्त्व खात्रीनें वाढलें आहे.

पुस्तक छापून प्रकाशित करण्याचें काम परंधाम प्रकाशन, पवनार या संस्थेनें आपल्या अंगावर घेतलें आणि पार पाडलें. ही पू. विनोबाजींची संस्था. तिनें या पुस्तकाला एवढें महत्त्व दिलें हें माझें सौभाग्य मी मानतों.

पुणें, ता. १२-७-६२

सर्वांचा नम्र,
बाबूलाल गांधी

# विषयानुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १. लेखकाचा परिचय ... | ३ |
| २. निवेदन ... | ६ |
| ३. पुरस्कार ... | ११ |
| ४. प्रस्तावना ... | १२ |
| **विभाग १** | |
| १. भारतांतील भूमिसमस्येचें स्वरूप | १ |
| २. इतर देशांतील भूमिसमस्या व तिचा उकल (रशिया, पूर्व युरोपीय देश व चीन) | १२ |
| ३. आशियाई देश व आफ्रिका | २९ |
| ४. भूमिहीन आणि भारताचें नियोजन | ३६ |
| ५. कायद्याचा उपाय | ४० |
| ६. सीलिंग (धारण-क्षेत्राची कमाल मर्यादा) | ४५ |
| ७. हिंसा, कायदा, कीं विचार परिवर्तन ? | ५८ |
| ८. विचार-परिवर्तनाचा प्रयोगः भूदान-यज्ञ | ६५ |
| ९. भूदान-प्राप्तीच्या प्रयोगांतील अनुभव | ७५ |
| १०. महाराष्ट्रांतील विषमतेचें स्वरूप | ९२ |
| ११. महाराष्ट्राचें हृदयदर्शन | ९५ |
| **विभाग २** | |
| १२. वांटपाची पार्श्वभूमि | १०७ |
| १३. भूमिवितरण-चिकित्सा : १ | १२२ |
| १४. भूमिवितरण-चिकित्सा : २ | १३५ |
| १५. कार्य-संघटन | १५३ |
| १६. वितरणांतून झालेलें मानसदर्शन | १६१ |
| १७. वांटपानंतरचे नवे भूमिधारक | १९९ |
| १८. उपसंहार | २०३ |
| १९. परिशिष्ट नं. १ ते ७ | २१२ |



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...33..... दि: ...1.7.88...

# पुरस्कार

श्री. बाबूलाल यांनीं हें पुस्तक फार मेहनतीनें लिहिलें आहे. सामग्री गोळा करण्यांत जी कांहीं मेहनत घेतली आहे ती तर आहे च, पण महाराष्ट्रांतील भूदानांत मिळालेल्या जमिनीचें वांटप करण्यासाठीं त्यांनीं जी अपार मेहनत केली ती ह्या पुस्तकाचा मुख्य आधार आहे. मला असा विश्वास आहे कीं हें पुस्तक जो कोणी काळजीपूर्वक वाचील त्याच्या हृदयांत अहिंसक-सामाजिक-क्रांतीची भावना उचंबळून येईल.

भूमि-वितरणाचे आंकडे वगैरे जुन्या महाराष्ट्रापुरते च दिले गेले आहेत. त्या ऐवजीं सबंध महाराष्ट्राचे देतां आले असते तर बरें झालें असतें. मराठवाड्यांत श्री. अच्युतराव देशपांडे यांचे हातून भूमि-वितरण सांगोपांग झालेलें आहे. तत्संबंधीं आंकडे कां मिळूं शकले नाहींत असा सहाजिक च वाचकांच्या मनांत प्रश्न उभा राहील. सबंध पुस्तक फार काळजीनें लिहलेलें असतांना ही उणीव अधिकच ध्यान खेंचते.

भूदान-यात्रा,
असम प्रदेश
ता. ३-७-६२

# प्रस्तावना

"भारतांतील भूमिहीन आणि भूदान" या पुस्तकाचे दोन विभाग आहेत. पहिल्या विभागांत भारतांतील भूमि-समस्येच्या स्वरूपाचें विवेचन केलें असून भूदान-आंदोलनाचा त्रोटक आढावा घेतला आहे. दुसऱ्या विभागांत महाराष्ट्रांत भूदानांत मिळालेल्या जमिनीचें वांटप प्रत्यक्ष कसें केलें, त्यांत अनुभव काय आले, त्याची एकंदर निष्पत्ति काय याचें तपशीलवार विवेचन केलें आहे. पुस्तकाचे लेखक श्री. बाबूलाल गांधी यांस महाराष्ट्रांत भूदान समितीनें दान मिळालेल्या जमिनींचे वाटप पूर्ण करण्याकरितां सर्वाधिकार देऊन खास नियुक्त केलें होतें. हें काम त्यांनीं जवळजवळ एकहातीं पंधरा महिन्यांत पुरें केलें. तेव्हां दुसऱ्या विभागांतील सर्व लिखाण, लेखकाचा प्रत्यक्ष अनुभव व माहिती यांवर आधारित आहे असें म्हणतां येतें.

पहिल्या विभागांतील पहिल्या तीन प्रकरणांत भूमिहीनांच्या समस्यांची सर्वसामान्य स्वरूपाची ओळख करून दिली आहे. पहिल्या प्रकरणांत भारतांतील परिस्थितीबाबत त्रोटक आंकडयांसहित माहिती दिली आहे. पुढील दोन प्रकरणांत अनुक्रमें कम्युनिस्ट देशांतील प्रयोगाविषयींचा इतिहास आणि आशियांतील इतर देश व आफ्रिका यांतील परिस्थिति यांचे वर्णन आलें आहे. यापुढील तीन प्रकरणांत भारताच्या नियोजन मंडळाचें भूमिहीनांच्या प्रश्नाबाबतचें घोषित धोरण काय आहे हें दर्शवून राज्य-सरकारांनीं गेल्या पंधरा वर्षांत कूळसंरक्षण व सीलींग या विषयीं केलेल्या कायद्यांतील तरतुदींची सारांशानें माहिती दिली आहे. प्रत्यक्ष भूदानाबाबतच्या विवेचनाच्या दृष्टीनें एथवरचा भाग प्रास्ताविकच मानतां येईल. परंतु कोठेंच विस्तार करण्यास सवड नसतांहि हा प्रास्ताविक भाग उपयुक्त माहितीपूर्ण झाला आहे. पहिल्या विभागांतील यापुढच्या भागांत लेखक भूदानाकडे वळले आहेत. विचार-परिवर्तनाच्या मार्गाबद्दल थोडा तात्त्विक बिचार, भूदान चळवळीचा उगम आणि भूदान-प्राप्तीच्या

प्रयोगांतील अखिल भारतांतील व विशेषें महाराष्ट्रांतील अनुभव या विषयांचा पहिल्या विभागांतील उर्वरित प्रकरणांत परामर्श घेतला आहे.

पुस्तकाचा खरा महत्त्वाचा भाग म्हणजे दुसरा विभागच मानला पाहिजे. यांतील मुख्य विषय महाराष्ट्रांतील भूदानांत मिळालेल्या जमिनींचें केलेलें वांटप हा आहे. या विभागांत माझ्या मतें महत्त्वाच्या बाबी तीन आहेत : पहिली, लेखकानें भूदान समितीच्या सर्वसाधारण आदेशांस अनुसरून बनविलेली वांटपपद्धति व तिचें प्रत्यक्ष कार्यांतील स्वरूप; दुसरी, भूदानांत मिळालेली जमीन व तिचे दाते आणि या जमिनीचें वांटप व वांटपानें निर्मिलेले नवीन भूमिधारक या विषयींची अनेकांगी तपशीलवार दिलेली वर्गीकृत माहिती; तिसरी, वांटपांत आलेले अनेक अनुभव व त्यांत झालेलें मानस-दर्शन.

पहिल्या विभागांत लेखकानें भूमि-समस्येचें केलेलें विवेचन त्रोटक असलें तरी शक्य तितकें माहितीपूर्ण आहे. त्यामुळें भूदान-चळवळीचा उगम व उद्दिष्ट हीं कळण्यास मदत होते. त्याचप्रमाणें भूदान-याचनेच्या मागची वैचारिक पार्श्वभूमि व भूदान-यात्रेंत आलेले अनुभव यांचें पुरेसें वर्णन दिल्यामुळें या एकंदर घटनेचे यथार्थ दर्शन होतें. अशा तऱ्हेचें सर्वांगीण विवेचन एकत्रित आणलें हा या पुस्तकाचा एक विशेष गुण समजला पाहिजे. वर दर्शविल्याप्रमाणें पुस्तकांतील खरा नवीन व महत्त्वाचा भाग म्हणजे जमीन-वांटप महाराष्ट्रांत कसें करण्यांत आलें याविषयींचें साद्यंत आंकडेसिद्ध विवेचन हाच आहे. तेव्हां याबाबतच प्रस्तावनेंत मुख्यतः लिहिणें उचित होईल.

जमीन वांटपाचें ग्रंथांत वर्णिलेलें काम पश्चिम महाराष्ट्राच्या बारा जिल्ह्यांतलें आहे. विनोबांची महाराष्ट्रांत पदयात्रा १९५८ सालीं झाली. व महाराष्ट्रप्रदेश भूदान-यज्ञ-समितीनें आपल्या वतीनें जमीन-वांटपाचें काम करण्याचें श्री. बाबूलाल गांधी यांजवर एप्रिल १९५९ मध्यें सोपविलें. त्यांनीं हें काम एप्रिल १९५९ ते जून १९६० पर्यंत सतत पंधरा महिने गांवोगांव हिंडून केलें. श्री. गांधी लिहितात कीं, "हें काम करतांना माझी भूमिका एका अभ्यासू विद्यार्थ्याची होती." श्री. गांधी यांनीं आपल्या

पुस्तकांत दिलेली माहिती व त्यांनीं केलेली विषयाची मांडणी यावरून श्री. गांधी यांनीं केलेलें आपल्या भूमिकेचें वर्णन यथार्थ आहे असें सिद्ध होतें. त्यांची स्वतःची भूमिका अभ्यासू विद्यार्थ्याची होती, या मुळेंच त्यांचें पुस्तक इतर अभ्यासू विद्यार्थ्यांस उपयुक्त ठरावें अशा तऱ्हेनें लिहिलें गेलें आहे.

पश्चिम महाराष्ट्रांतील बारा जिल्ह्यांत भूदानांत मिळालेली जमीन एकूण ४१ हजार एकर होती. यांतील २६ हजार एकर जमिनीचें प्रत्यक्ष वांटप होऊं शकलें. १५ हजार एकरांचें वांटप श्री. गांधी करूं शकले नाहींत. यापैकीं जवळ जवळ ५ हजार एकर हें खराब क्षेत्र असल्याचें आढळलें, २ हजार एकराचें दान मालकांनीं परत घेतलें, आणि २ हजार एकरांचें दान कायदेशीर मालकी असल्याखेरीज दिलेलें आढळून आलें. वांटलेली जमीन ६००१ भूमिहीन कुटुंबांना देण्यांत आली. श्री. गांधी यांनीं या सर्व बाबींत जिल्हावार तपशीलवार माहिती दिली आहे. श्री. गांधी यांची दृष्टि खरोखर चिकित्सक अभ्यासकाची आहे हें त्यांनीं सर्व आंकडे देत असतां दात्यांचें मानस याविषयीं काळजीपूर्वक केलेलें त्रोटक वर्णन वाचून स्पष्ट होतें. क्रांतिविचार, धर्म, श्रद्धा, सामाजिक दडपण इत्यादि अनेक कारणांनीं दान मिळूं शकतें. या सर्वांची वर्गवारी व टक्के-वारी देण्याइतकी माहिती श्री. गांधी यांनीं आपलें वांटप-कार्य करतांना गोळा केली.

वांटप होऊं शकलें नाहीं त्या क्षेत्राबाबतची माहिती तपशीलानें दिली आहे आणि त्यावरून अर्थव्यवहार व समाजपरिस्थिति या बाबतींतले अनेक बारकावे व छटा कळून येतात. वांटप-पद्धति व वांटप-संघटन याची माहितीहि पूर्णपणें दिली आहे. आणि शेवटीं या वांटपाच्या कामीं दर एकरी तीन आणे एवढा खर्च आला हेंहि सांगितलें आहे. अनेकांस, 'वितरणांतून झालेलें मानस-दर्शन' या विस्तृत प्रकरणांतील सत्यकथा हाच पुस्तकाचा महत्त्वाचा भाग वाटेल. हें मानसदर्शन हृद्य तर आहेच, परंतु त्यांतून–सगळ्या पुस्तकांतूनच–समाजक्रांति करूं इच्छिणाऱ्यांस उद्बोधक असेंहि पुष्कळ आहे.

आपण केलेल्या जमीन-वांटपाची एकंदर फलश्रुति सांगतांना श्री. गांधी एके ठिकाणीं लिहितात, "सर्वांगीण जागृतीच्या प्रयत्नाचाच जणूं नवीन वांटप हा एक कार्यक्रम ठरला." पण याचबरोबर त्यांस हेंहि दिसून येतें कीं वांटपाच्या कामांत जी चालढकल किंवा उपेक्षा झाली तिच्यामुळें आंदोलन पुढें वाडवीत नेण्यास मदत झाली नाहीं. वरील दोन्ही दृष्टींनीं सद्य:स्थितीचा विचार होणें हें आवश्यक आहे. विनोबांनीं भूदानाची अभिनव कल्पना पुढें मांडली व त्यांच्या आवाहनास लोकांकडून अनपेक्षित प्रतिसाद मिळाला. त्यामुळें कांहीं अघटित प्रत्यक्षांत घडत आहे असें भासूं लागलें आणि आपण शांततापूर्ण क्रांतीच्या मार्गावर आहों असें अनेकांस वाटलें. भूदानयात्रेंत अनेक अनुभव आले. व्यावहारिक अडचणी सोडविण्याचे प्रयत्न होऊं लागले. अंतीं, भूदानाचें ग्रामदानांत परिवर्तन झालें आणि १९५७ सालीं येलवाल येथें अखिल भारतांतील सर्वपक्षीय पुढाऱ्यांनीं एकमुखानें ग्रामदान-आंदोलनाच्या मूलभूत उद्दिष्टांची व कार्यपद्धतीची प्रशंसा केली. आजवरच्या या चळवळींतील हा उच्चांक समजला पाहिजे. येथून ओहोटीस सुरुवात झाली. आणि आतां हा मार्ग सुकर नाहीं एवढेंच नव्हे तर हा कार्यक्रम आतां खुंटला अशी सार्वत्रिक समजूत दिसते. श्री. गांधी यांच्या पुस्तकामुळें ही नैराश्याची भावना कांहीं अशीं दूर होण्यास मदत व्हावी. पुस्तकाच्या वाचनामुळें काय चुकलें व काय सुधरून घेण्याजोगें आहे हें कळूं लागल्यास अधिकच बरें.

कोणत्याहि अभिनव क्रांतिकारक उपक्रमाच्या तीन अवस्था मानल्या पाहिजेत. पहिली विचारमंथनाची, दुसरी विचारप्रचाराची व नवकल्पना प्रस्थापनेची, तिसरी विचार व कल्पना प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविण्याची. जेथें यांतील दुसरी व तिसरी अवस्था बहुतांशीं एकसमयावच्छेदें व परस्पर-पूरक अशा घडून येतात तेथें क्रांति खरोखर यशस्वी होऊं शकतें. भूदान-ग्रामदान चळवळींतील आजवरची खरी उणीव म्हणजे आपणांस व्यवहारांत काय करावयाचें आहे या बद्दलच्या कार्यकर्त्यांतील अस्पष्ट कल्पना व प्रत्यक्ष व्यावहारिक कार्य करण्याबाबत विलक्षण चालढकल व उपेक्षा. विनोबांना कळ सांपडली असें मानलें तरी ही कळ म्हणजे कांहीं जादूचा दिवा नव्हता कीं ज्यायोगें स्वत:सिद्ध पुढें वाढून यावें. प्रत्येक मानवांत सुप्त, सुष्ट प्रवृत्ति

आहेत त्यांस योग्य तऱ्हेनें जागृत केलें असतां अनेक समस्या आपण सामोपचारानें सोडवूं व शांतता व समाधानाचें वातावरण प्रस्थापित करूं हा विचार आधुनिक युगांत सुपरिचित नाहीं व हा मार्ग व्यवहार्य मानला जात नाहीं. त्याचा उच्चार, प्रचार व पुरस्कार करण्यांत विनोबांनीं लोकोत्तर कल्पकता व धैर्य दाखविलें हे खचित. पण केवळ प्रचार-पुरस्कारानें समाज-क्रांति होत नाहीं हें तेवढेंच खरें. नवकल्पनेनें, साधूच्या वचनामुळें, मनुष्य क्षणभर भारावतो पण यामुळें जुने संस्कार व परिस्थितीचें दडपण हीं कांहीं लगेच नाहींशीं होत नाहींत. केवळ सत्प्रवृत्तीनें समस्या सुटत नाहींत. त्याकरितां सत्प्रवृति सतत जाग्रत ठेवून विचारपूर्वक दीर्घकालीन व्यावहारिक प्रयत्न करावे लागतात. हा शेवटचा विचार भूदान-ग्रामदानांत आजवर विसरल्यासारखा दिसतो आणि म्हणून सुरवातीच्या उठावाच्या मानानें प्रत्यक्ष फल फार अल्प दिसतें.

पण हें एवढ्यावर संपलें असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. भूदान-ग्रामदानानें सांगितलेला मार्ग हा आपल्या परंपरेस जुळता आहे, या कल्पना प्रभावी ठरूं शकतात, सर्वांस पटूं शकतात हें श्री. गांधी यांच्या अनुभवावरून निश्चयपूर्वक सांगतां येतें. खरी वाण हें लोण सर्वत्र नेऊन विवक्षित विधायक कार्य श्रद्धापूर्वक परंतु डोळसपणानें करणाऱ्या कार्यकर्त्यांची आहे. श्री. गांधी, हें वांटप केलें एवढ्यानें संपलें, असें मानत नाहींत हें त्यांनीं नवीन भूमिधारकांच्या भावी संघटनेबद्दल जें पुस्तकांत लिहिलें त्यावरून उघड होतें. चिकित्सक बुद्धीनें कार्य करून फलनिष्पत्ति अजमावणें आणि अनुभवांस अनुसरून व्यवहार सुधारीत सातत्य राखणें हें आतांच्या अवस्थेंत आवश्यक आहे. श्री. गांधी यांचें कार्य व पुस्तक हीं केवळ अपवादात्मक नसून कार्यकर्त्यांच्या नवीन पिढीची द्योतक आहेत असें मानल्यास या चळवळींत आतां एक नवीन व अधिक फलदायी कालखंडास प्रारंभ होत आहे अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें
२० ऑगस्ट १९६२

ध. रा. गाडगीळ

92308

# भारतांतील भूमिसमस्येचें स्वरूप

स्वराज्य मिळाल्यानंतर स्वराज्याचें पहिलें दर्शन म्हणून जी भारताची राज्यघटना करण्यांत आली त्या घटनेनें भारतीय नागरिकाला धर्म–जात–पंथ–लिंग–भेद न करतां नागरिकत्वाचे हक्क ( Fundamental Rights ) दिले आहेत. स्वातंत्र्य आणि समता या दोन महान् हक्कांची प्राप्ति भारतांतील प्रत्येक स्त्री-पुरुषाला या घटनेमुळें झाली आहे. या घटनेनें नागरिकांच्या मूलभूत हक्कांची सनद जाहीर केली, त्याचप्रमाणें तिनें कांहीं मार्गदर्शक सूत्रें–निर्देशक तत्त्वें–हि (Directive principles) जाहीर केलीं आहेत. मूलभूत हक्कांची सनद अशी आहे कीं जिला भारत सरकार आणि घटक-राज्यें स्वतः धक्का लावूं शकत नाहींत, आणि कोणालाहि तीं धक्का लावूं देणार नाहींत. हे हक्क संरक्षिण्याकरितां येथील राज्यसत्ता कायद्यानें बांधली आहे. निर्देशक तत्त्वांतील प्रत्येक कलम नागरिकत्वाची प्रगति साधण्याच्या दृष्टीनें आवश्यक असें मानलें असलें तरी तें ध्येयसूचक आहे आणि प्रयत्नावलंबी आहे. म्हणून आज तूर्त तीं तत्त्वें कायद्याच्या कक्षेंत आणलेलीं नाहींत. परंतु भारतीय समाजाला जर स्वातंत्र्य आणि समता या महान् तत्त्वप्रणालीकडे आगेकूच करावयाची असेल तर निर्देशक तत्त्वांची अंमलबजावणी जितक्या प्रमाणावर या देशांत होईल तितक्या प्रमाणांत तो प्रगति साधेल इतकें महत्त्व या तत्त्वांना आहे.

या तत्त्वांपैकीं पुढील निर्देशक तत्त्वांचा येथे उल्लेख करीत आहोंत :

( 39 ) The State shall, in particular, direct its policy towards securing—

(a) That the citizens, men and women equally, have the right to an adequate means of livelihood;

(b) That the ownership and control of the material resources of the community are so distributed as best to subserve the common good;

(c) That the operation of the economic system does not result in the concentration of wealth and means of production to the common detriment.*

[ ३९. सरकार विशेषतः पुढें नमूद केलेल्या गोष्टी अस्तित्वांत आणण्याच्या दृष्टीनें आपल्या कारभाराचें धोरण आंखील :

(अ) स्त्री आणि पुरुष नागरिकांना समान रीतीनें निर्वाहाचें पुरेसें साधन मिळण्याचा हक्क असावा;

(ब) समाजाच्या भौतिक साधनांची मालकी आणि ताबा यांची अशी वांटणी करावी कीं ज्यांतून सामाजिक हित जास्तींत जास्त उत्तम रीतीनें साधेल;

(क) अर्थयोजना अमलांत आणीत असतांना संपत्तीचें आणि उत्पादन-साधनांचें केंद्रीकरण होऊन त्यामुळें समाजहिताचा घात होईल, असें होता कामा नये. ]

ज्याला समाजवादी समाजरचना म्हणतात तिचें च दिशासूचन या निर्देशक तत्त्वांत आढळून येतें.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. जमीन हा या देशाचा आद्य आधार आहे. येथील शेंकडा ८० टक्के लोकांचें निर्वाहाचें आणि संपत्ति-उत्पादनाचें साधन जमीन हें च आहे. संपत्ति-उत्पादनाचीं आणि चरितार्थाचीं इतर साधनें या देशांत अजून शेतीच्या मानानें अल्प प्रमाणांत आहेत. या इतर साधनांचा विकास करावयाचा म्हटलें तरी त्याकरितां लागणारें भांडवल शेतीच्या उद्योगांतून च संग्रहित करावें लागणार आहे. बाहेरून कर्जाऊ भांडवल आणावयाचें म्हटलें तरी त्याच्या फेडीचा आधार कांहीं काळपर्यंत शेती हाच असणार आहे. म्हणून शेतीचा व्यवसाय पुढच्या कांहीं काळापर्यंत भारताचा मुख्य व्यवसाय राहणार आहे यांत शंका नाहीं. "सेन्ट्रल स्टॅटिस्टिकल् ऑर्गनायझेशन" (C. S. O.) या संस्थेनें भारतांतील अुद्योगधंद्यांतून होणाऱ्या उत्पन्नांचे विभागवार आंकडे दिले आहेत ते पुढील प्रमाणें :

*[ The Constitution of India, page 19. ]

| वर्ष | शेती | खाणी कारखानें व लहान अुद्योगधंदे | व्यापार वाहतुक आणि दळणवळण | इतर | एकूण राष्ट्रीय उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १९४८-४९ | ४२५० | १४८० | १६०० | १३४० | ८६७० |
| १९४९-५० | ४४९० | १५०० | १६६० | १३८० | ९०३० |
| १९५०-५१ | ४८९० | १५३० | १६९० | १४४० | ९५५० |
| १९५१-५२ | ५०२० | १६२० | १७९० | १५०० | ९९३० |
| १९५२-५३ | ४८१० | १७०० | १७८० | १५४० | ९८३० |
| १९५३-५४ | ५३१० | १७७० | १८०० | १६०० | १०४८० |
| १९५४-५५ | ४३५० | १८०० | १८१० | १६५० | ९६१० |
| १९५५-५६ | ४५२० | १८५० | १८८० | १७३० | ९९८० |
| १९५६-५७ | ५५२९ | २००० | १९६० | १८२० | ११३०९ |
| १९५७-५८ | ५३३० | २०९० | २०२० | १९२० | ११३६० |

यावरून ५० % टक्के राष्ट्रीय उत्पन्न शेतीमधून पैदा होतें हें स्पष्ट आहे.

आपल्या देशांत एकूण जमिनीचें जें वर्गीकरण झालेलें आहे तें डोळ्यांपुढें घेतलें तर या साधनांची आजची स्थिति काय आहे हें लक्षांत येईल.

भारतांतील एकूण क्षेत्र ७१ कोटी एकर आहे. त्याचें वर्गीकरण—

| | क्षेत्र एकर (कोटी) | शेंकडा प्रमाण |
|---|---|---|
| (१) लागवडीखालील शेतीचें | ३० | ४२ % |
| (२) शेतींतील चालू पड | ७ | १० % |
| (३) जंगलाचें क्षेत्र | १३ | १८ % |
| (४) ओसाड नापीक | १२ | १७ % |
| (५) पडीत असलेली पण शेतीस साधारण लायक | ९ | १३ % |
| | ७१ | १०० % |

लागवडीखालील ३० कोटी एकर शेत जमिनीच्या आधारावर जीं शेंकडा ८० टक्के ग्रामीण कुटुंबें जगत आहेत त्यांचें स्वरूप हि लक्षांत घेणें आवश्यक आहे :

शेतीच्या आधारें जगणारीं एकूण कुटुंबें ७९.८ त्यांपैकीं–

| | |
|---|---|
| (१) जमीन-मालक कुटुंबें | २२.२ टक्के |
| (२) कूळ म्हणून जमीन कसत असलेलीं कुटुंबें | २७.२ " |
| (३) थोडी शेती व थोडी मोल-मजुरी करणारीं कुटुंबें | १५.२ " |
| (४) भूमिहीन शेतमजूर | १५.२ " |
| | ७९.८ |

याचा अर्थ या जवळ-जवळ ८० टक्क्यांपैकीं सर्व च जण पुरतेपणीं निर्वाहाचें साधन म्हणून जमीन धारण करणारे नाहींत असा होतो.

या ८० टक्क्यांपैकीं सर्वांना च हमखास काम देण्याइतकी आणि त्यावर चरितार्थ चालविण्याइतकी जमीन उपलब्ध नाहीं. नुकताच जमिनी-बावत दहावा राष्ट्रीय सँपल सर्व्हे भारत सरकारकडून केला गेला, त्यावरील पुस्तकाच्या प्रस्तावनेंत द्वितीय पंचवार्षिक योजनेचे शिल्पकार प्रा. महालनोबिस लिहितात : "खेड्यांतील ६॥ कोटी कुटुंबांपैकीं $\frac{१}{५}$ हून थोड्या अधिक (२३.९ टक्के) म्हणजे १॥ कोटी कुटुंबांजवळ जमीन च नाहीं, $\frac{१}{४}$ कुटुंबांजवळ एक एकराहून कमी जमीन आहे. म्हणजे जवळ-जवळ निम्म्या संख्येच्या ग्रामीण कुटुंबांजवळ एकतर जमीन च नाहीं किंवा असल्यास एक एकराहून कमी जमीन आहे, आणि दुसऱ्या टोकास $\frac{१}{८}$ कुटुंबां-जवळ १० एकरांपेक्षां जास्त जमीन–म्हणजे एकंदर जमिनीच्या ६६ टक्के ($\frac{२}{३}$ भाग) आहे. या १२.८ टक्के कुटुंबांपैकीं एक टक्का कुटुंबाकडे ४० एकरापेक्षा अधिक जमीन आहे. म्हणजे एकूण जमिनीच्या १७.५ टक्के जमीन एक टक्का कुटुंबांकडे आहे."

वरील माहितीचा सरळ अर्थ असा कीं जमिनीची वांटणी अत्यंत विषम आहे. घटनेंतील निर्देशक तत्त्वांचा अमल व्हावयाचा म्हणजे

इतक्या शेतकरी (छोटे जमीनवाले व भूमिहीन) कुटुंबांचा प्रश्न सोडवावा लागेल. ही च ती भारताची भूमि-समस्या होय.

या भूमिसमस्येचें स्वरूप असें आहे कीं, अनेक ऐतिहासिक आणि भौतिक कारणांनीं या देशांत जमिनीची विषम विभागणी झाली आहे. प्राचीन काळीं, किंबहुना इंग्रजांचा अंमल सुरू होण्यापूर्वीं कांहीं काळ, शेतीवर निर्वाह करून राहणारा ग्रामसमाज स्वयंपूर्ण होता, सर्वांना जमीन होती. गरजेच्या इतर वस्तू निर्माण करणारे उद्योगधंदे होते, वर्ण-व्यवस्थेनें परस्परांचा सहकार स्थापन केला होता आणि कर्तव्यें नेमून दिलीं होतीं. येथें इंग्रजी सत्ता स्थापन झाली तेव्हां ही चातुर्वर्ण्याची स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था संपुष्टांत आली. आगगाडी, बोटी, तारायंत्रें व वहातुकीचीं साधनें अस्तित्वांत आल्यामुळें हीं खेडीं जबरदस्तीनें जागतिक बाजारपेठेंतील एक घटक बनलीं. येथील कच्चा माल परदेशीं जाऊन पक्का माल येथें येऊं लागला. धनिक वर्ग दलाली करणारा व्यापारीवर्ग बनला व पूर्वीपेक्षां निराळ्या प्रकारचीं शहरें अस्तित्वांत आलीं. ग्रामीण समाजाची स्वयंपूर्णता नष्ट झाली, ग्रामीण उद्योगधंदे बुडाले, जमिनीची मालकी विषम झाली, अनेक लोक साधनविहीन आणि भुकेकंगाल झाले. इंग्रजी सत्तेनें आपल्या सुखसोयीच्या दृष्टीनें जी राज्यकारभाराची घडी बसविली, त्यांतून नव्या जमीनदाऱ्या निर्माण झाल्या. देशाच्या कांहीं प्रदेशांत, उदा. उत्तर प्रदेश, बंगाल, बिहार इ. ठिकाणीं, इंग्रजांनीं जमीनदारी प्रथा निर्माण केली. जमिनीची मालकी सरकारकडे आली. जमीन कसणारा आणि सरकार यांच्यामधले मध्यस्थ उत्पन्न झाले. शेतकऱ्याचा कर्ज-बाजारीपणा वाढला आणि यांतून च शेतकऱ्यांना पिळणारी सावकारशाही वाढली. सावकारशाही म्हणजे सावकारांचें राज्य, उत्पादन-साधनांवर आणि शेतकऱ्यांच्या श्रमशक्तीवर सावकारांची मालकी. जमिनी सावकारां-च्या ताब्यांत गेल्या आणि जमीन कसणारा शेतकरी कूळ आणि मजूर बनला. जमिनीच्या विषम वांटणीची ही कुळपरंपरा आहे.

आज भारतांतील जमिनीच्या मालकीचें स्वरूप काय आहे हें, वर जे आंकडे दिले आहेत त्यावरून, स्थूल मानानें समजून येईल. त्यांतून

मालकींत असणारी विषमता सहज दिसून येण्यायोगी आहे. शेतीवर जगणारीं कुटुंबें आणि त्यांचे प्रकार एवढ्यावरून जमिनीची वांटणी बरोबर लक्षांत येणार नाहीं. त्याकरितां जमीन-धारणा-क्षेत्र (Holding), क्षेत्रमान-परत्वें शेतकऱ्यांचे पडणारे गट, त्यांच्याकडे असलेली जमीन आणि एकूण जमीन-क्षेत्राशीं त्यांचें असलेलें प्रमाण हें पहावें लागेल. तें पुढें दिलें आहे :

| क्षेत्र (Holding) | शेतकऱ्यांचें शें. प्रमाण | त्यांचेकडील एकूण क्षेत्र (कोटी एकर) | एकूण क्षेत्राशीं त्याचें शें. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ एकरापेक्षा कमी | १६.८ | .३७ | १.० |
| १ ते २॥ एकर | २१.३ | १.७० | ४.६ |
| २॥ ते ५ एकर | २१.० | ३.६० | ९.९ |
| ५ ते १० एकर | १९.१ | ६.५० | १७.६ |
| १० ते २५ एकर | १६.२ | १२.५० | ३२.५ |
| २५ ते ५० एकर | ४.२ | ७.०३ | १९.० |
| ५० एकरापेक्षा जास्त | १.४ | ५. ६ | १५.४ |
| | | ३७.३० | |

वरील कोष्टकावरून ज्यांच्याकडे जमिनी आहेत अशा लोकांचें परस्पराशीं प्रमाण दिसून येतें, परन्तु या व्यतिरिक्त शेतीवर निर्वाह करणारीं पण जमिनीचे मालक नसणारीं अशीं १॥ कोटी कुटुंबें या देशांत आहेत. या शेत-मजुरांची संख्या सारखी वाढत गेली आणि त्या मानानें मालक अगर कूळ म्हणून शेत जमीन करणारांची संख्या कमी कमी होत गेली. सन १९२१ मध्यें दर हजारी शेतकऱ्यांत २९१ शेतमजूर होते, त्यांची प्रत्यक्ष संख्या २ कोटी १० लक्ष होती. १९३१ सालीं दर हजारीं शेतकऱ्यांत शेत-मजुरांचें प्रमाण ४०७ होतें, म्हणजे त्यांची प्रत्यक्ष संख्या ३ कोटी ३५ लक्ष झाली होती.

या सर्व परिस्थितीचा समाजजीवनावर असा परिणाम झाला कीं जमीन कसणारा शेतकरीवर्ग (बहुतांशीं कूळ आणि मजूर) आणि

बिनकणसारा गैरहजर मालकवर्ग असे दोन वर्ग निर्माण झाले. यांत पहिल्या वर्गाच्या जीवावर ऐतखाऊपणानें दुसरा वर्ग जगूं लागला. कसणाऱ्या वर्गाला त्याच्या मेहनतीचें फळ पदरांत पडलें पाहिजे तें मिळेनासें झालें. कूळ असलें तरीसुद्धां त्याची हि स्थिति जवळ जवळ मजुरासारखी राहिली. शिवाय जमीनमालक अशांना आपल्या घरगुती कामाकरितां राबवून घेत तें वेगळेंच. यांतून च हळूं हळूं गैरहजर जमीनमालकाविषयीं कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या व मजुरांच्या मनांत शोषणामुळें, अन्यायामुळें, अढी उत्पन्न झाली असल्यास नवल नाहीं. श्री. जवाहरलाल नेहरू आपल्या आत्मचरित्रांत एके ठिकाणीं लिहितात :

"त्यांच्या दुःखांच्या अगणित गोष्टी मीं ऐकल्या, कंबर मोडून-टाकणाऱ्या त्यांच्या कर्जांची हकीकत ऐकली, त्यांच्याकडून उकळल्या गेलेल्या नजराण्यांच्या गोष्टी समजल्या, शेतीवरून आणि झोपड्यांमधून त्यांना जबरदस्तीनें हुसकून लावीत असल्याचीं व ते भरडले जात असल्याचीं वर्णनें ऐकलीं. त्यांच्या चहूंबाजूला गिधाडें घिरट्या घालीत होतीं. जमीनदारांचे गुमास्ते, सावकार, पोलीस वगैरे सर्व, त्यांना बरोबर आपली शिकार बनवीत होते. दिवसभर अविश्रांत मेहनत केल्यानंतरसुद्धां आपण जें कांहीं पैदा केलें आहे तें आपलें नाहीं असें किसानाला दिसून येत होतें, त्यांच्या नशिबीं केवळ जोडे, लाथाबुक्क्या, शिव्या आणि उपासमार होती; आमच्या शेतकऱ्याच्या भयभीत, निराशापूर्ण आणि खोल गेलेल्या डोळ्यांहून अधिक दुःखद दृश्य कुठें हि पहायला मिळायचें नाहीं. खरोखर आमच्या शेतकऱ्यांनीं वर्षानुवर्षें किती ओझें आपल्या डोक्यावर वाहिलें आहे बरे !"

[ An Autobiography–Jawaharlal Nehru, page 52. ]

तथापि भारतांतील हा शेतकरी-समाज एकप्रकारें सोशीक आणि स्वभावानें दबून राहणारा असल्यामुळें त्यानें बंड केलें नाहीं इतकें च.

इंग्रजी अमदानींत वारसा-हक्काच्या कायद्यानें मालमत्तेच्या विभागणी-ची सोय करून दिल्यामुळें विभक्त कुटुंब-पद्धति वाढली आणि जमीन-वाल्या वर्गांत कुटुंबाच्या फारकतीबरोबर वांट्याला आलेल्या जमिनीची हि

फारकत होऊं लागली. त्यामुळें जमिनीचें विभाजन होऊन जमिनीचे तुकडे झाले. त्यामुळें शेतीची कसणूक, उत्पादनाचें प्रमाण, शेतकऱ्यांचा उत्साह, हे सर्व बिघडून गेले. ही स्थिति बिहार, पंजाब, बंगाल, उत्तरप्रदेश या जमीनदारीप्रधान प्रदेशांची च आहे असें नाहीं तर मुंबई-मद्राससारख्या रयतवारी पद्धति असलेल्या प्रदेशांत हि आहे. भारतांतील शेतज़मिनीचें सरासरी धारणाक्षेत्र ( Holding ) हें त्या मानानें फार कमी आहे. शेतीची चौकशी करणाऱ्या रॉयल कमिशननें १९२८ सालीं हें प्रमाण पुढीलप्रमाणें दिलें आहे : "मुंबई १२.२ एकर, पंजाब ९.२ एकर, मध्यप्रदेश ८.५ एकर, मद्रास ४.९ एकर, उत्तर प्रदेश ३.१ एकर, आहे." (Royal Commission on Agriculture in India, page 9.) याहून अगदी अलीकडे 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' नें जी माहिती गोळा केली आहे त्यावरून असें दिसून येतें कीं ओरीसांतील जमीन-धारणा-क्षेत्रापैकीं ६० टक्के आणि उत्तर प्रदेशांतील जमीन-धारणांपैकीं ६६ टक्के धारणा-क्षेत्रें (Holdings) ३ एकरांच्या खालचीं आहेत, तर मद्रासमध्यें शेंकडा जवळ-जवळ ८४ धारणा-क्षेत्रें (Holdings) पांच एकरांच्या खालचीं आहेत." आणि "सरकारी अंदाजावरून असें उघडकीस आलें आहे कीं मुंबई राज्यांत धारणा-क्षेत्रांची म्हणजे खात्यांची संख्या १९०४–०५ मध्यें जी १२,७२,१०२ होती त्याहून १९४३–४४ मध्यें २२,७१,००० पर्यंत ती वाढली आहे." १९४५ सालीं नेमलेल्या दुष्काळ-चौकशी-समितीला असें दिसून आलें कीं सर्व प्रान्तांमध्यें खात्याचे वाढते तुकडे करण्याकडे प्रवृत्ति वाढत आहे. २५ एकरांचें खातें १२५ अलग अलग खात्यांत विभागलें गेलें आहे अशी उदाहरणें कांहीं कमी नाहींत." [ India at a Glance, page 256 ]

जमिनीच्या होणाऱ्या विषम वांटणीच्या जोडीला दुसरी एक अहितकारक घटना हि घडली. ती म्हणजे कुटीर व ग्रामीण अुद्योगधंदे जवळ जवळ बुडाले. शेतकऱ्याला जोडधंदा राहिला नाहीं. त्यामुळें शेतीवर अवलंबून असणारांची

संख्या अधिकाधिक वाढू लगली.* ज्यांना शक्य होतें त्यांनी शहरचा रस्ता धरला व नव्या निघत असलेल्या उद्योग-धंद्यांत ते मजूर बनले. पण तेथें हि मर्यादाच होती. एका प्रमाणाबाहेर शहरांत हि कोठें रोजगार होता ? तेव्हां शेकडों ग्रामीण स्त्रीपुरुषांना त्याच टीचभर जमिनीच्या तुकड्यांवर किंवा हंगामी मोलमजुरीनें मिळेल त्यावर अवलंबून राहावें लागलें. त्यामुळें लाखो लोक बेकार व अर्धपोटी राहिले.

स्वराज्यानंतर हि वरील परिस्थितींत विशेष फरक पडलेला दिसत नाहीं. आज हि शेतीच्या व्यवसायावर जगणाऱ्या ६॥ कोटी कुटुंबांपैकीं १॥ कोटी कुटुंबांना जमीन च नाहीं. या कुटुंबांची आज सर्वांत अत्यंत वाईट अशी दशा आहे. राष्ट्राचें सरासरी उत्पन्न दरडोई २८१ रुपये आहे. औद्योगिक मजुराचें दरडोई उत्पन्न २६५ रुपये आहे, तर शेतमजुरांचें दरडोई उत्पन्न १०९ रुपये आहे. अशा रीतीनें आज भूमिहीन मजूर सर्वांत दरिद्री आहे. आर्थिक दृष्टीनें जसे ते नागविलेले आहेत तसे सामाजिक अन्यायानें ते पीडलेले–दबलेले आहेत. 'अखिल भारतीय खेतीहर मजदूर जाँच समिती'नें जो रिपोर्ट तयार केला आहे, त्यामध्यें खालील आंकडे पहावयास सांपडतात :

"या शेतमजूरांमध्यें ११ टक्के क्षत्रिय, ७.४ टक्के मुसलमान, २.४ टक्के ब्राह्मण, १.७ टक्के बनिये, १.८ टक्के अन्य जातीचे लोक आहेत, आणि ६६.७ टक्के हरिजन–आदिवासी आहेत."

एवढा मोठा समाजांतील वर्ग भुकेकंगाल, मागसलेला, अज्ञ व पीडित ठेवून सामाजिक स्वास्थ्य कधीं हि निर्माण होणार नाहीं. कारखान-

---

* खालील आंकड्यावरून तें दिसून येईल :

| साल | प्रमाण |
|---|---|
| १८८१ | ५८.०० |
| १८९१ | ६१.०६ |
| १९०१ | ६६.०५ |
| १९२१ | ७१. ६ |
| १९३१ च्या सुमारास | ७३. ९ |

दारींतील मजूर एकत्र काम करतात, तें संघटित होऊं शकतात, सामाजिक परिस्थिति जाणण्याची कुवत कांहीं अंशीं त्यांच्यामध्यें येते. परन्तु खेडोपाडीं पसरलेला हा शेतमजूर विखुरलेला असल्यामुळें आणि निरक्षर व सर्वस्वीं पराधीन असल्यामुळें तो संघटित होऊं शकलेला नाहीं, आणि त्याला वाचा हि फुटलेली नाहीं. समाजाच्या खालच्या थरांत दडपल्या गेलेल्या अशा मजुरांचा प्रश्न स्वराज्यानंतर डोळचांआड करतां येणार नाहीं. या प्रश्नाला समाधानकारक उत्तर शोधलें पाहिजे.

स्वातंत्र्योत्तर काळांत जी लोकजागृति झाली आहे व आपल्या राज्यघटनेनें ज्या आकांक्षा जनतेमध्यें निर्माण केल्या आहेत त्या लक्षांत घेतल्या तर या प्रश्नाची किती निकड आहे याची कल्पना येईल.

अलाहाबाद येथे १९५४ सालच्या भारतीय शेती–अर्थशास्त्र–संस्थेच्या १५ व्या वार्षिक अधिवेशनापुढें अध्यक्ष म्हणून भाषण करतांना प्रा. श्री. धनंजयराव गाडगीळ यांनीं या जमिनीच्या भुकेसंबंधीं पुढील उद्‌गार काढले होते :

"ग्रामीण-पत-पाहणी (Rural Credit Survey) मध्यें अप्रत्यक्ष रीत्या उपलब्ध झालेला महत्त्वाचा पुरावा ही जमिनीची भूक केवढी आहे हें चांगल्या रीतीनें दर्शवितो. 'तुमची कर्जाची गरज कितीशी आहे व कर्ज मिळाल्यास तें तुम्ही कोणत्या कारणीं लावाल' असे प्रश्न त्या पाहणींत शेतकऱ्यांना विचारण्यांत आले होते. या प्रश्नांना त्यांनीं जीं उत्तरें दिलीं त्यावरून हें चांगलें च स्पष्ट होतें. खालच्या थरांतील म्हणजे गांवांतील शेतकऱ्यांची त्यांच्याकडे असलेल्या शेतीच्या आकारमानाप्रमाणें क्रमवारी लावली असतां खालच्या अर्ध्या थरांतील–शेतकऱ्यांची कर्जाची बरीचशी गरज जमीनखरेदीसाठीं असल्याचें आढळून आलें. त्यांच्या कर्जाच्या एकूण गरजेपैकीं ४० टक्क्याहून अधिक गरज जमीनखरेदीसाठीं होती हें त्यांनीं दिलेल्या उत्तरावरून आढळून येतें. या थरांतील शेतकऱ्यांचा जमिनखरेदीसाठीं झालेला सरासरी प्रत्येकीं खर्च १२ रु. होता तर त्यासाठीं त्यांची कर्जाची सरासरी गरज प्रत्येकीं ३३३ रु. होती. जमीनखरेदी एवढचा अल्पप्रमाणांत होण्याचें कारण कर्जाचा पुरवठा नाहीं हें जेवढें आहे तेवढें च विकत घेण्यास जमीन

हि फारशी उपलब्ध नाहीं हें हि आहे. म्हणून कर्जपुरवठा होऊं शकला असता तर जमिनीची अधिक प्रमाणावर खरेदी झाली असती असें म्हणतां येणार नाहीं. प्रत्येकास आणखी जमीन खरीदावयाची आहे पण खरेदीसाठीं नवी जमीन च उपलब्ध नाहीं. कर्जपुरवठ्याची किती हि सोय केली तरी, अशी परिस्थिति असल्यामुळें, प्रत्येकाला अधिक जमीन खरेदी करणें शक्य होणार नाहीं. तथापि विशेषत: खालच्या थरांतील शेतकरी सर्वांत अधिक महत्त्व जमीनखरेदीस देतो असें यावरून स्पष्टपणें दिसून येतें. 'ग्रामीण पत पाहणीं' अहवालांतील माहितीवरून जमिनीची भूक पुराव्यानिशीं सिद्ध होते.

"ग्रामीण पतपाहणीमध्यें उपलब्ध झालेल्या अन्य माहितीमध्यें बिनशेतकरी वर्गांत ग्रामीण भागांतील शेती न कसणाऱ्या व्यापारी, सावकार, कारागीर व मजूर लोकांचा समावेश होतो. हा वर्ग जरी संमिश्र असला तरी त्यांमध्यें बहुसंख्या कारागीर व मजूर वर्गाची च प्रामुख्यानें होती. या वर्गाची स्थिति खालच्या थरांतल्या ३० टक्के शेतकऱ्यांपेक्षा-सुद्धां हलाखीची होती, असें च आढळून येतें. यावरून भूमिहीन मजुराची व खालच्या प्रतीच्या ग्रामीण कारागीर वर्गाची आर्थिक स्थिति फार च खालावलेली आहे हें च सिद्ध होतें. अशा परिस्थितींत जमिनीचा अगदीं लहान तुकडा मिळाला तरी आपली स्थिति सुधारेल अशी या भूमिहीन वर्गाची साहजिक च भावना होते. व निर्वाहाचे हें खात्रीचें साधन आपणास मिळेपर्यंत आपली स्थिति सुधारणें शक्य नाहीं असें हि त्यांना वाटतें."

जमिनीची भूक किती तीव्र असूं शकते हें शहरवासी कदाचित् समजूं शकणार नाहींत किंवा त्यांना ती जाणवणार नाहीं; परन्तु जगांतल्या मोठ-मोठ्या क्रांत्यांची आणि परिवर्तनांची जन्मदात्री 'जमिनीची भूक' ही आहे ही गोष्ट क्रान्त्यांचा इतिहास जाणणाऱ्यांना माहीत आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 33765 दि: 11/9/61
... 9595 ... नों. दि. 10/1/62

: २ :

## इतर देशांतील भूमिसमस्या व तिचा उकल

(रशिया, पूर्व युरोपचे देश व चीन)

भूमिसमस्येचा विचार करतांना जमिनीच्या न्याय्य वांटणीचा प्रश्न जसा भारतांत महत्त्व पावला आहे तसा च तो जगांतील इतर सर्व देशांमध्यें हि महत्त्वाचा मानला गेला असल्याचें आढळून येईल. राजकीय क्रांति जेथें जेथें घडून आली अशा प्रत्येक देशाला भूसमस्या सोडवणें आवश्यक झालेलें दिसतें. ऐतिहासिक काळांत जमीन मुबलक व माणसें कमी अशी स्थिति होती, तेव्हां ज्याला जशी लागली किंवा गवसली तशी जमीन त्यानें मालकीची केली. राजसत्ता हि अशा लोकांच्या हातीं असल्यामुळें ही मालकी अजरामर झाल्यासारखी झाली. परंतु जसजसा काळ लोटला, लोकसंख्या वाढली, गरजा वाढल्या तसतशी जमिनीची मागणी आणि किंमत दोन्ही वाढली. समाजांत त्यावरून उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, अशा प्रकारचे वर्ग पडले आणि जमिनीच्या मालकीवरून दर्जा ओळखला जाऊं लागला आणि त्याबरोबर च जमीनविषयक झगडे हि वाढले. जमिनीची विषम वांटणी व बेकारांची जमीनविषयक भूक किती स्फोटक होऊ शकते याचें प्रत्यंतर देशोदेशींच्या इतिहासांत सांपडतें. समाजक्रान्तीनंतर युरोप व आशिया खंडातील देशांमध्यें भूमिसमस्या सोडविण्याचे जे भिन्नभिन्न प्रयत्न केले गेले आहेत त्यांचें ओझरतें समालोचन करणें आपल्या अभ्यासाला उपयोगी होईल.

### रशिया

१९१७ सालीं रशियामध्यें झारशाही नष्ट केली जाऊन पहिल्या-प्रथम लोकांचें राज्य आलें, आणि त्यांनीं जमिनीच्या फेरवांटपाची घोषणा केली. त्यापूर्वीं जमिनीची वांटणी खालीलप्रमाणें होती:—

(१) १९ कोटी एकर जमीन ३० हजार मोठ्या जमीनदारांजवळ

(२) २० कोटी एकर जमीन १ कोटी ५ लक्ष गरीब शेतकरी कुटुंबांजवळ.

याचा अर्थ गरीब कुटुंबांजवळ सरासरी १९ एकर जमीन होती, तर एका मोठ्या जमीनदाराकडे सरासरी ५९ हजार एकर जमीन होती. ५० लाख गरीब शेतकरी असे होते कीं ज्यांच्याजवळ २॥ ते ५ एकर जमीन होती. शेंकडा १५ टक्के गरीब शेतकरी असे होते की ज्यांच्यापाशीं कांहींच जमीन नव्हती. *

रशियामध्यें सर्वसामान्य शेतकरी बराच काळ पूर्ण गुलाम आणि कांहीं काळ अर्धगुलाम अशा अमानुष अवस्थेंत जगत आला होता. त्यांच्यांत युगायुगांचा असंतोष धुमसत होता आणि त्यांच्यावर होणाऱ्या जुलुमाची, अन्यायाची चीड त्यांच्या निकटच्या मध्यम वर्गांतील शिक्षित-अर्ध-शिक्षित तरुण वर्गांत वाढत जात होती. गरिबांची पिळवणूक करून त्यावर ऐषआराम करणाऱ्या बड्या जमीनदारांविषयीं आणि जमीनदारांचा हि जमीनदार जो झार त्याच्याविषयीं या तरुणांच्या अंतःकरणांत तीव्र द्वेष निर्माण झाला होता. १९ व्या शतकाच्या मध्यांत कार्ल मार्क्सचें तत्त्वज्ञान साऱ्या युरोपभर पसरलें होतें. या तत्त्वज्ञानाचा अनेक तरुणांच्या भावनाशील अंतःकरणावर परिणाम होऊन त्यांनीं कम्युनिस्ट समाजाचें स्वप्न आपल्या चित्तांत जोपासलें आणि तें प्रत्यक्षांत आणण्यासाठीं त्यांनीं ठिकठिकाणीं क्रांतिकारक उठाव केले. त्यापैकीं एक उठाव रशियामध्यें १९०५ ते ०७ या काळांत झाला. कित्येक जमीनदारांना ठार मारून त्यांनीं त्यांच्या जमिनी, धान्य, गुरें ढोरें, आणि शेतीचीं औजारें हिसकावून घेतलीं. परन्तु झारनें हा उठाव दडपून टाकला. मोठे मोठे कम्युनिस्ट पुढारी देशाच्या बाहेर पळाले. झारच्या सरकारनें भांडवलवादी तत्त्वावर मोठे मोठे शेतीचे 'कारखाने' चालविण्याला प्रोत्साहन दिलें. मोठमोठ्या श्रीमंत शेतकऱ्यांनीं (कुलकांनीं) हजारो एकरांचे फार्म्स बनविले, सरकारकडून त्यांना उत्तम जमीन, निरनिराळ्या सवलती

*How the agrarion problem has been solved in the U. S. S. R.-D. S. Kolpakov-page 9, published by the Information Department of the U. S. S. R.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
३३७६६ नि. निबंध

आणि कर्जें मिळालीं. गरीब शेतकरी मात्र बरबाद झाला, त्याला आपली जमीन नाममात्र रक्कम घेऊन बड्या जमीनदारांना (कुलकांना) विकावी लागली आणि कामाच्या शोधार्थ गांवें सोडून शहरांत जावें लागलें. पहिल्या महायुद्धांत रशियाचे पुष्कळ लोक रणांगणावर कामास आले. शेतकरी कुटुंबांत काम करू शकणारे असे धष्टपुष्ट लोक राहिले नाहींत, शेंतीचें क्षेत्रफळ घटलें आणि पीक हि कमी झालें. देशांत हाहा:कार माजला, झारच्या विरुद्ध मजूर, शेतकरी आणि बुद्धिजीवी मध्यमवर्ग यांच्यामध्यें द्रोह उत्पन्न झाला, आणि शेवटीं या द्रोहांतून विद्रोह पैदा होऊन झारशाही उलथली गेली.

परन्तु सर्व सत्ता केवळ कम्युनिस्टांच्या हातीं आली असें झालें नाहीं. त्यामुळें झारशाही गेली तरी शेतकऱ्यांची जमिनीची भूक भागली नाहीं. बोल्शेविक पक्ष शेतकऱ्यांना–विशेषेंकरून शहरांतील मजुरांना–संघटित करीत होता. त्यांनीं मजूर, मुक्त सैनिक आणि शेतकरी यांची सोव्हि-एटस् स्थापन केली. शेतकरी–मजुरांची खेड्यांत व शहरांत छोटीं छोटीं दलें हि बांधलीं. या सर्वांतून बोल्शेविकांची एक शक्ति जमा होत चालली. ठिकठिकाणीं शेतकऱ्यांच्या कमिटयांनीं, जमिनदारांच्या रियासतीवर आपला ताबा केला. जुने कारभारी (मॅनेजर) काढून टाकून आपल्या लोकांतून नवे कारभारी ( मॅनेजर ) नेमले, आणि या रियासतींची व्यवस्था पाहण्यासाठीं आपल्या कमिटया बनविल्या. यावेळचें रशियाचें सरकार तात्पुरतें होतें. त्यानें लष्कर पाठवून शेतकऱ्यांचा आणि कम्युनिस्टांचा हा उपक्रम मोडून काढण्याचा प्रयत्न केला. परन्तु अनेक ठिकाणीं सैनिक च लोकांना जाऊन मिळाले, आणि कम्युनिस्ट पार्टीच्या नेतृत्वाखालीं या सरकारचा पराभव होऊन सोव्हिएटस्च्या यूनियननें साऱ्या रशियाची सत्ता किसान-कामगारांच्या नांवावर आपल्या हातीं घेतली.

लगेच दुसऱ्याच दिवशीं सोव्हिएट कॉंग्रेसनें जमिनीसंबंधीं प्रस्ताव करून जमीनदारांचा मालकी हक्क कसला हि मोबदला न देतां रद्द करून टाकला. देशांतल्या सर्वच्या सर्व जमिनीचें राष्ट्रीयीकरण झालें. जमीन विकणें किंवा खरीदणें बंद झालें. जमीनदारांच्या, धार्मिक मंदिरांच्या आणि राजघराण्यांच्या जमिनी राबणाऱ्या किसानांना मोफत दिल्या गेल्या. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें जमीन घेण्याचा हक्क मिळाला.

*जमिनीसंबधीं जें मूलभूत धोरण किंवा सिद्धांत ठरविण्यांत आले त्यांत–

(१) सर्व जमीन साऱ्या जनतेची संपत्ति मानली जावी, कसणारे असतील त्यांनीच तिचा उपयोग करावा.

(२) कसणाऱ्या शेतकऱ्यांमध्यें जमिनीचें वांटप करण्यावर नियंत्रण स्थानिक (Soviet) त्याचप्रमाणें मध्यवर्ती सरकारी संस्थेनें करावें.

(३) जमीन शेतकरी किती कसूं शकेल यावर किंवा त्याच्या चरितार्था-करितां किती आवश्यक आहे तें पाहून तितकी दिली जावी.

(४) सर्व जमीन वेळोवेळीं पुन्हा वांटीत जावी.

(५) जमिनीच्या पट्ट्याचें रूप काय असावें–कौटुंबिक, मोठें फार्म, सामुदायिक कीं सहकारी हें त्या त्या गांवच्या (Soviets) च्या मर्जीवर सोंपविण्यांत यावें.

क्रांतीपूर्वी शेतकऱ्यांच्या वापरांत एकूण ३६॥ कोटी एकर जमीन होती, क्रांतीनंतर जमिनीच्या बाबतींत जो प्रयत्न केला गेला, त्यामुळें शेतकऱ्यांना आणखी ४८ कोटी एकर जमीन मिळाली. परंतु शेतकऱ्यांना आपल्या मर्जीअनुरूप जमीन करण्याचें स्वातंत्र्य फार काळ लाभलें नाहीं. सोव्हिएट सरकारनें उत्पादन खूप मोठ्या प्रमाणावर वाढविण्यासाठीं शेतींत 'कारखानदारी' आणण्याचें योजिलें. त्याकरितां लहान लहान जमिनी त्यांनी खतम केल्या, व हजारो एकरांचे फार्मस् बनविले. स्वतंत्रपणें जे जमिनी कसत होते, त्यांना या मोठ्या फार्मस्वर कामाला लावले, आणि ज्यांनीं या व्यवस्थेला विरोध केला त्यांची त्यांनीं अक्षरशः कत्तल केली. इंग्रजींत एक म्हण आहे कीं, कुत्र्याला अगोदर शिवी द्यायची आणि मग त्याला गोळी घालायची. त्याप्रमाणें जमिनीवर प्रेम करणाऱ्या आणि जमिनीची मालकी न सोडूं इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांवर 'कुलक' 'प्रतिक्रांतिवादी' वगैरे आरोप करून त्यांना नेस्तनाबूत करण्यांत आलें. या मोहिमेंत किती हजार, नव्हे लाख शेतकरी मारले गेले याची नक्की गणती कोठें च नाहीं.

*How the Agrarian problem has been solved in the U. S. S. R. –D. S. Kolpakov, p. 17-18.

रशियाच्या औद्योगीकरणाकरितां शेतीपासून होणाऱ्या उत्पादनाचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें सामुदायिक शेतीचे नाना प्रयोग सोव्हिएट सरकारनें सक्तीनें आतांपर्यंत अमलांत आणले, परंतु कम्युनिस्ट शिक्षणप्रणालींत चार पिढ्यांना तयार करूनसुद्धां शेतकरीवर्ग असंतुष्ट असल्याचें आणि त्यांच्या हातून आवश्यक तितकें उत्पादनाचें काम होत नसल्याचें सरकारला आढळून आलें आहे. नांगरट, कुळवण, पेरणी, कापणी अशा क्रियाकरितां सामुदायिक उठावणी करण्याच्या दृष्टीनें सरकारला, जनतेला नित्य नवे आदेश देऊन, सरकारी मोहिमा ( Compaigns ) काढाव्या लागतात, शेतावरच्या अवजारांची, धान्याची, बियाणाची चोरी होते, यावरून सक्तीची सामुदायिक शेती शेतकऱ्यांत आपलेपणा उत्पन्न करण्याला कारणीभूत झाली आहे असें दिसत नाहीं. इकडे इज्रायेलमध्यें पाहिलें तर स्वेच्छेनें बनविलेले किबूथ्स इ. मध्यें अशा चोऱ्यांचे वगैरे प्रकार मुळींच आढळत नाहींत, ही एक लक्षांत घेण्यासारखी गोष्ट मानली पाहिजे. शेतकरी हा केवळ एक धंदेवाला नाहीं. तो जमिनीचे लेकरूं आहे, ही गोष्ट निसर्ग अनेक विकृतींतून हि प्रकट करीत असतो. रशियामध्यें 'कुलक' नाहींसे झाले तरी शेतकऱ्यांची स्वतःच्या जमिनीची भूक नाहींशी झाली नाहीं. सोव्हिएट सरकारला या भुकेपुढें आतां नमावें लागत आहे आणि अधिकाधिक नमावें लागेल असें दिसत आहे.

## पूर्व युरोपचे देश

पूर्व युरोपचे देश सोव्हिएट रशियाला लागून च आहेत. ते आज, युगोस्लाव्हिया वगळून, रशियाचें 'उपग्रह' (Satellites) समजले जातात. युगोस्लाविया १९४८ सालापर्यंत सोव्हिएट रशियाशीं संबद्ध होता. त्यानंतर तो आपली धोरणें स्वतंत्रपणें आंखू लागला आहे. पूर्व युरोपांतील बाकीचे पोलंड, रुमानिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया इ. देश कम्युनिस्ट राजवटीचे आहेत आणि अंतिम सर्व सत्ता तेथें सोव्हिएट रशियाची चालते. कारण "कॉमिनफॉर्म" (Cominform) या जागतिक संघटनेमधील हे देश आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोप खंडात देशांची जी घडण आणि वांटणी झाली त्यांत या देशांवर रशियानें आपली दोस्ती एक प्रकारें लादली आहे. आणि

यापैकीं प्रत्येक देशांत तेथील कम्युनिस्टपार्टी व एक सर्वाधिकारी राज्य-सूत्रें चालवीत असतो.

हे सर्व देश शेतकी-प्रधान आहेत. सर्व अर्थरचना शेतीच्या उत्पादनावर आधारलेली आहे. बहुसंख्य लोक खेड्यांत राहतात, खेडूत आहेत, शेतकी हा त्यांचा केवळ धंदा नाहीं, त्यांचें जीवन आहे. जमीन हें केवळ उपजीविकेचें साधन नाहीं, ती आई आहे. आईप्रमाणें च ते तिच्यावर प्रेम करतात. शेकडों वर्षें जमिनीच्या मालकीपासून ते वंचित झाले असले तरी जेव्हां केव्हां एकदां मालक म्हणून त्यांच्या हातीं जमीन आली तेव्हां त्या जमिनीची माती हातांत घेऊन ते भावनावश होऊन ओरडले : "ही माझी जमीन !" अमेरिकेंत आणि पश्चिम युरोपच्या भागांत जमीन ही एक देवघेवीची, व्यापाराची वस्तु मानली गेली असेल, पण पूर्व-युरोपांत शेतकरी जमीन विकणें हें अकुलीनपणाचें समजतो. ज्याच्यापाशीं जमीन आहे तो सुरक्षित आहे असें भारताप्रमाणें तिकडे हि लोकांत समजलें जातें. भारताप्रमाणें च तिकडे हि लोक इतर धंद्यांतून जी मिळकत होईल ती जमिनीत घालत असत.

जमिनीची भूक पूर्व-युरोपच्या शेतकऱ्यांत आज हि मोठ्या प्रमाणावर आहे. परंतु या निरनिराळ्या देशांत रशिया माणेंच सरंजामशाही होती आणि बहुतेक जमीन या बड्यांच्या च मालकीखालीं होती. शेतकरी हा बहुतेक गुलामच राहत आला होता. फार थोडी जमीन शेतकऱ्याच्या खाजगी मालकीची होती. १९२० ते ३० मध्यें अल्बेनिया आणि हंगेरी सोडून निरनिराळ्या देशांतील सरकारांनीं मोठमोठ्या जमीनदाऱ्या मोडून टाकून लहान लहान शेतकऱ्यांना जमिनी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला.

पूर्व-युरोपांत काम करणाऱ्या कम्युनिस्टांना या जमिनीच्या भुकेची चांगली च जाणीव होती. जेथें जेथें त्यांना जमीन काढून घ्यावयास मिळाली तेथें तेथें त्यांनीं ती काढून घेतली. शेतजमिनीची शेतकऱ्यांकडे असलेलीं क्षेत्रें २० ते ५० हेक्टर म्हणजे ५० ते १२५ एकरांचीं निरनिराळ्या देशाप्रमाणें निरनिराळीं होतीं. यावरील सर्व जमिनी सार्वजनिक जमीन-फंडांत सामील करण्यांत आल्या. गेल्या महायुद्धांत जे लोक जर्मन सैन्या-

बरोबर पळून गेले त्यांनीं टाकून दिलेल्या जमिनीसुद्धां या 'राष्ट्रीय जमीन फंडां'त सामील करण्यांत आल्या. धार्मिक संस्थांच्या आणि राजांच्या जमिनी भूमिहीन व अल्पजमीनवाल्या शेतकऱ्यांत वांटून देण्यांत आल्या. कांहीं क्षेत्र सरकारी फार्मकरितां बाजूला काढण्यांत आलें. जमिनीचे प्रथम तुकडे तुकडे करून च व्यक्तींना मालकी हक्कानें ते वांटले गेले, याचें कारण अर्थात् राजकीय होतें. पूर्व-युरोपच्या या सर्व देशांत जमिनीबाबतच्या सर्व योजना रशियाच्या च लागू करण्यांत आल्यामुळें पुढें या लहान-लहान जमिनींचें "समाजीकरण" (Socialisation) झालें. तें करतांना सर्व पद्धति आणि प्रकार रशियांतल्या प्रमाणें च अंमलांत आले. त्यामुळें जमिनीची मालकी व्यक्तिगत शेतकऱ्याचीं नष्ट होऊन त्यांचीं शेतें मोठ्या क्षेत्रांत समाविष्ट करण्यांत आलीं आणि फिरून ते "आपल्या सोव्हिएटचे" शेतमजूर बनले.

पूर्व-युरोपांतील कम्युनिस्टांच्या कार्यक्रमांत दाखल झालेल्या या सर्व देशांतील शेतकरी असंतुष्ट आणि अशान्त आहेत, त्यांची असंतुष्टता आतांपर्यंत मधूनमधून होणाऱ्या उठावणींतून व्यक्त झाली आहे. परन्तु ते सर्व उठाव जबरदस्त शक्ति वापरून रशियाच्या साह्यानें दडपून टाकण्यांत आले आहेत. एक युगोस्लावियानें मार्क्सवादी राहून सुद्धां रशियापासून आपला सुभा सवता केला, आणि जेव्हां तेथील 'पार्टीझन' पक्षाला व त्यांचा अधिनायक मार्शल टिटो याला शेतकऱ्यांची जमिनीविषयींची अदम्य भूक अनावर आढळून आली तेव्हां समाजीकरण (Socialisation) केलेल्या शेतीचें पुन्हां शेतकऱ्यांमध्यें त्यांनीं वाटप केलें, सामुदायिक शेती ऐच्छिक केली आणि नियोजित व्यक्तिगत शेतीकडे ते वळले.

## युगोस्लाविया

युगोस्लावियांत १९४५ मध्यें जमिनीवर २५ हेक्टरचे म्हणजे जवळ जवळ ६२॥ एकरांचें सीलिंग घालण्यांत आलें. त्यांतून जी ८ टक्के जमीन सरकारच्या हातीं आली त्यापैकीं केवळ २.६ टक्के जमिनीवर च सरकारी शेती होऊं शकली. सीलिंगमुळें हातीं आलेल्या जमिनीपैकीं ८० टक्के जमीन गरीब व भूमिहीन शेतकऱ्यांना वांटण्यांत आली. सामुदायिक आणि सहकारी

शेतीचा प्रचार मात्र सुरू होता. परंतु त्यांत फारसे शेतकरी सामील झाले नाहींत. मध्यंतरीं, म्हणजे १९४८ ते ५३ या काळांत, 'पेझंट वर्किंग को-ऑपरेटिव्हज्' ( शेतकरी सहकारी मंडळ्या ) काम करीत होत्या, अनेक लोकांना या समित्यांमध्यें (को-ऑपरेटिव्हज्‌मध्यें) दाखल होण्याची सरकारकडून सक्ती करण्यांत आली, पण याचें कारण राजकीय नसून देशांत अन्नाचा भयंकर तुटवडा पडला होता आणि इतर देशांतून हि धान्य मिळणें असंभाव्य वाटत होतें म्हणून देशांतल्या देशांत सामुदायिक कसणुकीनें धान्य-निर्मितींत वाढ होईल अशा आशेनें ही सक्ती करण्यांत आली होती. अनुभव मात्र आशादायक आला नाहीं. शेतीची परिस्थिति सुधारली नाहीं, पशुसंख्या वाढली नाहीं, उत्पन्न मात्र घटलें. १९५० मध्यें देशांत मोठा दुष्काळ पडला, आणि अमेरिकेनें युगोस्लावियाला धान्याची मदत केली. त्यानंतर समित्यांचें ( निरनिराळ्या कोऑपरेटिव्हज्‌चें ) आंदोलन थांबविण्यांत आलें; असलेल्या समित्यांना अधिक कार्यक्षम बनविण्याचें ठरविण्यांत आलें, त्याकरितां त्यांना कांहीं सवलती देण्यांत आल्या, तरीहि परिस्थिति सुधारली नाहीं. शेवटीं १९५३ च्या सुरुवातीला या समित्यांचें विसर्जन करण्यांत आलें. फक्त सहकारी जमिनी करणाऱ्यांच्या समित्या ठेवण्यांत आल्या, बाकीच्यांना आपली जमीन समितीमधून काढून घेण्याचाअ धिकार मिळाला. १९५१ सालीं सीलिंगमध्यें फरक करून ते २५ एकरांवर (१० हेक्टरवर) आणण्यांत आलें होतें, पण यांतून उपलब्ध झालेली जमीन व्यक्तींना न वाटतां जुन्या-नव्या सामुदायिक संस्थांना देण्यांत आली.

आज युगोस्लावियांत व्यक्तिगत शेती करणारांची संख्या जास्त आहे आणि त्यांच्या जवळ शे. ९० टक्के जमीन आहे. या व्यक्तिगत शेतकऱ्यांपैकीं सुमारे शे. ७० टक्के शेतकरी परस्पर–सहायकारी मंडळांचे (Service Co-operatives) सभासद आहेत. आज व्यक्तिगत शेतकऱ्यांजवळ जी जमीन आहे, तिचें प्रमाण खालीलप्रमाणें आहे :

| | होल्डिंगची संख्या | क्षेत्रफळ(१००० हेक्टरांत) |
|---|---|---|
| २ एकराखालीं | ४९८,६२० | ८३१ |
| २ ते ५ एकर | ९३३,९३६ | ३३२२ |

| | होल्डिंगची संख्या | क्षेत्रफळ(१००० हेक्टरांत) |
|---|---|---|
| ५ ते ८ एकर | ३८५,२२९ | २५२६ |
| ८ एकरांच्यावर | ३१७,६१० | ४२५५ |

यावरून* असें दिसेल कीं ⅔ शेतकऱ्यांजवळ १२ एकरांपेक्षां कमी जमीन आहे. बऱ्याच लोकांजवळ ५ एकरांपेक्षां कमी जमीन आहे. जमिनीचें उत्पादन फारसें वाढत नाहीं, तरी हि शेतकऱ्यांची व्यक्तिगत कसणूक युगोस्लावियांत अनुभवाअंतीं कायम ठेवण्यांत आली आहे. आणि तरी युगोस्लाविया मार्क्सवादी आहे !

## चीन

चीन हा भारताचा शेजारी देश आहे, पूर्वेकडच्या देशांत लोकसंख्येच्या दृष्टीनें भारताचा तो वडील भाऊ शोभतो. भारताप्रमाणें च तेथील संस्कृति ही शेतकरी संस्कृति आहे. भारताप्रमाणें च तेथेंहि सरंजामशाही व जमीनदारी मोठ्या प्रमाणांत बरा च काळ होती. भारताप्रमाणें च येथील सर्वसामान्य शेतकरी दडपलेला, पिळलेला, दरिद्री आणि अज्ञानी होता. जमिनीची भूक येथें हि तीव्र होती. आपली गुलामी झुगारून देण्यासाठीं येथील शेतकऱ्यांनीं पूर्वी अनेक वेळां उठाव केले होते. कांहीं वेळां त्यांना थोडेंफार यश आलें होतें. शेवटीं डॉ. सन्-यत्-सेन यांच्या नेतृत्वाखालीं तुंग-येंग-हुओ पक्षानें प्रचंड प्रमाणावर उठावणी करून चीनची राजसत्ता १९११ मध्यें मोडून काढली आणि 'लोकसत्ताक राज्य' स्थापन केलें. पुढें डॉ. सन्-यत्-सेन यांनी "कुओमिंगटांग" या नव्या राष्ट्रीय पक्षाची स्थापना केली. कम्युनिस्ट पक्षाचा १९२१ सालीं चीनमध्यें उदय होऊन तो 'कुओमिंगटांग' बरोबर काम करूं लागला. डॉ. सन्-यत्-सेन यांच्या मृत्यूनंतर चँग कै शेक यांनीं कुओमिंगटांग पक्षाची सत्ता बळकट करतांना कम्युनिस्ट पक्षाला नामोहरम करण्याचा प्रयत्न केला, यांतून बराच काळपर्यंत कम्युनिस्ट व चँग-कै-शेक ची राजसत्ता यांच्यामध्यें अंतर्गत यादवी युद्ध माजलें. शेवटीं १९४९ मध्यें कम्युनिस्टांचा विजय होवून चँगला तायवान (फोर्मोसा) या बेटांत पळून जावें लागलें.

---

* (आदर्श समाज-रचनेच्या शोधांत, युगोस्लाविया व इजरायल) –रा. कृ. पाटील, पान ६३.

या सबंध यादवीयुद्धाच्या काळांत कम्युनिस्ट पक्षानें जेवढा जेवढा प्रदेश काबीज केला तेथें तेथें आपली सत्ता स्थापन करतांना जमिनीच्या प्रश्नाला "आदिमहत्त्व" दिलें आणि त्यांनीं ठरविलेल्या कार्यक्रमाप्रमाणें जमिनीची फेरवांटणी करण्यास सुरुवात केली. कम्युनिस्ट क्रांति होत असतांना व झाल्यानंतर मावत्से तुंगनें आपल्या देशांतील भौगोलिक, सांस्कृतिक व आर्थिक रचनेचा सूक्ष्म अभ्यास करून चीनचा शेतकरी वर्ग हाच क्रांतीचा अग्रदूत होऊं शकेल असें ठरविलें होतें आणि त्यानें प्रारंभापासून त्यासंबधींची कांटेकोर बारीकसारीक तपशीलासह तयारी चालविली होती. शिक्षण व प्रचार हीं त्यानें आपल्या कार्यपद्धतींतील प्रमुख साधनें ठेवलीं होतीं. त्याचबरोबर खेड्यांतल्या गरीब वर्गाची सेवा हें हि त्यानें आपलें प्रभावी साधन केलें होतें. या कार्यक्रमामुळें आतांपर्यंत गांजल्या गेलेल्या शेतकरीवर्गावर फार अनुकूल परिणाम होऊन त्या त्या भागांत कम्युनिस्टांचे पाय कायमचे रोवले गेले. या शेतकरीवर्गामधूनच त्यांनीं आपल्याला लागणारे कार्यकर्ते आणि सैनिक तयार केले आणि कम्युनिस्ट-क्रांति पसरवली.

"लोकांची प्रजासत्ताक सर्वाधिकारशाही" ( People's Democratic Dictatorship नांवाच्या आपल्या पुस्तकांत माओनें लिहिलें आहे कीं "शेतकऱ्याचें मन तयार करणें हा मोठा प्रश्न आहे. शेतकऱ्याची अर्थव्यवस्था विखुरलेली आहे. सोव्हिएट युनियनच्या ( रशियाच्या ) अनुभवाप्रमाणें शेती समाजाच्या मालकीची होण्याकरितां फार दीर्घकाळ आणि काळजीपूर्वक काम करण्याची आवश्यकता असते. शेती समाजाच्या मालकीची झाल्यावांचून संपूर्ण आणि स्थिर समाजवाद स्थापन होणार नाहीं. आणि शेतीचें हें समाजीकरण पार पाडण्याकरितां सरकारने आपल्या मालकीचे शेतीउद्योग हा प्रमुख घटकावयव धरून त्यावर एक शक्तिशाली अुद्योग वाढविला पाहिजे, लोकांच्या प्रजासत्ताक सर्वाधिकारसत्तेनें देशाच्या औद्योगीकरणाचा प्रश्न पायरीपायरीनें सोडविला पाहिजे.*" देशाला उद्योगप्रधान बनविल्यावांचून

* Agrarian policy of The Chinese Communist Party
-Chuo Kuo Chun, page 92.

देशाचें भांडवल व जीवनमान वाढणार नाहीं अशीच, भारतीय लोकशाहीच्या नियोजन-नीतीप्रमाणें, चीनच्या कम्युनिस्ट पक्षाची नीति होती. आणि त्याकरितां, म्हणजे भांडवलाचा संचय आणि उत्पादक साधनांच्या (यंत्रें इ. च्या) आयातीसाठीं देशांतील मालाची निर्यात वाढविणें ही प्रक्रिया चालविण्याकरितां, देशाच्या शेती-धंद्यानेंच मुख्यत्वेंकरून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें हा सारा भार उचलला पाहिजे असें पक्षानें ठरविलें होतें.* विषम जमीनधारणेपासून उत्पादन-वाढ साधत नाहीं, त्याकरितां जमिनीची कसणाऱ्यांमध्यें वांटणी करून दिली पाहिजे या निष्कर्षावर येऊन माओच्या नेतृत्वाखालीं कम्युनिस्ट पक्षानें जमीनदार वर्गाला जमिनीच्या मालकींतून समजावणीनें आणि त्यानें साधलें नाहीं तर जबरीनें मुक्त केलें. श्रीमंत शेतकरी वर्गाला त्यांनीं प्रथम हीच वागणूक दिली, त्याचप्रमाणें सरंजामदार वर्गाच्या व धार्मिक संस्थांच्या (देवळांच्या वगैरे) ताब्यांत ज्या जमिनी होत्या त्याहि त्यांनीं मोकळ्या केल्या आणि शेतमजुरांमध्यें वांटून टाकल्या.

चीनच्या ग्रामीण लोकवस्तीचे कम्युनिस्टांनीं पुढीलप्रमाणें चार भाग पाडले होते; (१) जमीनदार वर्ग, (२) संपन्न शेतकरी, (३) मध्यम शेतकरी, आणि (४) शेतमजूर. यापैकीं (१) 'जमीनदार वर्ग' म्हणजे ज्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर जमीन आहे पण जे स्वतः कसत नाहींत, मजूर लावून कसून घेतात ते; (२) 'संपन्न शेतकरी' म्हणजे जे स्वतः शेती करतात पण त्यांच्याजवळ जास्त जमीन असल्यामुळें ते जमीन खंडानें हि लावतात किंवा नोकरांकरवीं कसतात; (३) 'मध्यम शेतकरी' म्हणजे जे स्वतःच्या जमिनीवर स्वतः श्रम करतात, दुसऱ्यांकडे नोकर म्हणून राबत नाहींत आणि स्वतः नोकर ठेवीत नाहींत; आणि (४) 'शेतमजूर' म्हणजे ज्यांच्याकडे स्वतःची जमीन कांहींच नसते किंवा फारच थोडी असते आणि जे दुसऱ्यांकडे नोकरी करतात किंवा खंडानें जमीन करतात. हा शेवटचा वर्गच चीनमध्यें मोठ्या संख्येचा असल्यामुळें कम्युनिस्ट पक्षानें तोच रक्षणीय वर्ग मानला. जमीनदार लोक या शेतमजुरांकडून कित्येक वेळां

*Agrarian policy of the Chinese Communist Party.
—Chuo Kuo Chun, page 93.

इतका भरमसाट खंड घेत कीं तो एकूण पिकाच्या ५० ते ७० टक्के पडत असे. त्यामुळें चिनी शेतमजूर हे भारतीय शेतमजुरांप्रमाणें बहुतांशीं उपासमारीच्या उंबरठ्यावर जगत होते.*

चीनमध्यें त्या काळच्या ४१ कोटी शेतकरी लोकसंख्येपैकीं जमीनदारांत व इतरांत जमिनीची विभागणी कशी झाली होती हें खालील आंकड्यांवरून दिसेल :

| | वर्ग | कुटुंबांचें शें प्रमाण | जमिनीच्या मालकीचें शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| (१) | जमीनदार | ३ | २६ |
| (२) | संपन्न शेतकरी | ७ | २७ |
| (३) | मध्यम शेतकरी | २२ | २५ |
| (४) | शेतमजूर | ६८ | २२ |

१९४६-४९ च्या युद्धोत्तर काळांत कम्युनिस्टांच्या हातीं सत्तांतर होत असतांना कम्युनिस्टांच्या जमीनविषयक धोरणांत गरीब शेतकरी आणि शेतमजूर यांना प्राधान्य देण्यांत आलें. जमीनदारांच्याच नव्हे तर 'संपन्न' शेतकऱ्यांच्या जमिनी व मालमत्ता भरपायी न देतां सरसहा जप्त करण्यांत आल्या आणि त्या गरीब शेतकऱ्यांत वांटून देण्यांत आल्या. १९४९ मध्यें कम्युनिस्ट पक्षानें संपूर्ण चीनवर सत्ता मिळवितांच १९५० च्या जूनमध्यें 'शेतकी सुधारणा कायदा' (Agrarian Reform Law) जारी केला. या कायद्यानें–

(१) जमीनदारांची मालकी नष्ट करण्यांत आली, आणि

(२) संपन्न शेतकऱ्याला तो स्वतः अगर मजुरांकरवीं कसत असलेली जमीन, त्याची इतर मालमत्ता आणि त्यानें खंडानें लावलेली जी जमीन, त्यानें घरीं केलेल्या जमीनीपेक्षां जास्त नसेल तेवढी, त्याच्याकडे ठेवूं देण्यांत आली.*

यांत 'संपन्न' शेतकरीवर्ग राखण्यांत आला असें दिसतें आणि तें खरें आहे. तें धोरण पुढें स्थिरस्थावर झाल्यानंतर बदलण्यांत आलें याचा अर्थ

* ('Agrarian Policy of the Chinese Communist Party dage 96. —by Chuo Kuo Chun.)

इतकाच कीं 'जमीनदार' आणि 'संपन्न शेतकरी' हे दोन वर्ग कम्युनिस्टांना काढूनच टाकावयाचे होते, परंतु कालमान-परिस्थिति पाहून ते या बाबतींतलीं धोरणें आंखीत असत. असें च धोरण शेतकऱ्यांना जमिनीचें फेरवांटप करण्याच्या बाबतींत ठेवण्यांत आलें होतें. उदा०* उत्तर मंचुरियामध्यें शेतकऱ्याला माणशीं ७ माअु म्हणजे १⅙ एकर, दक्षिण मांचुरियामध्यें ३ माअु, होनान प्रांतांत २ ते ३ माअु, हुनान आणि होपी प्रांतांत १ ते २॥ माअु आणि पूर्व चीनच्या भागांत १॥ ते २ माअु अशी जमीन वांटण्यांत आली. (६ माअु=१ एकर)

आतां हें प्रमाण कांहीं आर्थिक दृष्टचा परवडणारें (Economic Holding) म्हणतां येणार नाहीं. यांत्रिक शेती जेथें करावयाची असेल त्याला तर हे तुकडे अडथळाच होणार. परंतु चिनी कम्युनिस्टांनीं शेतीव्यवसायाचे औद्योगीकरण करायचें असतांना सुद्धां जमिनीची अशी लहान लहान तुकडचांत वांटणी केली, यावरून दोन गोष्टी सिद्ध होतात. एक म्हणजे जमिनीची भूक तीव्र होती, आणि दुसरी, आम शेतकरीवर्गाला खूष करून कम्युनिस्टांना त्यांना आपलेसें करावयाचें होतें. हें दुसरें कारण अर्थात् राजकीय होतें.

आपली सत्ता स्थिर झाली असें वाटल्यानंतर कम्युनिस्टांनीं हळू हळू परस्पर सहायकारी सहकारी संस्था (Service Co-operatives) निर्माण करून व पुढें त्यांत सहकारी शेती आणून जबरदस्तीनें सामुदायिक शेतीकडे वाटचाल केली; म्हणजे या तुकडचांचे बांध पुढें मोडून टाकण्यांत आले. परंतु प्रथम मात्र वर उल्लेखिल्या प्रमाणें त्यांनीं तुकडे करून वांटणी केली. फेर-वांटपाच्या कार्यक्रमाची दरसाल प्रगति कशी होत गेली हें खालील तक्त्यावरून कळून येईल.

| काळ | किती लोकांत वांटली (आंकडे दशलक्षांत) | किती लोक राहिले (आंकडे दशलक्षांत) |
|---|---|---|
| जून १९५० | १७८ | ३२२ |

---

* Agrarian Policy of the Chinese Communist Party,
–Chuo Kuo Chun, page 99.

§ Ibid page 98.

| | | | |
|---|---|---|---|
| फेब्रुवारी | १९५१ | ३३९ | १६१ |
| सप्टेंबर | १९५१ | ४०० | १०० |
| " | १९५२ | ४६३ | ३७ |
| नोव्हेंबर | १९५२ | ४९४ | ६ |
| सन | १९५३ | ४९७ | ३ |

जमिनीचें फेरवांटप हें एक मोठें राष्ट्रीय कार्य समजून त्या करितां ठराविक गोष्टींची प्रथम तयारी करण्याचा नियम कम्युनिस्ट चीन सरकारनें केलेला आहे. हें काम त्यांनीं साचेबंद केलें होतें. हा त्यांचा सांचा भारतांतील वांटपपद्धतीशीं तुलना करून पाहण्याच्या दृष्टीनें तपशीलवार समजून घेणें उपयुक्त होईल.

ज्या गांवामध्यें जमिनीचें फेरवांटप करावयाचें असेल तेथील खडान्‌खडा माहिती अगोदर मिळविली जात असे. ती माहिती मिळविण्यासाठीं लोकांत शिक्षण आणि प्रचार हीं सुद्धां साधनें अमलांत आणलीं जात असत. प्रचार-साधनांत व्याख्यानें, लोकनाटचें, चित्रमय प्रदर्शन, यांको नांवाचीं नृत्यें त्याच प्रमाणें घरोघर जाऊन प्रत्यक्ष बोलणीं करणें आणि हंगामाचे वेळीं त्यांच्या बरोबर शेतींतील कामें हि करणें अशा बाबींचा त्यांत समावेश असे. या सर्वांतून लोकांना शिकविलें जात असे कीं * "जमीन तुमची आहे, जमीनदार हे चोर आहेत, त्यांचा जमिनीवर हक्क नाहीं, सरकारनें कसणारांचीच जमीन ठरविली आहे, ज्या जमीनदारांनीं तुमचा छळ आजपर्यंत केला त्यांना शासन झालें पाहिजे, त्यांची जमीन काढून घ्यायची आहे. त्यांचा दुष्कृत्यांचा पाढा जाहीर झाला पाहिजे, भिऊं नका, जमीनदारांच्या हातीं आतां सत्ता नाहीं, इ. इ." हें शिक्षणाचें काम करण्याकरितां कार्यकर्तादलें ( Worker's Teams) शिकवून तयार केलीं जात असत. या दलांत चांगलीं व्याख्यानें देणारे वक्ते जसे असत तसे गाणारे, चित्रें काढणारे, असे कलावंत हि असत. ज्या गांवांत जायचें त्या गांवाची माहिती असलेली जुनीं माणसें हि या दलांत असत.

---

*'People's China' July 10, 1950, page 120. – Chuo Kuo Chun.

अशा रीतीनें शिक्षण व प्रचार केल्यानंतर आणि साक्षात् संबंध जोडल्यानंतर गांवच्या लोकांतून जे आपल्याला अनुकूल झालेले आहेत असें आढळून येई (Positive Elements) त्यांना मुख्य धरून 'ग्राम-संस्था' बनविली जाई, अनुकूल माणसें शोधणें आणि त्यांची संघटना करणें हें त्या जिल्ह्यांतील भूमिसुधारणेच्या कामांतील पहिलें आवश्यक कर्तव्य मानलें गेलें होतें. यानंतर पुढची पायरी म्हणजे गांवांतील आजपर्यंत परंपरेनें चालत आलेले सत्तेचे गड्डे तोडावयाचे आणि अशा लोकांविषयीं आम जनतेच्या मनांत असलेली दराऱ्याची भावना मोडावयाची. या उद्देशानें गांवच्या लोकांच्या आमसभा घेतल्या जात आणि अशा सभांमधून ग्रामकंटक' ( Local Despots ) म्हणून जमीनदारांची चौकशी व न्याय करण्याचा विधि करण्यांत येई. लोकांची वर्गवारी पाडण्याचें कामहि अशा आम सभांतून होत असे. अशासभांना "त्वेष बोलून दाखविणाऱ्या बैठकी" ( Speak bitterness meetings ) "हिशोब पटवून घेणाऱ्या बैठकी" (Settle account meetings) "झगडा बैठकी" (Struggle meetings) अशीं नांवें ठेवलीं होतीं. मात्र सभा चालविण्याची पद्धति एकच असे–प्रथम कार्यकर्ता-दल काळजीपूर्वक उद्दिष्टांची चर्चा करी आणि सभेच्या कामांची योजना समजावून सांगे. त्यानंतर गांवांतील ज्यांनीं भरमसाट खंड, व्याज आणि राबणूक करून घेतली असेल अशा "ग्राम-कंटकांना" (Local despots) म्हणजे लोकांत अप्रिय असलेल्या जमीन-दारांना किंवा ज्या पूर्वींच्या स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांनीं लांचलुचपत इ. रीतीनें पैसे उकळले असतील अशांना हें कार्यकर्तादल अचुक बाजूला काढी; नंतर तें दल जिल्हाभरच्या अशा ग्रामकंटकांच्या नांवांचा, त्यांच्या दुष्कृत्यांचा पाढा फळ्यावर लिहून व आपल्या नृत्यनाट्यांतूनहि जाहीर करी आणि मग त्या गांवसभेपुढें या सर्व आरोपित लोकांना एका रांगेंत उभें केले जाई आणि सभेला समजावून दिलें जाई कीं "गांवकरी भाईनों, तुमच्या मनांत जो कांहीं त्वेष भरला असेल तो सारा जाहीर रीतीनें बोलण्याची वेळ आतां आली आहे, तुमच्या साऱ्या तक्रारी उघड बोला, कांहीं मनांत ठेवूं नका. सरकारची, फौजेची, कशाचीहि भीति बाळगूं नका. ते सर्व आतां आपले --राबणाऱ्या लोकांचे--आहेत. या श्रीमंत हलकटांना आणि लुच्चांना

म्यायची आपणाला मुळींच जरूर नाहीं. यांच्यापैकीं ज्या कोणीं अत्याचार केले असतील त्यांच्या तोंडावर येथें मोकळेपणानें न भितां ज्या कोणाला बोलून दाखवावयाचें असतील त्यांनीं बोलून दाखवावेत." या आरोपींचा दबदबा कार्यकर्तादलानें लोकांच्या मनांतून अगोदरच काढून टाकला असल्यामुळें अत्याचार झालेले लोक उघडपणानें आणि पुष्कळ तावातावानें आपल्यावर त्यांच्याकडून झालेल्या अत्याचारांचा पाढा वाचीत. यावर आरोपीला त्याचें म्हणणें काय आहे हें पुराव्यानिशीं शाबीत करण्याला सांगितलें जाई. किंवा आरोप कबूल असेल तर कबुलीजबाबावर त्याची सही घेतली जाई. शेवटीं सभेचा अध्यक्ष सभा संपवितांना जाहीर रीतीनें अशी खात्री देई कीं 'लोकांचें न्याय-मंडळ' याचा न्याय करील, आणि मग प्रचाराच्या एकामागून एक घोषणा केल्या जात. आरोपीला नंतर कित्येक वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सांगितली जाई, आणि त्या योगें गांवच्या लोकांना प्रतीति होई कीं आपली सत्ता आतां फार मोठी आहे आणि आम्हां गांवसमाजाच्या शक्तीपुढें आजपर्यंत प्रतापी असणाऱ्या सरंजाम-जमीनदारांचे आता कांहीं चालणार नाहीं. शिक्षा जी दिली जाई ती केव्हां केव्हां लोकांनीं निवडलेल्या न्यायमंडळाकडून दिली जाई. कित्येक वेळां सभेंत हजर असणाऱ्या शेतकरी लोकांकडूनहि ती दिली जाई, कित्येक वेळां आरोपींचे तेथल्यातेथें च अपमान आणि हाल केले जात, आणि चेतलेल्या लोकांच्या रागाला कित्येकवेळां हे आरोपी बळीहि पडत. आजकाल अशा रीतीनें शिक्षा करण्याच्या प्रथा कायद्यानें बंद करण्यांत आल्या आहेत. जमीनदारांना ज्या कांहीं सजा होत त्यांना कायदेशीर स्वरूप देऊन नंतरच त्या अमलांत आणीत असत.

जेव्हां जमीनदाराला मृत्यूची सजा होत असे तेव्हां वरिष्ठ न्यायालयांतून ती पक्की करण्यांत येत असे. परंतु यांतून मानसिक दृष्ट्या शेतकऱ्याच्या मनांत या 'वरच्या' म्हटलेल्या वर्गांविषयीं शत्रुत्वाची भावना भरपूर प्रमाणांत उत्पन्न केली जाई. अशा सभांमुळें हजारों शेतकऱ्यांना कम्मुनिझमची व पक्षाची सहज दीक्षा मिळत असे आणि यांतून पुन्हां नवीन कार्यकर्त्यांचें दल निर्माण करतां येत असे.

पक्षाच्या या पद्धतीविषयीं खुलासा करतांना १९५० च्या आपल्या एका रिपोर्टांत माओनें लिहिलें आहे कीं, "लोकांच्या प्रजासत्ताक सर्वाधिकारशाहीच्या दोन पद्धति आहेत. शत्रूच्या बाबतींत एक, लोकांच्या बाबतींत दुसरी. शत्रूच्या बाबतींत ही अधिसत्ता हुकुमशाहीची पद्धति अवलंबिते, म्हणजे ती त्याला राजकीय कार्यामध्यें भाग घेऊं देत नाहीं, लोकांच्या सरकारचा कायदा मान्य करायला त्याला भाग पाडते आणि राबून त्यानें स्वतःला नवाच मनुष्य बनवावें या करितां त्याच्यावर सक्ती करते. लोकांच्या बाबतींत मात्र ती अधिसत्ता सक्तीचा उपयोग करीत नाहीं, तर लोकशाहीच्या मार्गाचा उपयोग करते, म्हणजेच ती लोकांना राजकीय चळवळींत भाग घ्यायला परवानगी देते, अमुक करा अशी त्यांच्यावर सक्ती करत नाहीं, तें करण्याकरितां लोकशाहीच्या पद्धतीनें ती त्यांना शिक्षण देते, यांचें मन वळविते."*

अशा प्रकारच्या सभा पार पडल्यावर नवीन स्थापन झालेल्या शेतकरी-संस्थेच्या विद्यमानें जमीन-वांटपाचा कार्यक्रम होत असे. "शेती-सुधार-कायद्यानें जमिनीचे सगळीकडचें वांटप पूर्ण झाल्यानंतर लोक-सरकार ( People's Government ) कडून या नवीन जमिनीच्या सनदा त्या त्या लोकांना दिल्या जातील आणि या सर्व मालकांचे जमिनीची व्यवस्था ठेवण्याचे, खरेदी विक्री करण्याचे किंवा भाडेपट्टे करण्याचे हक्क अनिर्बंधपणें हें सरकार मान्य करील," असें 'कॉमन प्रोग्राम' मध्यें कलम घालण्यांत आलें होतें आणि त्या प्रमाणेंच समारंभ करून जमिनीच्या सनदा ( Title deeds ) त्यांना करून देण्यांत आल्या. नवीन शेतकऱ्यांची मालकी कम्युनिस्ट सरकारनें अशा रीतीनें मान्य केली. त्याचें कारण मागें म्हटल्याप्रमाणें लोकांची जमिनीची भूक तृप्त करणें हें जसें होतें तसेंच राजकीयहि होतें, लोकांच्या या भुकेचा त्यांना पक्षीय कारणाकडे उपयोग करून घ्यायचा होता. तसा तो त्यांनीं घेतला हि. लोकांमध्यें एक उत्साह जागृत केला. लोक स्वतःच जमीन-सुधार-कार्यक्रम अमलांत आणण्याच्या कामाला लागले आणि कम्युनिस्टांच्या लोकमानसांतील सत्तेला स्थिरता प्राप्त झाली.

*Agrarian Policy of the C. C. Party–Chuo Kuo Chun p. 139

रशियामध्यें १९१७ सालीं लाल क्रान्ति झाल्यानंतर लगे च पहिल्या-प्रथम जमीन राष्ट्राच्या मालकीची ( Nationalisation ) करण्यांत आली. परंतु त्याचे परिणाम अनुकूल झालेले आढळले नाहींत, म्हणून चीननें रशियाचा हा अनुभव लक्षांत घेऊन शेतकऱ्यांचे जमिनीचे मालकी-हक्क लागलीच नष्ट करूं नयेत हें इष्ट मानलें. चिनी नेत्यांनी अगोदर जमिनीची फेरवांटणी केली, नंतर परस्पर सहाय्यकारी सहकार-मंडळें काढलीं, त्यानंतर शेतकी सहकारी संघ निर्माण केले आणि त्यानंतर सामुदायिक शेतीचा अवलंब करून शेवटीं आज 'कम्यून्स' मध्यें सर्व प्रयत्नां-चें रूपांतर केलें आहे. अशा सावकाशीच्या प्रक्रियेंतून त्यांनीं खेड्यांतील अर्थरचना पार बदलून टाकून तिच्यांत यांत्रिकीकरण आणलें आहे, आणि उत्पादनांत घोडदौड मारण्याचा चंग बांधला आहे. त्यांच्या या प्रक्रियेमुळें उत्पादक शेतकरीरूपी जिवंत यंत्रें कुरकुर न करतां त्यांना सहाय्यक बनलीं असल्याचा चिनी पुढाऱ्यांचा दावा आहे.

## : ३ :

# आशियांतील देश व आफ्रिका

जमिनीबाबतची विषमता घालविण्यासाठीं पक्षाधिष्ठित एकाधिकार-शाहीनें प्रसंगीं भयंकर अत्याचार करून हि जमिनीचें फेरवांटप जेथें केलें अशा देशांतील परिस्थिति आपण पाहिली. आतां ज्या देशांत लष्कराच्या हातीं सत्ता येऊन केवळ लष्करी फर्मानानें जमिनींचें फेरवांटप केलें गेलें अशा जपान, ईजिप्त, सीरिया व पाकिस्तान या आशियांतील देशांची स्थिति पाहूं.

### जपान

जपान हें अनेक बेटांचें मिळून बनलेलें एक राज्य आहे. १९४५ पर्यंत तेथें बादशहाची सत्ता प्रत्यक्ष चालत होती. गेल्या महायुद्धांत पराभव

झाल्यानंतर अमेरिकेच्या हुकमतीखालीं परंतु तिथल्याच लोकांच्या हातीं तेथील राज्यसूत्रें आलीं. बादशहा नांवाला राहिला. अमेरिकेनें जपानी लोकांना कांहीं नियंत्रणें ठेवून आपली राज्यघटना फिरून बनविण्याची संधी देऊन जपानी राष्ट्राला सक्तीनें आपलें दोस्त-राष्ट्र बनविलें आहे. जपानी लोक मोठे पुरुषार्थी, उद्योगी, कलारसिक आणि सुसंस्कृत आहेत.

जपान हा सुद्धां शेतीप्रधान देश आहे. जमीन थोड़ी आणि माणसें फार अशी स्थिति तेथें आहे. कुटुंबाला सरासरी २½ एकरांहून थोडी अधिक जमीन तेथें पडते. जपानची शेतजमीन १६० लक्ष एकर असून जवळ-जवळ ६५ लाख कुटुंबें ती कसत आहेत. जपानची लोकसंख्या ८ कोटींच्या वर आहे. कोणत्या हि पौर्वात्य शेतीप्रधान देशांतील लोकांप्रमाणें च जपानचे लोक हि भावनेनें जमिनीला चिकटलेले आहेत. अर्थ-कारणांत-सुद्धां जमीन आणि तिच्यापासून होणारे उत्पादन हाच त्यांचा मुख्य आधार आहे.

जेथें राजा आहे, तेथें सरंजामदारी आली च, आणि मोठमोठ्या जमिनीची मालकी हि त्यांच्याकडे च असायची. जपानमध्यें शेती करण्यालायक सर्व जमीन अशी थोड्या लोकांच्या ताब्यांत होती. मात्र तेथें जमीन लागण करण्याची पद्धति ( Tenure System ) फार काळापासून चालत आलेली होती. जमीनमालक हे बहुधा गैरहजर असत. आणि त्यांच्या जमिनी कुळा-कडून कसल्या जात. परंतु या कुळांना मूलभूत हक्क किंवा जमिनीचा फायदा कधीं मिळाला नाहीं. उलट त्यांच्यावर फार मोठ्या प्रमाणावर कर लाद-लेले असत आणि या करांच्या पैशाच्या बळावर जपानची एकतंत्री राज्य-सत्ता बलवान् बनली होती. लोकशाही नसल्यामुळें कुळांना मताचे किंवा राज्यकारभारांत भाग घेण्याचे कसले च हक्क नव्हते. त्यांना हि जमिनीची भूक होती च. ती भूक, दोस्तांनीं जपान सर केल्यावर, तेथील युद्धोत्तर व्यवस्थेचें काम ज्या जनरल मॅकऑर्थरकडे दोस्तांकडून सोपविण्यांत आलें होतें, त्यानें च एक प्रकारें भागविली.

जनरल मॅक्ऑर्थर यांनीं जपानी 'डायेट' (पार्लमेन्ट) ला जमीन प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकऱ्यांमध्यें ती वाटण्याची 'यादी' ( Memorandum )

९ डिसेंबर १९४५ रोजीं दिली, व तदनुसार जमीन-सुधारणेचा कायदा करण्यास सांगितलें.

जमिनीची मालकी मिळविण्याकरितां जपानच्या कूळ-शेतकऱ्यांनीं आतांपर्यंत पिढयान्‌पिढया चळवळी केल्या होत्या. त्या जरी दडपल्या गेल्या होत्या तरी त्यांतून त्यांची जमिनीची भूक तीव्रतेनें प्रकट झालेली होती व तो जपानच्या जमीनदारीला मोठा धक्का होता. त्यानंतर १९३० मध्यें जपानच्या शेतीमालांत भावघट झाली होती तिचा, व कूळसंबंध व्यवस्थित करण्याकरितां पूर्वीच्या सरकारानें जी उपाययोजना केली होती, तिचा हि जमीनदारीवर प्रतिकूल परिणाम झाला होता. त्यांत पुन्हां जपान देशाच्या मुख्य अन्नधान्यावर सरकारनें नियंत्रण घातलें आणि दुसऱ्या महायुद्धांत व त्यानंतर चलन-वाढ झाली; या सर्व कारणांनीं जपानची जमीनदारी गडगडण्याच्या बेताला आली होती.*

नवीन शेतकरी सुधारणा कायद्यानें (Agriculture Land Adjustment Act, 22 Dec. 1945) पुढील गोष्टी केल्या :

(१) गैरहजर मालकांकडून जमीनमालकीचें प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्याकडे हस्तांतर झालें पाहिजे.

(२) जमीन न कसणाऱ्या कोणत्याहि मालकांकडून योग्य दरानें शेतजमिनी खरेदी करता आल्या पाहिजेत.

(३) कुळांना जमिनीची विक्री, त्यांच्या प्राप्तीच्या प्रमाणांत वार्षिक हप्ते देऊन, करावयाची आहे.

(४) ज्या कुळांनी जमीन खरेदी केली त्यांना परत कूळ म्हणून बनविण्याच्या धोक्यापासून संरक्षण मिळालें पाहिजे.*

जनरल मॅक्‌आर्थरच्या या धोरणाच्या मुळाशीं केवळ सामान्य जपानी शेतकऱ्यांचा कैवार नव्हता, जपानच्या एकतंत्री सरकारची राजकीय शक्ति

*The Land Reform in Japan, p. 16, 22. –Yasuo Kondo. ( Published by the National Research Institute of Agriculture, Ministry of Agriculture, Tokyo, Japan.

शेतकऱ्यांच्या हुकमी परिश्रमांतून निघणाऱ्या उत्पादनावर अवलंबून होती. आणि त्यांवर च जपानची राजसत्ता राबविणारा सरंजामदार-वर्ग बलवान् बनला होता. जनरल मॅक्ऑर्थर नें योजलेला हा कार्यक्रम सफल झाला तर जपानच्या राज्यसत्तेमध्यें पूर्ण सत्तांतर होणें अपरिहार्य होतें. कांहीं का असेना, दोस्तांच्या योजनेप्रमाणें जपानच्या राजकीय क्षेत्रांत नवीन तत्त्वांचा उदय झाला आहे असें दिसून येतें. जनरल मॅक्ऑर्थरच्या लेखणीच्या फटकाऱ्यानें आज कुळें शेताचीं आणि देशाचीं मालक बनलीं आहेत.

## मध्यपूर्वेंतील देश--ईजिप्त, सीरिया, इराक, इराण

या सर्व देशांत शेतीवर काम करणाऱ्यांपैकीं मोठी संख्या भूहीनांची च आहे. जे कांहीं शेतमालक म्हटले जातात त्यांची हि जमीन अशी च दीड-दोन एकर असते. तीवर त्यांचें पोट भागत नाहीं. ही स्थिति सुधारण्यासाठीं मोठमोठ्या इस्टेटी आणि सरकारच्या ताब्यांतील मोठमोठे भू-भाग मोडून त्यांची भूहीनांत वांटणी करून देण्याच्या योजना या देशांतून करण्यांत आल्या आहेत.

ईजिप्तमधील शेतीची जवळ-जवळ निम्मी जमीन ही १.५ टक्के जमीन-मालकांच्या ताब्यांत आहे. इराणमध्यें ३०० कुटुंबाकडे ५० टक्के जमीन आहे. इराकमध्यें ८५ टक्के जमीन मोठमोठ्या जमीनदारांकडे आहे, तर सीरियामध्यें ६० टक्के जमीन मोठमोठ्या जमीनदारांकडे आहे. ही विषमता काढून टाकण्याच्या दृष्टीनें वरील देशांत जे कायदे केले गेले आहेत व ज्या योजना आंखल्या गेल्या आहेत, त्यांतील मुख्य हेतु भूमि-हीनांना जमीन देणें, त्या जमिनी लागवडीखालीं आणण्यासाठीं त्यांना मदत करणें व त्यासाठीं सहकारी तत्त्वाचा अवलंब करणें हा आहे. ज्या जमिनींचें वांटप करावयाचें त्या तीन प्रकारच्या असतात. सरकारी, ववफ व मोठ-मोठ्या इस्टेटी. त्याबाबतींत त्या त्या देशांतील सरकारें क्रमाक्रमानें योजना आंखून वांटप करीत आहेत. ईजिप्त व सीरिया ह्या दोन देशांत शेत-जमिनीच्या मालकीची कमाल-मर्यादा अनुक्रमें २०० एकर व १२५ ते २५० एकर इतकी ठेवली आहे. ज्या शेतकऱ्यांना ही सरकारी जमीन मिळते त्यांनीं जमिनीची किंमत लहान-लहान हप्त्यांनीं साधारणपणें २० ते २५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम 33 ७६८ वि: ...
क्रमांक ... नों दि: ...


वर्षांत फेडावयाची असते. ह्या मुदतींत जमीन त्याला गहाण टाकतां किंवा विकतां येत नाहीं. वाटलेली जमीन प्रत्येक कुटुंबाला सरासरी ३।। एकर पडते.*

भूमिहीनांना जमिनी देण्याबरोबर च त्यांच्या उत्पनांत वाढ व्हावी म्हणून कांहीं देशांत कांहीं मुदतीपर्यंत सारासूट देण्यांत येते. इराणमध्यें जमीनदाराला शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या खंडांतून जमीन-साऱ्याच्या २० टक्के भाग कायद्यानें कापून घेतला जातो व त्याची समान विभागणी शेतकरी आणि 'सुधारणा व सहकारी निधि' यांमध्यें होते. ह्या निधींतून ग्रामीण विभागांत शिक्षण, रस्ते, सहकारी संस्था इत्यादि उभारण्यासाठीं खर्च होतो.

## पाकिस्तान

पाकिस्तानची ८५ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. जमिनीचा मोठा भाग पाकिस्तानांतल्या नबाब–जमीनदार–मौलवी–मुल्ला अशा मोठ्या जमीनदारांच्या मालकीचा होता.

सन १९५९ मध्यें पाकिस्तानचे सेनापति जनरल आयुबखान यांनीं पाकिस्तानची सत्ता आपल्या ताब्यांत घेतल्यावर १००० एकरांहून अधिक मालकी असलेल्या जमिनी जमीनदाराच्या हातून काढून घेऊन त्या सामान्य शेतकऱ्यांत बांटल्या, जमीनधारणा-क्षेत्रावर एकप्रकारें सीलिंग घातलें.

## मलाया

मलाया द्वीपकल्प किंवा इंडोचायना हा आज स्वतंत्र देश झाला आहे. तो शेतीप्रधान आहे. परंतु तेथें एकीकडे अतिशय मोठे जमीनदार आणि दुसरीकडे अतिशय लहान जमीनदार अशी जमिनीच्या बाबतींतली विषमता आहे. येथें ७० टक्के जमीन कांहीं थोड्या मोठ्या जमीनमालकांच्या हातीं आहे आणि ३० टक्के लहान मालकांच्याकडे आहे, त्यामुळें सामान्य लोक

*Land Reform and Development in the Middle East– A Study of Egypt, Syria, Iraq. –Doreen Warriner, p. 24, 32, 83, 140.

भयंकर दारिद्र्यांत आहेत. शेतकऱ्यांच्या हक्कांचें रक्षण केलेलें नाहीं त्यामुळें ते जुलुमी जमीनदारांचें भक्ष्य बनले आहेत. शेतकऱ्यांत असंतोष आहे. आणि कम्युनिस्ट पक्षानें आपलें पाय तेथें रोवण्याला ही संधि साधलेली आहे. मलाया राज्य-संघाच्या फौजी शासनाचा मुख्य अधिकारी ब्रिटीश जनरल सर जिराल्ड टेम्लर गनिमी काव्यानें लढणाऱ्या साम्यवाद्यांचा सामना करीत होता. तो एकदां म्हणाला : "मला आपण शंभर पलटणी अधिक दिल्या तरी आवश्यक भूमि-सुधारणा-कायद्यावांचून मला साम्य-वाद्यांचा पराभव करता येणार नाहीं. माझ्या कामापैकीं १० टक्के काम फौजेशीं संबंधित आहे, बाकीचे ९० टक्के राजकीय आणि आर्थिक आहे."

यावरून मलायाचें राजकारण जमिनीच्या वांटपाशीं कसें संबंधित आहे तें कळून येईल.

## ब्रह्मदेश

भारताच्या शेजारील ब्रह्मदेशांत शेतीमध्यें काम करणाऱ्या लोकांची संख्या ६६॥ टक्के आहे. आणि १ कोटी ८० लक्ष एकर जमीन शेतीखालीं आहे. १९४१ सालीं या जमिनीपैकीं जवळ-जवळ अर्धा हिस्सा लोअर बर्मा-मधील कालव्याखालची सुपीक जमीन युरोपियन व भारतीय अशा परदेशी लोकांच्या हातीं होती. तेथें १९३८ सालीं एक जुना टेनन्सी कायदा अमलांत आणला गेला होता. आणि त्यानें कुळांना संरक्षण देऊन माफक दरांत खंड ठरवून दिले होते. परंतु न्यायालयांनीं हा कायदा १९४९ सालीं घटनाबाह्य ठरविला. त्यानंतर कुळांनीं ठराविक खंड द्यावा असा कायदा पास झाला. त्यानें जमीनसाऱ्याच्या दुप्पट खंड ठरवून दिला. १९४८ मध्यें जो जमिनीचा राष्ट्रीयकरणाचा कायदा पास झाला होता त्यानें, गैरहजर मालकांकडून सरकारानें जमिनी सरकारी साऱ्याच्या १२ पट रक्कम देऊन खरेदी करावयाच्या आणि त्या भूमिहीन शेतकऱ्यांना सवलतीच्या शर्तीवर वांटून द्यावयाच्या, असें ठरविलें होतें. बर्मामध्यें अजून स्थिर सरकार नाहीं, त्यामुळें या प्रयोगाचा परिणाम अजून अजमावतां येत नाहीं.

## आफ्रिकाखंडांतील राष्ट्रें

आफ्रिका खंडास आतांपर्यंत 'कुंभकर्ण' म्हणत होते. युगानुयुगें या खंडांतील लोक, जगांत झपाट्यानें प्रगत होत असलेल्या सुधारणेपासून अलिप्त राहिले होते. कोणाहि जबरदस्तानें बाहेरून यावें, आणि या शरीरानें धिप्पाड परन्तु मनानें भाबड्या प्रजेला लुबाडावें. त्यांच्या देशांतील संपत्ति त्यांच्याच हातांनीं खणून काढून हिरावून न्यावी, त्यांच्यावर जुलूम करावे, त्यांना भयभीत अवस्थेंत ठेवावें आणि वेळीं प्रंसगीं त्यांची कत्तल हि करावी, असा प्रकार चालत आला आहे. सबंध खंडभर अत्यंत सुपीक व अनेक नद्यांनीं भिजविलेली अशी शेतीलायक जमीन पसरलेली आहे. तेथील मूळचे लोक आपल्याला आवश्यक तेवढ्यापुरती जमीन कशीत आणि त्यांच्या गरजाहि फार थोड्या असत. परन्तु युरोपच्या अनेक देशांमधून लोभी गोरे लोक या खंडांत शिरले, अरबी भाषेंतील सुरस गोष्टींपैकीं सिंदबादच्या सफरींत त्याला जशा हिऱ्याच्या खाणी आढळून आल्या आणि त्यानें बचक बचक भरून हिरे वेचलें त्या रीतीनेंच डच, फ्रेंच, इंग्रज, पोर्तुगीज, आणि बेलजियन् लोकांनीं या खंडाचे हातीं लागतील तसे तुकडे पाडून घेतले, आणि तेथें मळ्यांच्या व फळबागांच्या रूपानें शेतीची कारखानदारी सुरू केली. आणि मूळचा त्या जमिनीचा मालक ? त्याला त्यांनीं गुलाम बनविलें. तो आपल्याच आईपासून वंचित झाला. आजतागायत ही परिस्थिति कमी-जास्त प्रमाणांत कायमच आहे.

परन्तु राबणाऱ्या लोकांच्या जागृतीची पहांट फुटत आहे. त्यांत झुलू, किकुयु, बाल्उवा इ. आफ्रिकन कृष्णवर्णीय समाज परकीयांच्या पकडींतून सुटण्यासाठीं सज्ज झालेला दिसत आहे. राजकीय दृष्ट्या गोऱ्यांनीं बनविलेले या खंडाचे निरनिराळे विभाग स्वतंत्र होत आहेत. यांतूनच त्यांना आर्थिक स्वांतत्र्याचाहि लाभ मिळणार आहे. तेथील झगडे मुख्यतः राजकीय स्वरूपाचे असले तरी त्यांच्या पोटांत गोरा जमिनदार विरुद्ध मूळचा काळा शेतमजूर असा झगडा समाविष्ट आहे. मुक्ति झाली तर जमिनीची आणि मजुरांची दोघांची हि एकदमच होईल आणि आईपासून तुटलेलें लेकरूं पुन्हां आईला मिळेल.

: ४ :

# भूमिहीन आणि भारताचें नियोजन

जमिनीची भूक योग्य वेळीं निवारण झाली नाहीं तर समाजस्वास्थ्य व शांति टिकविणें अशक्यप्राय होतें हें ऐतिहासिक सत्य भारतीय नेत्यांना अवगत आहे. आपल्या स्वातंत्र्याच्या आंदोलनांत या आर्थिक दुःस्थितीकडे प्रथमपासून लक्ष पुरविलें गेलें आहे. हें ग्रामीण दारिद्र्य दूर करण्यासाठींच स्वराज्य हवें, असें राष्ट्रवादी सेवक जनतेला सांगत आले आहेत. राष्ट्रीय सभेच्या ध्वजावर मुद्रित केलेलें चरख्याचें चिह्न याच गोष्टीची हमी देत आलें आहे. स्वराज्यानंतर भारतांत जमिनीची समान वांटणी व किफायतशीर रोजगार सर्वांना मिळेल असें आश्वासन दिलें गेलें आहे. १९३७ सालीं कॉंग्रेच्या हातांत अंशतः अधिकार येतांच कॉंग्रेस-मंत्रीमंडळांनीं प्राथमिक उपचार म्हणून खोती–जमीनदारी निर्मूलन, कूळ-हक्क-संरक्षण, सावकारी–नियंत्रण अशीं कामें हातीं घेतलीं. स्वराज्य मिळाल्यानंतर जमीनदारी पद्धति, निरनिराळचा वतनदाऱ्या आणि जमिनीशीं संबद्ध असलेले शेतकरी आणि सरकार यांच्या मधले मोठे मध्यस्थ कायद्यानें नष्ट करण्यांत आले; तरी सुद्धां जमीन प्रत्यक्ष कसणाऱ्या वर्गाच्या हातीं गेली नाहीं. बिनकसणाऱ्या वर्गाच्या हातीं अजूनहि मोठ्या प्रमाणावर जमिनी आहेत.

देशाच्या नियोजनाची आंखणी करतांना जमिनीची न्याय्य वांटणी हाहि नियोजनाचा भाग मानला गेला आहे. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पुस्तकांत पान ३१७ वर पुढील प्रमाणें मजकूर आहे :

"The pattern of village development envisaged for the future clearly assumes that the distinction within the village-community between those who have land and those who are landless must disappear andt hat there should be equality of status and opportunity. The correct distinction then will be between workers with varying skills who may be engaged in different occupations both agricultural and

non-agricultural. It is also agreed that in implementing schemes of rural development the first concern should be to ensure that the under-privileged and the lower-income groups receive the maximum benefits. The imposition of ceilings on agricultural holdings and development through co-operative management of land and other resources of the village in the interest of the entire community are accepted policies."

(Second Five Year Plan, page 317.)

(ग्रामविकास करण्याचें पुढचें जें स्वरूप डोळ्यांपुढें आहे त्यांत गांव-समाजांतला 'जमीन असणारे, आणि 'जमीन नसणारे' असा जो भेद आहे तो नाहींसा झाला पाहिजे आणि सर्वांचा दर्जा समान व सर्वांना संधी समान असें झालें पाहिजे असें स्पष्टपणें गृहीत धरलें आहे. मग जो निश्चित स्वरूपाचा भेद राहील तो शेतीच्या आणि बिगर शेतीच्या इतर निरनिराळ्या धंद्यांत गुंतलेल्या कामकऱ्यांच्या कर्तबगारीमधला किंवा कौशल्यामधला राहील. ग्रामीण विकासाच्या योजना अमलांत आणतांना ही गोष्ट सुद्धां मान्य करण्यांत आली आहे कीं समाजांतील सर्वांत खालच्या थराचे आणि अल्प–मिळकतीचे जे गट आहेत त्यांना जास्तींत जास्त लाभाची हमी देणें हें पहिलें कर्तव्य राहील. शेतीच्या जमीन-धारणा-क्षेत्रावर "कमाल मर्यादा" (Ceiling) घालणें आणि जमिनीची व गांवांतील इतर साधनसामुग्रीची सहकारी तत्त्वावर व्यवस्था लावून सबंध गांवसमाजाच्या हिताच्या दृष्टीनें विकास करीत जाणें हें मान्य झालेलें धोरण आहे.")

नियोजन समितीच्या आदेशानुसार कसणाऱ्याला त्याच्या श्रमांचा योग्य मोबदला मिळावा याकरितां जशी निरनिराळ्या राज्यांमध्यें तरतूद करण्यांत आली आणि, जेथें त्यापूर्वी कुळासंबधींचे कायदे होते त्यांत तशा दुरुस्त्या करण्यांत आल्या, त्याचप्रमाणें ज़मिनीवरील मालकीहक्क कुळाकडे जाण्यासंबधींचे कायदे कांहीं राज्यांत करण्यांत आले. त्या वेळचें मुंबई राज्य या बाबतींत अग्रेसर राहिलें. मुंबई राज्यांत कूळ हा मालक समजून त्यांच्याकडे जमिनीचा हक्क जाण्याची कायद्यानें तरतूद करण्यांत आली

आहे. त्याच बरोबर जमीन धारण करण्याची सुद्धां मर्यादा बांधून देण्यांत आली आहे. हे उपाय केवळ मुंबई राज्यांतच नव्हे तर इतर राज्यांतून हि आतां हळूहळू अमलांत आणले जात आहेत.

असें सर्व ठरविण्यांत आणि करण्यांत हेतु हा आहे कीं जमीन एका हातीं केंद्रित करण्याची जी प्रवृत्ति आजपर्यंत चालत आली आहे तिला आळा घातला गेला पाहिजे आणि भूमिहीन शेतकऱ्यांकरितां जमीन शक्य तेवढी मोकळी करता आली पाहिजे. हा प्रयत्न पुढें 'कमाल जमीन धारणेच्या' (Ceiling) कायद्याच्या रूपानें हातीं घेतला गेला आहे. यांतून जी जमीन उपलब्ध होईल तिची भूमिहीन शेतमजुरांमध्यें वांटणी करण्याचा सरकारचा संकल्प आहे.

नियोजन समितीच्या धोरणाप्रमाणें भूमिहीन हरिजन व आदिवासी शेतकऱ्यांना जमिनी देऊन त्यांना पुन्हां वसविण्याकरितां पहिल्या पंचवार्षिक योजनेंत कांहीं राज्यांत सरकारी जमिनी उपलब्ध करून देण्यांत आल्या. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतहि अशीच तरतूद करण्यांत आली. अर्थात् यांतून गरजेच्या मानानें फारच कमी जमीन उपलब्ध झाली आहे. जमिनीची भूक मात्र आतां बरीच वाढलेली आहे. त्यामुळें आतां मागणीहि वाढलेली आहे.

परन्तु कुळांना जमिनी देऊन अल्प जमीनवाल्यांचा आणि निव्वळ शेतमजुरांचा प्रश्न सुटलेला नाहीं. त्या थरांतहि आतां जागृति आणि मागणी वाढू लागलेली आहे. जातीची, वर्गाची, अशी नाना मिषें घेऊन ही भूक प्रकट होत आहे. उत्तर-प्रदेश, बिहार, गुजरात, महाराष्ट्र या प्रांतांत प्रत्यक्ष कसणाऱ्या गरीब वर्गाच्या संघटना बनल्या आहेत आणि त्यांनी अनेक प्रसंगीं सरकारकडे मोर्चे नेऊन जमिनीची मागणी केली आहे. या मागणीची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे आणि येथें लोकशाही असल्यामुळें, लोक-प्रतिनिधींनाहि त्या तीव्रतेची जाणीव होऊं लागली आहे.

कमाल क्षेत्रमर्यादे ( Ceiling ) चे दोन विशेष हेतू नियोजन मंडळाच्या मनांत आहेत ते असे :

(१) शेत जमिनीच्या झालेल्या विभागणीचें आजचें स्वरूप आणि लहान-लहान शेतांची बहुसंख्या लक्षांत घेतां कमाल क्षेत्र-मर्यादा ठरवून त्यांतून ज्यादा उपलब्ध होणारी जमीन फार मोठ्या प्रमाणांत वांटतां येईल असा फारसा संभव नाहीं असें दिसून आलें आहे. तथापि प्रगतिशील सहकारी ग्रामीण अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठीं अशा प्रकारची विषमता कमी करणें आवश्यक आहे; त्याचबरोबर जमिनीची फेरवांटणी जितकी करणें शक्य आहे तितकी केल्यानें व पडीत जमिनीवर भूमिहीनांना वसविण्यासाठीं उपाययोजना अमलांत आणल्यानें भूमिहीन असलेल्या लोकसंख्येला उपजीविकेचीं साधनें मिळण्याची संधि प्राप्त होते."

(Third Five Year Plan, page 93, para 95.)

(२) वर निर्दिष्ट केलेल्या धोरणानुसार जमीनविषयक सुधारणांचा कार्यक्रम जर अमलांत आला तर भारतांतील शेतकरीवर्गापैकीं बहुसंख्य लोक शेतमालक होतील. त्यांनी आपली संघटना करून कर्जाकरितां, खरेदीविक्रीकरितां, (कच्च्या मालाचा) पक्का माल करण्याकरितां, आणि गरजेच्या मालाचें वांटप करण्याकरितां स्वतःच्या सहकारी संस्था काढाव्यात या दृष्टीनें त्यांना उत्तेजन द्यावें आणि साहाय्य करावें. असें उत्तेजन आणि साहाय्य हें उत्पादनासाठीं सहकारी संस्था त्यांच्याच संमतीनें करण्याच्या कामीं देण्यांत यावें. थेट खेड्यापर्यंत जितक्या प्रमाणांत अशा प्रकारच्या संघटना पोचविल्या जातील, तितक्या प्रमाणांत छोट्या आणि आर्थिक दृष्ट्या न परवडणाऱ्या जमिनीमुळें उद्‌भवणाऱ्या अडचणी कमी करता येतील आणि प्रत्येक समाजांतील असमर्थ घटकांना त्यांचें जीवनमान उंचावण्याकरिता मदत देतां येईल. जमीन सुधारणेचा प्रत्येक टप्पा जसजसा अमलांत येईल तसतशी शेतीचें उत्पादन वाढविण्याकरितां आणि ग्रामीण अर्थव्यवस्था विविध मार्गांनीं साधण्याकरितां अधिकाधिक पूर्ण मदत देणें शक्य होत जाईल या गोष्टीवर नेहमींच भर देण्यांत आला आहे. शेतकऱ्यांमध्यें अधिक ऐक्यभाव आला आणि ग्रामीण समाज अधिक बळकट झाला तर त्यामुळें त्या त्या ठिकाणीं जास्त प्रमाणांत त्यांच्या हातून

पुरुषार्थ होऊं लागेल आणि अधिक गतीनें आर्थिक व सामाजिक प्रगति होऊं लागेल."

(Third Five Year Plan, page 94, para 96)

भूमिविषयक विषमता कमी करण्याच्या दृष्टीनें राज्यसत्तेकडून पुढें ठेवलीं गेलेलीं उद्दिष्टें आणि कार्यक्रम यांचें दिग्दर्शन येथपर्यंत केलें. उद्दिष्ट पूर्णपणें साध्य होण्याच्या दृष्टीनें या कायदेशीर साधनांची कार्यक्षमता प्रत्यक्ष अनुभवाच्या कसोटीवर आतां तपासली पाहिजे.

: ५ :

## कायद्याचा उपाय

जमिनीची सर्व मालकी कायद्यानें सरकारची आहे, स्वत:ला मालक म्हणविणारे हे केवळ वहिवाटदार (Occupants) आहेत, ही कायदेशीर भूमिका आहे. म्हणून कायद्याच्या कक्षेंत राहून जमिनीची विल्हेवाट करण्याचा सरकारला अधिकार आहे. सरकारला समाजहिताकरतां एकाकडून जमीन काढून दुसऱ्यास द्यावयाची झाली तर परंपरागत वहिवाटीच्या हक्कांचा (Occupancy Rights चा) मोबदला देण्याची तरतूद केली म्हणजे पुरें अशी स्थिति आहे. जमिनीची वहिवाट जर सरकारला बदलून द्यावयाची असली तर लोकप्रतिनिधींकडून असा कायदा मजूर झाल्यास सरकारला तें करतां येईल.

निरनिराळ्या राज्यसरकारांनीं आजपर्यंत जमीनमालकींतील विषमता कमी करण्याच्या बाबतींत जे कायदे केले आहेत ते तीन प्रकारचे आहेत :

(१) साक्षात् जमीन कसणाऱ्यावर होणारे अन्याय (खंड, बेदखली इ. बाबतचें) दूर करणें.

(२) जे शेतकरी कूळ म्हणून साक्षात् जमीन कसतात त्यांना जमिनीची मालकी देणें.

(३) व्यक्तीकडे असलेल्या जमिनीचें प्रमाण विवक्षित मर्यादेंत ठेवून उपलब्ध होणारी जमीन भूमिहीनांना वांटून देणें.

कुळें म्हणून जमीन स्वतः कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाबतींत आतांपर्यंत कायद्यांत कोणत्याहि प्रकारचें पुरेसें संरक्षण दिलें नव्हतें. मालकानें स्वतःच्या मर्जीप्रमाणें कुळाला पुढें शेत करण्याला द्यावें अगर न द्यावें अशी अनिश्चितता होती, त्याचप्रमाणें शेतकऱ्यानें तयार केलेल्या पिकांत खुद्द त्याचा हिस्सा किती असावा या संबंधींहि स्पष्ट अशी कांहीं कायदेशीर मर्यादा नव्हती. म्हणजे शेतकऱ्याला शेतावरून काढून टाकणे (Eviction) आणि खंड (Rent) म्हणून पिकाचा वाटेल तेवढा हिस्सा त्याच्याकडून घेणें या गोष्टी मालक आपल्या इच्छेअनुरूप करूं शकत होता. या दोन्ही प्रकारच्या अनिश्चितता दूर करून कुळाला सुरक्षित करणें याबद्दलची तरतूद कुळासंबंधी केलेल्या कायद्यांतून निरनिराळ्या राज्यांत करण्यांत आली.

जमिनीची भूक वाढली आहे, आणि त्यासंबंधीं निरनिराळे राजकीय पक्ष व इतर संघटना प्रयत्न करीत आहेत हें पाहणाऱ्या जमीनदार आणि जमीनमालक-वर्गांनी निरनिराळ्या राज्यांत कुळांना भय आणि लोभ दाखवून काढून टाकण्याचा सपाटा चालविला. तेव्हां त्या त्या सरकारांना यासंबंधीं विशेष कायदे करून हा बेदखलीचा अन्याय थांबविण्याचा प्रयत्न करावा लागला. तरीहि तिला पुरता आळा बसला असें झालें नाहीं आणि हा गुन्हा करणाऱ्यांना शिक्षा झाल्या असेंहि फारसें घडलें नाहीं.

कुळांना संरक्षण देऊन कायमपणें त्यांनीं जमीन कशीत राहावी याबद्दलची जी तरतूद निरनिराळ्या राज्यांच्या कायद्यांत करण्यांत आली त्यांत 'स्वतः जमीन कसणाऱ्या' (Personal Cultivation) मालकाला स्वतःकरितां जमीन ठेवून घेण्याची तरतूदहि आहे. निरनिराळ्या राज्यांत तिचें प्रमाण वेगवेगळें आहे. मुंबई राज्यांत अशी एक तरतूद करण्यांत आली आहे कीं ठरविलेल्या तारखेपर्यंत जमिनीची ठरलेली किंमत कुळांनी गैरहजर मालकाला दिली तर सर्व जमिनीचा मालक कुळ हें बनतें. मात्र जमीन धारण करण्याची कमाल मर्यादा कोरडवाहू ४८ एकर आणि बागा-

ईत १२ एकर ठरविण्यांत आली आहे. केरळमध्यें ठरलेल्या मुदतीपर्यंत जमीनीची किंमत कूळ जरी भागवू न शकलें तरी सुद्धां त्याला त्या जमीनी-वर शेती करण्याचा हक्क दिला गेला आहे. उत्तर प्रदेशांत सरकार शेतकऱ्यांकडून सारा वसूल करतें आणि जमीनदारांना जमिनीच्या मोबदल्याची रक्कम देतें. तर दिल्ली प्रांतांत शेतकरी सरकारी सारा भरतो त्याच बरोबर जमीनदाराला मोबदलाहि भरतो. हैद्राबाद राज्यांत कोणत्याहि जमिनीचा मालकी हक्क शेतकऱ्याला देण्याचा अधिकार सरकारला मिळालेला आहे आणि त्या अधिकाराचा उपयोग करून कित्येक कुळांना जमिनीची मालकी दिली गेली आहे. मराठवाड्यांत मुंबई सरकारनें कुळाला अशा रीतीनें स्वामित्व देण्याची व्यवस्था सर्व जिल्ह्यांना लागू केली आहे. विदर्भांतहि मुंबईचा कूळकायदा १९५९ च्या प्रांरभापासून लागू करण्यांत आला आहे.

सकृत्‌दर्शनीं ठिकठिकाणीं झालेले हे कुळाच्या हिताचे कायदे प्रगतिपर असलेले दिसतात आणि देशाचें नियोजन करतांना कसणाऱ्याविषयीं जो न्याय करावयाचा त्याला हात घातलेला दिसतो, परंतु या कायद्याची अमलबजावणी होत असतांना सर्वत्र जे अनुभव आले आहेत त्यांत– (१) फारच थोडीं कुळें मालक बनण्यासाठीं प्रवृत्त झालीं, (२) पुष्कळ कुळांनीं कूळपणाचा राजीनामा लिहून दिला, (३) मालकांनीं जमिनी पूर्ववत् आपल्याकडे ठेवून घेतलेल्या आहेत, (४) पूर्वीच्या कुळांकडून त्यांनी नोकरनामे लिहून घेतले आहेत हे अनुभव आहेत. त्याचप्रमाणें खंडाच्या परिमाणांत पूर्वीपेक्षां जरी सुधारणा झाली असली तरी कुळांना पिकाचा जास्तींत जास्त वांटा जाईल असे सर्रास घडत नाहीं. आतां हेच परिणाम जर प्रत्यक्षांत घडत असले तर कूळकायदा करून लोकसत्ताक सरकारनें काय साधलें म्हणायचें ? कायदा असून तो जवळ जवळ नसल्यासारखा झाला. असें होण्याचीं कारणें, उदाहरणार्थ मुंबईचा कूळकायदा घेऊनच, पाहतां येतील.

या कुळकायद्यांत जमीनमालकाला कूळवहिवाट रद्द करण्याचा हक्क अधिनियम ३१ अन्वयें देण्यांत आला आहे. त्यांत म्हटलें आहे कीं "जमीन-

मालकास जातीनें जमीन कसण्यासाठीं किंवा कोणत्याहि बिनशेतीच्या कारणासाठीं जमिनीची खरीखुरी आवश्यकता असेल तर कबजा मिळविण्यासाठीं नोटीस दिल्यानंतर व अर्ज केल्यानंतर कूळवहिवाट रद्द करण्याचा अधिकार आहे." या कलमाचा आधार घेऊन हजारो जमीन-मालकांनी महसूल अधिकाऱ्यांकडे कुळाकडून जमीन आपल्याकडे मिळण्याबद्दल अर्ज केले आणि पुष्कळांचे अर्ज मंजूरहि होऊन गेले. आतां, जमीनमालक शेतकरी कसा झाला ? तर या कायद्याच्या अधिनियम २, कलम ६ मध्यें मालकाला अशी सवलत मिळाली आहे कीं "(i) स्वतःच्या कुटुंबांतील कोणत्याहि इसमाला अंगमेहतीनें, अथवा (ii)स्वतःच्या किंवा स्वतःच्या कुटुंबांतील कोणत्याहि इसमाच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं मजुरीनें कामावर लावलेल्या मजुरांकरवीं अथवा रोख रकमेंत किंवा मालाच्या रूपांत द्यावयाच्या वेतनावर ठेवलेल्या नोकरांकरवी जमीन कसण्याला 'जातीनें जमीन कसणें' ही संज्ञा लागू होऊं शकते." या सवलतीचा फायदा घेऊन आपण स्वतः जमीन कसणार आहोंत असें कोणताहि गैरहजर मालक म्हणूं शकेल यांत नवल काय ? त्यामुळें कुळांच्याकडे लागू होणारी जमीन मालकाकडे राहूं शकली.

मालकाच्या हातून ज्या जमिनी सुटल्या त्या कुळांना अधिनियम ३२ अन्वयें खरेदी करता येतात. अधिनियम–३२ के अन्वयें जमिनीच्या खरेदीची किंमत ठरविण्यांत आल्यावर तें 'कायम कूळ' असेल तर खरेदीच्या किंमतीची पूर्ण रक्कम एका वर्षाच्या आंत न्यायाधिकरणा (Tribunal) कडे अनामत ठेवली पाहिजे. 'कायम कूळ' नसेल तर ही रक्कम एक वर्षाच्या आंत ठोक रकमेंत किंवा न्यायाधिकरण ठरवील तितक्या वार्षिक हप्त्यांनीं दरसाल दरशेंकडा ४॥ टक्के व्याजाच्या दरानें न्यायाधिकरणाकडे अनामत ठेवली पाहिजे. पुष्कळांच्या बाबतींत अशा रीतीनें रक्कम काढून अनामत ठेवणें शक्य नसल्यामुळें त्या जमिनी कुळांच्याकडे आल्या नाहींत.

या खेरीज पुष्कळ ठिकाणीं मालकांनी कुळांना धाकदपटशा दाखवून, पैसे चारून, त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन कूळहक्काचे राजीनामे लिहून घेतले. अज्ञान मुलाच्या नांवावर जमिनी चढवून कुळाला होणाऱ्या

विक्रीचा व्यवहार टाळला. या प्रकारावर उपाययोजना कूळकायद्यांत नाहीं.

कूळकायद्यानें समस्या सुटण्याला मदत झाली आहे असा अनुभव मात्र आलेला नाहीं. हा कायदा करणारांची मनोवृत्ति मालक व कूळ दोघांच्याहि बाबतींत स्पष्ट व निःसंदिग्ध नाहीं आणि भूमिहीनांना जमीन मिळून त्यांची संख्या कमी व्हावी ही तरतूद तर त्यांत नाहींच, त्यामुळें कांहीं कुळांना मालकी हक्क व शाश्वती मिळाली असली तरी मालकी नष्ट करण्याची स्पष्ट कल्पना नसल्यामुळें धड मालकी संपत नाहीं, धड ती जिवंत राहात नाहीं अशी अर्धमेली अवस्था जमीनमालक-वर्गाची त्या कायद्यानें केली आहे. कायद्यांतून पळवाटा निघण्याजोगी परिस्थिति असल्यामुळें कोर्टबाजी ( Litigation ) भरपूर वाढलेली आहे. त्या सर्वांचा परिणाम म्हणून समस्या सुटण्याऐवजीं अधिक अवघड मात्र झाली आहे.

पुणें येथील 'गोखले इन्स्टिटय़ूट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स' या संस्थेनें या बाबतींत एक व्यापक पाहणी केली आहे. १९४७-४८ ते १९५२-५३ या पांच वर्षांच्या काळांत या कायद्यामुळें काय काय बदल झाले ते त्यांनीं अभ्यासले व त्यावरून खालील निष्कर्ष काढले आहेत :

"पूर्वीं जितकी जमीन खंडानें दिलेली असे तिच्या–

(१) ५० टक्के जमीन पूर्वींच्याच कुळांकडे राहिली;

(२) २० टक्के जमिनीवरील कुळें बदललीं;

(३) २७ टक्के जमीन मालकांनीं स्वतः करण्यासाठीं म्हणून परत घेतली, पण त्यांतली पांच टक्के जमीन परत दुसऱ्या कुळांना दिली;

(४) फक्त ३ टक्के जमीन कुळांनीं विकत घेतली ;

(५) आणि शिवाय पूर्वीं खंडानें न दिलेल्या जमिनीपैकीं सुमारें ४ ते ५ टक्के जमीन कूळ-कसणुकीखालीं येत राहिली.

"याचा अर्थ असा कीं, १९४७-४८ सालीं जी परिस्थिति होती त्यांत फारसा फरक पडला नाहीं. त्यावेळीं सुमारें ३ टक्के जमीन खंडानें

दिलेली असे. त्यांपैकीं जेमतेम १ टक्का कुळांनी विकत घेतली. आणि सुमारें ४-५ टक्के जमीन मालकांनीं परत आपणांकडे घेऊन स्वत: कसायला सुरुवात केली, अर्थात् 'स्वत:' म्हणजे नोकरांकरवींच ही कसणूक चालते. हे नोकर मजूरीवर न नेमतां त्यांच्याशीं खंडाचा करार झालेला असतो, फक्त कागदोपत्रीं त्यांचा 'कूळ' म्हणून उल्लेख न करतां 'नोकर' म्हणून उल्लेख केला जातो. दुसरे मालक आपली जमीन नव्यानें कुळांना देत होतेच. थोडक्यांत जमिनीचा फार मोठा हिस्सा अद्यापहि गैरहजर मालकांच्या मिरासदारीखालीं राहिला व त्यापासून होणारे दुष्परिणाम चालू राहिले.''*

कूळ-कायदे (Tenancy Laws) करून कुळांना जमिनीचा वांटा उपभोगण्यासाठीं हक्कानें मिळावा या दृष्टीनें मुंबई राज्याप्रमाणेंच इतर-हि राज्यांत अशा प्रकारचे कायदे करण्यांत आले आहेत. आणि तेथेसुद्धां कायद्यांच्या अंमलबजावणीचा असाच अनुभव येत आहे. 'कसणाऱ्याला मालक' बनविण्याच्या व्याख्येंत भूमिहीन शेतमजूर तर कोठेंहि या कायद्यांत बसविलेला नाहीं. आणि कुळांची अवस्था कायद्यानंतरहि वर वर्णन केली त्याप्रमाणें आहे. आतां भूमिहीनांकरितां केलेल्या 'कमालक्षेत्र धारणा'-च्या कायद्याची स्थिति पाहूं.

## : ६ :

## सीलिंग (धारणा-क्षेत्राची कमाल मर्यादा)

देशांतील भूमिहीनांचा प्रश्न सोडविण्याचें अगत्य लक्षांत घेऊननियो-जन-मंडळानें अुशीरां कां होईना, मोठ्या जमीन-मालकांच्या हातांतून जमीन मोकळी करण्याचें तत्त्व स्वीकारलें. निरनिराळ्या राज्यसरकारांना त्यानें कमाल क्षेत्र-मर्यादा (Ceiling) ठरविण्याचा आदेश दिला. परंतु कोणत्याहि

*Working of Bombay Tenancy Act 1948—Report of Investigation. -By V. M. Dandekar and G. J. Khudanpur.

कारणानें कां होईना दुसरी पंचवार्षिक योजना पुरी होईपर्यंतसुद्धां राज्यसरकारांनी त्या संबधींचा कायदा आपल्या विधिमंडळांत आणला नाहीं. १९५९ च्या कॉंग्रेसच्या नागपुर अधिवेशनांत 'कमाल क्षेत्र-धारणा' (Ceiling) बद्दल पुढीलप्रमाणें ठराव करण्यांत आला होता:

"जमीन-सुधारणेच्या बाबतींत असलेली अनिश्चितता घालविण्या-करितां आणि शेतकऱ्याला स्थिरपणा आणण्याकरितां आज असलेल्या आणि पुढें निर्माण होणाऱ्या जमिनीची कमाल-क्षेत्र-मर्यादा निश्चित करण्यांत यावी आणि त्या हेतूनें तसेंच मध्यस्थ काढून टाकण्याच्या दृष्टीनें १९५९च्या अखेरीपर्यंत सर्व राज्यांमधून कायदेशीर तरतुदी करण्यांत याव्यात."

(नागपूर कॉंग्रेस ठराव, १९५९)

यानंतर मात्र सरकारी चक्रें फिरूं लागलीं आणि निरनिराळ्या राज्यांत 'कमाल जमीन-धारणा' संबंधींचा कायदा होणार असल्याचा बोलबोला होऊं लागला. हितसंबंधीवर्ग म्हणजेच मोठमोठ्या जमिनींचे मालक आणि त्यांच्या संघटना स्वसंरक्षणासाठीं अगोदरच सज्ज होऊन बसल्या होत्या. त्या तद्‌विरोधी प्रचार करूं लागल्या. अर्थात् केवळ प्रचार करूनच हे लोक थांबले नाहींत, तर कायद्याच्या कक्षेंत बसेल अशा रीतीनें त्यांनीं आपल्याकडे असलेल्या जमिनीच्या आपसांत वांटण्याहि करून टाकल्या. अर्थात् ही क्रिया याचवेळीं जोरानें चालू झाली असली, तरी तिचा प्रारंभ मात्र कूळकायद्याच्या जन्माचे वेळींच–म्हणजे ७-८ वर्षांपूर्वींच–झाला होता. त्यामुळें जमीन-मालकांकडून जमीन काढून घेऊन ती भूमिहीनांना उपलब्ध करून देणें शंकास्पदच झालें आहे. आणि ही गोष्ट लोकसभेंमध्यें कै. पं. गोविंदवल्लभ पंत यांनीं सीलिंग बद्दल बोलतांना स्पष्ट शब्दांत कबूल केली होती.

आतांपर्यंत ज्या राज्यांत 'कमाल क्षेत्र-मर्यादे'चे कायदे झाले आहेत, त्यांच्यापैकीं ज्यांची जेवढी माहिती आज हातीं आली आहे, तेवढी पुढें मांडली आहे. ही माहिती अ. भा. कॉंग्रेस कमिटीनें निरनिराळ्या राज्य-सरकारकडून मुद्दाम मागविली होती :

प. बंगाल 'प बंगाल जमीन सुधारणा कायदा, १९५५' या कायद्यान्वयें २५ एकर ही क्षेत्र-मर्यादा पुढील होणाऱ्या जमीन-धारणेची मर्यादा म्हणून ठरविण्यांत आली आहे. या राज्यांत मध्यस्थ जमीनदार वगैरे वर्गांना सरकारच ठरविलेल्या दराप्रमाणें जमिनीचा मोबदला (Compensation) देतें. आतांपर्यंत सरकारनें २ लक्ष ६९ हजार एकर शेतीची जमीन आणि २ लक्ष ७५ हजार एकर बिगर शेतीची म्हणून असलेली जमीन ताब्यांत घेतली आहे. आणखीहि जमीन सरकारकडे येईल अशी अपेक्षा आहे. शिवाय कांहीं लाख एकर जंगलची जमीन आणि इतर जमिनी यांचाहि ताबा सरकारकडे आला आहे.

प. बंगाल सरकारकडे जी उपरिनिर्दिष्ट जमीन आल्याचें म्हटलें आहे ती जमीनदारी-निर्मूलन-कायद्याच्या परिणामांतून मिळालेली आहे. त्या कायद्यांत कमाल जमीनधारणाची तरतूद केलेली होती.

**उत्तर प्रदेश–** उ. प्र. राज्याचे मुख्यमंत्री श्री. चंद्रभान गुप्ता, आपल्या सरकारनें केलेल्या सीलिंग-कायद्याबद्दल बोलतांना म्हणाले : "आम्ही सीलिंगचा कायदा केला आहे, पण त्याचा जमिनी मिळण्यास आम्हांला उपयोग झालेला नाही. कायदा होण्याच्या पूर्वींच जमीन-मालकांनी जमिनीची वांटणी निरनिराळ्या नातलगांच्या नांवानें करून टाकली आहे. आतां आम्ही यंत्राच्या सहाय्यानें शेती करून शेतीचेंउत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करूं. पण आमचा कायद्याचा हेतु सिद्धीस गेलेला नाहीं."

उत्तर प्रदेश सरकारनें चालू (Existing) जमीन धारणाच्या क्षेत्रावर ४० ते ८० एकरांची मर्यादा घातली आहे. आणि पुढें होणाऱ्या जमीन-धारणावर (Future holdings) १२$\frac{१}{२}$ एकरांची मर्यादा घातली आहे.

**मध्यप्रदेश**–या राज्यांत कायम बागायती क्षेत्राची मर्यादा २८ एकर व इतर जमिनीची ८४ एकरांपर्यंत ठेवण्यांत आली आहे. या कायद्यामुळें ८ लाख एकर जमीन वांटण्याकरितां मोकळी होईल अशी अपेक्षा होती, परन्तु या ज्यादा जमीनीची विल्हेवाट लावण्याकरिता जमीन-मालकांना २ वर्षांचा अवधि मिळाल्यामुळें या काळानंतर कितीशी जमीन उपलब्ध होईल हें आतांच गंगणें कठीण होईल, असें त्या सरकारचें म्हणणें आहे.

**आंध्र**–या राज्यांत या कायद्यानें मालकाकडे जमीन राहून ज्यादा जमीन किती उपलब्ध होईल याचा अंदाज लावणें राज्य सरकारला शक्य झालें नाहीं. कायद्यानें चालू (Existing) क्षेत्र धारणावर २७ ते ३१२ एकरांची व पुढील (Future) क्षेत्रधारणावर १८ ते २१६ एकरांची मर्यादा घातली आहे.

**राजस्थान**–या राज्यांत कमाल मर्यादेचा कायदा मंजूर झालेला आहे. ३० स्टँडर्ड एकरांची ही मर्यादा आहे. परंतु त्यामुळें किती जमीन वांटपासाठी उपलब्ध होईल, याचा निश्चित आंकडा मिळण्याजोगा नाहीं. सरकारच्या पूर्वीच्या अंदाजाप्रमाणें या कायद्यानें ८० लाख एकर जमीन वांटण्यासाठी उपलब्ध होईल असा अंदाज होता, परंतु आतां हा आंकडा बराच कमी होईल असें सरकारचें म्हणणें आहे.

**बिहार**–येथें कायदा झाल्यावर त्यांतून जी ज्यादा जमीन उपलब्ध होईल ती ग्रामपंचायतींच्या ताब्यांत राहील आणि भूमिहीन शेतमजूर व लहान लहान शेतकरी यांच्या सहकारी शेती-सोसायटयांच्या द्वारा त्यांची कसणूक केली जाईल, असें ठरविण्यांत आलें आहे.

या बिलाप्रमाणें ३० ते ९० एकर जमीन हें कमाल प्रमाण ठरविण्यांत आलें आहे. अविभक्त हिंदु कुटुंबांतील ज्या व्यक्तीला एखाद्या जमिनीमध्यें हिस्सा मिळाला आहे किंवा मिळू शकतो तो जमीनधारक म्हणून मानला जाईल. म्हणजे हा कायदा लागू होत असतांना कुटुंबांत वांटण्या झाल्या आहेत असा त्याचा अर्थ मानला जाईल. कमाल क्षेत्राचा कायदा लागू होणार हा गाजावाजा बरीच वर्षें होत असल्यामुळें बऱ्याच कुटुंबांनी आपल्या वांटण्या करून टाकल्या आहेत. त्यामुळें ज्यादा जमीन १॥ लाख स्टँडर्ड एकरांपेक्षा जास्त मिळणार नाहीं असा अंदाज आहे, पण या मिळालेल्या ज्यादा जमिनींतील मोठा भाग कुळांकडे जाईल. त्यांना 'वहिवाटदार रयत' हा दर्जा मिळून ती जमीन प्राप्त होईल, म्हणून त्यांतून फक्त साधे २॥ लाख एकरच जमीन भूमिहीनांकरितां उपलब्ध होण्याचा संभव आहे.

या कायद्यांत आणखी एक विशेषता दाखल केली गेली आहे. ती इतर राज्यांच्या कमाल धारणा-क्षेत्राच्या कायद्यांत नाहीं. ती म्हणजे 'लॅण्ड लेव्ही' ही होय. या कलमान्वयें १ ते ५ एकर जमीन असणाऱ्यांकडून त्यांच्याकडे असलेल्या एकूण जमिनीचा २०वा भाग, ५ ते १० एकरा-पर्यंतच्या जमीन-मालकांकडून १० वा भाग व २० किंवा त्यावर जमीन असलेल्यांकडून ६ वा भाग सरकार वसूल करणार आहे. ता. २५ डिसेंबर १९६० रोजीं किंवा त्यानंतर ज्यांनीं याप्रमाणें आपली जमीन भूदानांत दिली असेल किंवा जे देणार असतील त्यांना तेवढ्या जमिनीच्या बाबतींत 'लेव्ही'ची सूट मिळणार आहे.

**पंजाब**–या राज्यांत मुंबईंतील कूळकायद्यासारखाच कुळांना संरक्षण देणारा कायदा १९५३ व १९५५ सालीं अनुक्रमें 'पंजाब कूळसंरक्षण कायदा' ( Punjab Security of Land Tenant Act 1953 ) आणि पेप्सु कुळ व शेतजमीन-कायदा १९५५' (The Pepsu Tenancy and 'Agricultural Land Act 1955) असे अमलांत आले आहेत. या कायद्या-न्वयें जमीन-मालकाला किंवा कुळाला स्वतःच्या कसणुकीकरितां म्हणून जास्तींत जास्त ३० स्टॅण्डर्ड एकर किंवा ६० साधे एकर जमीन ठेवण्याचा आणि ५० स्टॅण्डर्ड एकर किंवा १०० साधे एकर जमीन बेदखल झालेल्या इसमांना घेण्याचा, अधिकार मिळाला आहे.

१९६० आक्टोबरपर्यंत हातीं आलेल्या अहवालाच्या आधारावर ज्यादा म्हणून जाहीर केलेलें प्रत्यक्ष क्षेत्र १ लाख ६६ हजार स्टॅण्डर्ड एकरा-पर्यंत उपलब्ध होईल असा अंदाज आहे. या राज्यांत ज्यादा जी जमीन प्राप्त होईल ती फक्त भूमिहीन शेतमजुरांमध्येंच न वांटली जातां लायक कूळ वगैरेंनाहि दिली जाईल. आतांच्या अंदाजावरून ४० हजार भूमिहीनांना या जमिनीवर बसवितां येईल. आणि प्रत्येक भूमिहीन कुटुंबाला ५ स्टॅण्डर्ड एकर जमीन वांटावयाची म्हटलें तर २ लाख स्टॅण्डर्ड एकर क्षेत्र लागेल.

**मद्रास**–१९६० मध्यें सीलिंगसंबंधींचें बिल असेंब्लीमध्यें दाखल झालें. या कायद्यामुळें किती ज्यादा जमीन उपलब्ध होईल तें अंदाजानें देखील सांगतां येत नाहीं असें या सरकारचें म्हणणें आहे. या जमीन देण्याच्या

धोरणानुसार फक्त भूमिहीन आणि स्वत: शेती कसूं इच्छिणारे गरीब लोक हे च त्यांच्या नांवावर विनामोबदला जमीन करून घ्यायला लायक ठरविले गेले आहेत.

या कायद्याप्रमाणें ५ माणसांच्या एका कुटुंबाला जास्तींत जास्त ३० स्टॅण्डर्ड एकर जमीन राहील. पांचाहून जास्त माणसें असतील तर ज्यादा प्रत्येक माणसाच्यामागें ५ स्टॅण्डर्ड एकर या हिशोबानें परन्तु कुटुंबाकडे एकूण जास्तींत-जास्त ६० स्टॅण्डर्ड एकर जमीन राहील.

वरील सर्व माहिती [ A. I. Congress Committee, Economic Review, January 1961] वरून घेतली आहे

**केरळ**–या राज्यांत १५ ते ३७ $\frac{१}{२}$ एकरांची मर्यादा घालण्यांत आली आहे. या कायद्यानें जमीन किती उपलब्ध होईल हें निश्चित सांगतां येत नाहीं.

**ओरीसा**–२५ ते १०० एकर ही क्षेत्रमर्यादा ठरविली गेली आहे.

**आसाम**–चालू क्षेत्र-धारणावर ५० एकरांची व पुढें होणाऱ्या क्षेत्र-धारणावर ३० एकरांची मर्यादा घालण्यांत आली आहे.

**दिल्ली व हिमाचलप्रदेश**–३० स्टॅंडर्ड एकर मर्यादा ठरविली आहे.

**मणिपूर व त्रिपुरा**–२५ स्टॅंडर्ड एकर ही मर्यादा आहे.

**म्हैसूर**–रु. ३६०० निव्वळ उत्पन्न देण्याइतकी जमीन प्रत्येक कुटंबाकडे राहील, असें ठरविण्यांत आलें आहे.

**जम्मू-काश्मीर**–भारताच्या इतर भागांत कमाल क्षेत्रधारणा-कायदे होण्यापूर्वी बरींच वर्षे जमीन-धारणावर मर्यादा घालण्याचा कायदा या राज्यांत करण्यांत आला होता. त्या अनुसार चालू (existing) व पुढील (future) जमीन-धारणावर २२$\frac{३}{४}$ एकर ही मर्यादा ठरविण्यांत आली आणि आतांपर्यंत चालू जमीन-धारणांवरील मर्यादेप्रमाणें जमीन निश्चित करण्यांत येऊन २$\frac{१}{२}$ लाख एकर जमीन भूमिहीनांमध्यें वांटूनहि टाकली गेली आहे.

[ India 1961, page 266-67 ]

दा. क. 92308

गुजरात–द्विभाषिक मुंबई राज्यांत असतानांच या भागांतील कमाल क्षेत्र-धारण बिल त्यावेळच्या असेब्लीपुढें आलें होतें. परंतु मधल्या भाषिक घडामोडीच्या काळांत तें मागें पडलें होतें. नंतर १९६० च्या सप्टेंबर महिन्यांत तें नव्या गुजरात असेब्लीपुढें मांडण्यांत आलें. त्या बिलाप्रमाणें जमिनीचे चार वर्ग पाडण्यांत आले आहेत ते असे:–

(१) जिरायत (२) भातपिकी (३) हंगामी बागायती आणि (४) नित्याची बागायती. कमाल क्षेत्र-धारणाची मर्यादा जिरायत जमिनीची १३२ एकर आणि किमान मर्यादा ५६ एकर ठरविण्यांत आली आहे. अर्थात जमिनीचा पिकाऊपणा लक्षांत घेऊन तेथें-तेथें त्याप्रमाणें ही मर्यादा बांधण्यांत आली आहे. कोणत्या खेड्यांत कोणती जमीन या मर्यादेंत येईल याची जिल्हावार सबंध यादीच बिलाला जोडली आहे. खाजगी विहीरीवर भिजत असलेल्या जमिनी बागायती न ठरवितां जिरायत ठरविण्यांत आल्या आहेत. त्यामुळें जमिनीची कसून मशागत करून जास्त पिकें काढण्याला प्रेरणा राहील, असें सरकारचें म्हणणें आहे. या कायद्यानें अन्नधान्य-उत्पादनाला धक्का बसूं नये म्हणून ज्या सलग मोठ्या टापूवर (Blocks वर) आतांपर्यंत पुष्कळ भांडवली खर्च केला आहे, जे सुसंघटित झालेले आहेत आणि जे मोडले असतां उत्पादनांत घट होईल असें वाटतें, असे सलग टापू या कायद्याच्या कक्षेंतून वगळले आहेत. अर्थात सुधारलेलें बीं-बियाणें तयार करणें, नवीन नवीन पिकांचा प्रयोग करणें, आणि उत्कृष्ट प्रकारची शेती करणें या संबंधींच्या अटी पाळल्या तरच त्यांना या कायद्यां-तून वगळण्यांत येईल, असें ठरविण्यांत आलें आहे. स्थानिक स्वराज्य-संस्था, विद्यापीठाच्या शिक्षणाकरितां निर्माण झालेल्या पब्लिक ट्रस्टच्या, इस्पितळांच्या मालकीच्या जमिनी, तसेंच सहकारी संस्थांकडे लॅण्ड मॉर्गेज बँकांकडे असलेल्या व भूदान समितीकडे असलेल्या जमिनींना या कायद्यां-तून वगळण्यांत आलें आहे. जमीनीच्या पोकळ वांटण्या किंवा तब्दिली करून या कायद्याच्या उद्देशालाच हरताळ फासला जाऊं नये याकरितां अशा प्रकारच्या वांटण्या किंवा तब्दिली, ज्या १५ जानेवारी १९५९ नंतर झाल्या असतील, त्या प्रामाणिक आहेत अशी कलेक्टरांची खात्री झाली नसेल तर विचारांत घेतल्या जाणार नाहींत.

खातेदाराची स्वतःचीच जमीन नव्हे तर त्याच्या बायकोच्या, अज्ञान मुलाच्या नांवावर असलेली जमीनसुद्धां या कायद्यांत धरली जाईल.

( Economic Review Jan. 1961 )

**महाराष्ट्र**–महाराष्ट्र सरकारनें कमाल क्षेत्र-धारणेसंबंधीं जो कायदा केला आहे, त्याचें उद्दिष्ट सांगतांना म्हटलें आहे कीं–

(१) महाराष्ट्र राज्यांतील **शेतकरी वर्गांत शेतजमिनीची न्याय्य वांटणी व्हावी या करितां आणि विशेषेंकरून भूमिहीन लोकांना स्वतःला कसण्याला जमीन मिळावी म्हणून** हा कमाल क्षेत्र-धारणे (Ceiling) चा कायदा करण्यांत येत आहे.

या कायद्यानें क्षेत्र-धारणाची कमाल मर्यादा ठरविण्याकरितां पुढील प्रमाणें जमिनीचे ४ प्रकार पाडण्यांत आले आहेत :

अ (१) सरकारनें बांधलेल्या पाटबंधाऱ्यांतून सतत मिळणाऱ्या पाण्याखालीं भिजणारी जमीन,

(२) वर्षांतून फक्त ८ महिने वरील रीतीनें पाणी मिळणारी, किंवा सरकारनें बांधलेल्या पाटबंधाऱ्याच्या जवळ सतत पाणी असणाऱ्या विहीरींतून पाणी मिळत असलेली जमीन, किंवा सरकारनें बांधलेल्या पाणी-सांठ्यांतून पाणी वर काढून भिजली जाणारी जमीन,

(३) वर्षांतून फक्त ४ महिने सरकारनें बांधलेल्या पाणी-सांठ्याच्या योजनेंतून पाणी मिळणारी जमीन, आणि

(४) वरीलपैकीं कोणत्याहि प्रकाराखालीं न येणारी कोरडवाहू जमीन.

(ब) कमाल धारणा-क्षेत्र खालीलप्रमाणें राहणार आहे--

१ ला प्रकार— १८ एकर

२ रा „ — २७ „

३ रा „ — ४८ „

४ था „ — ६६ ते १२६ एकर

(क) महाराष्ट्र राज्यांतील प्रत्येक जिल्ह्यांत हा कायदा कोणत्या स्थानिक क्षेत्राला लागू होऊं शकतो तें कायद्याच्या शेवटीं एक यादी (Schedule) देऊन दाखवून देण्यांत आलें आहे. व त्या स्थानिक क्षेत्रांत कोणत्या प्रकाराखालीं किती कमाल जमीन धारण करतां येईल तें व भरपाईचा दर दाखविण्यांत आला आहे.

(ड) ४ ऑगस्ट १९५९ नंतर जर कोणी आपल्या नांवावर असलेली जमीन वांटली किंवा तबदिल केली असेल तर ही वांटणी किंवा तबदिली कमाल मर्यादेचा हिशोब करण्याच्यावेळीं लक्षांत घेतली जाणार नाहीं.

या कायद्यांतून सरकारी, स्थानिक स्वराज्य-संस्थेच्या आणि विद्यापीठाच्या जमिनी वगळण्यांत आल्या आहेत. ज्या पांजरापोळाच्या किंवा गोशाळाट्रस्टच्या जमिनींच्या उत्पन्नाचा खर्च ट्रस्टच्या उद्दिष्टांकरितां होतो अशा ट्रस्टच्या जमिनी आणि शेतकी सोसायटीच्या जमिनी कायद्याच्या कक्षेंतून वगळण्यांत आल्या आहेत.

महाराष्ट्र सरकारच्या अंदाजाप्रमाणें या कायद्यामुळें सुमारे ११ लाख एकर जमीन भूमिहीनांना वांटण्याकरितां उपलब्ध होण्यासारखी आहे. परंतु वस्तुस्थिति पाहतां, कूळकायद्याच्या वेळींच जमिनींच्या आपसांत कायदेशीर वांटण्या खातेदारांनीं करून टाकल्यामुळें, जमीन २-३ लाख एकरांपेक्षां अधिक मिळेल असें चिह्न दिसत नाहीं.

सदरहू कायद्याचें हें स्वरूप पाहिल्यानंतर निरनिराळ्या राज्य सरकारांची सद्बुद्धि लक्षांत घेऊनहि असें म्हणणें भाग आहे कीं भूमिहीनांचा प्रश्न सोडविण्याकरिता जितकें धाडस आणि हिंमत या सरकारांच्या जवळ असायला पाहिजे तितकी ती नाहीं. १९४७ च्या नोव्हेंबर मध्यें दिल्ली येथें स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भरलेल्या पहिल्या अ. भा. कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत कॉंग्रेसच्या उद्दिष्टांसंबंधींचा जो ठराव करण्यांत आला होता त्यांत जमिनीच्या मालकी हक्काबद्दलचें जें तत्त्व ग्रथित करण्यांत आलें तें पुढील प्रमाणें आहे :

"जमीन व तिच्यांतील सारी संपत्ति आणि उत्पादनाचीं व विनिमयाचीं सारीं साधनें समाजाच्या मालकीचीं असावींत व समाजानें समाजाच्या हितासाठीं म्हणून त्यांचा वापर करावा." १९४८ सालीं काँग्रेसनें आपली आर्थिक कार्यक्रम समिति नियुक्त केली होती व तिनें जमीनमालकीची कमाल मर्यादा निश्चित करावी अशी शिफारस केली होती. पुढें डॉ.जे.सी. कुमारप्पा यांच्या अध्यक्षतेखालीं १९५१ सालीं काँग्रेसनें 'शेती सुधारणा समिति' नेमली होती, त्या समितीनेंसुद्धां हा कमाल-मर्यादेचा प्रश्न आपल्या अहवालांत दाखल केला होता. या प्रश्नाकडे आतांपर्यंत एकसारखें दुर्लक्ष करण्यांत आलें. कूळकायद्यामुळें मर्यादित प्रमाणांत कां होईना सरकारांनीं प्रगति केली, परंतु भूमिहीनांच्या प्रश्नाला हात घालणें सरकाराला अवघड वाटलें. काँग्रेसनें जमीन-सुधारणेबाबत जे ठराव केले त्यांची अमलबजावणी काँग्रेसतर्फे निवडून गेलेल्या प्रतिनिधींकडून कायदेमंडळांत व्हावी अशी अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. परंतु अशा स्वरूपाची जमीन-सुधारणा-बिलें कायदेमंडळांत आणण्यालाच मुळीं वेळ लागला, याचें कारण खुद्द काँग्रेस-पक्षांतच अनेक प्रतिनिधींची या प्रश्नाच्या बाबतींत अनुकूलता कमी होती. श्री. जवाहरलालजी आणि त्यांच्यासारखे इतर नेते यांच्या दडपणामुळें काँग्रेसमध्यें तसे ठराव झाले. परंतु जेव्हां कायदेमंडळांत बिलाच्या रूपानें ते ठराव आले तेव्हां पक्षांतील लोकच त्याला आंतून विरोध करूं लागले. पण बाहेरच्या परिस्थितीचें व इतर विरोधी पक्षांचेंहि दडपण असल्यामुळें सत्ताधारी पक्षाला यासंबंधीं कायदे करणें भाग पडलें. ते केले नसते तर त्यांचे पुरोगामित्व आणि समाजवाद सिद्ध झाला नसता. पण या कायद्याची अंमलबजावणी होतांना पुन्हां दिरंगाई होत जाईल अशी मागील इतिहासावरून साधार भीति वाटते. एक तर कायद्याचें रूप जितकें क्रांतिकारी असलें पाहिजे तितकें होऊं शकलेलें नाहीं, आणि दुसरें म्हणजे टप्प्याटप्प्यांनीं पाऊल पुढें पडत आहे. काळाच्या मागणीबरोबर पाऊल न पडल्यामुळें कायदे अपुरे ठरत जात आहेत.

भारतांतील १॥ कोटी भूमिहीन कुटुंबांकरितां आतां जवळ जवळ ७॥ कोटी एकर जमिनीची गरज आहे हें गृहीत धरलें म्हणजे कमाल-मर्यादेच्या या कायद्यांतून जी जमीन भूमिहीनांना वांटण्याकरितां म्हणून

अनुक्रम 33vEC वि: निबंध
क्रमांक 2297 नों: दि: 90.90.62

मिळेल तिचें प्रमाण गरजेपेक्षां फारच कमी असल्याचें आढळून येईल. त्याचें कारण जमीनवाला वर्ग समाजहिताच्या दृष्टीनें अजून विचार करीत नाहीं आणि म्हणून आपल्या हातांतून जमीन बेगळी करण्याच्या बाबतींत तो खळखळ करीत आहे, कायद्यांतून पळवाटा शोधीत आहे हें आहे आणि तशी संधि त्यांना मिळण्यासारखी तरतूद कायद्यांतहि राहिलेली आहे. उदा० कमालमर्यादेच्या हिशोबासाठीं कायद्यांच्या अमलाच्या ज्या तारखा धरल्या आहेत त्यापूर्वीं कित्येक वर्षें निरनिराळ्या राज्यांत जे जमीनदारी-निर्मूलनाचे व कूळसंरक्षणाचे कायदे होत गेले, त्यांनीं कांहीं मर्यादेपर्यंत 'कमाल धारणाक्षेत्र' ठरविण्याच्या प्रश्नाला हात घातला होता आणि तेव्हांपासून जमीनमालक-वर्ग स्वहितसंरक्षणार्थ धडपड करूं लागला व त्यांनीं आपसांत वा अन्य रीतीनें कायद्यांत बसेल असें जमिनीचें वांटपहि करून टाकलें. हें पूर्वीं म्हटलेंच आहे.

कमालमर्यादेचें क्षेत्र ठरवितांना, एका कुटुंबाकडे तीन कुटुंबांचे जास्तींत जास्त क्षेत्र राहावें असें नियोजनमंडळानें मानलें आहे. त्यामुळें भाडोत्री मजुरांकडून नित्य मजूरीनें शेती करून घेण्याला त्यानें अवसर राहिला आहे, आणि म्हणून भूमिहीन मजुरांचा वर्ग कायमचा राहील अशी परिस्थिति त्यांतून निष्पन्न होत आहे. ज्याप्रमाणें कूळ कायद्यांत "जातीनें कसणूक" या शब्दांची व्याख्या करण्यांत चूक करून ठेवली आहे, तशीच कमाल मर्यादा ठरवितांना वरील प्रकारची चूक करून ठेवली गेली आहे. अशा पळवाटांमुळें कायद्याचें उद्दिष्टच नाहींसें होण्याला एक प्रकारें मदत होते. कूळकायद्यानें जमीन घेतली तर मुकदमेबाजी (Litigation) इ. वाढते. सीलिंग बनवलें तर त्यांतूनहि कांहीं निघत नाहीं, कारण खालचें सीलिंग ठेवलें तर मालक लोक असंतुष्ट होतील आणि मोबदला जास्त द्यावा लागेल, वरचें ठेवलें तर गरिबांसाठीं कांहीं जमीन उपलब्ध होण्याची फारशी आशा राहत नाहीं. म्हणून कूळकायदा काय, जमीनदारी-निर्मूलन कायदा काय किंवा कमाल क्षेत्र-धारणा कायदा काय त्यांनीं कांहीं मर्यादेपर्यंत जरी भूमिहीनांना न्याय करण्याकडे पाऊल टाकलें असलें आणि कायद्यानें सामाजिक न्यायाचा प्रश्न सोडविण्याचा पुकारा केला असला तरी आजच्या परिस्थितींत मालकलोकांची आजची विरोधी मनोवृत्ति कायम असतांना हा प्रश्न संपूर्णपणें

सुटणें कसें असंभवनीय आहे हें आतांपर्यंतच्या विवेचनावरून उघड होईल असें वाटतें. नियोजन मंडळाचाहि हिशोब ८-९ लाख एकर जमिनीपेक्षां जास्त जमीन सीलिंगच्या कायद्यानें उपलब्ध होणार नाहीं असाच आहे.

भूमिहीन शेतकऱ्यांना कांहीं-ना-कांहीं प्रमाणांत तरी जमीन देण्याची जर कल्पना आणि प्रामाणिक इच्छा असेल--आणि ती आज सत्तारूढ कॉंग्रेसपक्षाची आहे असें धरून चालण्यास हरकत नाहीं—तर आपल्या हेतु-सिद्धीस्तव एक वितीचें पाऊल टाकण्यापेक्षां खरोखर नैसर्गिक रीतीनें जेवढें पडणें अवश्य आहे तितकें पाऊल टाकलें पाहिजे. त्या दृष्टीनें जास्तींत जास्त जमीन मालकाकडे ठेवण्याची मर्यादा बांधून देतांना 'खुद्द कसणुकीं'चेंच तत्त्व समोर ठेवलें पाहिजे, आणि 'खुद्द कसणूक' म्हणजे आजच्या कूळकायद्यांत मानलेल्या भोंगळ व्याख्येप्रमाणें नव्हे तर शब्दार्थाला साजेल त्या अर्थानें. जे जमिनीवर स्वतः राबत आहेत किंवा राबतील अशांच्याकडेच यापुढें जमिनी राहतील आणि त्यासुद्धां त्यांच्या निर्वाहाला पुरेल इतक्याच प्रमाणांत राहतील असें निःसंदिग्धपणें ठरविण्यांत आलें तरच जमीन ही कसणाऱ्यांच्या हातीं राहील आणि बहुसंख्य कसणाऱ्यांना न्याय मिळेल.

परंतु त्याकरितां आजच्या जमीन-मालकांचें मन या गोष्टीला अनुकूल झालें पाहिजे. आज समाजामध्यें आणि कॉंग्रेसमध्यें या वर्गाचीच चलती आहे, तो वर्ग शक्तिमान आहे, चळवळचा आहे, बोलणारा आहे. या लोकांना जमिनीच्या न्याय्य वांटपाची भूमिका पटली तर कमाल क्षेत्र-मर्यादेऐवजीं किमान क्षेत्र-वांटपाचे कायदे फारसा अडथळा न होतां पास होतील आणि कायद्यांचें उल्लंघन होण्याची भीति बहुतांशीं नाहींशी होईल.

खुद्द-कसणुकीइतकीच जमीन गांवांतील प्रत्येक कुटुंबाकडे ठेवायची म्हटली तरी त्यांतून सर्वांना जमीन मिळूं शकत नाहीं असें म्हटलें जातें. 'किमान क्षेत्र' याचा अर्थ "आर्थिक दृष्टचा परवडणारें क्षेत्र" (Economic Holding) नव्हे तर एका बैलजोडीला कसतां येईल एवढी जमीन. तसें केलें तर किती जमीन किती कुटुंबांना उपलब्ध होऊं शकते हें खालील तक्त्याकरून ध्यानांत येईल. त्याकरितां पांच प्रान्तांचे आंकडे श्री. रा. कृ.

पाटील यांनीं आपल्या चीनच्या शिष्टमंडळाचा जो रिपोर्ट* भारत सरकारला सादर केला आहे, त्यांत दिले आहेत :

| क्रम बाब | मद्रास | आंध्र | पंजाब | मुंबई | म.प्रदेश |
|---|---|---|---|---|---|
| (अ) ज्यादा उपलब्ध होणारे क्षेत्र | | | | | |
| (१) एका कुटुंबाला पुरेसें होण्याजोगें क्षेत्र (एकर) | ७.५ | ७.५ | १५.० | १५.० | १५.० |
| (२) या मर्यादेवरील शेतांची (Holding) संख्या (लाख) | ९.७ | ५.७ | २.५ | ७.९ | ५.३ |
| (३) या मर्यादेच्या वरचें ज्यादा क्षेत्र (लाख एकर) | ७५.० | ७१.० | ३३.० | १३१.० | १०३.० |
| (ब) गरजा | | | | | |
| (१) एका कुटुंबाला किमान मानता येईल असे क्षेत्र (एकर) | २.५ | २.५ | ५.० | ५.० | ५.० |
| (२) या मर्यादेच्या खालचीं शेतें (लाख एकर) | २४.० | २२.० | ३.० | २३.० | १०.० |
| (३) या शेताचें प्रत्यक्ष क्षेत्रफळ (लाख एकर) | २७.० | २५.० | ७.० | ४७.० | २६.० |
| (४) किमान क्षेत्र करण्याकरितां आवश्यक असलेली अधिक जमीन (लाख एकर) | ३३.० | ३१.० | १०.० | ६९.० | २७.० |
| (५) भूमिहीन कुटुंबांची संख्या (लाख) | १४.५ | ९.३ | २.२ | ५.२ | ९.४ |
| (६) त्यांना वसविण्याकरितां लागणारी जमीन क्षेत्र (लाख) | ३६.० | २३.० | ११.० | २६.० | ४७.० |
| (७) एकूण आवश्यक क्षेत्र (कलम ४ व ६ धरून (लाख एकर) | ६९.० | ५४.० | २१.० | ९५.० | ७४.० |

वरील तक्त्यावरून 'किमान मर्यादा' घातल्यानें जमिनीचें उपलब्ध होणारें क्षेत्र सर्व भूमिहीनांना वसविण्याकरितां आवश्यक असणाऱ्या जमिनीच्या क्षेत्रांहूनहि अधिक राहतें हें स्पष्टपणें समजून येतें.

परंतु याकरितां माणसांच्या मनाची तयारी झाली पाहिजे ना ?

*Report of the Indian Delegation to China on Agrarian Co-operatives. –R. K. Patil, p 171

## : ७ :

# हिंसा, कायदा, कीं विचार-परिवर्तन ?

स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ करणाऱ्यांच्या मनांत केवळ इंग्रजांच्या हातांतून सत्ता काढून घेणें आणि एतद्देशीयांच्या हाती ती देणें एवढाच हेतु नव्हता. स्वातंत्र्य ज्या अंतिम उद्दिष्टासाठीं हवें होतें त्या उद्दिष्टांत समतेचा आणि नागरिकांच्या आत्मप्रतिष्ठेचा समावेश होता, किंबहुना त्या उद्दिष्टांसाठींच स्वातंत्र्य हें राजद्वार मानलेलें होतें. म्हणून, स्वातंत्र्यानंतर शक्य तितक्या लवकर जर या देशाच्या यच्चयावत् नागरिकांना समानतेचा आणि आत्मप्रतिष्ठेचा लाभ झाला नाहीं तर येथें यादवीचा धोका उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. यासंबंधींची चिह्नेंहि या दिरंगाईमुळें दिसून येत आहेत.

समता आणण्याचे अत्याचाराचे मार्ग अवलंबिले तर आर्थिक समता साधेल कदाचित्, परंतु त्यांतून नागरिकांचे स्वातंत्र्य आणि बंधुभाव दुरावेल असें अनुभवास येतें. रशियाचे-चीनचे प्रयोग आज त्या देशांची आर्थिक समृद्धि दर्शवितात असें मानलें–आणि तें खरें असलें–तरी नागरिक-हक्कांची तेथें गळचेपी आहे आणि नागरिक हा तेथें राज्य-सत्तेचा गुलाम आहे ही गोष्टहि सत्य आहे. तेव्हां केवळ आर्थिक समृद्धीकरितां आणि समतेकरितां जन्मसिद्ध स्वातंत्र्याचा बळी द्यावा लागणें हें मानवसमाजाच्या प्रगतीचें चिह्न असूं शकत नाहीं. प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य पाहिजे, त्याचबरोबर समता आणि सामाजिकताहि पाहिजे आहे. हीं तिन्ही ( स्वातंत्र्य–बंधुता–समता ) ज्या योगें साधतील, एकाकरितां दुसऱ्याचा बळी द्यावा लागणार नाहीं, असा सुवर्णमार्ग जो शोधील तो मानवसमाजाचें कल्याण करील अशी स्थिति आहे.

लोकशाहीमध्यें असा सुवर्णमार्ग सांपडेल अशी माणसाची श्रद्धा आहे. परंतु त्यांतहि जर नागरिकांत सामाजिकता ( समाजविषयक कर्तव्यभावना) आणि समानता आणण्याकरितां नागरिकाच्या स्वातंत्र्याचा अपहार

राज्यसत्तेकडून होऊं लागला, कायदा हा जर पदोपदीं तलवारीचेंच काम करूं लागला, सामान्य नागरिकाला पदोपदीं कायद्याच्या भंगाचें भय उत्पन्न होईल इतकें कायद्याचें जंजाळ वाढलें, तर लोकशाहीविषयींचा दावासुद्धां फोल ठरेल अशी भीति आहे. आणि लोकशाहीची पद्धति विफल ठरली तर मग मानवसमाजापुढें मार्गच नाहीं असें होईल.

म्हणून लोकशाहीच्या पद्धतींत सुद्धां कायद्याचें बळ हें 'दंडबळ' न राहतां 'संमतिबळ' राहिलें पाहिजे अशा निष्कर्षावर यावें लागतें. 'संमतिबळ' या शब्दानें केवळ लोकांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींपैकीं बहुसंख्यांची संमति एवढाच अर्थ गृहीत धरून भागणार नाहीं. संमति म्हणजे समाज-मानसाची अनुकूलता, लोकांना विशिष्ट कायद्यामधील नीतितत्त्वें ग्राह्य होणें. असें न झालें तर रुसोनें कायद्यांसंबंधीं एके ठिकाणीं जें म्हटलें आहे तें लोकशाहींतसुद्धां सार्थ ठरेल. तो म्हणतो :

"Laws are always useful to those who own, and injurious to those who do not......laws gave the weak new burdens and the strong new powers."

("कायदे हे नेहमीं संपत्तीवाल्यांना उपकारक होतात, गरीबांना उपद्रवकारक ठरतात......कायद्यांनीं दुर्बळावर नवीं कर्तव्यें लादलीं आणि सबळांना नवे अधिकार दिले.")

आज परिग्रहाच्या आंवतींभोवतीं कायद्याचा असा व्यूह रचला गेला आहे कीं, तो परिग्रह कायदेशीर होऊन बसला आहे. चोरी शिक्षेस पात्र ठरविली गेली आणि ज्यानें चोराला चोरीची प्रेरणा दिली त्याला मात्र रक्षणाची हमी मिळाली. हें बदलण्यासाठीं होणारे कायदे जनतेच्या पुरुषार्थाशिवाय शक्तिशाली होणार नाहींत.

"कायद्याची शक्ति फार मर्यादित आहे. लोकमताच्या पाठिंब्याशिवाय कायदा हा पोरक्या पोराप्रमाणें आहे. लोकमताच्या म्हणजे शिष्टसांप्रदायाच्या मागोमाग येणारा कायदा उत्तम, लोकमताच्या एक दोन पाऊलें पुढें चालणारा कायदा मध्यम व लोकमत मागें टाकून भरधांव धांवणारा कायदा अधम होय. तो फोल, हास्यास्पद व शासन-संस्था

अनादराला पात्र करण्यास करणीभूत होतो. कायदा हा आचारांतून उत्पन्न व्हावा. आधीं कायदा, मग आचरण हा क्रम उलटा आहे," असें श्री. अप्पासाहेब पटवर्धन यांनीं लिहिलें आहे तें विचारणीय आहे.

या जमीन-वांटपाच्या कायद्याचेंच उदाहरण घेतलें तर आजचे त्या बाबतींतले कायदे अल्प परिणाम करणारे दिसून येतात. श्री. विनोबांनीं आपल्या एका भाषणांत हा विषय सुरेख शब्दांत मांडला आहे. ते म्हणाले :

"कायदा जमिनीच्या न्याय्य वांटपाचें काम करील असें सामर्थ्य कायद्याला लाभलेलें नाहीं, आणि कायदा जितकें करूं शकतो तितकें करण्याची शक्ति सत्तावाल्या लोकांत नाहीं. अशा रीतीनें कायदा स्वतः दुर्बल आहे आणि आज कायदा ज्यांच्या हातांत आहे ते त्याहूनहि दुर्बल आहेत. अशी ही दुहेरी दुर्बलता आहे. कायद्यानें सर्वांचें मानसिक सौमनस्य वाढण्याऐवजीं वैमनस्य, झगडे इ. वाढतात. त्यायोगें भारत शक्तिशाली होणार नाहीं. नव्हे, कटकटी निर्माण होतील. गांवागांवांतून झगडे होतील तर त्याचा परिणाम म्हणून आपण आपले स्वातंत्र्यसुद्धां गमावून बसूं, असा संभव आहे. आज जमीनवाले लोकच असेंब्लीमध्यें जाऊन बसले आहेत, हें लोकांना माहीत आहे. नुकतेंच आंध्रमध्यें सीलिंगचे बिल बनूं घातलें आहे. त्यांनें सीलिंग कमी करण्याचा प्रयत्न आहे. त्या सीलिंगनें ८० लाख भूमिहीनांना जमीन मिळण्याजोगी आहे. परन्तु ती मिळविण्याकरितां सरकार जो खर्च करणार तेवढ्यांत तितकी जमीन खरेदी देखील होऊं शकते. आंध्रचा हा नवा कायदा केंद्रीय सरकारला पसंत नाहीं म्हणून तो तहकूब करावा लागला. या उदाहरणांनीं मीं आपल्याला कायदा कोणत्या दिशेनें जात आहे तें दाखवीत आहें. कायद्याची स्वतःची असमर्थता आणि सरकारची असमर्थता असा दोहोंच्या असमर्थतेचा वर्ग झाला आहे. म्हणून हें काम कायदा करूं शकत नाहीं, करुणाच करूं शकते. करुणा या आपल्या देशांत उदंड आहे. ती जरा खोदावी लागेल तेव्हांच परिणामकारक काम होईल."

दुसऱ्या दृष्टीनें विचार केला तर 'मध्यस्थ'- निर्मूलन कायद्यांनीं आणि सीलिंगच्या कायद्यानें सरकार आपल्याकडे घेत असलेल्या जमिनीचा

मोबदला (Compensation) घटना-कायद्याप्रमाणें द्यावा लागणार आहे. आजच्या हिशोबाप्रमाणें जमीनदार इ. वर्गाला द्यावी लागणारी रक्कम ६२५ कोटींच्यावर आहे. शिवाय सीलिंगमधून मिळणाऱ्या जमिनीची रक्कम काय द्यावी लागेल याचा अजून अंदाज झालेला नाहीं. इतकी सर्व रक्कम काढणें सरकारला आजच्या परिस्थितींत अशक्य आहे. म्हणून सरकारची मन:स्थिति या बाबतींत निरुत्साही राहणार हें स्वाभाविक आहे.

आपण लोकशाही मानली आहे. लोकशाहीचा अर्थ आहे समता. आपल्या व्यक्तित्वाच्या विकासाकरितां प्रत्येकाला संपूर्ण संधि आणि साधन मिळावें हा समतेचा आशय आहे. जनतेला समतेची भूक आहे. समतेशिवाय लोकशाही टिकविणें अशक्य आहे. उत्पादनाच्या साधनांवर जोंपर्यंत खाजगी मालकी राहील तोंपर्यंत समता प्रस्थापित होणार नाहीं. खाजगी मालकी राहील, तोंपर्यंत शोषणहि राहणारच.

देशांत जी कांहीं शेतजमीन उपलब्ध आहे, तिचा वापर समान हक्कानें करण्याची संधि, जे भूमिहीन आणि अल्प जमीनवाले आज तिच्यावर राबून जगत आहेत, त्यांना मिळाली पाहिजे. या देशाचा प्रत्येक नागरिक काम मिळण्याचा हक्कदार आहे आणि त्याच्याजोगें काम त्याला मिळालें पाहिजे या तत्त्वाची आपल्या घटनेनें दखल घेतली आहे. परंतु परिस्थिति मात्र अशी आहे कीं जमिनीची वांटणी करायची म्हटलें तर त्याकरितां जमीन पुरेशा प्रमाणांत मोकळी होत नाहीं. यालाहि कारण घटनेनें नागरिकाला दिलेला मूलभूत स्वातंत्र्याचा आणि मालमत्ता बाळगण्याचा हक्क (Right to Property) हाच आहे. ही घटनेंतील दोनहि तत्त्वें उदात्त आहेत, वांछनीय आहेत, पण एक दुसऱ्याला मारक होत आहेत अशी स्थिति आहे. त्यावर लोकशाहींत कायद्यानें उपाय काय करतां येण्याजोगा आहे ? नियोजन-मंडळ आणि सरकार या परिस्थितीपुढें हात टेकून म्हणतें कीं आम्ही येथें हतबल आहोंत. आम्हांला यांतून मार्ग काढतां येईल असें दिसत नाहीं.

अशा परिस्थितींत कत्तलीचा म्हणजे जोरजबरदस्तीचा वापर न करतां आणि आजच्या परिस्थितींत कायद्याचाहि आसरा न घेतां मार्ग

काढायचा तर शिक्षणावांचून म्हणजेच अहिंसेवांचून दुसरा इलाज नाहीं. गांधीजींनीं म्हटलें आहे : "अहिंसेचा अर्थ विरोधकाच्या पोटांत शिरणें, त्याचें अंतःकरण बुद्धीसह काबीज करणें, त्याच्यांतील सुहृद्‌भावाची आणि कर्तव्याची जागृति करणें." घटनेला धक्का न लावतां न्याय प्रस्थापित करण्याचा हा एकच मार्ग आहे.

गांधींजींनीं लिहिलें आहे :

"आपल्याला हवा असलेला बदल जर अहिंसेच्या साधनांनीं घडवून आणला तर वरिष्ठ वर्गाच्या बौद्धिक शक्तींना जग आंचवणार तर नाहींच, पण वरिष्ठ वर्गहि त्या आपल्या बुद्धीचा वापर मजुरांना बळी देऊन करणार नाहीं. पुढें होणाऱ्या अहिंसक समाजव्यवस्थेंत जमीन राज्यसत्तेच्या मालकीची राहील. अशा रचनेंत बौद्धिक शक्ति आणि श्रमशक्ति वायां जाणार नाहींत. ...अहिंसक मार्गांनीं ही सुधारणा घडवून आणायची तर धनिकांचें आणि गरीबांचें दोघांचेंहि शिक्षण करूनच ती होईल. धनिकांना हमी दिली पाहिजे कीं तुमच्या विरुद्ध जबरदस्ती कधींहि उपयोगांत आणली जाणार नाहीं. गरीबांना हें ओळखायला शिकविलें पाहिजे कीं तुमची इच्छा नसेल तर तुम्हांला कांहींहि करायला लावण्याची सक्ती कोणीहि करूं शकणार नाहीं. तुमचें स्वातंत्र्य अहिंसेची म्हणजेच आत्मक्लेशाची विद्या शिकूनच तुम्ही मिळवूं शकाल. हा हेतु साध्य करून घ्यायचा असेल तर उपरिनिर्दिष्ट शिक्षणाची सुरुवात आतांपासूनच केली पाहिजे. त्याचें पहिलें पाऊल म्हणजे एकमेकां-विषयीं आदराचें व विश्वासाचें वातावरण प्रस्थापित केलें पाहिजे."

सारी जमीन देवाची म्हणजे निसर्गानें निर्माण केलेली. जमीन निर्माण करण्यांत माणसाची शक्ति लागलेली नाहीं. शेतीसाठीं उपयोग करून घेण्या-करितां तिला तयार करण्यांत माणसाचे श्रम आणि बुद्धि खर्ची पडलेली आहे ही गोष्ट मात्र खरी. म्हणून माणसांना आपल्या उपजीविकेपुरती जमीन आपल्याकडे ठेवण्याचा हक्क मिळाला आहे. पण त्याहून जास्त जमीन स्वतःकडे ठेवणें म्हणजे एकतर आपल्याच शेजाऱ्याला त्या हक्कापासून वंचित करणें आणि वर त्यालाच लुबाडण्याचा गैरवाजवी हक्क उपभोगणें आहे. जमिनीचा हा खरा उपयोग नाहीं, तो न्यायाला आणि माणुसकीला

धरून नाहीं. आणि जेथें लोकसंख्येच्या मानानें जमीन थोडी तेथें तर तो ईश्वराचा आणि समाजाचा दोघांचाहि गुन्हाच आहे.

खरें म्हणजे जमीन, त्यावर राहणाऱ्या सगळ्या समाजाची किंवा गांवाची आहे. समाजालाच तिची व्यवस्था करण्याचा अधिकार आहे. तो अधिकार मान्य करून चालण्यांतच सामाजिक व्यवहार सुरळीत चालणार आहेत. त्या अधिकारावर अतिक्रमण करण्यांत शेवटीं व्यक्तीचें अकल्याण आहे. कारण ती समाजाचा शत्रु बनते.

माणुसकी, शेजारधर्म, सामाजिक बुद्धि, स्वातंत्र्याची कदर या सर्व दृष्टीनें, आपल्यापाशीं, आज जी अतिरिक्त जमीन आहे ती समाजाकडे सुपूर्त करणें हाच व्यक्तीच्या कल्याणाचा, आनंदाचा, आणि सुखाचा उपाय आहे. यांतूनच समाजांत सहकार्य वाढीस लागेल. सहकार्यानें साधनशक्ति वाढेल, श्रमाचा व बुद्धीचा संयोग होईल, राष्ट्राचें उत्पादन वाढेल आणि यांतूनच देश समृद्ध होईल. व्यक्तीच्या स्वार्थांतून देशांत समृद्धि येते हा भांडवलशाहीचा सिद्धांत आतां अनुभवानें खोटा ठरला आहे.

यच्चयावत् शिक्षित-अशिक्षित, श्रीमंत-गरीब नागरिकांना हें शिक्षण देण्याची आणि एकमेकांत एकमेकांविषयीं, गांधीजी म्हणतात त्याप्रमाणें, सुहृद्भाव आणि विश्वास उत्पन्न करण्याची आवश्यकता आहे. त्यानें विचारांत परिवर्तन होईल, आज मानलेली खोटीं मूल्यें बदलतील, ज्याच्या जवळ जास्तींत जास्त जमीन तो प्रतिष्ठित ही भावना जाईल. जो स्वत: शेतांत राबतो तो दरिद्री, हलका ही कल्पना नाहीशीं होईल. विचारपरिवर्तनानें सगळेच प्रतिष्ठित बनतील. सर्वांना एकमेकांविषयीं सहानुभूति वाटूं लागेल. यांतूनच माणुसकी जागी होईल आणि तो शेजारधर्म पाळायला लावील. कोण एक वेळ जेवतो, कोण दोन दिवसांचा उपवासी आहे, हें समजूं लागेल. मन त्याच्या कारणाच्या मुळाशीं जाईल. न्यायाची भावना उचल खाईल आणि आपल्यांत शेजाऱ्याला वांटा देण्याची आपोआप प्रेरणा स्फुरेल. या ध्येयाच्या पूर्तींत मन समाधान मानेल. अशा रीतीनें गांवांतल्या प्रत्येकाला काम करण्याचा, कामाचें साधन मिळण्याचा, काम करून उपजीविका करण्याचा हक्क प्राप्त होईल. कोणाच्याहि स्वातंत्र्याला बाधा न पोहोचतां घटनेंतील तें निर्देशक तत्त्व (Directive Principle)

अमलांत येईल. शेजारधर्माच्या या कृतीवर कायदा शेवटीं आपलें शिक्कामोर्तब करील आणि तें पक्कें होईल. लोकांनींच आपसांतला अन्याय, आपसांतलें दैन्य, आपसांतील बेकारी, आपसांतील विषमता आपल्याच प्रयत्नांनीं घालवायला प्रवृत्त होणें यांत त्या कार्याचें यश तर आहेच पण हें सर्व करण्याच्या प्रक्रियेंतून जी एक शक्ति लोकांत निर्माण होते तिचें महत्त्व सर्वांत मोठें आहे. लोकशक्ति हें तिचें नांव आहे. या लोकशक्तिविना लोकशाही निष्प्राण आणि जड आहे. या लोकशक्तीची उपासना शिकविणें हें मोठें काम आहे. यावरच लोकविकासाच्या योजनांचें यश अवलंबित आहे. लोकशक्तिवांचून या योजना फलद्रूप होणें कठिण आहे.

हें सारें चित्र मोठें रम्य आहे. हा सारा आदर्शवाद मनाला गोड वाटणारा आहे. परंतु तो व्यवहारांत उतरणें अशक्य आहे. हें सारें व्यवहाराच्या अभावीं स्वप्नरंजनच आहे. मनुष्य हा स्वार्थी आहे. बुद्धि ज्यावेळीं स्वार्थाच्या आधीन होते तेव्हां ती न्याय ओळखत नाहीं. जमीनदार माणसें समाजहित किंवा शेजाऱ्याचें हित पाहतील असें वाटत नाहीं. स्वराज्य आल्यानंतर सरकारनें जमीनदाऱ्या आणि वतनदाऱ्या तसेंच सरंजामशाही ही कायद्याच्या फटकाऱ्यानें घालविली आहे. कत्तल अयोग्य आहे. कायदा अपुरा पडत असला तरी त्याच्या भीतीनेंच काम होईल, हृदयाच्या परिवर्तनावर अवलंबून राहिलों तर युगांतरापर्यंत वाट पहावी लागेल. मनुष्यस्वभाव रक्तमय क्रान्तीला वचकतो, शांतिमय आर्जवांना दाद देत नाहीं. लोक जितके जमिनीसाठीं भुकेलेले आहेत तितके अहिंसेसाठीं नाहींत. अहिंसेचा मार्ग समाजांत बदल घडवून आणण्याला समर्थ आहे हें अनुभवानें सांगतां येईल काय? अशा शंका आणि आक्षेप निर्माण होतात. ते रास्त नाहींत असें नाहीं. ते प्रत्यक्ष अनुभवाची मागणी करतात. त्यांना उत्तर हें आहे कीं, अहिंसेनें विचार परिवर्तन करण्याचा, विचारपरिवर्तनांतून जीवन-परिवर्तनाचा आणि जीवन-परिवर्तनांतून समाज-परिवर्तनाचा गेल्या १० वर्षांत जो देशव्यापी आणि ग्रामव्यापी प्रयत्न 'भूदान-यज्ञ' या नांवानें प्रयोगरूपानें ज़मिनीच्या वांटपाच्या बाबतींत करून पाहिला गेला आहे त्याचे परिणामच त्या साधनाची योग्यायोग्यता सांगतील. तो प्रयोग आतां तपासला पाहिजे.

: ८ :

## विचारपरिवर्तनाचा प्रयोग : भूदान-यज्ञ

तेलंगण हा भारतांतल्या अत्यंत कंगाल प्रान्तांपैकीं एक प्रान्त आहे. ज्याकाळची गोष्ट आतां सांगणार आहोंत त्याकाळीं निजामाची सुलतानी रियासत नुकतीच संपली होती तरी अंदाधुंदीचा मामला अजून आवरला गेला नव्हता, रझाकारांची राख अजून धगधगत होती. छोटे छोटे जमीनदार अजूनहि परंपरागत वैभवाच्या नशेंत होते. आपापल्या सरंजामशाहीचे ते राजेच होते. तेलंगणांतील रयत बहुतांशीं निव्वळ गुलामींत खितपत होती. राबणाऱ्या लोकांना स्वतःची जमीन नव्हती, रोजगार मिळेल तेथें जावें, मिळेल तेव्हां पोटाला खावें, उपासपोटीं दिवसांमागून दिवस काढावे, अशा रीतीनें भूमिहीन मजुरांचीं कुटुंबेंच्या कुटुंबें वर्षानुवर्षें जगत आलीं होतीं. पोटाकरितां हमखास काम आणि कामाचें साधन मिळण्याचा आपल्याला जन्मसिद्ध अधिकार आहे, याची जाणीव इतर लोकांप्रमाणेंच त्यांनाहि नव्हती. भूक भागविण्याचें साधन जमीन, ती पाहिजे म्हटली तरी कशी मिळणार ? देवानें भाग्यवंतांना जमीन दिली, आपण अभागी जन्माला आलों आणि तसेच मरणार, अशीच मनोभावना या सगळ्या लोकांची होती. कांहीं ठिकाणीं जमीनदारांच्या आणि सरंजामदारांच्या जुलुमानें कांहीं निखारे फुलले असले तरी ते क्वचितच !

स्वराज्याच्या जागृतीच्या काळांत तेलंगणांतले कांहीं शिक्षित तरुण आपल्या भागांतल्या या गरीबांच्या केविलवाण्या परिस्थितीच्या दर्शनानें संतप्त झाले, सरंजामशाहीची त्यांना चीड आली आणि गरीबांना या अवस्थेंतून ताबडतोब मुक्त करण्याच्या उतावळीनें त्यांनीं चीनच्या 'माओ-तंत्रा'चा अवलंब केला. गनिमी पद्धतीनें लढण्याकरितां त्यांनीं टोळ्या तयार केल्या. गरीब लोकांमधूनच त्यांनीं निवडक निवडक तरुण या टोळ्यांत घेतले. क्रांतीचा मंत्र आणि तंत्र त्यांनीं त्यांना समजावून दिलें. जमिनीची

भूक या मार्गानें भागण्याची आशा त्यांनीं त्यांच्यांत निर्माण केली आणि देशांत तेलंगणाचा एक कम्युनिस्ट टापू (Pocket) निर्माण करण्याचा चंग त्यांनीं बांधला. अर्थात् कांहीं अखिल भारतीय पातळीवरच्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांचें मार्गदर्शन आणि मदत त्यांना होती च. रात्रीं बेरात्रीं जमीनदारांच्या गांवांवर आणि घरांवर सशस्त्र छापे घालावेत, त्यांना दहशत दाखवावी, कित्येक ठिकाणीं खून पाडावेत, जबरदस्तीनें जमिनीची आश्वासनें घ्यावींत, पैसे मिळवावेत. अशा रीतीनें साऱ्या तेलंगणभर त्यांनीं धुमाकूळ माजविला. भारत सरकारनें रझाकारांची चळवळ दडपून टाकल्यानंतर सुद्धां तेथें आपलें सैन्य ठेविलें होतें. परंतु कम्युनिस्टांच्या गनिमी टोळ्या एक प्रकारें तिथल्या लोकांच्या सहानुभूतीच्या बळावर काम करीत असल्यामुळें, लष्कराला किंवा पोलिसांना त्या आटोपत नव्हत्या. कम्युनिस्टांच्या या बंडखोरींत दोनतीन हजार लोक मारले गेले म्हणतात. कोटचवधि रुपयांची नासधूस झाली आणि हजारों भूमिहीनांना जमीनदारांच्या जमिनी काढून देण्यांत आल्या. दिवसा पोलीस आणि रात्रीं कम्युनिस्ट यांच्या कात्रींत तेथील जनता कित्येक दिवस सांपडली होती. पोलीसांच्या कारवाईनें अनेक कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची धरपकड होऊन त्यांना तुरुंगांत अडकवण्यांत आलें होतें. लोक या अराजकाला कंटाळून गेले होते. अशा परिस्थितींत शांतिप्रस्थापनेसाठीं म्हणून श्री. विनोबांनीं तेलंगणांत आपली पदयात्रा सुरू केली. तत्पूर्वीं पकडलेल्या कम्युनिस्टांना ते सरकारची परवानगी घेऊन भेटले, आणि अत्यंत सहानुभूतिपूर्वक त्यांच्याशीं त्यांनीं चर्चा केली. कित्येक कम्युनिस्टांनीं आपला पराभव कबूल केला. परंतु शांतीच्या मार्गाच्या यशस्वितेविषयीं दाट शंका व्यक्त केली. अर्थात् या शंकेला उत्तर शब्दांनीं देण्यांत अर्थ नव्हता. प्रत्यक्ष कामच खात्री करून देऊं शकणार होतें.

तेलंगणांत जमिनीची भूक जागृत केली गेली आहे, ती रास्त आहे, याची विनोबांना चांगली कल्पना आली होती. तथापि त्यांच्या पदयात्रेचा हेतु लोकांमध्यें धैर्य निर्माण करणें, त्यांना दिलासा देणें, स्वतःच्या पायावर उभें राहण्याचें शिक्षण त्यांना देणें, हा होता. हैद्राबाद जिल्ह्यांतून पदयात्रा नळगोंडा जिल्ह्यांत प्रविष्ट झाली. नळगोंडा आणि वारंगळ हे दोन जिल्हे कम्युनिस्टांचे बालेकिल्ले समजले जात होते. अजूनहि कम्युनिस्टांचें वर्चस्व

तेथें होतें. या नळगोंडा जिल्ह्यांतील पोचमपल्ली गांवीं विनोबांचा पहिला मुक्काम होता. सकाळीं नित्याच्या रिवाजाप्रमाणें गांव पाहण्यासाठीं विनोबाजी फिरत असतां हरिजनवाड्यांत गेले. तेथें हरिजनमंडळींनीं त्यांचें स्वागत केलें आणि बोलतां बोलतां हात जोडून त्यांनीं जमिनीची मागणी केली. सारे हरिजन जमिनदारांकडे मजुरीनें शेती करीत होते आणि या कष्टाच्या मोबदल्यांत त्यांना वर्षाअखेरीस साऱ्या पिकाचा $\frac{1}{20}$ भाग, १ घोंगडें आणि एक वाहाणाचा जोड मिळत होता. विनोबा म्हणाले, "तुमची मागणी बरोबर आहे, पण मी तुम्हांला जमीन कोठून देणार ? तरी पण माझ्याकडे एक अर्ज लिहून द्या, हैद्राबाद सरकारकडे मी प्रयत्न करून पाहीन."

म्हणजे विनोबांनाहि जमिनीची मागणी पुरी करता येईल याविषयीं खात्री नव्हती. तेथें ते बसले असतांना मागून गांवची मंडळी येऊन बसली. विनोबांनीं त्यांना सहज म्हटलें : "पहा, या तुमच्या गांवच्या हरिजन-मंडळींची जमिनीची मागणी आहे आणि त्यांना जमीन मिळणें रास्त आहे. ४० एकर बागाईत आणि ४० एकर जिरायत अशी ८० एकर जमीन आपल्याला पुरेल असें ते म्हणतात. सरकारकडे मी प्रयत्न करून पाहीन म्हणतों, परंतु सरकारचा प्रयत्न किती अनिश्चित असतो हें तुम्हांला माहीतच आहे. तुमच्यापैकीं कोणी आपल्या या बांधवांना जमीन देऊं शकणार नाहीं का?" लगेच एक गृहस्थ उभे राहिले. त्यांनीं सांगितलें :"मी माझी १०० एकर जमीन या हरिजनांना देतों." विनोबाजी क्षणभर त्याच्याकडे पाहातच राहिले. म्हणजे त्यांनाहि कोणी आपली मालकीची जमीन खुषीनें काढून देऊं शकतो याची खात्री नव्हती, त्यांनीं पुन्हां त्या गृहस्थाला विचारलें, "तुम्ही काय म्हणालांत तें पुन्हां बोला." त्या गृहस्थानें आपल्या दानाचा पुनरुच्चार केला आणि ताबडतोब एका कागदावर आपलें १०० एकरांचें दान लिहून दिलें. सायंकाळच्या सभेंत विनोबांनीं या घटनेचा उल्लेख केला आणि श्री. रामचंद्र रेड्डी नांवाच्या ज्या गृहस्थांनीं जमिनीचें दान दिलें होतें त्यांना उठून उभें राहायला सांगितलें. विनोबाजी म्हणाले, "मी माझी १०० एकर जमीन देईन असें ज्यानें वचन दिलें आहे तो हा गृहस्थ. तो तुमच्यापुढें उभा आहे. जर त्यानें जमीन दिली नाहीं तर

तो ईश्वराचा अपराधी ठरेल. हें लक्षांत ठेवा, परंतु जर यानें जमीन दिली तर सर्वच्या सर्व हरिजन मंडळींनीं प्रेमभावानें एकत्र होऊन ही जमीन कसायची ही जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडते." रामचंद्र रेड्डी यांनीं आपल्या दानाचा येथें पुन्हां उच्चार केला.

भूमिहीनांनीं जमीन मागणें आणि त्या मागणीचा रास्तपणा पटवून देणाऱ्याच्या विनंतीला लगोलग उत्तर मिळणें या दोन घटना येथें घडलेल्या पाहायला मिळतात. श्री. रामचंद्र रेड्डी हे एक जमीनदार होते. कम्युनिस्टांच्या कर्तबगारीनें म्हणा किंवा न्यायबुद्धि जागृत झाली म्हणून म्हणा त्यांच्या मृत पित्यानें भूमिहीनांना देण्याकरितां जमीन काढून ठेवली होती. मृत पित्याची इच्छा पुरी करण्यासाठीं म्हणून म्हणा किंवा कर्तव्य-जागृति म्हणून म्हणा, बापाचा वारसा आलेल्या जमीनदार मुलानें ही जमीन देऊन टाकली. यावरून जमीनदारवर्गांत जमीन आतां मोठ्या प्रमाणांत आपल्याजवळ ठेवणें अयोग्य आहे, ठेवून चालणार नाहीं, या गोष्टीची जाणीव आली होती असें दिसून येतें. पुढें विनोबाजी त्या भागांत जवळ जवळ दोन महिने हाच जमीन मागण्याचा कार्यक्रम घेऊन हिंडले आणि सुमारे १२ हजार एकर जमीन भूमिहीनांकरितां त्यांचेकडे देण्यांत आली.

हा एक प्रकारें समाजव्यवहारांतला अलौकिकच अनुभव म्हणावयाचा. जमीन मागून मिळणारी वस्तु नाहीं. प्राणापेक्षाहि ती माणसाला प्रिय आहे; जिच्याकरितां शेजाऱ्यांचे खून पडले आहेत, जिच्याकरितां घरेंदारें धुळीस मिळालीं आहेत, अशी ही जमीन; पण ती मागून मिळाली. मंदिरा-करितां नव्हे, भुकेल्या माणसांकरितां मिळाली; मालकी हक्क राखून ठेवून नव्हे, मालकीवर पाणी सोडून मिळाली; एक-दोघांच्याकडून नव्हे, सुमारे ६०० लोकांच्याकडून मिळाली. सगळे देणारे मातब्बर जमीनदारच असतील असें नाहीं, छोटेहि कांहीं असतील. भूमिहीनांकरितां जमीन न्यायाच्या नांवानें मालकांच्या हातांतून वेगळी होऊं शकते हा सामाजिक व्यवहारामधला अगदीं आगळा आणि कदाचित् पहिलाच अनुभव पण अगदीं नैसर्गिकपणें आलेला, तोच पुढें 'भूदान-यज्ञ' या नांवानें जगभर गाजला.

अशी जमीन देणाऱ्याच्या मनाची स्थिति काय असते ती पोचमपल्लीचे जमीनदार रामचंद्र रेड्डी यांच्या तोंडूनच ऐकूं या : "मी या घटनेचा जेव्हां विचार करतों तेव्हां मला समजून येतें कीं मीं त्यावेळीं जें केलें त्यापेक्षां दुसरें कांहीं करूं शकलों नसतों. दान करण्याची माझ्यावर कोणी सक्ती केली नव्हती, किंवा औदार्याच्या झटक्यांतहि मी तें केलें नव्हतें. विनोबांची भेट होण्यापूर्वींहि मी हरिजनांना जमीन द्यावयाच्या विचारांतच होतों, परंतु विनोबांनीं समाजाच्या आजच्या परिस्थितींत ज्यांना जमीन नाहीं त्यांना ती देण्याची आवश्यकता तर्कदृष्टचा पटवून दिली आणि माझ्या नैतिक कर्तव्याची मला ओळख झाली. कांहीं लोक म्हणतात कीं भावनेच्या आहारीं जाऊन लोक दान देतात. पण माझ्या बाबतींत तरी तें खरें नाहीं. दुसऱ्या कांहींचें म्हणणें आहे कीं, जमीनमालकावर नैतिक दबाव आणला जातो. परंतु त्यांत चूक काय आहे ? आपलें नैतिक कर्तव्य जाणून भूमिहीनांना जमीन देणें योग्य नाहीं काय ? नैतिक कर्तव्यपूर्तीच्या भावनेंतून दान करण्यानें मनांत मागाहून कटुता राहत नाहीं, हृदय निर्मळ होतें आणि शतकानुशतकांचें ओझें खालीं उतरल्यामुळें मन कसें मोकळें होतें."

यानंतर केवळ विनोबाजीच नव्हे तर लहानमोठे अनेक कार्यकर्ते देशभर खेडचापाडचांतून जमीन मागण्याकरितां हिंडले आहेत आणि मागून जमीन मिळते असा आशावादी अनुभव त्यांना आला. तेलंगणांत कदाचित् दहशतीनें गांजले जाऊन जमीनदारांनीं जमीन दिली असेल असा संशय घेऊन खुद्द विनोबाजींनीं च वर्धा-नागपुर-मध्यप्रदेश-विंध्यप्रदेश, नव्हे उत्तर प्रदेश आणि बिहार यासारख्या दाट लोकवस्तीच्या व गंगा-यमुनांसारख्या नद्यांच्या अत्यंत सुपीक भागांत सुद्धां नाना धर्मांच्या, नाना वर्गांतल्या, नाना पेशांच्या अनेकांकडून जमीन मागितली आणि त्यांना जमीन मिळाली. या जमीन मागण्यांतले आणि मिळण्यांतले अनुभव अलौकिक आहेत, अतिशय हृदयंगम आहेत. मुख्य अनुभव असा कीं भूमिहीनांना न्याय देण्याचा आणि ज्याच्यापाशीं जें असेल त्यांतला अंश त्यानें समाजाला अर्पण करण्याचा विचार कोणी अमान्य करीत नाही. वृत्तीप्रमाणें आणि शक्तीप्रमाणें लोक देतात पण विचार पुरता मान्य करतात. आधीं विचारांत परिवर्तन, मग जीवनांत परिवर्तन. कोठेंहि आग्रह नाहीं, दडपण नाहीं, हट्ट नाहीं, सक्ती नाहीं. "आमचा विचार समजल्यानंतर जर कोणी देत नसलें तर त्याचें आम्हांला दुःख होत

नाहीं, कारण आम्ही मानतों कीं जो आज देत नाहीं तो उद्या देणारच आहे. विचार-बीज उगवल्याशिवाय राहात नाहीं. आमचा विचार समजून जर कोणी दिलें तर त्याचा आम्हांला आनंद होतो, कारण त्यामुळें सर्वत्र सद्भावना निर्माण होते. आमचा विचार समजल्याशिवाय कसल्यातरी दडपणानें जर कोणी देईल तर त्यानें मात्र आम्हांला दुःख होईल. कसेंहि करून जमीन मिळविणें हा कांहीं आमचा उद्देश नाहीं, तर साम्ययोग व सर्वोदयाची वृत्ति आम्हांला निर्माण करावयाची आहे," असा विनोबाजींचा बाणा आहे. याला विचाराच्या मूळ सामर्थ्यावर प्रचंड श्रद्धा लागते, अनन्य निष्ठा लागते ही गोष्ट खरी, पण त्यावांचून कोणतें समाजकार्य आजवर घडलेलें आहे ? विनोबाजींनीं आपला एक मनोरंजक अनुभव त्या संदर्भात सांगितला आहे : "अमुक मनुष्य दान देईल तर इतर सारे दान देतील असें लोकांनीं एकदां मला सांगितलें. याचा अर्थ तो कधीं दान देणारच नाहीं असें त्यांनीं मनांत पक्कें धरलें होतें. मला आश्चर्य वाटलें. मी त्याच्याकडे गेलों आणि सांगायला सुरुवात केली : 'मी तुमचा भाऊ आहें आणि एक गोष्ट तुमच्यापुढें मला मांडायची आहे. (त्यानें आजवर कोणालाहि दान दिलें नव्हतें हें मला माहीत होतें.) तुम्ही आजवर कुणालाहि दान दिलेलें नाहीं, त्याअर्थीं तुम्ही सर्व दान माझ्याकरितां राखून ठेवलें आहे असें मी समजतों. लोकांनीं सारखें मागत राहावें आणि आपण दान देत सुटावें हा मूर्खपणा होईल. म्हणून दान विचारपूर्वक दिलें पाहिजे. मी आज तुमच्याकडे मागायला आलों आहे, परंतु त्यापूर्वी माझा विचार समजावून द्यायला आलों आहे. विचार पटला तर तुम्ही द्या, विचार पटला तर तुम्ही जरूर द्याल असा मला विश्वास आहे'. अशी संपूर्ण श्रद्धा ठेवून जसा मुलगा आईकडे जातो आणि म्हणतो : 'आई मला भूक लागली आहे', आणि आई त्याला खायला देते, अगदीं तश्शाच श्रद्धेनें मीं माझें म्हणणें त्याच्यापुढें मांडलें. तेव्हां त्या गृहस्थानें इतकें दान दिलें कीं माझी तितकी अपेक्षाच नव्हती. लोकहि चकित झाले. म्हणूं लागले, 'पहा, बाबाचा केवढा प्रभाव आहे.' मीं म्हटलें, 'बाबांनों, हा बाबाचा प्रभाव नाहीं, हा विश्वासाचा प्रभाव आहे.' आणि ही विश्वासाची शक्ति कांहीं बाबाच्या बापाचीच इस्टेट नाहीं. ही इस्टेट कुणालाहि लाभूं शकते. ही गोष्ट मी मुद्दाम कार्यकर्त्यांकरितां सांगितली आहे."

विनोबांना कळ सांपडली आणि त्यांनीं देशभरच्या कार्यकर्त्यांना आवाहन केलें. जुने कार्यकर्ते जे मिळाले त्यांनाहि आणि नवे तरुण मिळाले त्यांनाहि विनोबांनीं कामाला लावलें. बिहारमध्यें तर कार्यकर्त्यांना असा अनुभव आला कीं मागायला जाणारेच कमी पडतात. तेथें त्यांनीं ३२ लाख एकरांची मागणी केली होती. २१ लाख एकर जमीन मिळाली. कमी मिळाली याचें कारण कार्यकर्ते कमी पडले. १९५७ पर्यंत देशांतील (त्या वेळच्या) एक कोटी भूमिहीन कुटुंबांकरितां पांच कोटी एकर जमीन पाहिजे आणि ती आपल्याला मिळवायची आहे असा संकल्प विनोबांचा होता. अखिल भारतीय सर्व-सेवा-संघानें हा संकल्प आपला मानून १९५७ अखेरपर्यंत भूदानाचें आंदोलन देशभर चालविण्याचें जाहीर केलें. तरी सर्व सेवा संघाचे सुद्धां कार्यकर्ते अपुरे पडल्यामुळें हें संकल्पित कार्य पुरें होऊ शकलें नाहीं. पण विनोबाजीसारख्या शास्त्रज्ञानें जें जें क्षेत्र प्रयोगशाळा म्हणून हातीं घेतलें तेथें तेथें प्रयोगाची यशस्विताच सिद्ध झाली. प्रत्यक्ष कार्य सिद्ध होणें राहिलें, कारण हें तंत्र देशभर लावण्याकरितां जितकी उपकरणांची गरज होती तितकीं उपकरणें संख्येनें आणि गुणांनीं पुरती उपलब्ध झालेलीं नाहींत. याशिवाय दुसरें कोणतेंहि कारण सिद्धीच्या अपुरेपणाकरितां आढळत नाहीं. काळाची ही निकड आहे, विचार पटण्याजोगा आहे, तत्त्व सर्वमान्य झालें आहे, गरजू आतुरतेनें वाट पहात आहेत, पण अंमलच कमी पडला, असें आढळून येत आहे.

विनोबाजींच्या प्रेरणेनें कित्येक छोटचा मोठचा कार्यकर्त्यांनीं या ध्येयसिद्धीसाठीं आपलें जीवनदान केलें आहे. अशा कार्यकर्त्यांची विनोबाजींच्या मार्गदर्शनाखालीं एक सेना तयार होत आहे. परंतु या कार्यांतली एकाग्रता आज नष्ट झाली आहे. केवळ जमीन प्राप्त करून घेणें आणि भूमिहीनांना वांटणें एवढचाच एका कामाकडे देशांतल्या सर्व शक्तींनीं आणखी कांहीं काळ एकवटून लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तसें जर झालें तर हा प्रयोग कार्यान्वित होण्याची फार मोठी शक्यता आहे.

जी जमीन मिळाली तिच्यामागें केवळ त्यागाचा हेतूच होता कां ? या प्रश्नाचें उत्तर अनुभवांतून दिलें पाहिजे. अनुभव असा आहे कीं दानाच्या मागें मालकीहक्काच्या विसर्जनाची भावना होती परंतु कोठें ती शुद्ध

स्वरूपांत होती तर कोठें मिश्रित होती. मिश्रित म्हणजे भूमिहीनांच्या विचाराव्यतिरिक्त अन्य स्वार्थ मिसळलेली. उदाहरणार्थ, नापीक जमीन हातावेगळी करणें, नांवलौकिक मिळावा अशी आशा ठेवणें, कुळावर सूड उगविणें, भांडणतंट्यापासून किंवा गुंतागुंतीपासून मोकळें होणें इ. इ. शुद्ध त्यागाची भावना म्हणजे सामाजिक न्याय देण्याच्या भावनेनें किंवा दया वा धर्मभावनेनें प्रेरित होणें. भूदानांत मिळालेल्या जमिनीचे प्रकार दात्याच्या वृत्तिअनुसार नानाविध आहेत. ती हलकी आहे, खडकाळ आहे, रेताड आहे, तर उत्तम सुपीक आहे, बागायती आहे, आणि उत्तम प्रतीची भातपिकी जमीन सुद्धां आहे. देशांत जमिनीचे जेवढे आणि जसे प्रकार आहेत तेवढे आणि तसे प्रकार भूदानांत मिळालेल्या जमिनींचेहि आहेत. त्यांत वैशिष्टयें आढळलेलीं नाहींत.

कोणी लहान लहान दात्यांनीं आपल्या अल्प जमिनीचा नैवेद्य म्हणून छोटे-छोटे तुकडे दिले आहेत. ते कां घेतले ? शेतीच्या अर्थशास्त्राला ते परवडणारे आहेत कां ? यांतून आणखी नवीनच गुंतागुंती आपण निर्माण करणार नाहीं कां ? असे प्रश्न आहेत. त्याचें एकच उत्तर विनोबाजींनीं दिलेलें सयुक्तिक वाटतें. ते म्हणतात : "मला पांच कोटी एकर जमीन मिळवायची आहे. एवढी मोठी जमीन एकाच्या हांतून दुसऱ्याच्या हातांत जात असतांना जमिनीचे कदाचित् तुकडे पडतील हि. पण भूदानांतून निर्माण होणाऱ्या क्रांतीशीं तुलना करतां तुकड्यांबाबतचा हा प्रश्न अगदींच मामुली असून वस्तुतः व्यर्थच म्हटला पाहिजे. मला त्याबद्दल दुःख होत नाहीं. पण मानवी हृदयाचीं होत असलेलीं शकलें मात्र मला व्याकुळ करीत आहेत. तुकडे काय, परस्परांची सदिच्छा आणि सहकार्य वाढलें कीं पुन्हां जोडतां येतील, परंतु सामाजिक व आर्थिक विषमतेमुळें दुभंगलेलीं मानवी मनें पुन्हां जोडलीं नाहींत तर आमच्या देशासारख्या देशांत तरी धोका आहे. आम्ही वस्त्र पुनः शिवण्यासाठींच कापीत आहोंत. ...दुसरी गोष्ट अशी आहे कीं, जमिनीचे लहान लहान तुकडे झाल्यानें उत्पादन घटतें ही कल्पनाच मुळांत अनुभवाला धरून नाहीं. या विषयावर नियोजन-समितीशीं हि माझी चर्चा झाली होती. लहान तुकड्यांत भरपूर मेहनत-मशागत केली तर पुरेसें धान्य उपजूं शकतें हें माझें म्हणणें त्यांना पटलें."

शेवटीं प्रश्न राहतो जमिनीची मालकी कोणाची? व्यक्तीची, समाजाची कीं सरकारची ? एका खाजगी मालकींतून जमीन काढून दुसऱ्या खाजगी मालकींतच देण्याची योजना आहे कीं काय ? असेल तर ती कितपत इष्ट आहे ? या प्रयोगांतील मुख्य विचार सामाजिक कर्तव्याची जाणीव करून देणें हा आहे. मुळांत जमीन ही देवदत्त-निसर्गदत्त आहे. माणसाला कष्ट करून खाण्यापुरती ती ताब्यांत ठेवण्याचा अधिकार आहे, हें गृहीत धरलें आहे. म्हणून जमिनीवर मालकी जर कोणाची असेल तर ती 'गोपाळा'ची म्हणजेच ग्रामसमाजाची आहे. भूदान ही एक प्रक्रिया आहे. एकाची मालकी संपावयाची आणि दुसऱ्याची त्याऐवजीं चढवायची असा हा नुसता मालकीचा खांदेपालट नाहीं. भूदानांत अनुत्पादकाची मालकी जाते आणि उत्पादकाकडे ती येते. त्यांत मालकीचा पायाच मुळीं बदलतो. त्याच्या पुढची पायरी म्हणजे व्यक्तीची मालकीच न ठेवणें, जमीन गांवसमाजाची करणें. जमिनीची गरज आणि कसण्याची शक्ति कोणाला किती आहे हें ग्रामसमाज ठरवील, आणि ग्रामपंचायत अमलांत आणील. कोणाला जमीन कसायची नसेल त्यांनीं ती पंचायतीकडे सुपूर्त करावी, कोणाला हवी असेल त्यानें ती पंचायतीकडे मागावी. गांवाला धान्य वगैरेची किती गरज आहे याचें नियोजन गांव करील. आणि कोणत्या जमिनींत काय पिकवावें याचें हि नियोजन गांव करील. पिकाचें उत्पादन वाढविणें आणि धान्य-कोठार करून संकट-कालाकरितां तरतूद करून ठेवणें आणि 'भांडवल-संचय' (capital formation) करणें हें सर्व ग्रामसभा करील.

इंग्रजांच्या अमदानीपूर्वी जमीन गांवाच्याच मालकीची होती, आतां-हि ती गांवाच्या मालकीची होईल. 'जमिनीची अंतिम मालकी गांवाची, वहिवाट कुटुंबाची आणि कसणूक सहकार्याची' अशी त्रिगुणात्मक व्यवस्था राहील. जमिनींतून गैरहजर मालक निघून गेले, कसणारे वहिवाटदार बनले तर या व्यवस्थेला अनुकूल अशी मन:स्थिति उत्पन्न होण्यासारखी आहे. तोहि प्रयोग भूदान-आंदोलनांत करून पाहण्यांत आला आहे. आणि बऱ्याच कष्टांनीं कां होईना तो सफल होण्याची आशा दिसत आहे. श्रम पडतात ते हा विचार रुजविण्याचे. ज्या कार्यकर्त्यांनीं लोकांचा विश्वास संपादन केला आहे त्यांना हे विचार रुजवितां येतात असा अनुभव आला आहे. भारतांत जीं कांहीं थोडीं ग्रामदानें झालीं आहेत, तीं या अनुभवाचा

पुरावा आहेत. जमिनीचें आर्थिक दृष्टया उत्तम नियोजन ग्रामदानाच्या आधारावर होऊं शकतें, म्हणून आज जमीनवाल्यांकडून जमीन घेऊन जमीन नसलेल्यांना देणें हें जरी भूदानाचें प्राथमिक स्वरूप असलें तरी ग्रामदानां-तून ग्रामराज्य हें त्याचें अंतिम साध्य आहे.

जमिनीच्या न्याय्य वांटपाचा अहिंसेच्या मार्गानें केलेला हा प्रयोग सफल होण्याजोगा आहे याची खात्री देशांतल्या सर्व विचारवंतांना आणि पक्षांना–कम्युनिस्टांना सुद्धां–पटलेली आहे. याचें प्रत्यंतर येलवाल येथील सर्वपक्षीय पुढाऱ्यांच्या परिषदेंत आलें. ही परिषद १९५७ सालच्या सप्टेंबर महिन्यांत म्हैसूर राज्यांत भरली होती. तेथें सर्वांनीं मिळून जाहीर घोषणा करणारें एक निवेदन प्रसिद्ध केलें. त्यांत म्हटलें आहे कीं :

"ग्रामदान-आंदोलनाच्या मूलभूत उद्दिष्टांची आम्ही प्रशंसा करतों. या उद्दिष्टाच्या द्वारां ग्रामदानांत आलेल्या गांवांचें सहकारी जीवन आणि त्यांचा पुरुषार्थ यांचा पूर्ण विकास होईल आणि या गांवांतील जनतेची आर्थिक स्थिति चांगली होऊन जनतेची सर्वांगीण उन्नति हि होईल, याखेरीज या आंदोलनानें भूमिसमस्येची सोडवणूक करण्याकरितां समस्त भारतांत मानसिकदृष्या अनुकूल वातावरण तयार होईल आणि त्याबरोबर सहकारी जीवनहि विकसित होईल. या आंदोलनाचें मुख्य वैशिष्टय म्हणजे त्याची अहिंसात्मक पद्धति आणि ऐच्छिक स्वरूप हें होय. या रीतीनें नैतिकमार्ग व्यावहारिक व आर्थिक लाभाशीं जोडला गेला आणि सहकाराच्या व स्वाव-लंबनाच्या आधारावर सामाजिक व्यवस्थेच्या विकासाचा प्रारंभ झाला. अशा आंदोलनाला सर्व प्रकारच्या मदतीची आगि प्रोत्साहनाची गरज आहे."

या परिषदेंत उपस्थित असलेल्या केंद्रीय आणि राज्यसरकारांतील सभासदांनीं भूदान-आंदोलनाची प्रशंसा करून व मदतीची इच्छा दर्शवून सांगितलें कीं संबंधित सरकारांनीं आपल्या जमिनीसंबंधींच्या सुधारणांचा, म्हणजे जमिनीच्या बाबतींतील सर्व स्वार्थी हितसंबंधांचें उचाटन, जमीन-धारणा-क्षेत्राची निश्चित मर्यादा आणि जनतेच्या संमतीनें सहकारी चळवळीची प्रगति यांचा, पुरस्कार करावा लागेल. या सरकारी योजनांचा ग्रामदान-आंदोलनाशीं संघर्ष नाहीं, किंबहुना या योजनांना या आंदोलनानें पाठिंबाच मिळत आहे. सरकारची राष्ट्रीय विकासयोजना आणि ग्रामदान

आंदोलन यांच्यामध्यें जास्तींतजास्त निकटचा सहयोग होणें इष्ट आहे. परिषदेनें विनोबाजींच्या आंदोलनाची आणि अहिंसात्मक व सहकारी उपायांनीं राष्ट्रीय आणि सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीकरितां त्यांनीं केलेल्या प्रयत्नांची फार प्रशंसा केली आणि या आंदोलनाला उत्साहपूर्वक पाठिंबा देण्याची भारतीय जनतेला विनंति केली.

: ९ :

## भूदानप्राप्तीच्या प्रयोगांतील अनुभव

विचार-परिवर्तनांतून समाजपरिवर्तन होऊं शकतें आणि आर्थिक प्रश्नहि सुटूं शकतात ही गोष्ट केवळ तात्त्विक भूमिकेवर मांडून चालणार नाहीं, प्रत्यक्ष अनुभवाचा आधार तिला मिळाला आणि तो शास्त्रीय कसोटीला उतरली तरच ती व्यवहार्य ठरते. एक जमिनीचा प्रश्न घेतला तरी जमीन नसलेल्यांकरितां आपल्यांतील जमीन काढून देणें हें आपलें सामाजिक कर्तव्य आहे, नव्हे, जमीन ही खरोखर खाजगी मालकीची वस्तूच नव्हे हें केवळ भूमिहीन वर्गाला किंवा जमीन कमी असणाऱ्या वर्गाला पटून भागणार नाहीं. कारण हा प्रत्यय एकतर्फी होईल, त्यांत विचारापेक्षां कदाचित् स्वार्थभावनेची प्रेरणा असण्याचा संभव मोठा आहे. ज्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर जमीन आहे, ज्यांच्याकडे चांगली सुपीक जमीन आहे, ज्यांचा शेती हाच व्यवसाय आहे, आणि ज्यांनीं त्यांत आपलें भांडवल गुंतविलें आहे, ज्यांनीं जीवनाचा अंतिम आधार म्हणून जमीन खरेदी केली आहे, अशा जमिनीशीं निगडित संबंध असलेल्या वर्गांतील लोकांना जर हा विचार पटला तर, आणि त्यांच्याकडून जर जमिनीची मालकी सुटली तर, या प्रयोगांत तथ्य आहे असा निष्कर्ष काढण्यास प्रत्यवाय नाहीं. मग जमीन हा ज्यांचा व्यवसाय नाहीं, म्हणजे पोटाचा धंदा नाहीं, त्यांना तो पटेल असें मानण्यास कांहीं हरकत येणार नाहीं. विनोबाजींनीं ज्याप्रमाणें फक्त नळगोंडा जिल्ह्यांत प्रयोग करून समाधान मानलें नाहीं, कम्युनिस्टांचा जेथें संबंध हि आला नाहीं अशा प्रदेशांत तो यशस्वी होतो कां हें त्यांनीं मुद्दाम् करून पाहिलें, तसें जेथें

जमिनीला फारसें मूल्य नाहीं, जमीन निकस आहे, किंवा करायला कोणी मिळत नाहीं अशाच प्रदेशांत नव्हे तर जेथें जमिनीवर उड्या पडत आहेत अशा प्रदेशांतहि हा प्रयोग करून पाहिला असेल आणि त्याला यश आलें असेल तर या प्रयोगाची सार्वत्रिकता सिद्ध होऊं शकते.

अशा प्रयोगाच्या भूमिकेवरून भारतांत आणि त्यांतल्या त्यांत महाराष्ट्रांत झालेल्या कामाचे नमुने आतां आपल्याला पाहावयाचे आहेत. प्रयोग सार्वत्रिक तेव्हांच होऊं शकेल कीं जेव्हां तो विशिष्ट व्यक्ति किंवा विशिष्ट परिस्थिति यांच्या पुरता मर्यादित राहणार नाही. तो दोन्ही प्रकारें सर्वसामान्य होईल. उदा० एखाद्या विशिष्ट पुरुषाच्या प्रभावानें जर विशिष्ट ठिकाणीं जमीन मिळाली तर तो त्या पुरुषाचा प्रभाव होय; पण कोणीहि सामान्य मनुष्य कोणाहि जमीनमालकाकडे जातो आणि विचार यथार्थ रीतीनें पटवून देतो आणि त्याला जमीन मिळते असें घडून आलें तर तें विचाराचें सामर्थ्य होय. या कसोट्यांवर भूदान-आंदोलनांत आतांपर्यंत जें दिसून आलें आहे त्याची तपासणी करतां येईल.

भूदान-यज्ञाच्या आंदोलनांत आतांपर्यंत ४३½ लाख एकर जमीन ५¾ लाख लोकांकडून सबंध देशांत, आणि १½ लाख एकर जमीन जवळ जवळ २५,००० लोकांकडून महाराष्ट्रांत मिळालेली आहे. हे जमीन देणारे सगळे केवळ मोठे जमीनदार असणें शक्य नाहीं हें उघड आहे. यांत लहान जमीनमालक आहेत तशीं कुळेंहि आहेत असें दिसून येतें. हा विचार सर्व थरांत पसरावा म्हणून विनोबाजींनीं कित्येक ठिकाणीं नवीन नवीन तंत्रेंहि योजिलीं होतीं. केव्हां त्यांनी '२ वर्षांत साऱ्या भारतांत मिळून २५ लाख एकर जमीन मिळवायची' असा संकल्प करविला, तर केव्हां एका प्रांतांतील सबंध प्रांताच्या जमिनीचा ⅙ भाग जमीन मिळविण्याकडे कार्यकर्त्यांना लावलें. कोठें एका जिल्ह्यांतील गांवागांवांतून जमीन मिळविण्याचा प्रयत्न त्यांनीं करायला लावला तर कोठें भूमिहीन शिल्लक राहूं द्यावयाचा नाहीं अशी योजना करविली. अशा सर्व प्रकारच्या प्रयत्नांतून १९५७ अखेर पर्यंत १ कोटी भूमिहीन कुटुंबांकरितां ५ कोटी एकर जमीन उपलब्ध करण्याचा प्रयत्न जारीनें झाला.

आतांपर्यंत देशभर मिळालेल्या जमिनीचे राज्यवार आंकडे ३१ डिसेंबर १९६१ पर्यंतचे पुढील प्रमाणें आहेत :

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 33688 वि: 17881
क्रमांक 9898 नोंद दि: 90-10-62

| प्रदेश | भूमि-प्राप्त (एकर) | दाता-संख्या | भूमि-वितरण (एकर) | जमीन वांटली त्यांचो संख्या | वितरणाला अयोग्य जमीन | ग्राम दान संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| आसाम | ९,७५२ | ५,११२ | — | — | — | ४१५ |
| आंध्र | २,४१,९५२ | १६,६२९ | ९६,९४७ | २६,९८८ | ५८,३३३ | ५८७ |
| उत्तर-प्रदेश | ४,१९,५४५ | ३५,५८० | १,२९,२६७ | ४९,९८४ | — | ५७ |
| उत्कल | १,५३,०४२ | ८३,६०३ | १२,९४० | ६,४८४ | २,२८१ | १,९२९ |
| केरळ | २९,००२ | १,२२६ | ५.३९१ | — | ६,३८० | ४०३ |
| गुजरात | १,०३,१३२ | १८,३२७ | ४९,९५८ | ९,८८७ | १७,९११ | १४८ |
| तमिलनाड | ८०,४३० | १७,४०० | १९,४९१ | ७,६५५ | — | २५४ |
| प. बंगाल | १२,६०८ | ८,६०४ | ३,४८८ | ३,७०२ | ९२६ | २५ |
| पू. पंजाब | १२,८९७ | — | २,७०६ | — | — | ६ |
| बिहार | २०,५३,०९४ | ३,०४,९८१ | २,५७,०६९ | १,४८,३१५ | १०,५९,५४२ | ८५ |
| मध्य-प्रदेश | ३,८५,८९० | ४४,८६७ | १,११,०३९ | १९,९१० | १०,७७१ | १५३ |
| महाराष्ट्र | १,४६,०८७ | २४,२८९ | ८६,६४७ | १६,००४ | ११,९८९ | २८२ |
| मैसूर | १९,९८३ | ५,४७६ | २,९१५ | १,२६१ | ५३ | ५८ |
| राजस्थान | ३,५३,३५८ | ८,०६७ | ८९,८९० | ११.५३४ | २३,९१२ | २३४ |
| हिमाचल-प्रदेश | १,५६,८०० | — | २,१०० | — | — | ४ |
| एकूण | ४१,७७,५७२ | ५,७४,१६१ | ८,६९,८४८ | ३,०१,७२४ | ११,९२,१७८ | ४,६४० |

नोट : १. केरळच्या फक्त तीन जिल्ह्यांचीच माहिती मिळाली.
२. मराठवाड्याच्या पांच जिल्ह्यांची माहिती मिळाली नाहीं.

या जमिनीपैकीं आतांपर्यंत ८,३३,४६६ एकर जमीन २$\frac{3}{4}$ लाख भूमिहीनांना वांटून देण्यांत आली आहे. जमीन वांटतांना वर निर्दिष्ट केलेल्या एकूण भूमिप्राप्तीच्या आंकड्यांतून कांहीं भाग कदाचित् कमी होण्याचा संभव आहे, कारण कित्येक वेळां दान मिळविण्यामध्यें कार्यकर्त्यां-कडून चुका व संकल्पपूर्तीच्या भरांत खोटे आंकडे भरण्याचा दोष घडला असूं शकेल. तथापि गेल्या १० वर्षांत केवळ मागून साडेत्रेचाळीस लाख एकर जमीन भूमिहीनांना वांटण्याकरितां म्हणून मिळते हा अनुभव दुर्लक्ष करण्यालायक खास नाहीं.

भूदान प्राप्त करतांना निरनिराळ्या थरांत जे अनुभव आले ते पुढें दिले आहेत. प्रथम विनोबाजींचे अनुभव देऊन पुढे इतर छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांचे दिले आहेत.

## अनुभव

विनोबाजी उत्तर-प्रदेशांत पदयात्रा करीत असल्यावेळची ही घटना आहे. उत्तरप्रदेशाच्या सुलतानपुर जिल्ह्यांत अमीठी नांवाचें एक छोटे संस्थान होतें. या संस्थानचे राजेसाहेब राणा रणजयसिंह हे चांगले विद्वान्, संस्कृतचे व्यासंगी असे सच्छील गृहस्थ आहेत. त्यांच्या राज्यांतील एकंदर गांवें ३२६, त्यांपैकीं २६ गांवांचा राजेसाहेबांनी अगोदरच सार्व-जनिक ट्रस्ट करून टाकला होता. भूदान-यज्ञाविषयीं त्यांनी अगोदरच ऐकलें होतें, तथापि विनोबाजींची भेट झाल्यानंतर विनोबाजी त्यांना म्हणाले, "आपण जास्तींत जास्त जेवढें भूदान करणें शक्य आहे तेवढें करावें आणि स्वतः भिक्षापात्र घेऊन बाहेर पडावें. स्वातंत्र्यानंतर आपलें राज्य गेलें या गोष्टीचें आपल्या मनाला दुःख होतां कामा नये. मुलगा कारभार करायला लायक झाला म्हणजे बाप सर्व कांहीं त्याच्यावर सोपवून देतो. जे राजे लोकप्रिय असतात ते प्रजेला पुत्रवत् मानतात, स्वतःला लोकांचे सेवक समजतात. आपणसुद्धां सेवक होऊन काम केलेंत तर लोकांच्या हृदयांत आपल्याला प्रेमाचें स्थान मिळेल. या भूदान-यज्ञामुळें कोणीहि व्यक्ति गरीब राहणार नाहीं. गरीब असोत, श्रीमंत असोत जे श्रम करतील ते सर्वच श्रीमान् बनतील."

संत विनोबांच्या वाणीच्या प्रभावामुळें म्हणा किंवा राजेसाहेबांच्या धर्मशीलतेमुळें म्हणा, त्यांनी दानाचा पहिला हप्ता म्हणून आपली २००० एकर जमीन लिहून दिली आणि विनोबाजी काशीला पोचले तेव्हां त्यांनी आणखी एक हजारांचें दान केलें.

जमीन-मालकीचा गोठलेला पहाड वितळूं लागला. उत्तर प्रदेशांत आणि बिहार राज्यांत मोठे मोठे राजे महाराजे, मोठ मोठ्या मठांचे महंत भूदान-यज्ञाच्या आवाहनापुढें विरघळूं लागले. हिमाचल प्रदेशांत पांच हजार बिघे जमिनीची जहागीर असलेले महंत श्री. उघोदासजी यांनी आपली सर्व जहागीर भूदान-यज्ञांत दान करून टाकली. या पांच हजार बिघ्यांपैकीं जवळ जवळ दोन हजार बिघे बरड जमीन आहे. जहागिरींत एक लाख रुपयांहून अधिक किमतीच्या इमारती आहेत. हें सर्व विनोबांना अर्पण करून महंत-जींनी केवळ ६१ बिघे जमीन आणि १ घर आपल्या करितां ठेवून घेतलें आहे.

बिहार प्रदेशांत रंका नांवाच्या संस्थानचा जमीनदार राजा सुशिक्षित आहे. विनोबाजी रंका येथें गेले आणि राजेसाहेबांनी त्यांचें स्वागत केलें तेव्हा विनोबाजींनीं त्यांना विचारलें "दरिद्रनारायणासाठीं जमीन किती देणार?" राजेसाहेब म्हणाले "आतांपर्यंत जेवढे कार्यकर्ते आले त्यांनी जेवढें मागितलें तेवढें त्यांना मिळालें. आपली जेवढी इच्छा असेल तेवढें आपण घ्यावें".

विनोबाजींनी विचारलें, "आपल्याजवळ जमीन किती आहे?"

राजेसाहेबांनी विनोबाजींच्या पुढें सारे कागद ठेवले. एक लाख एकर पडीत आणि बारा हजार एकर स्वतःच्या वहितीखालीं असलेली उत्कृष्ट जमीन आहे असें त्यावरून दिसून आलें.

विनोबाजी म्हणाले, "पडीत आहे ती तर सर्व देऊनच टाका, आणि स्वतःच्या कसणुकींपैकीं $\frac{1}{6}$ हिस्सा द्या."

राजेसाहेबांनीं तें मान्य करून एक लाख एकर जी पडीत होती ती व २ हजार एकर चांगल्या जमिनींतील भाग होता तो लिहून दिला. त्यावर विनोबाजी म्हणाले, "हा माझा पहिला हप्ता झाला. मी पुन्हा आपणांकडे येईन त्यावेळीं आपण पुढचे हप्ते द्यावेत. आणि जोंपर्यंत भूमिहीन कुटुंबें शिल्लक आहेत तोंपर्यंत तर मी आपल्याकडे येतच राहीन."

याच प्रांतांतल्या रांची जिल्ह्यांत दुसरी एक पालकोट नांवाची जमीनदारी आहे. जमीनदार राजा लालासाहेब यांनी आपल्या जमिनीचा सहाव्वा हिस्सा देऊन टाकला. परन्तु एवढ्यानें विनोबाजींचें समाधान झालें नाहीं. त्यांनी भूदान मिळविण्याकरितां राजेसाहेबांनाच बाहेर काढलें आणि गांवोगांव फिरून ते दरिद्रनारायणाकरितां जमीन मागूं लागले.

दरभंगा हें हिंदुस्थानांतील एक प्रसिद्ध व श्रीमंत संस्थान मानलें जात होतें. भूदानाचा विचार या संस्थानच्या 'महाराजाधिराजां'च्या कानांवर गेला होताच आणि त्यांच्या मनांत अनुकूल भावना निर्माण झाली होतीच. महाराजाधिराज एका गांवीं विनोबाजींच्या मुक्कामावर आले आणि त्यांनी १ लाख २० हजार एकर जमीन विनोबाजींना अर्पण केली. विनोबाजी म्हणाले, "आपण दान दिलें हें योग्यच झालें. परन्तु हें काम आपण आपलें समजावें अशी माझी इच्छा आहे."

राजेसाहेब म्हणाले, "माझ्याकडून जेवढें होईल तेवढें करण्याला मी हजर आहे."

बिहारमध्यें जमीन उत्तम, नद्याहि पुष्कळ वाहात असलेल्या, त्यामुळें जमिनदाऱ्याहि तेथे पुष्कळ संख्येनें बनलेल्या असणें साहजिक आहे. अशाच रामगड नांवाच्या जमीनदारीचे महाराज आपल्या इतर भाईबंदांप्रमाणें भूदानाच्या विचाराने प्रभावित झाले आणि त्यांनी एक लाख एकरांचें दान केलें. पुन्हा पदयात्रा करीत विनोबाजी जेव्हां रामगडला गेले तेव्हां त्यांनी आपल्या कुटुंबांतल्या माणसांच्या वांटणीची जमीन काढून अलग अलग दानपत्रें करून २½ लाख एकर जमिनीचीं दानपत्रें करून दिलीं. राणीसाहेबांनी आपले अलंकार विनोबांना अर्पण केले. राजेसाहेबांनी भर पावसांत हातीं कुदळ घेऊन एक तासभर श्रमदान केलें.

उत्तर भारतांत विनोबाजींची यात्रा चालत होती. त्यावेळीं दक्षिणेकडे ते येणार किंवा नाहीं याची निश्चिती नव्हती. अशा वेळीं बंगलोरचे एक मुसलमान नागरिक जनाब सैय्यद हुसेन यांनीं आपली एक हजार एकर जमीन डॉ. राजेन्द्रप्रसाद यांचेकडे विनोबांना दक्षिणेकडील भूदानाचा प्रारंभ म्हणून दानपत्राच्या रूपानें पाठविली.

कोईमतुर ( मद्रास ) जिल्ह्यांत श्री. विनोबांची पदयात्रा सुरू असतांना पिळमुडु गांवी त्यांचा मुक्काम होता. तेथील एक मोठे जमीनदार आणि गिरणीमालक यांनी विनोबांना जवळ जवळ दोन हजार एकर जमीन दान दिली होती. त्या गृहस्थाचे वृद्ध वडील २०-२५ वर्षें रुईचे गठ्ठे घेऊन सायकलवर फिरत असत. कित्येक वर्षांनंतरच्या सतत परिश्रमानें आज ते सहा गिरण्यांचे मालक बनले आहेत. त्यांचा मुलगा, जो गिरणी मालक आहे तो, भूदानाचें काम अंगावर घेऊन जमीन मागत फिरूं लागला.

मोठमोठ्या राजामहाराजांकडे, जमीनदार-इनामदारांकडे जमिनी पुष्कळ, तेव्हां त्यांतली जमीन काढून द्यायला त्यांना काय कष्ट पडणार ? शंकाशील मन अशी शंका घेते. पण हा समजहि खरा नाही. श्रीमंत आहेत त्यांनाच आपल्या मालमत्तेचा लोभ अधिक जखडून ठेवतो असा अनुभव नाहीं. एका फकीराला जमीन द्यायला हे जमीनदार तयार होतात याचा अर्थ काळाचा महिमा त्यांच्याकडून हें करवितो, कोणीतरी निमित्तमात्र होतो, असाच घ्यावा लागेल. विचाराला कोठेंहि प्रतिबंध होऊं शकत नाहीं तो श्रीमंतांचें मन जसें फिरवितो तसें गरीबांचेंहि फिरवितो. विचाराच्या शक्तीपुढें श्रीमंत-गरीब, शिक्षित-अशिक्षित, श्रेष्ठ-कनिष्ठ हे सर्व नमतात. भौतिक बळापेक्षां विचारबळ श्रेष्ठ आहे असें दिसून येतें याचें कारण विचारबळ सार्वत्रिक क्रान्ति घडवून आणूं शकतें. लौकिक क्रान्तीमध्यें क्रान्तीचे परिणाम ज्यांना अनुकूल होण्याचा संभव असतो तेवढेच सामील होतात. परन्तु अशा वैचारिक क्रांतींत ज्यांना गमवावें लागतें तेहि आपखुषीनें सामील होतात असा एक अपूर्व अनुभव या प्रयोगांत दिसून आला.

गरीबांकरितां होणाऱ्या क्रान्तींत गरीब आपखुषीनें सामील होतील असें सहज मनांत येतें, पण श्रीमंताइतकाच गरीबालासुद्धां आपल्या यःकश्चित् मालमत्तेचाहि तितकाच लोभ असतो. लोक घेण्याला तयार होतात, देण्याला कांकूं करतात. पण भूदानाचे विचारपरिवर्तन गरीबाला सुद्धां श्रीमंताप्रमाणेंच आपखुषीनें या क्रान्तींत भाग घ्यायला लावतें असें दिसून येतें.

उत्तर प्रदेशांतील गोष्ट आहे. श्री. विनोबांच्या यात्रीदलांतील एक मुलगा एका खेडेगांवच्या माणसाला विनोबांकडे घेऊन आला. विनोबाजींच्या खोलींत त्यावेळीं कोणी जमीनदार. कोणी धनिक, कोणी गिरणीमालक असे बसले होते. त्या मुलानें विनोबाजींकडे तक्रार केली कीं या माणसाजवळ फक्त २१ डेसिमल ( ८ गुंठे) जमीन आहे ती सर्व तो भूदानांत द्यायची म्हणतो, त्यांना पुष्कळ समजावलें तरी ते ऐकत नाहींत. विनोबाजींनीं त्या माणसाकडे डोळे भरून पाहिलें. त्यानें विनोबांचे पाय धरले आणि तो म्हणाला, ''महात्माजी, मेरी यह तुच्छ भेंट स्वीकार कर लीजिये.''

विनोबाजी म्हणाले, ''पण मग तुमच्याजवळ कांहीं राहणार नाहीं.''

तो शेतकरी म्हणाला,''नाहीं म्हटलें तरी मला कारखान्याची नोकरी करावी लागतेच आहे. एवढया जमिनीनें माझा निर्वाह होत नाहीं. माझ्या घरांत ५–६ माणसें आहेत.''

''चांगली गोष्ट आहे. पण ती तुमच्याकडेच राहूं द्या.'' पण तो ऐकेना. विनोबाजींनीं आग्रह केला तर तो रडूं लागला.

शेवटीं विनोबाजींनीं त्या दानपत्राचा स्वीकार केला आणि त्यावर लिहिलें ''या मनुष्याची घरची स्थिति पाहतां ही जमीन याला प्रसाद म्हणून परत देणें आहे, याच्या आग्रहावरून त्याच्या समाधानाकरितां आम्ही ती स्वीकारली आहे.''

* * *

दुसरा एक प्रसंग : रात्रींचे ८।। वाजून गेले होते. झोपण्याच्या तयारींत विनोबाजी होते. इतक्यांत एक शेतकरी धांपा टाकीत विनोबाजींच्याकडे आला. संकोचानें मान खाली घालून तो उभा राहिला. विनोबाजींनीं त्याच्याकडे पाहिलें, तेव्हां हात जोडून तो म्हणाला :

'महाराज, आपल्या सभेला मला येतां आलें नाहीं...' पुढें संकोचानें त्याची जीभ अडखळली. विनोबाजींनीं त्याला प्रेमानें विचारलें, ''कोठें राहतां ?''

''पांच मैलांवर एक गांव आहे तेथें.''

''काय करतां ?''

"शेतकरी आहे, महाराज"

"मग गरीबांकरितां कांहीं आणलें आहे ?' विनोबाजींनीं विचारलें.

"होय महाराज, माझ्यापाशीं सगळी सात बिघे जमीन आहे, त्यांतली दोन बिघे द्यायला मी आलोय्."

* * *

डेहराडून जिल्ह्यांतील चौधहपुर नांवाच्या एका लहानशा गांवांत विनोबांची पदयात्रा आली होती. सायंकाळचें प्रार्थना-प्रवचन झालें. रात्रीं ठरलेल्यावेळीं विनोबाजी आणि सर्व यात्रिक झोपीं गेले. मध्यरात्रीचे बारा वाजले असतांना बैलगाडींत बसून "रामचरण" नांवाचे एक गृहस्थ आले. संध्याकाळच्या सभेला त्या गांवची कांहीं माणसें आलीं होतीं त्यांनीं गांवांत गेल्यानंतर सांगितलें असावें की एक साधुपुरुष गरीबांच्या करितां जमीन मागत फिरत आहे. तेव्हां रामचरण गाडींत बसून विनोबाजींना शोधीत आले. त्यांना दोन्ही डोळ्यांनीं दिसत नव्हतें. दानपत्र लिहून घेणारा कार्यकर्ता जागा होता. त्यानें त्या आंधळ्या गृहस्थाची विचारपूस केली. श्री. रामचरण यांनीं आपलें दानपत्र लिहून दिलें आणि ते आले तसे निघून गेले. सकाळीं विनोबाजींना ही गोष्ट कळतांच ते उद्गारले :

"अरे, तो आंधळा नव्हता, साक्षात् परमेश्वरच आम्हांला आशीर्वाद देण्याकरितां आला होता. त्याला आंधळा म्हणणारे आम्हीच आंधळे ठरूं:"

* * *

असाच एका गांवामध्यें विनोबाजींचा मुक्काम पडला असतांना सायंकाळच्या सभेंत त्यांचें भाषण संपल्यावर लोक आपापल्या गांवीं परतले. शेजारच्या गांवांत राहत असलेल्या एका म्हातारीला कळलें कीं एक बुवा गरीबांकरितां जमीन मागतो आहे. ती निघाली, आणि रात्रीं अकरा वाजता विनोबाजींच्या मुक्कामावर आली. त्यावेळीं सर्वजण गडद झोपीं गेले होते. ती म्हातारी रात्रभर दारांत बसून राहिली. पहाटे एक कार्यकर्ता उठून बाहेर आला तेव्हां त्याला ती दिसली. त्यानें विचारपूस केल्यावर बाईनें आपली 'तराईमें ग्यारह नाला जमीन और एक घर' यज्ञामध्यें समर्पण केलें !

तमिळनाडमध्यें पूजनीय व्यक्तींचा आदर फळें फुलें देऊन करण्याचा रिवाज आहे. विनोबाजींची पदयात्रा चालली असतां दरम्यानच्या एका गांवचे लोक हातांत फळें फुलें घेऊन विनोबांचा सत्कार करण्यासाठीं उभे होते. विनोबाजींनीं त्यांच्याकडील फळांफुलांची थाळी हातांत घेतली आणि लोकांना पुकारलें, "जो प्रसाद लेगा वह जमीन देगा." दोन प्रहरच्या त्या कडकडीत उन्हांत गांववाल्यांनीं तयार केलेल्या मंचावर उभें राहून विनोबाजींनीं या अभिनव पद्धतीनें फळें वांटण्याला सुरुवात केली. एक गृहस्थ उठले–"मी दोन एकर देतों." त्यांना प्रसाद मिळाला. दुसरा एक म्हातारा काठीं टेकीत टेकीत त्यांच्या जवळ आला आणि म्हणाला, "माझ्या बागायती जमिनीपैकीं ८ सेंट (१॥ गुंठा) घ्या." जवळचे एक पांढरपेशे गृहस्थ होते ते उठून म्हणाले "एक एकर." गांवचे पुढारी म्हणाले–"१५ एकर".

विनोबाजींनीं पुकारलें : "आणखी कोणी आहे प्रसाद घेणारा?" दूर झाडाखालीं बसलेला एक गरीब शेतकरी पुढें झाला. प्रसाद घेतांना त्याचे हात कांपत होते. त्याच्या तोंडांतून हळू हळू शब्द बाहेर पडले :

"माझी सर्वच्या सर्व जमीन २ एकर ५२ सेंट आपल्याला दान देतों."

लोकांनीं टाळ्या वाजवून त्याचें अभिनंदन केलें. "तुम्हांला दुप्पट प्रसाद" म्हणून विनोबाजींनीं एक केळ आणि एक संत्रें त्याच्या हातीं ठेवलें.

"मी तुमच्याकडे भिक्षा मागत नाहीं, तुम्हाला दीक्षा देतो आहे", हें विनोबाजींचें सूत्र आहे. या सूत्राचा अर्थ असा कीं देणाराच्या मनांत केवळ दयेची नव्हे तर नागरिक-कर्तव्याची जाणीव निर्माण होऊन त्यानें दिलें पाहिजे. काम केवळ जमीन गोळा करण्याचें नाहीं, मनें गोळा करण्याचें आहे. तमिळनाडमध्यें पदयात्रा चालू असतांना येलैक्कोविल गांवीं एक गृहस्थ ५ एकरांचें दानपत्र घेऊन विनोबांच्याकडे आले. "आपली जमीन किती आहे ?" विनोबाजींनीं विचारलें. ते म्हणाले, "४५० एकर". त्यांच्या दानपत्रावर "दान अपुरें म्हणून परत," असें लिहून विनोबाजींनीं तें दानपत्र परत दिलें आणि म्हटलें "मी ४५० एकरांतून ५ एकर दान घेतलें तर या आंदोलनला माझ्याच हातांनीं तोडल्यासारखें होईल. अशीं

दानपत्रें मी माझ्या हातांनीं फाडून टाकीन. मी कांहीं भिक्षा मागत नाहीं, हक्क मागत आहें. मी माझ्या आश्रमाकरितां दान मागितलें असतें तर आपण जेवढी जमीन दिली असती तेवढ्याबद्दल आपले उपकार मानले असते. पण हें आंदोलनच वेगळ्या प्रकारचें आहे. ही शांतिमय क्रांति आहे. मी असें सांगितल्यानें एक एकर जमीन जरी मिळाली नाहीं तरी मी नाचेन. पण असें दान घेण्यानें भूमिहीनांचा हक्कच बाजूला टाकल्यासारखें होईल."

या सर्व घटना खुद्द विनोबाजींच्या प्रचारकार्यांतील अनुभवाच्या सांगितल्या.

विनोबाजी एक तपस्वी साधुपुरुष ही त्यांची प्रसिद्धी आगाऊच ते जेथें जातील तेथें पोहोचे. त्यामुळें भाविक जनसमाज आपल्या परंपरागत संस्कृतीनें प्रेरित होऊन ते मागतील तें देण्याची मनाची तयारी करीत असेल, अशी शंका बुद्धिवंतांना येण्याची शक्यता आहे. तसें असलें तरीहि भाविकपणांतून म्हणजे धर्मभावनेंतून या समाजक्रांतीला मदत होऊं शकते असा निष्कर्ष काढण्याला कांहींच हरकत नाहीं. तथापि विशिष्ट व्यक्तिमत्वांतून जर विशिष्ट गोष्टी घडत असतील तर तो विचाराचा परिणाम नव्हे, असेंहि समजलें जाण्याचा संभव आहे.

भूदानाचा विचार समजावून देणारे एकटे विनोबाजीच फिरत नव्हते. अनेक पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या दर्जाचे कार्यकर्ते—राजकीय पक्षांचे तसे च सामाजिक संस्थांचे हि कार्यकर्ते त्यांत होते. ४३ लाख एकरांची कमाई कांहीं एकट्या विनोबाजींची नाहीं. म्हणून लहान लहान अप्रसिद्ध किंबहुना परप्रांतीय, परभाषिक, परदेशीय अशा सुद्धां कार्यकर्त्यांच्या समजावणीला आणि विचारप्रचाराला यश लाभलें असेल तर तो विचाराचा प्रभाव समजला पाहिजे.

गुजरातमध्यें कांहीं कार्यकर्ते स्त्रीपुरुष भूदानाच्या प्रचारार्थ गांवोगांव हिंडत असतांना एका गांवाला गेले. स्त्री कार्यकर्त्या घरोघर जाऊन लोकांना भेटून भूदानाचा विचार समजावून सांगत होत्या. एका गृहस्थानें आपली ६ एकर जमीन दानांत दिली. हें दान लोकांना समजतांच लोक आश्चर्यचकित झाले. कार्यकर्त्यांनीं त्या गृहस्थांना विचारलें, "तुमच्याकडे

किती जमीन आहे ?" त्यानें सांगितलें, "६ एकर आहे. ३।४ दिवसांपूर्वी आम्हां सर्व बंधूच्यांत वांटण्या झाल्या आणि माझ्या वांट्याला ६ एकर जमीन आलेली आहे. ती सारी मी देऊं इच्छितों." कार्यकर्त्यांना वाटलें हे सडेफटिंग असतील, म्हणूनच हें धारिष्ट त्यांनीं केलें असेल; पण तपास करतां कळलें कीं त्यांच्या कुटुंबांत पत्नी आणि चार मुलें आहेत. "तुमचा निर्वाह कसा व्हायचा ?" असें विचारतां तो गृहस्थ म्हणाला, "मेहनत-मजुरी करीन, ईश्वर बसलेला आहे ना ?"

दुसरी त्याच प्रांतांतील गोष्ट आहे. गुजरात हा समृद्ध भू-भाग आहे हें प्रसिद्ध आहे. म्हणून तेथें जमीन मिळणें आणि ती सामान्य लोकांकडून सामान्य कार्यकर्त्यांना मिळणें याला फार मोठा अर्थ आहे. मुनी संत बालजी फिरत फिरत एका गांवीं गेले. तेथें मेर नांवाच्या जातीचे लोक राहत होते. अतिशय गरीब लोक, हे काय जमीन देणार, असें संत बालजींना वाटलें. परन्तु गांवांत काम सुरूं झालें आणि कोणी एक बिघा, कोणी दोन बिघे, तिसऱ्यानें तीन, चवथ्यानें चार अशा रीतीनें देण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली. जवळच एक म्हातारा मेर बसला होता. तो संत बालजींना म्हणाला, "माझी २० बिघे जमीन लिहून घ्या." शेजारींच त्या भागांतले कार्यकर्ते बसले होते. त्यांनीं विचारलें, "बाबा, २० बिघेज मीन दान देत आहांत ती अर्थ समजून देता आहांत कीं चढाओढीच्या आवेशांत देता आहांत ?" म्हातारा उत्तरला : "ऐका, मी जेवायला बसलों होतों. दीड भाकरीची भूक होती माझी आणि माझ्या पानांत एकच भाकर होती. त्याचवेळीं आंगणांत एक उपाशी माणूस आला. तेव्हां जेवढी भाकरी माझ्या पुढचांत होती त्यांतली अर्धी मीं त्याला दिली. आतां यांत तुम्ही मला काय समजावून सांगणार ?"

पंजाबांत एक कार्यकर्ती भगिनी भूदानयात्रा करीत एका गांवीं पोहचली. त्या गांवांत धनिकांची संख्या जास्त आहे. सभेला जमीनदार आणि शेतकरी यांची चांगली उपस्थिति होती. भगिनीनें भूदान समजावून सांगतांना सांगितलें कीं, "प्रतिष्ठेसाठीं आणि नांवासाठीं जे दान दिलें जातें तें सात्त्विक दान नसतें. ज्या दानानें देणाऱ्यांत अहंकार आणि घेणाऱ्यांत दीनता येणार नाहीं तेंच दान उत्तम होय." सभा संपली. कोणी दाता

पुढें झाला नाहीं. भगिनी आपल्या मुक्कामाकडे गेली. "आज ज्यांनीं दान दिलें नाहीं ते उद्या अवश्य देतील" अशी भावना तिनें मनांत बाळगली होती. इतक्यांत तिच्याकडे एक वृद्धसे गृहस्थ आले आणि म्हणाले, "माझी ३९ बिघे जमीन दानांत लिहून घ्या." भगिनीनें विचारलें. "सभेमध्येंच कां नाहीं आपण दान जाहीर केलें ?" तें गृहस्थ म्हणाले, "मला नांवाची इच्छा नव्हती म्हणून."

भूमिहीनांकरितां भूमिवानांकडून भूमि मागणें हें विनोबाजीप्रमाणें कार्यकर्त्यांनींहि कसें धर्मकार्य मानलें होतें आणि तें कोणत्या निष्ठेनें चालविलें होतें याचें एक उदाहरण म्हणून श्री. विमलाबाई ठकार यांच्या बिहार-पदयात्रेंतील एक घटना येथें देतों.

गया जिल्ह्यांत एक छोटीशी जमीनदारी होती. या पदयात्रेचा रस्ता जमीनदारीच्या गांवावरूनच जात होता. दुरून गांव पाहून बाई म्हणाल्या, "ह्या गांवांत आपण जाऊं या". साथीदार म्हणाले, "छे: छे:, फुकट हेलपाटा होईल. तिथला जमीनदार अत्यंत दुष्ट, दारुडा, व्यसनी आहे. तो काय जमीन देतोय् ? त्याचे कसलें हृदयपरिवर्तन होणार ?" बाईंनी म्हटलें, "आपण नारायणाच्या दर्शनाकरितां बाहेर पडलों आहोंत. त्याला टाळून पुढें कसें जातां येईल ? विनोबाजींचें आंदोलन म्हणजे गंमत कां आहे ? त्यांत गंभीर मानवनिष्ठा आहे. आपण त्यांना जाऊन भेटूं". पण साथीदारानें ऐकलें नाहीं. बाई एकटयाच गांवांत शिरल्या आणि जमीन-दाराच्या गढीवर गेल्या. त्यांनी दरवाजांतून हांक मारली, "भाईसाहेब".

आंतूनच जमीनदारानें विचारलें, "कौन है ?" "मैं आपकी बहन आयी हूं," बाईंनीं बाहेरूनच उत्तर दिलें.

स्त्रीचा शब्द ऐकतांच त्यानें स्वत: येऊन दार उघडलें आणि बाईंना वरपासून खालपर्यंत प्रथम न्याहाळलें आणि आश्चर्यानें विचारलें--

"बाई, तूं कोण आहेस आणि येथें कशासाठीं आली आहेस ? मी एक दुष्ट मनुष्य आहे हें गांवच्या लोकांनीं तुला नाहीं कां सांगितलें ?"

बाई त्यांना म्हणाल्या, "भाईसाहेब, तुम्ही कसेहि असा. तुम्हाला आई-बहीण तर असेलच. मी तुमची बहीण म्हणून आलें आहे आणि भूदान-

यज्ञाच्या संदेशाची राखी तुमच्या मनगटावर बांधल्यावांचून मी येथून जाणार नाहीं." त्यांचें हे शब्द ऐकतांच, काय असेल तें असो, त्या गृहस्थाच्या डोळ्यांत एकदम पाणी आलें. त्यानें त्यांना आंत नेलें. त्यांच्या जेवण्याखाण्याची सोय केली. बाईंनीं त्या गृहस्थाला भूदानाविषयींचा विचार सविस्तर समजावून सांगितला. त्यानें तो शांतपणें ऐकला. त्यानेंच मग सभेची दवंडी देवविली. सभेला अध्यक्ष म्हणून आपण हजर राहिला. स्वत: १२५ एकर जमीन दान दिली. सभेमध्यें इतरांनींहि दान दिलें. अशा रीतीनें त्या गांवांतून एकूण २१५ एकर जमीन मिळाली !

श्री. विमलाबाईंनीच आपल्या पदयात्रेंतील सांगितलेला हा आणखी एक अनुभव आहे :

"एका गांवीं सभेंत विचार समजावून सांगितल्यावर एका सद्गृहस्थानें आपल्या ५० एकरांपैकीं १३ एकर व दुसऱ्यानें २५ एकरांपैकीं ३ एकरांचें दान दिलें. सभा आटोपून मी परत चालले असतां झाडाआडून एक बाई पुढें आली आणि म्हणाली, 'मला देखील थोडी जमीन द्यायची आहे.' माझ्याबरोबर गांवची एक दोन माणसें होतीं. ती हंसू लागली आणि म्हणाली, "बहनजी, ही गरीब बाई आहे, आमच्या घरांत भांडी घासण्याची मोलमजुरी करते. हिच्याजवळ फक्त ४० डेसीमल (१६ गुंठे) जमीन आहे. हिला मुलें आहेत. आणि म्हणते जमीन दान देणार!" मी त्या बाईला नकार देऊं लागतांच तिला अत्यंत दु:ख झालेलें दिसलें. ती म्हणाली, 'मी गरीब मोलकरीण म्हणून कां माझें दान परत करता ? आणि श्रीमंतांकडून तेवढें दान घेता ?' तिचें दान स्वीकारल्यावांचून मला इलाजच राहिला नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून बाहेर आले तों त्या गांवांतील जमीनदार आलेले दिसले. त्यांत ज्यांनी आदल्या दिवशीं दानें दिलीं होतीं ते होते. ते म्हणूं लागले, 'बहेनजी, रात्रभर झोप लागली नाहीं. भांडी घासणाऱ्या बाईनें ४० डेसीमलचें दान द्यावें, मी मात्र ५० एकरांचा मालक असतांना फक्त १३ एकर दिलें हे बरें नाहीं केलें. हें आणखी १७ एकरांचें दान लिहून घ्या.' ५० एकरांच्या मालकानें आपलें दानपत्र तयार केलें. २५ एकरांपैकीं ३ एकरांचें दान दिलें होतें त्यांनीहि आणखी १४ एकर जमीन वाढवून दिली. मोलकरणीच्या दानाचाच हा प्रभाव होता."

श्री. शंकरराव देव आसाम प्रांतांत यात्रा करीत असतां वाटेंत एका शेतकऱ्यानें आपल्या मालकीची ६ बिघे जमीन सर्वच्या सर्व भूदानांत देऊन टाकली. शंकररावांनीं विचारलें," सगळी जमीन देऊन टाकल्यावर तुम्ही निर्वाह कसा करणार ?"

तो शेतकरी आकाशाकडे बोट दाखवून म्हणाला; भगवंताला सर्वांची काळजी आहे."

ओरिसा प्रदेशांतली ही घटना आहे : 'मनापडा' गांवांत जमीन वांटपाचें काम सुरू होतें. श्री. नारायण चौधरी सहकुटुंब या समारंभाच्या तयारीला लागले होते. त्यांनीं आपली ४३ एकर जमीन सर्वच्या सर्व दानांत देऊन टाकली होती. त्यांनीं जाहीर केलें कीं, "गांवच्या भूमिहीन शेतमजुरांनीं आपसांत सल्लामसलत करून राजीखुषीनें त्या जमिनीपैकीं किती जमीन मला द्यायची हें ठरवावें. ती मी प्रसाद म्हणून ग्रहण करीन."

भूमिहीन एकत्र बसले आणि त्यांनीं श्री. चौधरींना अर्धी जमीन देण्याचें ठरविलें. परंतु श्री. चौधरी म्हणाले, "मला त्यापेक्षां कमी द्या." भूमिहीन म्हणाले, "एवढी तुम्ही घेतलीच पाहिजे." शेवटीं चौधरींचा हट्टच पुरा करावा लागला.

कांचीपुरम् येथें १९५६ सालचें सर्वोदय संमेलन झालें. या संमेलनाकरितां मुंबईहून कांहीं तरुण मुलें ८०० मैल पायीं चालत गेलीं. त्यांचा हा प्रवास मराठी, कानडी आणि तमिळ या तीन भाषा-प्रदेशांतून झाला. शेवटच्या दोन भाषा या मुलांना अगदीं परक्या होत्या आणि त्यांचे मुक्काम तर खेड्यापाड्यांत होत होते. पायीं चालतांना आणि मुक्कामाचे ठिकाणीं ते सभा घेत व भूदानाचा संदेश समजावून सांगत. कांचीपुरम्ला पोहचेपर्यंत ७५० एकरांचें दान त्यांना मिळालें. विचाराचें सामर्थ्य या एकाच उदाहरणावरून कितीतरी स्पष्ट होतें. कारण हीं १४ ते २५ वर्षांपर्यंतचीं मुलें होतीं. भाषा अपरिचित, तीं स्वत: लोकांना अपरिचित, असें असूनहि केवळ विचार समजूनच लोकांनीं त्यांना जमीन दान दिली.

मद्रास राज्यांतील सेलम जिल्ह्यांत महाद्रवीड, कळघम् आणि कम्युनिष्ट या तीन पक्षांचा जोर होता. काँग्रेस पक्षांतील कार्यकर्ते फार कमी

होते. येथील कॉंग्रेस कार्यकर्ते श्रीमान आहेत, जनता मागासलेली आहे. भूदान कार्यकर्त्यांच्या तीन तुकड्या तीन भागांत फिरल्या. त्यांच्या सभांना सौम्यसा उपद्रव झाला. सभा मोडण्याचे प्रयत्न झाले. श्रीमान् कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीं भूदान-कामाची उपेक्षा केली. तरी दानपत्रें मिळालीं आणि तीं गरीबांकडून मिळालीं. एकूण १५० माणसांनीं ३९० एकर जमीन दिली. या दानपत्रांत कित्येक द्रविड कळघम्, कम्युनिस्ट, आणि रामराज्य परिषद या पक्षांतील लोकांचींहि दानपत्रें आहेत!

तामीळनाड प्रान्तांत एका कार्यकर्त्या भगिनीची भूदान-यात्रा चालू होती. 'मुर्कन गुंठ्ठी' या गांवीं एक आर्. वेंकट चालयम् रेड्डियार नांवाचे सद्गृहस्थ कार्यकर्त्या भगिनींना भेटले. त्यांची एकूण ३५ एकर जमीन होती. त्यांनीं ७ एकर जिरायत जमीन अगोदरच दान केली होती. या बाई गेल्यानंतर आणखी ९।। एकर जिरायत जमीन त्यांनीं दिली. पण बाईंचें भाषण समाप्त झाल्यावर सभेंत उभे राहून ते म्हणाले, "मी एकूण १६½ एकर जिरायत जमीन देऊन टाकली आहे. पण भाषण ऐकून माझे डोळे उघडले, विचार बदलले. माझ्यापाशीं जी उत्तम एकरी तीन हजार रुपये किमतीची बागाईत जमीन आहे, त्यापैकीं एक एकर जमीन मी देत आहें. सर्वच देऊन टाकावी असा मोह वाटतो आहे. साऱ्या गांवानें आपल्या साऱ्या जमिनीचें दान करून टाकावें अशी माझ्या मनांत इच्छा आहे. उरलेली सर्व जमीन मी देऊन टाकणार पण माथ्यावर कर्जाचा भार आहे आणि माझ्या घरीं आणखी चार माणसें आहेत. पण गांव जर सर्वस्व-दानाला तयार झाला —आणि त्या करिता मी स्वतः प्रयत्न करीन—तर माझी उरलेली सर्व जमीन मी देऊन टाकीन"

हे बोलणें ऐकून लोक सद्गदीत झाले. जे दान देण्याच्या विरुद्ध होते तेहि उठून दानाची घोषणा करूं लागले. सभा संपली आणि रात्रीं झोपण्याच्या तयारींत असतांना एक हरिजन संकोचत संकोचत कार्यकर्त्याच्या अंथरुणाजवळ आला आणि नम्रतापूर्वक त्यांना म्हणाला, "आपण रागावूं नका. मला सुद्धां दान देण्याची इच्छा झाली आहे, म्हणून मीं आपल्याला त्रास दिला. मी गरीब आहें, माझी काय ताकत असणार? पण माझ्याकडे आहे आपली ४ एकर जमीन, त्यांतली एक एकर लिहून घेतां?"

बाळागुंडपुरम् या गांवीं सभा झाली. त्या गांवांत मुसलमानांची ४० घरें आहेत. गांवचे पुढारी एक मुसलमान गृहस्थ होते; सभेंत एका भगिनीचें भाषण झाल्यावर ते मुसलमान गृहस्थ म्हणांले, "लोकशाही पाहिजे असेल तर गरीबी-अमीरी घालविली पाहिजे. माझ्याजवळ ६० एकर जमीन आहे, त्याच्या सहाव्या हिस्शाचें दान मी करीत आहें, माझ्या इतर नातलगांना बोलावून आणखी जमीन देता आली तर देईन. हें प्रेमाचें काम आहे, हा माणुसकीचा संदेश आहे."

पंजाबच्या हिस्सार जिल्ह्यांत पातली या गांवीं गांवच्या लोकांशीं भूदानाच्या बाबतींत बरीच चर्चा होऊन सुद्धां दानपत्रें कोणी भरलीं नाहींत. दोनप्रहरीं कार्यकर्ता वामकुक्षी करीत पडला असतांना दूरच्या 'तुरफापुर' या गांवचा एक इसम घामानें थबथबलेला आला. त्यानें विचारलें "धरती दान करवानेवाले पंडत आप हैं ?" पुढें तो म्हणाला "माझी ३५ बिघे धरती आहे, तिनें आतांपर्यंत मला खूप दिलें आहे, आता इतरांचें भलें व्हावें म्हणून मी ती देऊं इच्छितों. आपण घ्याल कां ?" कार्यकर्त्यानें विचारलें "मग तुमचा निर्वाह कसा होणार ?" "माझें लग्न झालेलें नाहीं. हा एकटाच देह आहे. भलें मोठें शरीर आहे. दोन रोटी करितां लाखो करोडो दुःखी बिनजमीनवाल्या शेतकऱ्याप्रमाणें मी सुद्धां मेहनत-मजुरी करूं शकतों. जमीन ठेवण्याचें काय कारण आहे ?"

दानपत्रावर सही करतांना त्याचे डोळे भरून आले होते. "महाराज, माझें एक घरहि आहे. ज्याला जमीन द्याल त्याच्या उपयोगाला तें येईल." "मग तुम्ही राहणार कोठें ?"

पुष्कळ समजावून दिल्यावर त्यानें आपलें अर्धें घर आपल्या हयातीपर्यंत स्वतःच्या उपयोगासाठीं ठेवून घेण्याचें मान्य केलें.

त्याच्या गांवीं जाऊन त्याची जमीन वगैरे किती आहे याची कार्यकर्त्यानें माहिती काढली तेव्हां समजलें कीं त्याची ५० बिघे जमीन असून तिच्यांत पांच विहिरी आहेत आणि गांवांतील ती सर्वांत उतम जमीन आहे!

भूदानाचा विचार किती सहज पटतो या संबधींचे हे देशभरचे सर्व थरांतले सर्व प्रकारच्या कार्यकर्त्यांच्या बाबतींत आलेले कांहीं निवडक अनुभव येथें उद्धृत केले आहेत. भूमिदानाचें कार्य हृदयाला स्पर्श करतें म्हणून तें धर्मकार्याशीं एकरूप होतें हें हि यावरून दिसून येतें.

## : १० :

# महाराष्ट्रांतील विषमतेचें स्वरूप

खास महाराष्ट्रांत जमीन-धारणाची स्थिति काय आहे याचा अभ्यास केला असतां येथेंहि जमीन नसलेल्यांची किंवा फार अल्प जमीन असलेल्यांची संख्या लक्षांत भरण्याजोगी दिसते. महाराष्ट्र प्रदेश हा नैसर्गिक दृष्टचा तीन प्रकारच्या टापूंत विभागलेला आहे :

(१) सह्याद्रीच्या खालीं असलेला समुद्र-किनाऱ्यालगतचा भाग–ज्याला 'कोंकण' म्हणतात तो.

(२) घाटमाथ्यावरचा डोंगराळ कोंकणी भाग, आणि

(३) सपाट प्रदेश-देशभाग.

या तिन्ही भागांवर पडणाऱ्या पावसाचें प्रमाण वेगवेगळें आहे. त्यामुळें हि जमिनीच्या मगदुरांत निरनिराळे प्रकार झाले आहेत. कोंकण आणि घाटमाथ्यावरील कोंकणी भाग हा खूप पाऊस पडणारा परंतु जमिनीच्या दृष्टीनें कमी सकस भाग आहे. मधल्या भागाचे पावसाच्या दृष्टीनें दोन भाग पडतात–पश्चिमेकडचा आणि पूर्वेकडचा. हे दोन दक्षिणोत्तर पट्टेच पडले आहेत. यापैकीं पश्चिमेकडील नाशिक ते कोल्हापूर या पट्ट्यांत २० इंचाच्यावर पाऊस पडतो. आणि त्यामुळें हा भाग चांगला पिकाऊ आहे. परंतु याला लागून पूर्वेकडचा जत ते येवला-मालेगांव या टापूंत पावसाचें प्रमाण नेहमीं अनिश्चित आणि कमी असतें. त्यामुळें जमीन चांगल्या प्रतीची असून सुद्धां पिकाची अनिश्चितता असते. धुळे, जळगांव आणि विदर्भ-नागपूर या भागांत जमिनी उत्तम आहेत. त्याचप्रमाणें पाऊसहि बहुधा योग्य प्रमाणांत पडतो. मराठवाड्याचा कांहीं भाग सोडला तर हीच स्थिति तेथेंहि आहे. हे दोनहि प्रदेश जमिनीच्या दृष्टीनें संपन्न आहेत.

सबंध महाराष्ट्रांत जमीन-धारणेचें स्वरूप रयतवारी पद्धतीचें आहे असें मानलें जातें. परंतु मराठवाडा-विदर्भ हे भाग ऐतिहासिक काळापासून

संस्थानी मुलुखांत जमा झालेले होते. तसेंच पश्चिम महाराष्ट्रांतहि कांहीं टापू संस्थानी सरकारच्या ताब्यांत होता. त्यामुळें संस्थानी सरजामशाही पद्धति येथें अमलांत होती. बंगाल-बिहारमध्यें जसे सरकार आणि रयत यांच्यामध्यें जमीनदार होते तसे विदर्भांत मालगुजार होते. नुकतीच येथील जमीनदारी व मालगुजार पद्धति कायद्यानें नष्ट करण्यांत आली आहे. परंतु जमिनी रयतांच्या ताब्यांत देण्याचें काम आतांपर्यंत अमलांत आलेलें नव्हतें. मुंबईराज्यांत आल्यापासून तथाकथित मालकांचे व कसणाऱ्या कुळांचे संबंध कायदेशीर करण्याच्या दृष्टीनें व कुळांचे हक्क सरक्षित करण्याच्या दृष्टीनें कूळकायदे येथें लागू करण्यांत आले आहेत.

पूर्वींच्या पश्चिम महाराष्ट्रांत १९५१ च्या खानेसुमारीप्रमाणें शेती-व्यवसायांत गुंतलेल्या एकूण १ कोटी १२ लाख लोकसंख्येपैकीं ७६ लाख ४४ हजार म्हणजे ६८ टक्के लोक जमिनीचे मालक-शेतकरी (Peasant-Proprietors) आहेत, १६ लक्ष ६२ हजार म्हणजे १५ टक्के स्वतः मालक नाहींत पण कुळें म्हणून कसणारे आहेत, १५ लक्ष ४९ हजार म्हणजे १४ टक्के लोक निव्वळ शेतमजूर आहेत.

या ६८ टक्के मालक-शेतकरी वर्गाची खालील प्रमाणें विभागणी आहे :

| वर्ग | खातेदार संख्या | त्यांचेकडील एकूण क्षेत्र (एकरांत) |
|---|---|---|
| ५ एकरापर्यंत | ८,७६००० | २२,६१००० |
| ५ ते १५ एकरांपर्यंत | ४,६६००० | ४१,६१००० |
| १५ ते २५ एकरांपर्यंत | १,८६००० | ३६,६२००० |
| २५ ते १०० एकरांपर्यंत | १,४१००० | ५३,७८००० |
| १०० एकरांवर | १०००० | १७,७८००० |

वरील तक्त्यावरून दिसून येतें कीं या विभागांत शंभर एकरांहून जास्त जमिनीचे धनी १० हजार आहेत आणि त्यांच्याकडे सुमारे १७ लाख एकर जमीन आहे, तर स्वतःची ५ एकरसुद्धां जमीन नसलेले खातेदार सुमारें ८¾ लक्ष आहेत आणि त्यांची एकूण जमीन २२ लाखांवर

पडते. म्हणजे शेंकडा १० टक्के खातेदार ४४ टक्के जमिनीचे मालक आणि शेंकडा ९० टक्के खातेदार उरलेल्या ५६ टक्के जमिनीचे मालक आहेत. तेव्हां ५ एकरांखालचे ८¾ लक्ष गरीब जमीन-मालक, १६ लक्ष ६५ हजार मालक नसलेलीं शेतकरी-कुळें आणि १५ लक्ष ४९ हजार शेतमजूर, म्हणजे एकूण शेती व्यवसायांत गुंतलेल्या लोकसंख्येंतील ३७ टक्के लोकांना एकतर जमीनच नाहीं किंवा असली तर अगदीं थोडी आहे. आणि इकडे ३ लक्ष २ हजार म्हणजे ३ टक्के जे गैरहजर मालक होते त्यांच्याच ताब्यांत ३० टक्के जमीन होती, परन्तु १९५७ च्या कूळकायद्यानें गैरहजर मालकी कमी करण्याचा जो प्रयत्न केला त्यांतून कांहीं थोडीं कुळें मालक झालीं असावींत. मागें लिहिल्याप्रमाणें या कायद्यांतील 'जातीनें कसणें' या संज्ञेचा फायदा घेऊन किती लोकांनीं जमीन कुळाला घेऊ दिली असेल तें कळणें कठिण आहे, म्हणजे कूळ-कायद्यानंतर सुद्धां कूळवर्गामधील कांहीं भाग तरींच भूमिहीनांमधील सर्व लोक हे अजूनहि जमिनीविना बेकार आहेत.

अखिल महाराष्ट्रांतील विषमतेचें चित्रहि यापेक्षां फारसें वेगळें नाहीं. महाराष्ट्रांतल्या एकूण लोकसंख्येपैकीं ६३.९८ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. यांच्यापैकीं १४.७९ टक्के लोक भूमिहीन शेतमजूर आहेत, म्हणजे त्यांच्याजवळ स्वत:ची जमीन अजीबात नाहीं. आणखी ७.५९ टक्के लोक असे आहेत कीं ज्यांच्याजवळ स्वत:ची जमीन नाममात्रच आहे, त्यांची उपजीविका मुख्यत: शेतमजुरीवरच होते. राहिलेल्या ४१.६० टक्के जमीनमालकांपैकीं २.०२ टक्के जमीन-मालक स्वत: न कसणारे आहेत आणि त्यांच्याकडेच एकूण जमिनीचा सुमारें पांचवा हिस्सा आहे. खालील तक्त्यावरून महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागांतील विषमतेचें स्वरूप अधिक लक्षांत येईल:

(आंकडे शेकडेवारींत)

| एकर क्षेत्र | पश्चिम महाराष्ट्र | | मराठवाडा | | विदर्भ | | अखिल महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खातेदार | जमीन | खातेदार | जमीन | खातेदार | जमीन | खातेदार | जमीन |
| ०–५ | ४६.१२ | ११.८० | १८.२६ | २.६० | ५४.८४ | १२.११ | ४४.०० | ७.५० |
| ५–१५ | ३१.४१ | ३०.५५ | ३७.२२ | १७.८० | २८.९३ | २५.८७ | ३१.६० | ३५.०० |
| १५–६० | २०.९६ | ३७.७३ | {४४.५२ | ७९.६० | १४.०७ | ३८.७१ | २२.७० | ४२.७० |
| ६०च्यावर | १.५१ | १९.८२ | | | २.१६ | ३१.५२ | १.७० | १४.८० |

: ११ :

# महाराष्ट्राचें हृदय-दर्शन

महाराष्ट्रांतील जमीन-धारणाविषयींची विषमता पुष्कळांना माहीत नसते. म्हणून येथें जमिनीचे फेरवांटप करण्याची फारशी गरज नाहीं असें ते मानतात. मागील प्रकरणांतील आंकड्यांवरून हा गैरसमज दूर होईल. परन्तु भूदानाच्या मार्गानें म्हणजे विचार-परिवर्तन करून येथील विषमता कमी करणें शक्य होईल कां असाहि संशय लोकांच्या मनांत असतो. विनोबाजींची महाराष्ट्रांत पदयात्रा १९५८ सालीं चालू असतांना सांगली येथें तेथील एक न्यायाधीश विनोबाजींना भेटायला आले होते. त्यांनीं विनोबाजींना सांगितलें कीं या जिल्ह्यांत होणाऱ्या दिवाणी व फौजदारी खटल्यांपैकीं जमीन-प्रकरणावरून होणाऱ्या खटल्यांचें प्रमाण शे.९० टक्के आहे. तीच, किंबहुना त्यापेक्षां वाईट परिस्थिति रत्नागिरी जिल्ह्याची आहे. कमीजास्त प्रमाणांत सर्व महाराष्ट्रांत हीच स्थिति आहे. इतर प्रान्तांच्या मानानें राजकीय व सामाजिक जागृति या प्रदेशांत मोठ्या प्रमाणांत आहे, लोकांचा स्वभाव तीव्र आहे, त्यामुळें भूदानाच्या मार्गानें जमीन भूमिहीनांमध्यें वांटून देणें येथें अवघड आहे असें वाटलें तर आश्चर्य नाहीं. परन्तु अनुभव मात्र वेगळा आहे. इतर प्रांतांतील अनुभवाइतकाच तो उद्‌बोधक आहे. आणि खुद्द विनोबाजींची पदयात्रा या भागांत हा प्रयोग सुरू झाल्यानंतर फार उशीरां झाली हें लक्षांत घेतलें तर आलेले अनुभव कित्येक वेळां चकित करणारे आहेत असें वाटेल. येथें केवळ भूदानेंच होऊन राहिलीं नाहींत तर ग्रामपरिवार आणि ग्रामदानें करण्यापर्यंत भूदानाच्या विचार-प्रक्रियेची मजल गेली आहे.

महाराष्ट्रांत कोंकणभागांत असलेली खोतीपद्धति आणि विदर्भ भागांतील मालगुजारी पद्धति भूदान-यज्ञाचें काम सुरू होण्यापूर्वींच नष्ट करण्यांत आली होती. पण खोत आणि मालगुजार मंडळी असंतुष्ट होती. याच रीतीनें देशभागांतील निरनिराळ्या प्रकारचीं इनामी, मिराशी हक्काची

आणि जहागिरीची वतनेंहि कायद्यानें संपुष्टांत आणलेलीं होतीं आणि म्हणून तोहि वर्ग असंतुष्ट होता. महाराष्ट्रांत असा एक नवीन बागायतदारांचा वर्ग निर्माण झाला आहे कीं ज्यांचें हातीं जमिनीची मोठमोठीं क्षेत्रें एकत्र झालीं आहेत. हा वर्ग अल्पसंख्य असला तरी प्रभावी आहे. आणि कालव्याच्या पाण्याच्या सोयीमुळें त्यांच्या ताब्यांतील जमिनीची किंमत अनेक पटींनीं वाढली आहे.

या सर्वांच्याकडून भूमिहीनांना त्यांच्या जन्मसिद्ध हक्काची प्राप्ति कशी व्हायची? या सर्वांनीं संघटितपणें आपल्या मालमत्तेचें संरक्षण करण्याचा सर्व बाजूंनीं प्रयत्न चालविला होता आणि आजहि तो चालू आहे. अशा परिस्थितींत भूमिहीनांची दखल कोण घेणार? परन्तु महाराष्ट्रांत भूदानाची चळवळ सुरू झाली, वाढली आणि तिचा स्पर्श याहि वर्गांतल्या लोकांना झाला. असंतुष्ट, संतापलेले, लोकशाहीच्या सरकारावर नाराज असलेले असे हे लोक असून सुद्धां त्यांच्याकडून भूमिहीनांकरितां भूदानयज्ञांत खुषीनें दानें मिळालीं आहेत.

पश्चिम महाराष्ट्रांतील संस्थानांपैकीं ज्या ३-४ संस्थानिकांना भूदानाचे कार्यकर्ते भेटूं शकले त्यांनी आपल्या जमिनीचा कांहींना काहीं हिस्सा त्या यज्ञांत दिला आहे. फलटणचे राजेसाहेब श्री. मालोजीराव नाईक निंबाळकर यांनीं आपल्या जमिनीचा $\frac{1}{8}$ हिस्सा—म्हणजे १०० एकर जमीन—दान दिली आहे. ती देतांना त्यांनीं उद्‌गार काढले होते कीं, "मजजवळ ८००० एकर जमीन आहे, पण मला ती ओळखताहि येत नाहीं. एवढी मोठी जमीन जो स्वतःला उरकत नाहीं ती मी ताब्यांत कां ठेवावी? मी हेंच साऱ्या जमीनदारांना हांक मारून सांगत आहे, थोड्या जमिनीचा मालक आपली जमीन जितकी उत्कृष्ट ठेवतो तितकी पुष्कळ जमिनीचे मालक ठेवूं शकत नाहींत. यंत्रांनीं जमीन कसूं म्हणाल तर त्यानें आपलींच माणसें बेकार होतात. शेताची मशागत जनावरांच्या मदतीनें नव्हे तर माणसाच्या हातांनीं खोदूनहि करावी असें मी म्हणेन."

सांवतवाडीकर राजेसाहेबांनीं २०० एकरांच्यावर व जव्हारच्या राजांनीं १०० एकर जमीन दानांत दिली.

रत्नागिरी जिल्ह्यांत जी एकूण जमीन मिळाली त्यांत खोतांच्याकडील जमीन कांहीं कमी प्रमाणांत नाहीं. तीच स्थिति कुलाबा जिल्ह्यांतील आहे. या जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यांतील किकवी या गांवची एक वाडी आहे. तेथें ठाकूर लोक राहतात. त्या वाडीची सर्व जमीन श्री. तात्यासाहेब सुगवेकर या एका जमीनदाराच्या मालकीची होती. भूदानाचा संदेश त्यांच्या कानांवर आला, त्यांनीं तो पूर्ण समजून घेतला, त्यावर बरेच दिवस विचार केला, मोह सोडण्याची मनानें हळू हळू तयारी केली आणि एका रात्रीं निश्चय करून दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांनीं साऱ्या वाडीचें दान करून टाकलें. या वाडीची जमीन बरीचशी वरकस असून कांहीं भातपिकी आहे. श्री. तात्यासाहेब सुगवेकर हे कुलाबा जिल्हा खातेदार संघाचे अध्यक्ष होते. त्यांच्या चुलत्यांनींहि त्याच वेळीं ११ एकर भातपिकी जमिनीचें दान जाहीर केलें.

त्याचप्रमाणें, पनवेल तालुक्यांतील कुंडेवहाळ या गांवची ६६० एकर जमीन श्री. लक्ष्मण वामन आपटे यांची होती. भूदान कार्यकर्त्यांनीं त्यांना विनंति करतांच त्यांनीं सर्वच्या सर्व जमीन दान करून टाकली. पोलादपुर पेटचांतील बीरवाडीच्या आपल्या २५८ एकर जमिनीचें श्री रघुनाथ अंताजी पटवर्धन यांनीं दान करून टाकलें आहे.

वर उल्लेखिलेल्या बहुतेक सर्व जमिनींचें वांटपहि करण्यांत आलें आहे.

सांगली जिल्ह्यांत शिराळे पेटचांत तेथील देशपांडे इनामदार घराण्यांतील मंडळींनीं ४०० एकरांवर जमीन भूदानांत दिली आहे. नाशिक जिल्ह्याच्या बागलाण आणि कळवण ताळुक्यांतील एक जहागिरदार मुल्हेरचे देशमुख यांनीं भूदान केलें आहे. त्याचप्रमाणें श्री. दसुबापु या भिल्ल जहागिरदारानें आपल्या जमिनीचा १० वा हिस्सा भूदानांत दिला आहे. तात्पर्य, ज्या वतनदार किंवा पूर्वीच्या हक्कदार लोकांना भूदान कार्यकर्ते भेटू शकले त्यांच्यापैकीं बहुतेकांनीं हा विचार पटल्याची खूण म्हणून दान दिलेलें आहे. बागाईतदारांपैकीं ज्या मंडळींकडे भूदान-कार्यकर्ते जमीन मागायला गेले त्यांच्याकडून दानांत जमिनी मिळाल्या आहेत. अर्थात् फार मोठ्या बागाईतदारांकडून अजून मिळाल्या नाहींत, कारण तसा प्रयत्नच झाला

नाहीं. बारामती, इंदापुर, माळशिरस, कोपरगांव, श्रीरामपुर या तालुक्यांत वरील वर्गाकडून भूदान झालेलें आहे.

महाराष्ट्रांत मालक-शेतकरी वर्ग (Peasant-proprietors) ६८ टक्के आहेत. अर्थात् शेती करणारा हा वर्ग सामान्य आहे आणि या सामान्य वर्गाकडूनच महाराष्ट्रांतले मोठें भूमिदान झालेलें आहे असें दिसून येतें. (जिल्हावार भूमिप्राप्तीचा तक्ता पृष्ठ ११० वर पहा) भूदान-यज्ञाच्या आंदोलनांत जो अनुभव आला आहे तो महाराष्ट्राचें मानस यथार्थपणें दर्शवूं शकेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांतील अगदीं निवडक अनुभव पुढें दिले आहेत :

## महाराष्ट्रांतील अनुभव

कासोदें ( जळगांव जिल्हा ) या गांवीं चिमण धोंडू पाटील नांवाचे एक अल्प-शिक्षित शेतकरी राहतात. शेती हेंच त्यांचें निर्वाहाचें साधन. घरचा उद्योग सांभाळून आपल्या हातून होईल तेवढी सेवा ते करीत असतात. भूदानाची पदयात्रा त्यांच्या गांवीं गेली असतां त्या गृहस्थानें आपल्या १५ एकर २२ गुंठे जमिनीपैकीं फक्त १ एकर जमीन स्वत:साठीं ठेवून घेऊन बाकीची सर्व जमीन भूदान-यज्ञांत दिली. दानाचा हा विचार क्षणिक भावनेंतून निर्माण झाला नाहीं. अगदीं विचारपूर्वक त्यांनीं हा निर्णय घेतला होता. गांवच्या लोकांनीं एवढ्यावर त्यांचा निर्वाह होणार नाहीं म्हणून त्यांना समजावून सांगितलें असतां ते म्हणाले, "या देशांत माणशीं सरासरी $\frac{3}{4}$ एकर जमीन वांट्यास येते म्हणतात. या एका एकरामधून माझ्या कुटुंबाच्या पोटाला पुरेल एवढें मी काढूं शकेन असा मला भरंवसा वाटतो."

ठाणे जिल्ह्यांत कर्जत तालुक्याच्या भागांत सह्याद्रीच्या पायथ्याशीं मेचकरवाडी आहे. भूदानाचा विचार सांगत कार्यकर्ते त्या गांवीं गेले. प्रचाराची सभा चालू असतां एक गृहस्थ उठून घरांत गेले. त्यांचा मुलगा हि सभेंत बसला होता. त्यालाहि त्यांनीं घरांत बोलावून घेतलें. थोड्यावेळांत हे मेचकर बापलेक बाहेर आले आणि त्यांनीं कार्यकर्त्यांच्या हातीं जमिनीचें खरेदीखत दिलें आणि म्हटलें, "या दस्तऐवजांत असेल ती सर्व जमीन मी या मुलाच्या संमतीनें दान करीत आहें."

अनुक्रम 33६६ विः
क्रमांक ९२७६ नों. दि: १०.१०.६२


त्या कागदांत ३२ एकर २ गुंठे जमीन होती.

पण याहिपेक्षां हृदयस्पर्शी दान एका ठाकूर जातीच्या बाईचें आहे. ठाकूर जात ही आदिवासी जमात आहे. कशेळे या कर्जत तालुक्यांतील गांवीं सभा झाली तेव्हां सभेला बाई ही एकच आली होती. तिच्या अंगावर लज्जा रक्षण करण्याएवढेंहि धडूत नव्हतें. दोन मैलांवर किकवी गांव आहे. तिथली ही कुशी ठाकुरीण. आदल्या दिवशीं किकवीला भूदानाची सभा झाली होती पण त्यावेळीं ही ठाकुरीण जंगलांत कामाला गेली होती. घरीं आल्यावर तिला शेजाऱ्यांकडून गोरगरिबांना जमीन वांटण्यासाठीं मागताहेत असें कांहींतरी कळलें असावें. म्हणून ती कशेळीच्या सभेला मुद्दाम आली होती. जमीन सर्वांची आई आहे आणि ती सगळ्यांना मिळाली पाहिजे एवढें तिला चांगलें समजलें. पण तिच्या जवळ द्यायला तिची स्वतःची जमीनच नव्हती म्हणून तिला वाईट वाटत असलेलें दिसलें. कार्यकर्त्याशीं तिचें बोलणें झालें. त्यांत असें कळलें कीं ४-५ एकर जमीन ती कूळ म्हणून दुसऱ्याची कसत होती. स्वतः ती विधवा आहे आणि तिला मुलें बाळेंहि आहेत. आपल्यासारख्या इतर गरिबांकरितां आपणहि कांहीं द्यावें ही तिची तीव्र इच्छा पाहून कार्यकर्त्यानें तिला सांगितलें, कीं तूं कसतेस त्यांतल्याच एक एकराच्या कसणुकीच्या हक्काचें दान कर. तिला तें पटलें आणि कूळकायद्यानें मिळालेल्या १ एकराच्या कसण्याचा हक्क दुसऱ्या भूमिहीनाकरिता या कुशी ठाकुरणीनें सोडला !

कोल्हापुर जिल्ह्यांत दत्तवाड गांवीं राष्ट्र-सेवादलाच्या पथकाचा मुक्काम होता. पथक गांवांत आलें कीं मोठमोठीं श्रीमंत व जमीनदार मंडळी परगांवीं व रानांत जात हा अनुभव असे. दत्तवाड गांव त्याला अपवाद नव्हतें. गांवांत यापूर्वी अल्पसें भूदान मिळालें होतें. पथक-सैनिकांनीं प्रचार केला. प्रमुख मंडळींशीं चर्चा झाली. दान किती मिळणार हें कोणालाच सांगतां येईना. सभा भरली आणि सभेला रंग भरला. वातावरण तयार होऊं लागलें आणि आश्चर्य हें कीं ४१ लोकांनीं चुरशीनें दानें दिलीं.

दत्तवाड या गांवीं कोळ्यांची वस्ती आहे. ही मंडळी जमिनीच्या कसवटीकडे दुर्लक्ष करून इतर व्यवसाय करतात. त्यामुळें त्यांना जमिनी-

वरून हुसकून लावून ती दुसऱ्यांना कसायला देण्याचें घाटत होतें. त्यांतील एकानें पथकाच्या लोकांना विचारलें, "गरीबांवर होणारा हा अन्याय थांबेल कां ?" ती जमीन कोळयांकडून ज्यांना कसायला मिळणार त्यांना पथक-कार्यकर्ते भेटले. उभयतांचीं गाऱ्हाणीं ऐकून घेण्यांत आलीं. पाटील, कोळी, जमीनमालक, ग्रामस्थ पुढारी सारे एकत्र जमले. भूदान-विचार सर्वांना समजावून सांगण्यात आला. कोळी मंडळींनीं व्यसनें सोडून जमीन कसण्याचें कबूल केलें व ज्यांच्याकडे जमीन जाणार होती त्यांनीं ती न घेतां कोळयांकडेच ठेवण्याचें कबूल केलें. ती सर्व मंडळी समाधानानें परतली. त्यामुळें गांवांत फूट पडण्याची भीति होती ती दूर झाली. ज्यांनीं ही तयार केली त्यांनींहि आपली एक एकर जमीन भूदानाला दिली.

चिकुर्डे हे सांगली जिल्ह्यांतील गांव. भूदान-पथकाचा मुक्काम या गांवीं होता. पथकांतील एक सैनिक श्री. पी. बी. पाटील हे या गांवचे रहिवासी. सभा ठरली. प्रचार फेरीहि झाली. पण रात्रीं ऐनवेळीं आभाळ भरून आलें. सभा होणार नाहीं असें वाटूं लागलें. काय होईल तें होवो पण सभा घेण्याचें ठरलें. स्वतः पी. बी. पाटील सभेंत बोलले आणि प्रथम त्यांच्या वडिलांनी १/६ हिस्सा जमीन जाहीर केली. आणि मग एका-मागून एक ३२ लोकांनीं आपापला सहावा हिस्सा जाहीर केला. गांवांत ३/४ जमीन मोजक्या मंडळींच्या हातीं आहे. पण गरीब ग्रामस्थांनींच दानें दिलीं. इतर दानेंहि मिळालीं. सभा संपतांच पाऊस जोरानें आला आणि आश्चर्य हें कीं पावसांत भिजत येवून हरिजनांनीं दानें दिलीं. ५० हरिजनांनीं १/६ हिस्सा देण्याचें जाहीर केलें !

मुर्डशिगी (कोल्हापुर जिल्हा) या गांवांत सभा चालू होती. बापू दौलू जाधव उभा राहिला आणि म्हणाला, "माझी ६ गुंठे जमीन लिवा" लोक आश्चर्यानें पाहूं लागले. दुसरा एक मोठा जमीनवाला उठला आणि म्हणाला "ह्या जाधवानें जमीन दान दिली. मला राहवत नाहीं. ज्याची स्वतःची फक्त ६ गुंठेच जमीन आहे तो आपली सर्व जमीन या कामा-साठीं देतो तर मलाहि कांहीं देतां येईलच. पण शर्त एक—ही जमीन देण्याची मला जी इच्छा झाली ती या बापूमुळें. ह्या गरीब माणसाला

92308

जर माझी ही १ एकर उत्तम जमीन देणार असाल तर माझें दानपत्र लिहून घ्या.'' ही शर्त कोण नाहीं स्वीकारणार ?

हा कोल्हापुर जिल्ह्यांतीलच अनुभव आहे. एका गांवीं भूदानाची रात्रीं सभा झाली आणि दुसरे दिवशीं कार्यकर्ते गांवांत कांहीं लोकांना भेटून जमीन मागण्यासाठीं फिरले. भूदान समजावून सांगण्याकरितां घेतलेल्या सभेमुळें दोन परिणाम होत : एक, विचार सर्वांना समजून येई, आणि दुसरा, तो समजल्यामुळेंच कांहीं जमीनमालक कार्यकर्त्यांपासून दूर पळत. या गांवींहि तसाच अनुभव आला. एका जमीन-मालकानें टाळलें, दुसऱ्यानें घरच्या मंडळींचा विचार घेतों म्हणून सांगितलें. तिसऱ्यानें 'विचाराला सवड द्या' म्हटलें. मात्र कोणी 'नाहीं' म्हटलें नाहीं. कार्यकर्ते स्थानिक माणसाबरोबर एका चौथ्या घरीं गेले. तें एका मुसलमान बाईचें घर होतें. तिनें रात्रींच्या सभेला येण्याची आणि स्वतःकांहीं जमीन देण्याची इच्छा त्या स्थानिक माणसाजवळ बोलून दाखविली होती. म्हणून कार्यकर्त्यांना त्यानें तेथें नेलें होतें. ती बाई आजारी होती. दारिद्र्याची सारी चिह्नें तिच्या घरांत दिसत होतीं. ती जमीन देणार आहे काय याची चौकशी करतां, तिच्या नवऱ्यानें मिळविलेल्या १३ एकर माळरानाच्या जमिनींतली कांहीं जमीन तिला गरीबांसाठीं द्यायची आहे, असें कळलें. तिचा नवरा मरून सहा वर्षं झालीं होतीं.

त्या जमिनींत भुईमूग, बाजरी अशीं पिकें होतात असें तिनें सांगितलें.

कार्यकर्ता म्हणाला 'तुमच्या पोरांबाळांच्या पोटाला पुरायला नको कां ?' तेव्हां ती उद्गारली ''व्हय खरं, पर माझीं जशीं पोरं तशीं शेजाऱ्याचीं बी हाइत. हातनं उचलून दोन पायल्या शेंगा द्याव्या म्हटलं तर होत नाहीं, जिमीनच दिली तर हक्कानं तीं खातील तरी !''

गरीबालाच गरीबांचा खरा कळवळा येतो याची उदाहरणें या आंदोलनाच्या इतिहासांत वरील प्रमाणें अनेक पाहायला मिळतात. पण एक वेगळयाच प्रकारचें उदाहरण असें अनुभवाला आलें कीं ज्यांत मालकाचे आणि कुळांचे संबंध मुळापासून बदलले. ती हकीकत अशी :

रत्नागिरी जिल्ह्यांतल्या देवगड तालुक्यांतील दाभोळ गांवीं श्री. नाना बर्वे यांची जमीन आहे. ती त्यांनीं सगळी कुळांना लावली होती. श्री. नाना बर्वे यांनीं गेलीं कित्येक वर्षें आपल्या शेतकरी बांधवांची सेवा करण्यासाठीं गांवांतच एक 'सुकृताश्रम' काढला आहे. या आश्रामाच्या कामांत शेतीहि समाविष्ट करून ते आपली कांहीं जमीन स्वतः कसूं लागले. तेव्हां कुळांना वाटलें ही काय ब्याद आली. एक प्रतिस्पर्धी या दृष्टीनें कुळें त्यांच्याकडे पाहूं लागलीं. त्यांचें हित व्हावें म्हणून नानांनीं सुरू केलेल्या कामावरसुद्धां त्यांचा विश्वास बसेना. परंतु भूदानाची चळवळ सुरू झाली आणि नानांनीं आपल्या जमिनीचा ६ वा हिस्सा कुळांना देऊन टाकला. त्या दान-कर्मानें मात्र कुळांना मालकाविषयीं वाटणारा संशय कमी झाला. 'बामण आपल्या हिताचा विचार करणारा आहे' हें त्यांना पटूं लागलें. आतां न बोलवितां माणसें नानांच्या शेतीच्या कामाला मदत करूं लागलीं. कुंपणाच्या कामाला पूर्वीं ५ रुपये खर्च होत होते त्याऐवजीं आतां ३ रुपये लागूं लागले. असें कसें झालें असें विचारतां शेतकरी म्हणाले, "पूर्वीं आम्ही नुसते मजूर म्हणून तुमच्याशीं वागत होतों, आतां तसें वाटत नाहीं."

एके वर्षी त्यांनीं नानांना सांगितलें. "तुमच्या शेतावर आम्ही आतां मजूर म्हणून कामाला येणार नाहीं."

नानांनीं विचारलें, "कां रे बाबांनो ?"

ते म्हणाले, "आतां आम्ही तुमचे मजूर नाहीं. तुमचेच आहोंत. भातं कापून खळ्यावर आणून टाकूं, मळूं आणि तुम्ही जें द्याल तें प्रसाद म्हणून घेऊं."

'देण्यानें कांहीं नुकसान तर होत नाहींच, उलट प्रेमलाभाबरोबर क्षेमलाभहि होतो आणि गेलेल्या जमिनीच्या तुकड्यांचें नुकसान सुद्धां या दोन लाभांनीं भरून निघतें' असाच नाना आपला अनुभव सांगतात. 'समभावाचें वातावरण पसरतांच चोरी कमी झाली हा त्याचाच परिणाम आहे' असें नानांनीं सांगितलें.

आजच्या महाराष्ट्राच्या विदर्भ आणि नागपूर भागांतहि भूदानाच्या प्राप्तीचा प्रयोग मोठ्या प्रमाणावर झाला. विदर्भामध्यें निझामशाही राजवट असल्यामुळें जमीनदार, जहागीरदार आणि इजारदार हे जमिनीचे राजे होऊन बसले होते. नागपूर-विभागांत मालगुजार पद्धति म्हणजे एक प्रकारें जमिनदारीची अधिक सावकारशाहीची दुसरी आवृत्ति होती. परंतु या दोन्ही विभागांतील दानप्राप्तीचे अनुभव उत्तेजक आहेत. कार्यकर्ते लहान असोत, मोठे असोत, मालगुजाराकडे किंवा वतनदाराकडे गेले असतां आणि योग्य रीतीनें विचार त्यांना समजावून सांगितला असतां त्यांना विन्मुख जावें लागलें नाहीं. अशा अनेक अनुभवांपैकीं नमुन्यादाखल कांहीं पुढें दिले आहेत :

यवतमाळ जिल्ह्यांत पांढरकवडे तालुक्यांतील पाटणबोरी गांवची गोष्ट आहे. केशवराव देशपांडे यांचेकडे श्री. तुकडोजी महाराज भूदान-कार्यकर्त्यांसह मुक्कामाला थांबले होते. केशवरावांनीं सहाव्या हिश्शाचें ४०० एकरांचें दानपत्र करून दिलें होतें. त्याच गांवांत केशवरावांचे धाकटे बंधु राहात असत. भावाभावांचें एकमेकांशीं पटत नव्हतें. त्यांच्याकडेहि जमीन मागितली पाहिजे म्हणून तुकडोजी महाराज कार्यकर्त्यांसह त्यांच्या घरीं गेले. दुपारीं १२ वाजण्याची ती वेळ होती. त्यांच्या घरीं गेल्यावर घरच्या लोकांनीं केशवरावांच्या बंधूंना तुकडोजी महाराज आल्याची वर्दी दिली. परंतु ते त्यावेळीं पूजेला बसलेले होते. म्हणून त्यांनीं निरोप पाठविला कीं "मी आतां भेटूं शकणार नाहीं, नंतर भेटेन." सर्वजण परत केशवरावांकडे आले. केशवराव व गांववाले म्हणूं लागले, "पहा, असा हा उर्मट मनुष्य आहे. साधें भेटायला देखील तयार नाहीं. हा मनुष्य कसला भेटणार आणि दान देणार ?"

दुपारीं चारची वेळ होती. सारे कार्यकर्ते त्या गांवांतून निघण्याच्या तयारींत होते. इतक्यांत ते केशवरावांचे बंधु, बरोबर दोन माणसांच्या डोक्यांवर वह्यांचा गठ्ठा घेऊन येत असल्याचें दिसलें. महाराजांच्या जवळ येवून त्यांनीं प्रश्न केला, "थोरल्या बंधूंनीं किती जमीन दिली आहे ?" भूदान कार्यकर्त्यांनीं माहिती दिली. त्यावर ते म्हणाले, "माझें ३९९ एकरांचें

दानपत्र करा. या माझ्या जमिनीच्या माहितीच्या वह्या आहेत. त्यांतून तुम्हांला सर्व माहिती देतों." त्यांनीं सर्वे नंबर इ. माहिती देऊन दानपत्र करून दिल्यावर ते गृहस्थ घरीं जाण्यास निघाले. जातेवेळीं त्यांनीं एक पाकीट कार्यकर्त्यांच्या समोर ठेवलें व ते निघून गेले. कार्यकर्त्यांनीं तें पाकीट उघडून पाहिलें तों त्यांत ५०० रुपयांची रक्कम साधनदानासाठीं त्यांनीं दिलेली आढळली. त्यांनीं दिलेल्या जमिनींसंबंधीं केशवरावांना आणि गांववाल्यांना शंका होती. दानपत्रांत नमूद केलेल्या सर्वेनंबरावरून केशवरावांनीं त्या जमिनीची स्थिति आपल्या कागदपत्रांच्या आधारें पाहून घेतांना आढळून आलें कीं त्यांनीं जें ३९९ एकरांचें दान दिलें होतें ती उत्तमांतली उत्तम जमीन आहे!

आणखी एक घटना.

श्री मामासाहेब जळके हे यवतमाळ जिल्ह्यांतीलच स्वतः जमीनदार असणारे व एका अज्ञान जमीनदाराच्या मालमत्तेची वहिवाट पाहणारे कारभारी होते. त्यांच्याकडून भूदान मिळविण्यासाठीं कार्यकर्त्यांचा मुक्काम त्यांचेकडे झाला. मामांनीं कांहीं आढेवेढे न घेतां ६०० एकरांचें दान लगेच लिहून दिलें. परंतु तेवढ्यानें त्यांच्याकडील अपेक्षित हिस्सा पुरा होत नव्हता. मामा अधिक विचार करण्यासाठीं घरांत गेले. थोड्या वेळानें बाहेर येऊन त्यांनीं सांगितलें "माझ्याकडील ६०० एकर जमीन दिली आहे ती घ्या आणि मी ज्या जमीनदारांची व्यवस्था पाहात आहे त्यांची ५०० एकर जमीन दान देत आहें. अशीं ११०० एकरांचीं दानपत्रें स्वीकारा." त्यांनीं पुढें सांगितलें, "दोन दिवसांनीं तुमचा मुक्काम जेथें असेल तेथें दोन हजार एकर जमीन भोंवतालच्या जमीनदारांकडून मिळवून तुम्हांला आणून देतों." मामांनीं आपल्या शब्दाप्रमाणें दोन दिवसांनंतर ठरलेल्या ठिकाणीं भूदान-कार्यकर्त्यांजवळ २२०० एकरांचीं दानपत्रें आणून दिलीं.

किसनसिंग नांवाच्या एका लहान जमीनदाराकडे भूदानाच्या दौऱ्यांत कार्यकर्ते गेले असतां किसनसिंग यांनीं त्यांना पाहतांच कोरें दानपत्र घेऊन त्यावर शंभर एकर दान लिहून दिलें. कार्यकर्त्यांना आश्चर्य वाटलें. कांहीं

न ऐकून घेतांच दान आपण कसें दिलेंत असें विचारतां ते म्हणाले, "मी शहरांत कांही दिवसापूर्वी माझ्या एका नातेवाईकाकडे गेलों होतों. तेथें 'सर्वोदय' मासिक पत्रिका सहजपणें हातीं आली. पत्रिका वाचल्यानंतर मला भूदान-विचाराची कल्पना आली. त्याचवेळीं मनोमन दान देण्याचें ठरवून टाकलें होतें."

भूदान-आंदोलनाच्या घडत गेलेल्या इतिहासाचें वाचन करीत असतांना कांहीं जीं नमुन्याचीं उदाहरणें आढळलीं तीं येथें नमूद केलीं आहेत. महाराष्ट्रांत एकूण जी १$\frac{3}{2}$ लाख एकर जमीन भूदानांत मिळाली आहे ती मिळत असतांना वेगवेगळ्या थरांतल्या वेगवेगळ्या लोकांकडून हीं दानें प्राप्त झालीं आहेत. त्याच्या मागच्या मानसिक प्रक्रियेची कल्पना एवढ्या उदाहरणांवरून येण्याजोगी आहे असें समजण्यास हरकत नाहीं. हीं दानें मिळविण्याचें काम स्त्रियांनीं केलें आहे, मुलांनीं केलें आहे. कित्येक ठिकाणीं शाळांतल्या आणि कॉलेजांतल्या मुलांनीं आणि मुलींनीं शिक्षकांच्या मदतीनें शहरांतून आणि खेड्यांपाड्यांतून विचार-प्रचाराचें आणि त्याचा परिणाम म्हणून भूमि-प्राप्तीचें काम मोठ्या हौसेनें केलें आहे. राष्ट्र-सेवादलाच्या भूदान-पथकानें जवळ-जवळ १ वर्षभर महाराष्ट्रांत पदयात्रा चालविली आणि अनेक दानें मिळविलीं. कस्तुरबा निधीच्या मुलीं कांहीं भागांत हिंडल्या, त्यांनींहि विचार-परिवर्तनाचें हें कार्य केलें आणि विचार-परिवर्तनाला थोरामोठ्यांची गरज आहे असें नाहीं हें त्यांच्या कामांतून सिद्ध होऊं शकलें. हरिजन-सेवक-संघाच्या सेवकांनींहि दानें मिळविलीं. राजकीय पक्षांतल्या कॉंग्रेसच्या आणि प्रजासमाजवादी पक्षाच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांनीं कित्येक वेळां दौरे काढले, पदयात्रा केल्या आणि हा विचार पटवून देण्याचा आणि दानें मिळविण्याचा प्रयत्न केला. जमीन मागतांना जमिनी ज्यांना दिल्या जातील त्यांना साधनें सुद्धां द्यावीं लागतील हें जाणून कित्येक महिला-संघटनांनीं व इतरांनीं साधनदानेंहि मिळविलीं.

भूमि-विषमतेच्या बाबतींत न्याय झाला पाहिजे हा विचार या काळाची नेमकी गरज आहे म्हणूनच भूदान-यज्ञामार्फत जमीन मिळविण्याच्या कामाला इतक्या थोडक्या काळांत इतक्या थोड्या साधनसामुग्री-

निशीं इतकें यश आलेलें दिसतें. या प्रयोगांत जें अपयश आलें असेल त्याचीहि तपासणी झाली पाहिजे. अपयश या अर्थानें कीं हा विचार सामाजिक दृष्टचा अयोग्य आहे, यांत नीति किंवा न्याय नाहीं असे विचार प्रत्युत्तर म्हणून जर कोणी प्रगट केले असतील आणि म्हणून जमीन दिली नसेल तर तींहि उदाहरणें लक्षांत घेतलीं पाहिजेत. पण असें बहुधा कोठेंहि झालेलें आढळत नाहीं. प्रचारकांना असा अनुभव आला कीं कांहीं गांवांमध्यें आपण आलों आहों असे समजतांच त्या गांवचे पुढारी, मोठे जमीन-मालक गांवांतून बाहेर गेले. त्यांनीं भेटण्याचें टाळलें, परन्तु याचा अर्थ एवढाच होतो कीं या विचाराला आणि युक्तिवादाला तोंड देण्याचें आपलें सामर्थ्य नसल्याचें त्यांनीं अप्रत्यक्षपणें मान्य केलें. या विचाराच्या प्रचारानें लोकांत जें वातावरण तयार होईल त्यायोगें आपल्याला जमीन द्यावीच लागेल, नाहींतर आपली अप्रतिष्ठा होईल असेच विचार या जमीन मालकांच्या मनांत आले असले पाहिजेत. आणि हा तर त्या विचाराच्या भरीवपणाचा जयच म्हटला पाहिजे. फक्त मालकांची मानसिक दुर्बलता यांतून प्रगट होते. याखेरीज प्रचाराचें अपयश म्हणून एकहि उदाहरण दिसून येत नाहीं.

---

# विभाग २ रा

## : १२ :

## वांटपाची पार्श्वभूमि

जमिनीचें न्यायाला धरून फेरवांटप करण्याच्या अनेक प्रयोगांपैकीं 'भूदान यज्ञ' हा एक प्रयोग आहे. या दृष्टीनें त्याच्याकडे पाहून आतांपर्यंत विवेचन केलें. हा प्रयोग करीत असतांना भूदानपत्रें जमलीं खरीं, परंतु शेवटीं ज्या भूमिहीनांच्याकरितां हा प्रयत्न झाला त्या भूमिहीनांच्या पदरांत खरोखर किती जमीन पडली यावरून त्या प्रयोगाच्या यशाचें मोजमाप करणें योग्य होईल. हा शेवटीं एक प्रयोगच असल्यामुळें किती भूमिहीनांना जमीन मिळाली हा त्याचा निकष नसून मिळालेल्या जमिनीपैकीं किती भाग उपयोगांत येण्यासारखा सिद्ध झाला तो त्याचा निकष धरला पाहिजे असें मला वाटतें. त्यावरून दात्याचें एकूण मानस-अनुकूल वा प्रतिकूल-प्रदर्शित होण्यासारखें आहे. या प्रयोगांत माणसांशीं संबंध होता. जर दानपत्रांतून मिळालेल्या जमिनीचा बराच मोठा भाग टाकाव असेल, शेती करण्यालायक नसेल, तर हृदय पालटण्याचा हा प्रयोग म्हणजे आत्मवंचना किंवा कल्पना-राज्य (utopia) ठरेल; पण उलटपक्षीं, बहुतांश जमीन उपजाऊ अशी आढळून आली, तर हा प्रयोग यशस्वितेच्या सदरांत घालण्याला हरकत येऊं नये.

ही दृष्टि पुढें ठेवून जमीन-वांटपाचें जें काम पश्चिम महाराष्ट्राच्या १२ जिल्ह्यांत झालें त्याचा तपशीलवार वृत्तांत येथें सादर केला आहे.

केवळ मनाला पटवून देऊन जमिनीसारख्या मूलभूत उत्पादन-साधनाची फेरवांटणी करणें कितपत शक्य आहे या संबंधींचा १९५२ते १९५७ या ६ वर्षांत भारतांत आणि त्यांतल्या त्यांत महाराष्ट्रांत झालेला

प्रयोग आंकडेवार व घटनावर आपण मागें पाहिला. पश्चिम महाराष्ट्राच्या बारा जिल्ह्यांपुरतें बोलायचें तर हा प्रयोग चालू असतां ८००१ दात्यांकडून दानपत्रें मिळालीं. त्यावेळीं आजच्याप्रमाणें संयुक्त महाराष्ट्र झालेला नव्हता आणि म्हणून रत्नागिरी ते जळगांव या बारा जिल्ह्यापुरतीच एक 'महाराष्ट्र प्रदेश भूदानयज्ञ समिति' या कामाकरितां श्री. विनोबाजींच्याकडून नियुक्त करण्यांत आली होती. या समितीनें तयार केलेल्या दानपत्राचा नमुना पुढें परिशिष्ट क्र. १ मध्यें दिला आहे.

प्रत्येक दात्याकडून दानपत्राच्या दोन दोन प्रती करून घेण्यांत येत असत. त्यांपैकीं एक प्रत भूदान समितीच्या कचेरींत राही व दुसरी त्या त्या जिल्ह्याच्या सरकारी महसूल-अधिकाऱ्याकडे पाठविली जाई.

या सर्व दानपत्रांतील मिळून प्राप्त झालेल्या जमिनीचा आंकडा ४१,१६३ एकर १४ गुंठे होता.

भूदान-समितीची या कामीं भूमिका मध्यस्थाची होती, कारण दात्याकडून आलेली जमीन भूमिहीनांचीच मानलेली होती, फक्त योग्य भूमिहीन कोण हें शोधीपर्यंत समितीकडे ती राही. अशी निवड होईपर्यंत त्या जमिनीची वहिवाट मूळ दात्याकडेच राहात असे. दात्यानें स्वतःला त्या जमिनीचा विश्वस्त मानून तिच्यावरचा सरकारी सारा व खर्च वजा करून जें निव्वळ उत्पन्न राहील तें भूदान समितीकडे पाठवावें अशी योजना होती. प्राप्त झालेली जमीन त्या गांवच्या भूमिहीनांना शक्य तेवढ्या लवकर वांटली जावी असा भूदान समितीचा प्रयत्न होता. पण जमीन जशी जशी मिळत गेली तसें तसें वांटपाचें काम गुंतागुंतीचें आहे हें लक्षांत येऊं लागलें. तें तडकाफडकीं होणें शक्य नव्हतें. भूमिहीनांकरितां एकवेळ भूदानांत जमीन मिळविणें सोपें, तिचें योग्य वांटप करणें हें जिकीरीचें व कष्टाचें काम आहे. पदयात्रेंत जमिनीचें दान मिळे, पण एक-दोन आठवड्यांच्या मुदतींत तिचें वांटप करून टाकण्यासाठीं कार्यकर्त्यांचें स्वतंत्र दल योजावें ही कल्पना प्रथम कोणाला आली नाहीं. वांटपाचें काम दुय्यम समजलें गेलें. गांवकरी वा दाते पुढाकार घेऊन तें आपोआप करूं शकतील अशी अपेक्षा होती, पण तसेंहि झालें नाहीं. त्यामुळें प्राप्त

जमिनीचा आंकडा वाढत गेला व वांटप मागें राहात गेलें. जमिनीचें वांटप मागें राहिल्यामुळें किती अडचणी निर्माण होणार व भूदानाच्या कार्यांत वैगुण्य येणार आहे याची आरंभीं नीटशी कल्पना आली नसावी. नाहींतर चार पांच लाख एकर जमीन प्राप्त झाल्यानंतर असा सहज नियम बनवितां आला असता कीं पुढें प्रत्यक्ष वांटप झाल्यानंतरच दान म्हणून मिळालेली जमिनीची संख्या जाहीर करण्यांत यावी. बिहारमध्यें हजारो एकर जमीन भूदानांत मिळाल्यामुळें जमिनीची तत्काळ शहानिशा देखील करतां आली नाहीं. ती जमीन कुठें आहे, कोणाच्या नांवावर आहे वगैरे तपशील तपासून घेतला गेला नाहीं, वांटप फार मोठ्या प्रमाणांत मागें पडलें व प्राप्त झालेल्या जमिनीचें आणि वांटप केलेल्या जमिनीचें प्रमाण फार विषम बनलें. तो एक टीकेचाहि विषय झाला.

वांटप करण्यापूर्वी दात्याचा मालकीहक्क कायदेशीर आहे कीं नाहीं हें तपासणें, जमिनीची पाहणी करणें, गांवच्या लोकांना माहिती देऊन जाहीर रीत्या वांटपाची सभा घेणें, हीं कामें तत्काळ होऊं शकत नाहींत. पुष्कळशा जमिनी एकाहून अनेक गांवांत विखुरलेल्या असतात, एकाच गांवांत असल्या तरी गांवापासून दूर असतात; एकूण दानाचा आंकडा मोठा असला तरी जमिनी लहान लहान तुकड्यांत असतात. आणि मालकानें दान दिलेलें असलें तरी कोठें प्रत्यक्ष कुळाचा कब्जा असतो. कुळाला स्वतःच्या मालकीची जमीन आहे का, किती आहे हें पहावें लागतें. त्याला स्वतःची जमीन नसतेच असें नाहीं. कांहीं कुळांची तर स्वतःची जमीन बरीच मोठी असते. त्यांना समजावून द्यावें लागतें. वरील सर्व गोष्टींची तपासणी, पाहणी, आणि नंतर वांटणी करण्याला दिवसच्या दिवस जाऊं शकतात.

भूदानाच्या मोहिमेंत १९५९ अखेरपर्यंत महाराष्ट्रांत ८००१ दानपत्रें मिळालीं. इतक्या साऱ्या जमिनीची शहानिशा करणें हें पहिलें काम होतें. या दानपत्रांतून जी जमीन भूदान-समितीकडे आली तिचें जिल्हावार आंकडे पुढील प्रमाणें :

| जिल्ह्याचें नांव | | भूदाते | | भूदान क्षेत्र एकर गुंठे |
|---|---|---|---|---|
| (१) पुणें | — | ३१० | — | ५८४-१० |
| (२) अहमदनगर | — | १८१ | — | ८१७-३५ |
| (३) सोलापुर | — | ३५२ | — | १२१९-१० |
| (४) सातारा | — | ८५८ | — | ३१६४-११ |
| (५) सांगली | — | १३२ | — | ११७१-३१ |
| (६) कोल्हापूर | — | ४५५ | — | १२६४-३७ |
| (७) रत्नागिरी | — | ९२१ | — | ५५९९-०७ |
| (८) कुलाबा | — | ५३२ | — | ३७३८-१२ |
| (९) ठाणें | — | ५०७ | — | ६८८७-१३ |
| (१०) नाशिक | — | ७०२ | — | ३५८०-२४ |
| (११) धुळें | — | १९४३ | — | ८७२९-३६ |
| (१२) जळगांव | — | ११०९ | — | ४४०५-०८ |
| | | ८००१ | | ४११६३-१४ |

महाराष्ट्रांत १२ जिल्ह्यांतील १४६ तालुक्यांपैकीं १४१ तालुक्यांतून २८२५ गांवांत ८००१ दात्यांकडून ४११६१-१४ एकर जमीन भूदान-यज्ञामध्यें मिळाली.

या १२ जिल्ह्यांत सर्वांत जास्त जमीन धुळें जिल्ह्यांत मिळाली आहे. तेथल्या भूदान-जमिनीचें प्रमाण एकूण भूदानाशीं २१%टक्के पडतें. त्याच्या खालोखाल १६.८ टक्के जमीन ठाणे जिल्ह्यांत मिळाली आहे. तिसरा नंबर रत्नागिरीचा लागतो. प्राप्त झालेली जमीन वांटून देण्याच्या कामाला जरी १९५४ मध्यें सुरुवात झाली होती तरी १९५८ साल अखेरपर्यंत जितक्या वेगानें तें काम होणें अवश्य होतें तितक्या वेगानें तें होऊं शकलें नाहीं. त्या मुदतीपर्यंत साधारणतः ६-६॥ हजार एकर जमीन वांटली गेली होती. बहुतेक जिल्ह्यांमधून या कामाकरिता खास कार्यकर्ता नसल्यामुळें या कामाला सुरुवातहि झाली नव्हती. जवळ जवळ ३५ हजार एकरांचें काम शिल्लक पडलें होतें. जमिनीसंबंधींच्या तक्रारी आणि अडचणी उत्पन्न

झाल्या होत्या. कारण कूळकायद्याची आणि तुकडेबंदी व तुकडेजोड कायद्यांची अंमलबजावणी यावेळीं सरकारतर्फे सुरू झालेली होती.

१९५९ च्या एप्रिलमध्यें जमीन-वांटपाचें काम महाराष्ट्र प्रदेश भूदान-यज्ञ समितीच्या वतीनें माझ्याकडे सर्वस्वीं सोपविण्यांत आलें आणि ठिकठिकाणच्या भूदान कार्यकर्त्यांनीं तसेंच विधायक संस्थांच्या आणि राजकीय संस्थांच्या कार्यकर्त्यांनीं आपल्या सहकार्याचें मला आश्वासन दिलें. एप्रिल १९५९ ते जून १९६० पर्यंत सतत १५ महिने हें काम करावें लागलें. एकेक जिल्हा पुरा करीत तें संपविलें. आरंभ नाशिक जिल्ह्यापासून केला आणि शेवट रत्नागिरी जिल्ह्यांत झाला.

हें काम करतांना माझी भूमिका एका अभ्यासू विद्यार्थ्याची होती. 'भूमिदान-यज्ञाचें' कार्य या देशांत गेलीं कित्येक वर्षे चाललें आहे त्याचा परिणाम शेत्रटीं काय हें विद्यार्थ्याच्या व जिज्ञासूच्या नजरेनें मला पहायचें होतें. ती संधीच एकप्रकारें या कामानें माझ्यापुढें चालून आली.

जमिनीचें हस्तांतर व्हावयाचें तर सरकारी रीत्या कायदेशीर तरतूद होणें अवश्य असतें. त्यावेळच्या मुंबई सरकारनें सहानुभूतिपूर्वक अगोदरच अशी तरतूद करून ठेवली होती. भारतांत निरनिराळ्या राज्यांत भूदानांत मिळालेली जमीन धारण करणें आणि तिचें वांटप करणें हें काम पार पाडण्याकरितां कायदेशीर भूदान-मंडळें (Statutory Bhoodan Boards) निर्माण करण्यांत आलीं आहेत. मुंबई राज्यांत तसें मंडळ निर्माण करण्याची मुंबई सरकारची तयारी होती. परंतु महाराष्ट्र व गुजरात भूदान-समित्यांच्या विचारानें बोर्ड निर्माण करण्याचा विचार रद्द करण्यांत आला आणि पुढील प्रमाणें सरकारनें आपल्या महसूल-अधिकाऱ्यांना या बाबतींत 'आज्ञापत्र' (G. R.) काढलें :

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...33४९८... दि: ...
क्रमांक ...1२14... नों: दि: ... 7४-10-८२

**Bhoodan Movement,**
Removal of certain difficulties
in the way of......

## GOVERNMENT OF BOMBAY,
**Revenue Department**
Circular Memorandum No. BEY. 1055

Sachivalaya, 22nd July 1955.

## CIRCULAR MEMORANDUM OF GOVERNMENT.

Government is pleased to issue the following instructions in connection with Bhoodan Yagna Movement sponsored by Acharya Vinoba Bhave.

(a) The Bhooan Samiti recognised by Acharya Vinoba or the Sarva Sava Sangh will send to the Mamlatdar / Mahalkari a list of lands gifted to it along with the original Danapatra" ( gift-deed ) and the statement of persons to whom a particular land has been granted by the Samiti with full description thereof;

(b) On receipt of the documents referred to at (a) above, the Mamlatdar /Mahalkari should himself or through his subordinate Revenue Officers ascertain the validity or otherwise of the "Danapatra" and should cause necessary entries to be made in the Record of Rights as under :-

On receipt of intimation of the 'Danapatra' from the Bhoodan Samiti, the village officers should make an entry in village form VI entering the name of the person to whom the land has been donated by the Samiti. The Record of Rights enquiry should then be held in the normal course. The Mamlatdar /Mahalkari should, however, certify the entry himself after local enquiry. When the entry is

certified final change in village Form VII should be made. In both, in the entry in village Form VI and under "other rights" column in Village Form VII, the fact that Bhoodan Samiti is interested should be noted.

(c) In case the Mamlatdar / Mahalkari finds that the "Danapatra" or the Statement is incomplete requiring some more details, he should return it to the Bhoodan Samiti along with the memorandum containing points or details or lacuna which are required to be elaborated or filled in and on receipt of full information from the Samiti, the Mamlatdar / Mahalkari should proceed further as indicated under (b) above.

2. It may be noted that the Revenue Officers are not concerned with the validity or otherwise of the transactions as a result of Bhoodan Movement. They are concerned only with the position that in virtue of certain transfers, possession has changed hands and they have to give effect to it in the Village records.

3. The necessary notification exempting from stamp duty retrospectively and prespectively the instruments evidencing transfers of lands in favour of or by the Bhoodan Samiti or the Sarva Seva Sangh is being published in Part–IV–A– of the **Bombay Government Gazette.**

4. Government is also pleased to direct that the fees for measuring land at the instance of the Bhoodan Samiti should be recovered from the person to whom the land is given by the samiti.

By order and in the name of the Governor of Bombay.

**P. N. Ambegaonkar,**

Assistant Secretary to Government.

[अनुवाद:-

खालील आज्ञा मुंबई सरकारच्या महसूल खात्यानें आपल्या अधिकाऱ्यांना सर्क्युलर मेमो नं BEY १०५५ ने ता. २२ जुलै १९५५ रोजीं दिली आहे :

आचार्य विनोबा भावे यांनीं पुरस्कारलेल्या भूदान-यज्ञ-आंदोलनाच्या बाबतींत सरकार खालील प्रमाणें आज्ञा देत आहे :

१.(अ) आचार्य विनोबा भावे यांनीं अथवा सर्व-सेवा-संघानें मान्य केलेली भूदान समिति दानांत मिळालेल्या जमिनींची यादी मूळच्या दान-पत्रांसह व त्या जमिनी ज्या कोणाला दिलेल्या असतील त्यासंबंधींच्या संपूर्ण माहितींसह मामलेदाराकडे / महालकऱ्याकडे पाठवील.

(ब) 'अ' मध्यें नमूद केलेले कागदपत्र मिळाल्यानंतर मामलेदारानें / महालकऱ्यानें स्वत: अथवा आपल्या कनिष्ठ महसूल-अधिकाऱ्यामार्फत दानपत्र खरेंखुरें आहे कीं नाहीं (Validity or other wise) या संबंधींची खात्री करून घ्यावी आणि हक्कनोंदणी (Record of Rights) पत्रकांत अवश्य त्या नोंदी खालीलप्रमाणें करावयास लावाव्या :-

भूदान-समितीकडून दानपत्राची सूचना मिळतांच गांव-कामगारांनीं गांवगाडा पत्रक नं. ६ मध्यें (किंवा पत्रक ड मध्यें) समितीनें ज्या इसमास जमीन दिली असेल त्याचें नांव नोंद करावें. मग हक्कनोंदणीची चौकशी नेहमींच्या पद्धतीनें करावी. मात्र मामलेदारानें / महालकऱ्यानें अशा स्थानिक चौकशीनंतर ही नोंद खरी म्हणून स्वत: मंजूर करावी. ही मंजुरी दिल्या-नंतर गांवगाडा पत्रक नं. ७ मध्यें शेवटचा फेरफार करावा. गांवगाडा पत्रक नं. ६ मध्यें व पत्रक नं. ७ मधील 'इतर हक्क' या सदराखालीं भूदान-समितीशीं या जमिनीचा संबंध असल्याचें नोंद करून ठेवावें.

(क) मामलेदारास / महालकऱ्यास दानपत्र किंवा माहितीपत्रक अपुरें आहे व अधिक तपशिलाची गरज आहे असें वाटलें तर तें त्यांनीं परत भूदान-समितीकडे पाठवावें व सोबत कोणत्या तपशीलाची कमतरता आहे तें जाणवून देणारें पत्र लिहावें. अशी पूर्ण माहिती समितीकडून

आली म्हणजे मामलेदार / महालकरी यानें वर (ब) मध्यें सांगितल्याप्रमाणें पुढच्या कामाला लागावें.

२ भूदान आंदोलनामुळें घडून आलेल्या व्यवहाराच्या खरेखोटेपणाशीं (Validity or other wise) महसूल-अधिकाऱ्यांचा कांहींहि संबंध नाहीं. हक्काच्या कांहीं बदलामुळें जमिनीचा ताबा एकाच्या हातून दुसऱ्याकडे गेला आहे आणि आपल्याला गांवाच्या दप्तरांत त्याची नोंद करून ठेवावयाची आहे एवढ्यापुरताच त्यांचा संबंध आहे.

३ भूदान-समितीकडून किंवा सर्वसेवा-संघाकडून अथवा त्यांच्यापैकीं कोणाहि करितां मागें झालेल्या किंवा पुढें होणाऱ्या जमिनीच्या अदलाबदलीच्या कागदपत्रांना स्टँप-ड्यूटींतून मुक्त करण्यांत आल्याचें मुंबई-सरकारच्या भाग ४–अ या गॅझेटांत प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

४ वांटलेल्या जमिनीची भूदान-समितीच्या सूचनेवरून जर मोजणी झाली तर मोजणीची फी ज्या इसमाला जमीन दिली आहे त्याच्याकडून वसूल करावी.

पी. एन्. आंबेगांवकर,
असि. सेक्रेटरी टु गव्हर्नमेंट ]

## टिपणी

वर दिलेल्या हुकुमाचा पुरता खुलासा करून घ्यावा म्हणून महाराष्ट्र प्रदेश भूदान यज्ञ समितीचे कार्यवाह श्री. भाऊ धर्माधिकारी हे त्यावेळचे महसूल मंत्री श्री. भाऊसाहेब हिरे यांना भेटले होते. त्यांच्याकडून जो लेखी खुलासा झाला तो पुढीलप्रमाणें :–

"१. हुकुमांतील पहिल्या परिच्छेदांत येणारा 'दानपत्राचा खरेखोटेपणा' (Validity or otherwise) हा शब्दप्रयोग दानपत्र करण्याचा कायदेशीर हक्क व त्या बाबतींत कायद्यानें करावयाच्या रीतसर गोष्टी यांस अनुलक्षून वापरण्यांत आला आहे. महसूल अधिकाऱ्यांचा संबंध या कायदेशीर व्यवहाराशीं नसून तो फक्त या बाबतींतील अधिकृत ताब्यापुरता आहे.

२. ज्या कोणास जमीन दान करण्यांत आली असेल त्यानें दानपत्रांतील शर्तींचा भंग केल्यास ती जमीन दंडादाखल जप्त होण्यास पात्र

ठरेल. सरकार ती जमीन जप्त करून भूदान-समितीकडे मूळ अटीअनुसार विल्हेवाट लावण्यासाठीं परत करील.

३. या कामीं राज्य सरकारनें मान्यता दिलेल्या एखाद्या भूदान-समितीच्या नांवें किंवा अशा समितीनें इतर कुणाच्या नावें ज्या जमिनी करून दिल्या असतील अशा जमिनींना कूळ कायद्याचा अंमल लागू होणार नाहीं. तथापि कुळांना आपल्या कूळ-वहिवाटीचे हक्क दान करून देतां येतील अशी कोणतीहि तरतूद करण्यांत आलेली नाहीं.

४. हक्क नोंदणीच्या ( Record of Rights ) कामाच्या बाबतींत सरकार नोंदणीची (रजिस्ट्रेशनची) सक्ती करणार नाहीं. रीतसर नोंदणी करून दिवाणी कायद्याखालीं आपले हक्क अबाधित राखणें हें अशा बाबतींत संबंधित पक्षाच्या हिताचें असतें. मालमत्ता तबदील करण्याबाबत अधिनियम व भारताच्या नोंदणी (रजिस्ट्रेशन) बाबत अधिनियम या अन्वयें अशा सर्व दानपत्रांची नोंदणी फी ही केलेल्या कामाबद्दलची फी असल्यामुळें ती माफ करतां येत नाहीं याबद्दल सरकारला दिलगिरी वाटते.''

सरकारनें केलेली दुसरी एक मदत म्हणजे १९५७ च्या सुधारलेल्या कूळकायद्यांत ८८ (अ) या कलमान्वयें भूदानांत मिळालेली जमीन कूळ-कायद्याच्या अमलांतून मुक्त ठेवली ही होय.*

या राज्यांत 'तुकडेबंदी' कायदा झाला आहे. त्या अनुसार जमिनीचा तुकडा विशिष्ट मर्यादेपेक्षां कमी पाडणें गुन्हा मानला आहे. आणि जेथें असा तुकडा पाडण्यांत आलेला आढळेल तेथें २०० रुपये दंडाची शिक्षा ठेवण्यांत आली आहे. या कायद्यानंतरहि भूदान-समितीकडे लहान लहान तुकड्यांचीं दानपत्रें आलीं. 'तुकडेबंदी' कायद्याबरोबरच तुकडेजोडीसंबंधीं कायदा करून त्याप्रमाणें जिल्ह्या-जिल्ह्यांतून तुकडे जोडण्याचें काम यावेळीं सरकारनें चालू केलें होतें. हें काम करतांना जेथें जेथें भूदानांत मिळालेले तुकडे असतील तेथें त्या तुकड्यांना प्राधान्य द्यावें आणि ज्यांनीं दान केलें

* (कलम ८८ अ.-राज्य सरकारनें या बाबत मान्यता दिलेल्या भूदान-समितीकडे हस्तांतरित केलेल्या किंवा तिनें हस्तांतरित केलेल्या जमिनीस कायद्यांतील उपबंधांपैकीं कोणताहि उपबंध लागू असणार नाहीं.)

आहे त्यांना दंड माफ करावा अशा प्रकारची तिसरी सवलत सरकारनें भूदान तुकड्यांतील जमिनीच्या बाबतींत दिली आहे.

वांटप करतांना फारसा विचार न करतां किंवा चौकशी न करतां जमीन वांटून टाकावी तर तें वांटप न्याय्यच होईल हें सांगतां येत नाहीं. शिवाय भूदानाचा विचार लक्षांत घेऊन ज्या हेतूनें जमिनीचें दान करावें असा विचार दात्याच्या मनांत आला तो हेतु म्हणजे गांवांतल्या योग्य भूमिहीनालाच ती जमीन मिळावी हा. त्यामुळें आणि गांवांत उचापती करणारे विपरीत वृत्तीचे कांहीं लोक वरचढ असतात त्यांच्या ढवळा-ढवळीमुळें किंवा दडपणामुळें जमीन खऱ्या भूमिहीनालाच जाईल असें पुष्कळ वेळां घडून येत नाहीं. हा धोका टळावा म्हणून विनोबाजींनींच एक अत्यंत सुंदर, निःपक्षपाती, प्रत्यक्ष लोकशाहीची जमीन-वांटपाची पद्धत घालून दिली आहे. त्यायोगें सरळ भूमिहीनाकडेच जमीन जाते. ती पद्धत पुढील प्रमाणें:—

## वांटप-पद्धति

(१) ज्या गांवीं जमीन वांटायची त्या गांवाकरितां तारीख निश्चित करून त्या अगोदर ७ दिवस व खुद्द त्या दिवशीं ठरलेल्या वेळीं व ठरलेल्या ठिकाणीं जमीन-वांटपाकरितां सभा भरणार असल्याची दवंडी गांवांत दिली जावी. हरिजनवाड्यांसह घरोघर ही गोष्ट कळविण्याची खबरदारी घ्यावी.

(२) जमीन कोणाला वांटायची हा अधिकार कोणाहि व्यक्तीला नाहीं. वांटप हें गांवाच्या ग्रामसभेंत पुढील दिलेल्या पद्धति-अनुसारच व्हावयाचें असतें:—

(अ) सभेंत प्रथम योग्य व्यक्तींनीं भूदान यज्ञाचा हेतु, वांटपाची रीत ही समजावून द्यावी. शेंवटीं सारी जमीन गांवाची व्हावयाची हें उद्दिष्ट असल्याचें समजावून सांगावें;

(आ) त्यानंतर गांवांत आतांपर्यंत मिळालेली जमीन कोणती व किती भूमिहीन कुटुंबांत वांटतां येण्याजोगी आहे हें सर्वांना समजावून सांगावें,

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ३३५६ विः निव६
१२९५५ नों. दि. १५-१०-

(इ) त्यानंतर गांवच्या ग्रामसभेंत भूमिहीन शेतकऱ्यांची निवड करावी. भूमिहीन शेतकरी म्हणजे ज्याला जमीन कसतां येते पण ज्याच्या-जवळ स्वतःची किंवा कूळहक्काची जमीन मुळींच नाहीं आणि ज्याला अन्य उपजीविकेचें कसलेंहि साधन नाहीं असा पुरुष किंवा स्त्री.

(ई) पण जर भूमिहीन कुटुंबें अधिक आणि मिळालेली जमीन कमी अशी स्थिति असेल तर भूमिहीनांनाच आपसांत जास्त गरजू कोण हें ठरविण्यास सांगावें. या कामीं कोणत्याहि प्रकारचें दडपण येणार नाहीं याची खबरदारी घ्यावी. कोणत्याहि कारणास्तव भूमिहीनांना आपसांत निर्णय करतां आला नाहीं तर चिठ्या टाकून निर्णय घ्यावा.

(उ) शक्य तों ज्या दात्यानें जमीन दिली आहे त्याच्या मार्फतच हा वांटपाचा कार्यक्रम पार पडेल असा प्रयत्न अगोदर व्हावा. दाता वांटप करूं शकत नसेल तर कार्यकर्त्यांनीं वांटपाचा कार्यक्रम घडवून आणावा.

(ऊ) वितरण करतांना मिळालेल्या जमिनीचा $\frac{१}{३}$ वांटा तरी हरिजन कुटुंबांना द्यावा.

विनोबांनीं घालून दिलेल्या वरील पद्धतीप्रमाणें वांटप करतांना भूदान-यज्ञ समितीनें त्या बाबतींत एक धोरण ठरविलें होतें; तें पुढील प्रमाणें--

(१) दानांत मिळालेली जमीन त्याच गांवांतील भूमिहीनांकरितां मानावी. सदर गांवांत भूमिहीन कोणी नसेल, पण अपुरी जमीनवाले असतील तर त्यांना ती मिळावी. दोन्ही नसतील तर लगतच्या गांवांतील भूमिहीनाला जमीन देतां येईल.

(२) वांटावयाची जमीन ज्या गांवांत आहे त्या गांवांतील भूमिहीन कुटुंबांची माणसागणिक संख्या नमूद करून घेतली जावी.

(३) या यादींत भूमिहीन व उपजीविकेचें इतर साधन नसणारे बेकार अशांचा समावेश होईल हें नीट पहावें.

(४) दात्यांनीं दान केलेली जमीन जर कुळाकडे लावलेली असेल आणि तें कूळ स्वतः भूमिहीन असेल किंवा फारच अल्प जमीनवालें असेल तर ती जमीन त्याला भूमिहीन समजून त्यालाच अगोदर दिली जावी.

(५) जमिनीवर कूळ असून त्या कुळाची स्वतःची पुरेशी जमीन असूनहि भूदानांतील जमीन सोडण्याची त्याची तयारी नसेल तर, कूळ-कायद्यांतील कूळहक्काचीं कलमें भूदानांतील जमिनीला लागू होत नाहींत हें कुळाला समजावून सांगून ती जमीन भूमिहीनाकडे कशी जाऊं शकते हें त्याला सांगावें आणि तसा प्रयत्न करावा. मात्र त्या जमिनीच्या कबजामुळें भूमिहीन व कूळ यांच्यांत कटुता व संघर्ष वाढू नये एवढी खबरदारी घ्यावी .

ज्याला जमीन वांटण्यांत आली त्याला विनोबाजींच्या तर्फे भूदान समितीकडून एक 'जमीन वांटणी प्रमाणपत्र' दिलें जातें. हेतु असा कीं ती जमीन त्याची झाली याचा कागदी पुरावा त्याच्याकडे असावा. नंतर या प्रमाणपत्राची एक नक्कल व दात्याचें मूळ दानपत्र, जर तें अगोदर महसूल अधिकाऱ्याकडे पाठविलें नसेल तर, अशीं दोन्ही महसूल-अधिकाऱ्याकडे पाठवून दिलीं जातात. सरकारी दप्तरांत भूमिहीनाचें त्या जमिनीच्या खात्याला नांव लागतें आणि 'इतर हक्कां'च्या पत्रकांत भूदान-समितीचें नांव लागतें. मात्र, ही जमीन त्याला कांहीं शर्तींवर मिळते. त्या शर्ती त्या वांटप प्रमाण-पत्रांतच नमूद केलेल्या असतात. व त्या कबूल असल्याबद्दल नव्या खातेदाराची कबूली सहीच्या रूपानें घेतली जाते. 'जमीन-वांटणी-प्रमाणपत्र' परिशिष्ट क्र. २ मध्यें दिलें आहे.

दानामध्यें मिळालेल्या जमिनींपैकीं शेतीच्या दृष्टीनें निरुपयोगी असलेल्या जमिनींच्या दानपत्रांच्या बाबतींत विल्हेवाट लावण्याचें कामहि भूदान समितीनें वांटपाच्या कामाबरोबरच मजवर सोंपविलें. पण त्या संबंधींचें निश्चित धोरण प्रथम ठरविण्यांत आलें नव्हतें. तें नंतर अनुभवानें ठरवावें लागलें. तें धोरण पुढीलप्रमाणें :

(१) दानांत मिळालेल्या जमिनीचें क्षेत्र ८–१० गुंठे किंवा त्याहून कमी असेल, म्हणजे ती जमीन कसून उदरनिर्वाह करणें शक्य नसेल तर दात्याकडून अधिक जमीन मिळवून तो तुकडा पुरेसा मोठा करावा. तसें न जमलें तर तो तुकडा दात्याकडेच राहूं द्यावा. त्यानें त्याची लागवड करावी व त्यांतून खर्च वजा जातां जें निव्वळ उत्पन्न राहील तें महाराष्ट्र-सर्वोदय-मंडळाकडे पाठवावें.

(२) भूदानांत मिळालेल्या फार लहान तुकड्याशेजारीं लागूनच असाच लहान तुकडा धारण करणारा लहान जमीन मालक-असेल तर तो तुकडा गांवाच्या संमतीनें मूळ अटींवर त्याला द्यावा.

(३) दानांत मिळालेली जमीन पहाणीनंतर कसणूक करण्याच्या लायकीची नाहीं असें आढळून आलें तर ती जमीन दात्याला जाहीर रीत्या (सभेंत) परत करण्यांत यावी, व अशा रीतीनें त्याचें दानपत्र निकालांत काढावें. (दानपत्र परत देण्यापूर्वीं त्या जमिनीचा अन्य कांहीं उपयोग होऊं शकतो का याचा विचार केला जावा. )

(४) दानांत जमीन दिली होती परंतु चुकीनें किंवा इतर कारणांनीं विकली गेलेली असेल किंवा गहाण इत्यादि रीतीनें दुसऱ्याच्या ताब्यांत गेली असेल तर त्या जमिनीच्या ऐवजीं दुसरी तशाच तोलाची किंवा त्याहून जास्त तोलाची जमीन दात्यानें भूदान-यज्ञांत द्यावी असा प्रयत्न व्हावा. जर तें शक्य होत नाहीं असें आढळून आलें तर तें दानपत्र गांवाची सभा बोलावून दात्याला परत करण्यांत यावें.

प्रत्यक्ष वांटपाचें काम करतांना पुढील अडचणी आल्या :

(१) कांहीं ठिकाणीं दानांतील जमीन मिराशी-हक्कानें दुसऱ्याकडे असलेली आढळून आली,

(२) एकसाली हक्कानें सरकारकडून घेतलेल्या जमिनीचा हक्क कांहींनीं दुसऱ्या भूमिहीनांसाठीं दानपत्रानें दिला होता,

(३) कांहीं ठिकाणीं आपला दानाचा बेत बदलल्याचें दात्यानें सांगितलें.

(४) दानांत दिलेल्या कांहीं जमिनींची मालकी दात्यांची नसल्याचें आढळून आलें.

अशा अनपेक्षित घटनांसंबंधीं त्या त्या वेळीं निर्णय घेऊन दानपत्रें निकालांत काढण्याचा अधिकार मला देण्यांत आला.

पश्चिम महाराष्ट्रांतील बारा जिल्ह्यांत मिळालेल्या जमिनींच्या वांटपाचा हा प्रयत्न पुढें सविस्तरपणें मांडलेला आहे. एकूण दानांतील जमिनींपैकीं जवळ जवळ ६५ टक्के जमीन वांटण्यासारखी म्हणजे शेती-

योग्य मिळाली. राहिलेली ३५ टक्के जमीन ही मागें वर्णिल्याप्रमाणें तुकड्यांमधून, खराब स्वरूपांत, मालकी नाहीं वगैरे कारणांनीं वाटतां न येण्यासारखी असल्यामुळें अशा जमिनींच्या दानपत्रांचा निर्णय घेऊन व त्याप्रमाणें त्यांची व्यवस्था करून ती निकालीं काढण्यांत आली.

वांटप केलेल्या जमिनींचे आंकडे, तसेच वांटतां न आलेल्या जमिनींचे तपशीलवार आंकडे पुढें दिले आहेत. भूदान समितीला जीं एकूण दानपत्रें मिळालीं त्या दानपत्रांतून मिळालेल्या जमिनींचाच हा एकूण तपशील आहे.

एकूण भूदान-प्राप्ति ४१,१६३ एकर १४ गुंठे. दाते (दानपत्रें) ८००१

| | | | प्राप्त क्षेत्राशीं शें. प्रमाण |
|---|---|---|---|
| (I) वांटलेलें एकूण क्षेत्र | | २६६२४-१८ | ६४.५ |
| (१) प्रत्यक्ष वांटप क्षेत्र | २६२०७-३७ | | |
| (२) ग्रामदानांत गेलेलें क्षेत्र | ४१६-२१ | | |
| एकूण | २६६२४-१८ | | |
| (II) वांटप न झालेलें क्षेत्र | | १४५३८-३६ | ३५.५ |
| –(१) तुकड्यांतील क्षेत्र | १६७७-२० | | ४.० |
| –(२) खराब क्षेत्र | ४८३५-२८ | | १२.० |
| –(३) मिराशी हक्काचें क्षेत्र | ८००-०६ | | २.० |
| –(४) एकसाली हक्काचें क्षेत्र | १५७०-३५ | | ४.० |
| –(५) विक्रीचें क्षेत्र | ४०३-२० | | १.० |
| –(६) दान मागें घेतल्याचें क्षेत्र | २०६४-०३ | | ५.० |
| –(७) कायदेशीर मालकी नसल्याचें क्षेत्र | २१३७-१२ | | ५.० |
| –(८) चौकशी चालू असलेलें क्षेत्र | १०४९-३२ | | २.५ |
| एकूण | १४५३८-३६ | | |
| | एकूण क्षेत्र | ४१,१६३-१४ | |

: १३ :

# भूमिवितरण-चिकित्सा : १

## (१) वांटपाचें स्वरूप

पश्चिम महाराष्ट्रांत १४६ तालुके आहेत. गांवांची एकूण संख्या १५९०० आहे. जमीन मिळाली त्या तालुक्यांची आणि त्यांतील गांवांची संख्या, तसेंच जमीन जेथें वांटली त्या तालुक्यांची व गांवांची संख्या खालील तक्त्यांत एकत्र दिली आहे. त्यावरून भूदानाच्या क्षेत्राची कल्पना येण्याला मदत होईल.

| | | जिल्ह्यांतील तालुके | | | जिल्ह्यांतील गांवें | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | जिल्हा | एकूण तालुके | दान मिळालेले तालुके | वांटप झालेले तालुके | एकूण गांवें | भूदान झालेलीं गांवें | भूवांटप झालेलीं गांवें. |
| १. | पुणें | १३ | १२ | ११ | १५११ | १२३ | ५३ |
| २. | अहमदनगर | १३ | १३ | १२ | १३१९ | ११५ | ५१ |
| ३. | सोलापूर | ११ | ११ | ११ | ९३४ | १४२ | ९० |
| ४. | सातारा | ११ | ११ | ११ | ११५२ | १९२ | ७९ |
| ५. | सांगली | ८ | ८ | ७ | ५०२ | ६६ | ४४ |
| ६. | कोल्हापूर | १२ | ११ | १० | ९४८ | १४२ | ५५ |
| ७. | रत्नागिरी | १५ | १५ | १५ | १५१५ | ३९० | २२० |
| ८. | कुलाबा | १४ | १३ | १३ | १७७६ | २४८ | १५४ |
| ९. | ठाणें | १३ | १२ | १२ | १६६५ | ३०० | १९१ |
| १०. | नाशिक | १३ | १३ | १३ | १६५३ | २७० | १७५ |
| ११. | धुळे | १० | ९ | ९ | १५०१ | ३९३ | २१३ |
| १२. | जळगांव | १३ | १३ | १३ | १४२४ | ४४४ | २१५ |
| | | १४६ | १४१ | १३७ | १५९०० | २८२५ | १५४० |
| | | | | शेंकडा प्रमाण— | | १७.४ ट. | ५४ टक्के |

वरील तक्त्यावरून असें दिसून येतें कीं, एकूण गांवसंख्येपैकीं १७.७ टक्के गांवांतून म्हणजे ⅙ गांवांतून जमीन मिळाली आहे आणि वांटप ९.६ गांवांतून झालें आहे. दान मिळालेल्या गांवांशीं वांटप झालेल्या गांवांचें प्रमाण ५४ टक्के पडतें.

वांटप झालेलें क्षेत्र एकूण २७२७४ एकर १८ गुंठे आहे. या जमिनी देणाऱ्या दात्यांची संख्या ३४५३ असून त्या ६००१ भूमिहीन कुटुंबांना वांटून देण्यांत आल्या आहेत. एकूण दात्यांच्या संख्येशीं ज्यांच्या जमिनी वांटतां आल्या त्यांचें प्रमाण ४२ टक्के पडतें. जिल्हावार जी जमीन मिळाली ती आणि त्यांपैकीं जेवढी वांटली ती खालील तक्त्यांत दाखवून प्राप्तीशीं वांटपाचें प्रमाण काय पडतें तेंहि दिलें आहे,


| क्र. | जिल्ह्याचें नांव | भूदान प्राप्तीचें क्षेत्र | वांटप झालेलें क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पुणें | ५८४-१० | ४२०-२४ | ७२.२ |
| २ | अहमदनगर | ८१७-३५ | ४४४-३५ | ५५.० |
| ३ | सोलापूर | १,२१९-१० | ८४०-३९ | ६९.० |
| ४ | सातारा | ३,१६४-११ | १,९८२-२० | ६२.० |
| ५ | सांगली | १,१७१-३१ | ६०५-३१ | ५१.० |
| ६ | कोल्हापूर | १,२६४-३७ | १,०१४-०४।। | ७७.० |
| ७ | रत्नागिरी | ५,५९९-०७ | ३,६८५-३७ | ६४.० |
| ८ | कुलाबा | ३,७३८-१२ | २,९६३-०२ | ७९.० |
| ९ | ठाणें | ६,८८७-३३ | ५,३३८-१२ | ७७.४ |
| १० | नाशिक | ३,५००-२४ | २,०१०-१९ | ५६.० |
| ११ | धुळे | ८,७२९-३६ | ४,२५१-०५।। | ४८.७ |
| १२ | जळगांव | ४,४०५-०८ | ३,६५०-०८ | ६०.० |
| | | ४१,१६३-१४ | २६,२०७-३७ | |

त्यावरून असें दिसून येतें कीं वांटप झालेल्या जमिनीची प्रत्येकी सरासरी ६५ टक्के पडते. जी सरासरी ३५ टक्के जमीन न वाटतां राहिली त्याचीं कारणें मागील प्रकरणाच्या शेंवटीं नमूद केलीं आहेतच.

आतां जिल्हावार दात्यांची संख्या, जमीन-घेत्या कुटुंबांची संख्या आणि त्यांना मिळालेलें क्षेत्र यांचें दर्शन खालील तक्त्यावरून मिळतें:

| क्रमांक | जिल्ह्याचें नांव | दातेसंख्या | जमीन-घेत्यांची संख्या | वांटलेली जमीन एकर-गुंठे |
|---|---|---|---|---|
| १ | पुणें | ११६ | १२८ | ४२०-२४ |
| २ | अ. नगर | ७३ | ८० | ४४४-३५ |
| ३ | सोलापुर | १५२ | १६९ | ८४०-३९ |
| ४ | सातारा | १०७ | ४५३ | १९८२-२० |
| ५ | सांगली | ८५ | १६४ | ६०५-३१ |
| ६ | कोल्हापुर | १२८ | १६८ | १०१४-०४।। |
| ७ | रत्नागिरी | ५३१ | १००० | ३६८५-३५ |
| ८ | कुलाबा | २३२ | ९५० | २९६३-०२ |
| ९ | ठाणें | ३११ | १२०६ | ५३३८-१२ |
| १० | नाशिक | ३५४ | ३९९ | २०१०-१९ |
| ११ | धुळें | ९७९ | ८४४ | ४२५१-०५।। |
| १२ | जळगांव | ३१५ | ४४० | २६५०-०८ |
| | | ३३८३ | ६००१ | २६२०७-३७ |

सर्वांत जास्त जमीन धुळें जिल्ह्यांत मिळालेली आहे आणि वांटपाचें क्षेत्र सर्वांत जास्त ठाणें जिल्ह्यांत आहे. म्हणजे एकूण वांटप-क्षेत्राच्या २० टक्के क्षेत्र ठाणें जिल्ह्याचें आहे. त्याच्या खालोखालचा क्रमांक धुळें जिल्ह्याचा व तिसरा रत्नागिरी जिल्ह्याचा लागतो. त्याचें प्रमाण १५-१४ टक्क्यांच्या आसपास आहे. पुढें दिलेल्या आलेखावरून भूमिप्राप्तीचा व वांटपाचा प्रत्येक जिल्ह्याचा क्रमांक चांगला समजून येईल. (उंची प्राप्तीची व काळा भाग वांटपाचा समजावा.)


जळगांव
धुळे
नाशिक
ठाणे
कुलाबा
रत्नागिरी
कोल्हापूर
सांगली
सातारा
सोलापूर
अ. नगर
पुणे
१०००
२०००
३०००
४०००
५०००
६०००
७०००
८०००
९०००
१००००

## (२) ग्रामदानांत वांटलेली जमीन—

ज्या कांहीं गांवांत भूदान मिळालें होतें त्या गांवांनीं नंतर ग्रामदान करण्याचें ठरविलें, तेव्हां भूदानांत मिळालेली जमीन साहजिकच ग्रामदानांत सामील झाली. सांगली, रत्नागिरी, कुलाबा आणि धुळें या चार जिल्ह्यांत हीं ग्रामदानें झालीं आहेत. भूदान केलेले दाते, दानाचें क्षेत्र, व तें किती ग्रामदानी गांवांतील आहे हें खालील तक्त्यावरून समजून येईल.

| क्रमांक | जिल्हा | दाते | क्षेत्र एकर | किती गांवांतून |
|---|---|---|---|---|
| १ | सांगली | ३ | २००-०० | २ |
| २ | रत्नागिरी | ४ | ८-१३ | २ |
| ३ | कुलाबा | ३ | ८४-२९ | ३ |
| ४ | धुळें | ६० | १२३-१९ | ४ |
| | | ७० | ४१६-२१ | ११ |

या जमिनीचीं दानपत्रें त्या त्या ग्रामसभेकडे देण्यांत आलीं आहेत व त्यांची पुढील व्यवस्था त्यांचेकडे सोपविण्यांत आली आहे.

एकूण वांटप क्षेत्र २६२०७ एकर ३७ गुंठे आणि ग्रामदानांतील वांटलें गेलेलें क्षेत्र ४१६ एकर २१ गुंठे मिळून २६६२४ एकर १८ गुंठे वांटलेलें क्षेत्र आहे. म्हणजे एकूण प्राप्त जमिनीच्या ६५ टक्के जमिनीचें वांटप झालें असें समजण्यास हरकत नाहीं. तुकड्यांच्या रूपांत असलेल्या जमिनीचे जे निर्णय लागले त्यांतील चारशें एकरांचें क्षेत्र एक प्रकारें वांटपांतच धरण्याजोगें आहे. (तुकड्यां विषयींचें विवरण पुढें प्रकरण १४ मध्यें केलें आहे)

## (३) वांटपजमिनीचें स्वरूप—

महाराष्ट्रांत मिळालेल्या जमिनीचें स्वरूप साधारणपणें मध्यम प्रतीचें पडतें. वांटप झालेल्या जमिनाचा एकूण सारा २०६२९ रुपये आहे. त्याची सरासरी १२ आणे पडते.

(१) १० टक्के जमीन——एक रुपया किंवा त्याहून अधिक साऱ्याची आहे.
(२) ५० ,, ,, —८ आणे ते १५ आणे दरम्यानच्या साऱ्याची आहे.
(३) २५ ,, ,, —६ ,, ते ८ ,, ,, ,, ,,
(४) १५ ,, ,, —४ ,, ते ६ ,, ,, ,, ,,

एकूण जमिनीमध्यें उत्तमपैकीं जमीन एक हजार एकरांचे वर आहे. बागाईत जमिनीचें क्षेत्र २५० ते २७५ एकरांचें आहे. कोंकण भागांत भातपिकी जमीन जवळजवळ दोन हजार एकर मिळाली आहे. कोकण भागांतील एकूण वांटलेल्या जमिनीचा हा १/६ हिस्सा होतो.

वांटप झालेल्या जमिनींची आजच्या स्थानिक भावानें किंमत ८० लाख रुपयांपर्यंत जातें. इतर खराब वगैरे जमिनीसह अदमासे एक कोटी रुपये किंमतीची जमीन भूदान-यज्ञांत पश्चिम महाराष्ट्रांत मिळाली असें म्हणतां येईल.

दानांत मिळालेल्या मोठ्या क्षेत्राच्या जमिनीपेक्षां लहान लहान तुकड्यांच्या जमिनींच्या बाबतींत मालकीच्या दृष्टीनें कमी गुंतागुंत आढळली. या जमिनीचें वांटप पुरें करायला फार वेळ लागत नसे. अशा जमिनीची प्रतहि मोठ्या क्षेत्राच्या मिळालेल्या जमिनीपेक्षां सरस होती.

## (४) नवीन भूमिधारक (म्हणजे ज्यांना जमीन वांटली ते)–

पश्चिम महाराष्ट्रांत जी एकूण २६ हजार एकर जमीन वांटली गेली ती निरनिराळ्या जमातींतील कुटुंबांना वाटण्यांत आली आहे हें मागें सांगितलेच. एकूण जमिनीपैकीं ४० टक्के जमीन आदिवासी कुटुंबांत वांटली आहे, आणि एकूण वांटलेल्या क्षेत्रापैकीं या कुटुंबांना ३८ टक्के क्षेत्र मिळालें आहे. हरिजन आणि मागासलेल्या वर्गांतील ३५ टक्के कुटुंबांना ३४.३ टक्के जमीन मिळालेली आहे आणि इतर समाजांतील २५ टक्के कुटुंबांना २७.७ टक्के जमीन वाटण्यांत आली आहे. प्रत्येक आदिवासी कुटुंबाला सरासरी जमीन ४ एकर पडते. हरिजन आणि मागासलेल्या वर्गांतील कुटुंबांना मिळालेल्या जमिनीचें सरासरी प्रमाण ४ एकर आणि इतर जमातींतील कुटुंबांना ४ १/२ एकर पडते. एकूण वांटपामध्यें प्रत्येक कुटुंबाच्या मागें सरासरी प्रमाण ४ १/२ एकरांच्या आसपासच आहे. जमीन मिळालेलीं सर्वांत जास्त कुटुंबें ठाणे जिल्ह्यांत आणि त्या खालोखाल रत्नागिरी जिल्ह्यांत आहेत.

धुळें, नाशिक, ठाणें, कुलाबा या जिल्ह्यांतून प्रामुख्यानें आदिवासींना जमिनी मिळाल्या आहेत. तें क्षेत्र १० हजार एकर भरतें. इतर ज्या

जिल्ह्यांत आदिवासींची वस्ती नाहीं तेथें प्रामुख्यानें हरिजनांना आणि मागासलेल्या जमातींतील कुटुंबांना जमीन मिळालेली आहे. खालील तक्त्यामध्यें जमातवार वांटपाचें आंकडे मांडले आहेत :

जमीन मिळालेले (कुटुंबसंख्या) ६००१, वांटपक्षेत्र २६,२०७ एकर ३७ गुंठे.

| जमात | कुटुंबसंख्या | एकूण जमीन मिळालेल्यांशीं शें. प्रमाण | क्षेत्र एकर-गुंठे | एकूण वांटपाशीं शें. प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ आदिवासी | २४०० | ४०.० | १०,०९८-२१ | ३८.० |
| २ हरिजन | १३८५ | २३.५ | ५,९९१-२७॥. | २३.० |
| ३ मागासलेल्या वर्गांतील | ६८१ | ११.५ | २,८७१-०० | ११.३ |
| ४ इतर वर्गांतील | १५३५ | २५.० | ७,२४६-२८॥. | २७.७ |

(या संबंधींचा जिल्हावार तक्ता शेंवटीं 'परिशिष्ट ३' म्हणून दिला आहे)

भूदानांत मिळालेली जमीन हरिजनांना ⅓ वांटली जावी असें धोरण आहे. वरील तक्त्यावरून पाहतां हरिजन आणि मागासलेले वर्ग यांना मिळालेल्या जमिनींचें प्रमाण शें. ३४ पडलें आहे असें दिसून येतें.

वांटपाचे वेळीं त्या त्या जमातीच्या कार्यकर्त्यांचा आग्रह असे कीं अमक्या जमातीलाच जमीन मिळाली पाहिजे. केव्हां केव्हां ते रुसूनहि सभेंतून निघून जात. परन्तु भूदानांत मिळालेली जमीन गरजूलाच जावी, मग तो कोणत्याहि जाती-जमातीचा असो, तेंच भूदानाचें कार्य आहे हें आम्ही त्यांना समजावून देत असूं व झालेली निवड प्रत्यक्ष पहिल्यानंतर या मंडळींचें आपोआप समाधान होई. वर नमूद केलेल्या आंकड्यांवरून तें अधिक स्पष्ट होतें.

शेंवटीं जोडलेल्या परिशिष्ट नं. ३ मध्यें जिल्हावार व जमातीवार वांटपाची मांडणी केली आहे.

## (४) दात्यांची छाननी

जमिनीच्या संदर्भांत दात्यांची वर्गवारी खालीलप्रमाणें पडते :

| दाते | संख्या | एकूण दात्यांशीं शें.प्रमाण |
|---|---|---|
| १. ज्यांच्या जमिनीचें वांटप झालें असे दाते | ४६०२ | ५८.० |
| २. न वांटतां आलेल्या तुकडयांचे दाते | १४७४ | १८.० |
| ३. ज्यांच्या जमिनी वांटण्यालायक नव्हत्या असे | ४८० | ६.० |
| ४. मिराशी-हक्काचें क्षेत्र दिलें असे | ३६ | ०.४ |
| ५. एकसाली हक्काचें दान करणारे | ३११ | ४.० |
| ६. ज्यांनीं दान दिलेल्या जमिनीची विक्री केली असे | ८४ | १.० |
| ७. दिलेल्या दानाची पूर्तता करण्याची इच्छा नाहीं म्हणून दान परत घेतलेले | ७२१ | ९.० |
| ८. ज्यांची दानांतील जमिनीवर मालकी नाहीं असें सिद्ध झालें असे | २१३ | २.६ |
| ९. ज्यांच्या जमिनींची कायदेशीर चौकशी चालू आहे असे | ८० | १.० |
| | ८००१ | १००.० |

एकूण दात्यांपैकीं ज्यांच्या जमिनीचा शेतीच्या दृष्टीनें उपयोग झाला असे ५८ टक्के दाते आहेत. शिवाय एकसाली हक्काचें दान करणारे दाते ४ टक्के आहेत. त्यांच्याहि जमिनी उपयोगाच्या आहेत परंतु त्या वरील आंकडयांत धरल्या नाहींत.

ज्या दात्यांनीं आपलें दान परत घेतलें, दिलेल्या जमिनीची विक्री करून टाकली, स्वतःच्या मालकीचें क्षेत्र दिलें नाहीं, किंवा इतकें अल्प दान दिलें कीं तें सर्व परत करणें प्राप्त झालें असे दाते, एकूण दात्यांच्या शे. १९ टक्के भरतात.

प्रत्येक जिल्ह्यांत जिचें वांटप झालें अशा जमिनींच्या दात्यांचें व वांटप जमिनीचें एकूण त्या जिल्ह्यांतल्या दातासंख्येशीं आणि एकूण वांटलेल्या जमिनीशीं अनुक्रमें पडणारें प्रमाण खालील तक्त्यांत आढळेल :

| जिल्हा | एकूण दाते | वांटप केलेल्या जमिनीचें दाते | वांटप दात्यांचें शे. प्रमाण | वांटपजमिनीचें शे. प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ पुणें | ३१० | ११६ | ३८.० | ७२.२ |
| २ अ. नगर | १८१ | ७३ | ४०.० | ५५.० |
| ३ सोलापुर | ३५२ | १५२ | ४४.० | ६९.० |
| ४ सातारा | ८५८ | १०७ | १२.६ | ६२.० |
| ५ सांगली | १३२ | ८५ | ६०.० | ५१.० |
| ६ कोल्हापुर | ४५५ | १२८ | २८.० | ७७.० |
| ७ रत्नागिरी | ९२१ | ५३१ | ६०.० | ६४.० |
| ८ कुलाबा | ५३२ | २३२ | ४५.० | ७९.० |
| ९ ठाणे | ५०७ | ३११ | ६२.० | ७७.४ |
| १० नाशिक | ७०२ | ३५४ | ५०.० | ५६.० |
| ११ धुळें | १९४३ | ९७९ | ५०.० | ४८.७ |
| १२ जळगांव | ११०९ | ३१५ | २९.० | ६०.० |
| | ८००१ | ३३८३ | | |

## दात्यांचें मानस

जमिनीच्या वांटपासाठीं किंवा ती वांटतां येत नसेल तर तिच्या निकालासाठीं दात्यांना भेटण्याचा, त्यांचेशीं बोलण्याचा, आणि त्यांची दानाची भावना समजावून घेण्याचा योग मोठ्या प्रमाणावर आला. त्यामध्यें मालेगांव, बागलाण, नांदगांव (जि. नाशिक), हातकणंगले (कोल्हापुर), दक्षिण व उत्तर सोलापुर, मोहोळ (सोलापुर), माळशिरस (सोलापुर), इंदापुर. बारामती (पुणें), महाड (कुलाबा), डहाणू (ठाणे), मालवण (रत्नागिरी), शिराळे (सांगली), व फलटण (सातारा), या तालुक्यांतील बहुतेक दात्यांना भेटून त्यांची दानामागील भावना-वृत्ति-दृष्टिकोन समजावून घेण्यासाठीं एक नमुनावजा पाहणीचा प्रयत्न केला.

ही पाहणी करतांना पुढील पांच मुद्दे ठरविले होते. त्यांनीं दान दिलें तें—

(१) विनोबाजींचा क्रांति-विचार समजावून घेऊन खरोखर मालकी सोडण्याची तयारी म्हणून दिलें,

(२) भारतांतील धार्मिक परंपरेला अनुसरून, एक सत्कार्य म्हणून दिलें,

(३) सामाजिक परिस्थितीचें दडपण (Social Compulsion) पडल्यामुळें दिलें,

(४) लौकिक दृष्टि बाळगून दिलें,

(५) कुळासंबंधींच्या किंवा भागीदारीसंबंधींच्या सूडबुद्धीनें किंवा दुष्टाव्यानें दिलें ?

हें तपासण्याचा निकष म्हणून–

(१) जमिनीचा कितवा हिस्सा दिला;

(२) कोणत्या प्रतीची जमीन दिली;

(३) दिल्यानंतर वांटप होई तों त्या जमिनीची व्यवस्था विश्वस्त वृत्तीनें लावली का; आणि

(४) या कार्यासाठीं त्या गांवांत पुढें सुद्धां सहकार्य करण्याची वृत्ति कितपत आहे– इतक्या गोष्टी ठरविल्या होत्या.

जें आढळून आलें तें पुढील प्रमाणें:–

(१) क्रांतीचा विचार पूर्णपणें समजून घेतला आणि त्याला अनुसरून दान दिलें आहे असे दाते शेंकडा १०-१२ टक्के आढळतात. त्यांचें मिळालेलें दान सहाव्या हिश्शाचें किंवा त्याहून जास्त हिश्शाचें आहे. राहिलेल्या जमिनीवरील मालकी सोडण्याची त्यांची पूर्ण तयारी आहे. त्यामध्यें गरीब आणि मध्यम शेतकऱ्यांचें प्रमाण जास्त भरतें. मोठ्या किंवा सधन जमीन-वाल्या वर्गांतील उदाहरणें अपवादात्मक आहेत. याशिवाय सामाजिक, राजकीय, विधायक क्षेत्रांतील कार्यकर्तेहि आहेत. यांतील अनेकांचीं दानें ६-६, ७-७ वर्षांपूर्वींचीं आहेत. दान दिल्यानंतर त्या जमिनीची व्यवस्था वांटप होई तों एकतर स्वत:साठीं न करतां ते चांगल्या कामासाठीं करीत, नाहींतर गरीब भूमिहीन माणसाला फुकट करण्याला ती देत असत. वांटपाच्या कामांत या दात्यांचें चांगलें सहकार्य लाभलें.

(२) शेंकडा ३८ टक्क्यांच्या आसपास असे दाते दिसले कीं ज्यांना दानामागील विचार पटला होता, परंतु त्यांची प्रेरणा ही धार्मिक

दान परंपरेची होती. या विचाराविषयीं धार्मिक दृष्टिकोनांतून पाहून त्यांचें दान झालेलें आहे. धार्मिक संस्कारामुळें, असें कार्य आपल्या हातून व्हावें, अशीच भावना त्यांची या दानामधून व्यक्त झाली. अशाप्रकारचे लोक प्रामुख्यानें २० एकरांवरील शेतकरी, व्यापारी, आणि मध्यम वर्गांतले होते. गरीब शेतकऱ्यांचेंहि कांहीं प्रमाण आढळलें. त्यांचेकडून मिळालेलें दान हें साधारणत: वाजवी हिश्शांचें होतें; जमिनी सर्वसाधारणपणें बऱ्यापैकीं होत्या; दानानंतर त्या जमिनीची व्यवस्था दानापूर्वीप्रमाणेंच ठेवली होती. त्यांनीं दानांतील जमिनीचा उपयोग स्वत:साठीं करून घेतलेला दिसला नाहीं. उदा० यांच्यापैकीं ज्यांच्या जमिनी कुळाकडे होत्या त्यांनीं कुळाकडून दानानंतर खंड वसूल करण्याचें बंद केलें होतें.

(३) गैरहजर मालक-वर्गांतून मिळालेल्या दानांमध्यें सामाजिक दडपणाच्या भीतीनें दिलेल्या दानांची संख्या साधारणत: ३३ टक्के भरते. त्यांत दानासंबंधींच्या पारंपरिक धार्मिक भावनेचाहि अंतर्भाव आहे. कायद्यानें जमीन जाणारच आहे, मोबदला जो मिळणार तो हि अत्यल्प, तेव्हां दान देऊन भलाई पदरीं कां न घ्यावी, हा दूरदृष्टीचा विचार किंवा व्यवहारज्ञान त्यांत होतें. त्यांनीं कुळाकडून दानानंतर खंड वसूल करण्याचा प्रयत्न केला नाहीं. जेथें कुळांनीं नेहमींच्या प्रथेप्रमाणें आपणहून खंड भरला होता, त्यामध्यें कांहीं दाते असे निघाले कीं, त्यांनीं वांटप होईपर्यंत दानाच्या जमिनी कुळाकडे असतांनाहि जमिनीचा सारा भरला आणि जो खंड जमा झाला त्यांतील कांहीं भूदान-समितीला दिला किंवा अन्य कार्याला वापरल्याचें त्यांनीं दाखवून दिलें.

(४) कांहीं दात्यांनीं अश्रद्धेनें केवळ भिडेखातर किंवा तोंडदेखलेपणानें दान दिलें होतें. अशांची संख्या ६ ते ७ टक्के दिसून आली. त्यांच्याकडे स्वत:ची भरपूर जमीन असून सुद्धां त्यांनीं गुंठ्यांत मोजतां येईल एवढीच जमीन दानांत दिली होती. तीहि चांगली होती असें नाहीं. त्यांतल्या कांहीं जमिनी कुळांकडे किंवा मालकीसंबंधीं गुंतागुंत असलेल्या आढळल्या. दान वाढवून किंवा बदलून देण्याची त्यांची तयारी दिसली नाहीं. कांहीं दाते असे भेटले कीं त्यांनीं दानपत्रांत दाखविलेली जमीन प्रत्यक्षांत नव्हतीच. लौकिक दृष्टीनें प्रतिष्ठेसाठींच त्यांनीं दानपत्र भरलें होतें.

(५) कूळहक्कानें ज्यांच्या जमिनी गुंतल्या होत्या, कुळांकडून कसलेंच उत्पन्न किंवा खंड बऱ्याच वर्षांत ज्यांना मिळाला नव्हता, किंवा इतर कांहीं कारणांमुळें जमिनींच्या बाबतींत वाद होता, मालकीहक्का-संबंधीं गुंतागुंत होती, अशा दात्यांनीं पुढें कटकटी नकोत, परस्पर निकाल लागावा, विरोधकांच्या पदरांत जमीन पडू नये, लौकिक हि पदरांत पडावा आणि प्रतिवाद्याला परस्पर शह देण्याला किंवा त्याचा कांटा काढण्याला भूदान हें साधन व्हावें अशा बुद्धीनें दान दिलेलें होतें. अशांची संख्या ७–८ टक्के होईल. मात्र यांपैकीं कांहींच्या जमिनी चांगल्या प्रतीच्या होत्या.

या ठिकाणीं कोल्हापुर जिल्ह्याच्या हातकणंगले तालुक्यांतील दात्यांचा जो परिचय झाला तो देण्यासारखा आहे. त्यावरूनहि दात्यांचें मानस कळून येण्याला चांगली मदत होईल. हे दाते लहान लहान जमिनींचे मालक आहेत हें लक्षांत घेतलें पाहिजे.

(१) आपल्या गांवच्या भूमिहीन शेतकऱ्याला जमीन मिळावी हा विचार त्यांना समजलेला आणि पटलेला आहे.

(२) त्या दानाची जमीन इतरांना वांटली जावी ही त्यांची इच्छा आहे.

(३) शिल्लक राहिलेल्या मालकीचा तुकडा सर्व जमीन गांवसमाजाची होत असेल तर अर्पण करण्याची त्यांची तयारी आहे.

(४) जमीन चांगल्या प्रतीची आहे आणि गुंतागुंत नाहीं.

(५) घरांतील बायकामुलांना दानाची कल्पना आहे आणि त्यांचा दानाला पाठिंबाहि आहे.

## (५) वांटलेल्या जमिनींच्या ताब्याचें स्वरूप

वांटलेल्या जमिनींच्या ताब्याचें स्वरूप कशा प्रकारचें होतें हें पाहण्या-सारखें आहे. म्हणजे दान दिलेल्या जमिनीवर ताबा ज्या दात्यांचा होता ते स्वतः कसणारे होते कीं गैरहजर मालक होते व ताबा कुळांकडे होता हें यांत पाहतां येतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
अनुक्रम ३२७९८ दि: १०/१०/६८

वांटलेल्या जमिनीच्या दातासंख्येपैकीं गैरहजर मालकांची (Absentee Landlords) संख्या १६३४ म्हणजे शें. ५९ टक्के आहे. अर्थात या जमिनी कुळांना लावलेल्या होत्या. यांपैकीं ४९ टक्के दात्यांच्या जमिनी त्यावरील कुळांनाच वांटून दिल्या, आणि १० टक्के दात्यांच्या कुळांनीं, त्यांना भूदानाचें तत्त्व समजावून दिल्यानंतर खुशीनें आपला कूळहक्क भूमिहीनांसाठीं सोडून दिला. याला कांहीं अपवाद अर्थात् आहेत. ज्या कुळांनीं हक्क सोडला त्यांची संख्या ३३६ होती. कूळहक्काखालीं या जमिनी कुळांच्या ताब्यांत होत्या. त्यांना जमीन देण्याचें नाकारण्याचा हक्क होता. या कुळांमध्यें ज्यांना दुसरीकडे स्वतःच्या मालकीची १०-१५ एकर जमीन होती अशांनीं समजूतदारपणें आपला कूळहक्क आनंदानें सोडला, किंवा तडजोड घडवून, वांटपाचें आणि कबजाचें काम सुलभ केलें. तर २० एकरांच्यावर इतरत्र मालकी असलेली जीं प्रतिष्ठित कुळें त्यांत होतीं त्यांनीं या जमिनीवरचा कूळहक्क सोडण्यास फार खळखळ केली. भूमिहीनां-करितां हा हक्क सोडणें नैतिक व कायदेशीर दृष्टीनें सुद्धां रास्त आहे हें जाणूनहि कांहीं कुळांनीं हक्क सोडण्याची तयारी दर्शविली नाहीं. त्याबाबत कायदेशीर प्रयत्न चालू आहेत.

स्वतः कसत असलेल्या जमिनीचा हिस्सा दानांत देणाऱ्यांची संख्या १३८२ म्हणजे शें. ४१ आहे. त्यांच्या जमिनी अर्थात् इतर भूमिहीनांना वांटण्यांत आल्या.

वांटलेल्या जमिनींचा (१) स्वतःकडे ताबा असलेले व (२) कुळांकडे ताबा असलेले, अशी दात्यांची वर्गवारी करून दान दिलेल्या जमिनीचें क्षेत्र जिल्हावार दाखविणारा तक्ता परिशिष्ट नं. ४ म्हणून शेंवटीं दिला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 33062 वि: 18 aiš.
क्रमांक 1477 नों दि: 18-10-62



# भूमिवितरण-चिकित्सा : २

## (१) न वांटलेली जमीन

वांटप केलेल्या जमिनींसंबंधींची व ती देणाऱ्या दात्यांसंबंधींची छाननी आतांपर्यंत केली. आतां वाटतां न आलेल्या क्षेत्रांपैकीं प्रत्येक प्रकारच्या क्षेत्राची छाननी करून त्यांतून निघत असलेले निष्कर्ष पाहूं.

### तुकड्यांतील क्षेत्र–

महाराष्ट्रांत सरकारनें निरनिराळ्या विभागांतील जमिनीची स्थिति लक्षांत घेऊन तुकडेबंदी-कायद्यान्वयें किमान क्षेत्राची मर्यादा ठरविलेली आहे. जिरायत जमिनीची १ एकरापासून ३ एकरांपर्यंत व बागाईत जमिनीची १० गुंठ्यांपासून १ एकरापर्यंत वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळी मर्यादा ठरवून दिली आहे. तिच्या आंत तुकडा पाडतां येत नाहीं. सरकारच्या ठरलेल्या धोरणाहून लहान तुकडा पाडावयाचा नाहीं हें धोरण निश्चित करून तुकडेबंदी-कायद्याच्या कमाल मर्यादेपेक्षां जें लहान क्षेत्र असेल तें तुकड्यांतील क्षेत्र असें मानलें होतें.

महाराष्ट्रांत एकूण असे न वांटतां येण्यासारख्या जमिनींच्या तुकड्यांतील क्षेत्र २६३३ दात्यांचें १६७७ एकर २० गुंठे होतें. म्हणजे एकूण जमिनीच्या ४ टक्के जमीन अशा तुकड्यांच्या स्वरूपांत मिळालेली होती आणि या लहान लहान तुकड्यांच्या दात्यांची संख्या एकूण दात्यांच्या प्रमाणांत शेंकडा ३३.० टक्के पडते.

तुकड्यांच्या दात्यांना ज्यावेळीं आम्ही भेटत असूं त्यावेळीं प्रथम कायद्याच्या दृष्टीनें वांटप करतां येईल एवढा तुकडा मोठा करून द्या अशी मागणी करीत असूं, आणि नाशिक, सोलापुर, पुणें, धुळें, जळगांव, ठाणे, आणि कोल्हापुर या जिल्ह्यांतून कांहीं दात्यांनीं आपलें लहान क्षेत्र वाढवून दिलें. म्हणजे अधिक जमीन दान दिली. हें सर्व दान जवळ-जवळ ३००

एकरांच्यावर भरतें. कांहींना असें हें क्षेत्र त्यांच्या इच्छेप्रमाणें कोणाहि भूमिहीनाला देण्याचें आम्ही मान्य केलें, अट एवढीच कीं आमच्या व्याख्येप्रमाणें तो असावा.

कांहीं ठिकाणीं दात्यांना जमीन वाढवून देणें शक्य नव्हतें तेथें आणि मिळालेले लहान-लहान तुकडे सलग आहेत असें लक्षांत आलें किंवा दात्यांनीं सलग करून देण्याची तयारी दाखविली तेव्हां तसे सलग तुकडे एकत्र करून हे मोठे बनविलेले तुकडे वांटण्यांत आले. असे क्षेत्र ४०० ते ५०० एकरांच्या आसपास भरतें. येणेप्रमाणें तुकड्यांबाबतच्या प्रयत्नांतून जें अधिक दान झालें, तें सर्व वांटपक्षेत्रामध्यें (पूर्वीच्या) धरलेलें आहे.

जी जमीन वांटण्यासारखी नव्हती तिच्या निकालाबद्दलची सविस्तर माहिती आणि आंकडे पुढें दिले आहेत :

**तुकड्यांतील एकूण क्षेत्र १६७७-२० एकर, दाते २६३३**

| क्र. | जिल्ह्याचें नांव | दाते संख्या | दिलेलें क्षेत्र ए. गुं. |
|---|---|---|---|
| १ | पुणें | १४१ | ६२-२० |
| २ | अहमदनगर | १९ | ५७-०७ |
| ३ | सोलापूर | १२६ | १०५-०७ |
| ४ | सातारा | ६५८ | १८४-१३ |
| ५ | सांगली | १० | ९-२९ |
| ६ | कोल्हापूर | ३०२ | १६४-३२॥ |
| ७ | रत्नागिरी | १७४ | ९४-२१ |
| ८ | कुलाबा | २७४ | ७१-३० |
| ९ | ठाणें | २२ | ३०-०० |
| १० | नाशिक | १७६ | १३४-१० |
| ११ | धुळें | ४२० | २६४-३९॥ |
| १२ | जळगांव | ३११ | ५००-११ |
| | | २६३३ | १६७७-२० |

दात्यांनीं मोठा तुकडा करून देण्याचें नाकारलें आणि लागून दुसरे तुकडे किंवा दानांतील दुसरी मोठी जमीन नाहीं असें दिसलें तेव्हां या जमिनी-शेजारीं एखादा लहान जमीनवाला आहे असें आढळल्यास त्याला दात्याच्या इच्छेनें ही तुकड्यांतील जमीन देण्याचा निर्णय सोलापूर, सातारा व कोल्हापूर या ३ जिल्ह्यांमध्यें घेतला. या जिल्ह्यांत २६ दात्यांची १२ एकर २८ गुंठे जमीन अशा स्वरूपांत निकालांत निघाली. ही जमीन शेतीच्या दृष्टीनें उपयोगी होती.

दानांत मिळालेल्या तुकड्याच्या शेजारीं अल्प जमीनवाला नाहीं आणि दात्याची तर आपली जमीन वांटली जावी अशी इच्छा आहे आणि जमीन वाढवून देणेंहि शक्य नाहीं आणि जमीन उपयोगाची आहे अशी स्थिति होती तेथें आम्हीं दात्याला असें सांगत असूं कीं तुम्हीच योग्य भूमिहीनांची निवड करून त्याला ही जमीन भूदानाच्या शर्तीप्रमाणें कसायला द्या. अशा जमिनीवर तुकडेबंदी कायद्यामुळें नांव दात्याचेंच ठेवावें लागत असे. अशा प्रकारचे दाते ८ निघाले आणि त्यांची जमीन ६ एकर १४ गुंठे होती. मध्यम स्थितींतील या दात्यांची ही जमीन सरासरी एक रुपया साऱ्याची होती. आपल्या इच्छेप्रमाणें भूमिहीनाला त्यानें जमीन दिलेली असल्यामुळें अशा या तुकड्यांतील मशागतीस दात्यांची पूर्ण मदत मिळते असें नंतर दिसून आलें.

ज्यांना स्वतःच्या मालकीची जमीन एक दीड एकराच्या आंतबाहेर आहे अशा ११२५ दात्यांनीं ३८३-१६ एकर क्षेत्र दानामध्यें दिलेलें आहे असें आढळून आलें. भूदानाचा विचार समजला आणि आपली गरिबी जायची असेल तर आपणहि आपल्या जमिनीवरील छोटी मालकी सोडली पाहिजे हा विचार, हीं दानें देतांना यांपैकीं कांहीं दात्यांच्या मनांत होता. दिलेल्या दानाचें वांटप व्हावें, आपल्याहून गरीब माणसाला त्या जमिनीची मदत होईल, अशी कारुण्याची म्हणा, सहानुभूतीची म्हणा, भावना दुसऱ्या कांहीं दात्यांच्या दानामागें होती असें अनुभवाला आलें. यांतील कांहीं नमुनेदार प्रसंग इतरत्र मुद्दाम दिले आहेत. या अल्प जमिनीच्या मालकांनीं अगदीं लहान लहान तुकड्यांत दिलेलें क्षेत्र उत्तम प्रतीच्या जमिनीचें होतें.

कोल्हापूर जिल्ह्यांतल्या हातकणंगले आणि शिरोळ या दोन तालुक्यांतील गरीब दात्यांच्या दानांचा उदाहरण म्हणून निर्देश करतां येईल. तसेंच कुलाबा जिल्ह्यांतील महाड आणि माणगांव तालुक्यांत या लहान शेतकऱ्यांनीं भातपिकी जमिनी दिलेल्या असल्याचा निर्देश करतां येईल. अशा वृत्तीच्या दात्यांच्याबाबत, त्यांच्या जमिनी इतरांना वांटून देणें शक्य असलें तरी तसें करणें कितपत न्यायाचें होईल आणि न केलें तर दात्यांना कितपत अन्यायाचें होईल याचा विचार करावा लागत असे. अशा परिस्थितींत वांटपासाठीं जमलेल्या लोकांकडूनहि अशा जमिनी न वांटण्याचा आग्रह राही. गरीबांच्याबद्दल साऱ्यांची सहानुभूति प्रकट होई. अशा ठिकाणीं आम्ही जाहीर चर्चा करून निर्णय घेत असूं. ही दानांतील जमीन विनोबाजींची–भूदानयज्ञाची म्हणजे पर्यायानें गांवसमाजाची झालेली आहे, म्हणून यापुढें या जमिनीवर दात्यांचा मालकीहक्क राहणार नाहीं, परंतु त्याला निर्वाहाचें दुसरें साधन नसल्यामुळें ही जमीन त्याच्याकडेच कसण्यासाठीं आणि पिकेल तें त्यानें घ्यावें यासाठीं देण्यांत येत आहे, अशा निर्णयानें गांवकऱ्यांना व खुद्द दात्याला समाधान वाटत असे.

ज्या तालुक्यांमधून तुकडेजोडीचें काम सरकारनें सुरू केलेलें आहे अशा तालुक्यांतील तुकड्यांतील दानपत्रें नोंदीसाठीं सरकारकडे पाठविण्यांत आलीं. या नोंदीमुळें तुकडे-जोड करतांना भूदानाच्या तुकड्याला सरकारनें अग्रहक्क दिला आहे तो मिळावा म्हणून तशी व्यवस्था करण्यांत आली. तीं दानपत्रें ७४८ असून त्यांतील जमीन ७५४ एकर ३१ गुंठे आहे. नजीकच्या काळांत तुकडेजोड झाल्यावर हें वांटपाचें काम होईल. जिल्हावार त्यांचे आंकडे असे :—

| क्रमांक | जिल्हा | दाते | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | पुणें | ९७ | ३२-२६ |
| २. | रत्नागिरी | ६४ | ३४-२८ |
| ३. | धुळे | २७४ | १९५-२७ |
| ४. | जळगांव | ३११ | ५००-११ |
| ५. | अहमदनगर | २ | १-१९ |
| | | ७४८ | ७५४-३१ |

तुकड्यांतील कांहीं जमिनी शेतीच्या दृष्टीनें निरुपयोगी होत्या. अशा तुकड्यांतील जमिनीबाबत घेतलेले निर्णय पुढें 'खराब क्षेत्र' या सदरांत दिले आहेत.

२०६ दात्यांचें १७८ एकर ३१ गुंठ्यांचें ( तुकड्यांतील ) क्षेत्र कसल्याच उपयोगांत येण्यासारखें नव्हतें म्हणून तें ज्यांचें त्यांना परत देण्याचा निर्णय घेतला. परंतु या दात्यांना दान परत घेणें हें प्रशस्त वाटलें नाहीं. दिलेल्या जमिनीऐवजीं दुसरा अधिक चांगल्या जमिनीचा तुकडा बदलून देणें त्यांना शक्य नव्हतें, पण भूदानांत कांहीं तरी द्यावें अशी त्यांना मनापासून इच्छा होती. म्हणून प्रथम दिलेल्या निकामी तुकड्यांऐवजीं संपत्तिदान म्हणून त्यांनीं अल्पशी रक्कम दरवर्षी देत राहण्याचा संकल्प केला. त्यांपैकीं निम्म्या दात्यांनीं त्या वर्षाची रक्कम भूदान-समितीला रोख आणून दिली.

तुकड्यांतील जमिनीची विल्हेवाट लावतांना १७९ एकर २८½ गुंठे जमीन देणारे ३३८ दाते असे होते कीं त्यांनीं मनांत आणलें असतें तर त्यांना अधिक दान देऊन हे तुकडे कसण्याला योग्य एवढे करून देतां आलें असतें. त्यांची आर्थिक स्थिति तितकी संपन्न होती. पण त्यांना याबद्दल मुळींच आस्था दिसली नाहीं. एकदां औपचारिक रीतीनें जें अल्पस्वल्प दान दिलें त्यांत भर घालण्यास ते तयार नव्हते. भूदानाचा एकूण विचार त्यांना पटलेला नसावा असें त्यांच्या वृत्तीवरून दिसून आलें. तेव्हां असे तुकडे नाइलाजानें आम्ही दात्यांना परत करून टाकले.

पूर्वतयारी करतांना कांहीं मालक भेटूं शकले नाहींत. कांहीं गांवांना जातांच आलें नाहीं. या वा अशा कारणांमुळें १४२ दात्यांच्या ११४ एकर ३७½ गुंठे तुकड्यांतील क्षेत्राची विल्हेवाट लावण्याचें काम अजून उरलें आहे.

तुकड्यांत मिळालेल्या जमिनींसंबंधीं एकूण जो निकाल निरनिराळ्या प्रकारें लागला त्याचा जिल्हावार तपशील 'परिशिष्ट क्र. ५' या तक्त्यांत दिला आहे.

## (२) कसणुकीस अयोग्य-खराब क्षेत्र

खराब जमिनींबाबत शक्य तों दात्यांना त्या परत न करतां स्थानिक सार्वजनिक कामाकरितां त्यांचा उपयोग व्हावा अशी भूमिका घेऊन, अशा जमिनींच्या निकालाचें काम करण्यापूर्वीं त्या जमिनींच्या दात्यांना भेटून त्यांनीं खराब जमिनीऐवजीं शेतीच्या दृष्टीनें उपयोगाची अशी जमीन बदलून द्यावी आणि दानाच्या हेतूची पूर्तता करावी असें आम्हीं समजावून देत असूं. फार थोड्या ठिकाणीं दात्यांनीं हें मानलें. हें सर्व अपवादात्मक काम झालें.

खराब जमिनीपैकीं (१) ५७ दात्यांची १७४८ एकर २१ गुंठे जमीन त्या ठिकाणच्या ग्रामपंचायतींना व अन्य सार्वजनिक संस्थांना गांवच्या कामासाठीं देण्यांत आली.

(२) कांहीं ठिकाणीं हरिजनांना घरांसाठीं जागा नव्हती. खराब जमिनींपैकीं जेथें त्यांना उपयोग होईल अशी जमीन होती ती त्यांना देण्यांत आली. हें क्षेत्र १६ दात्यांचें ५४ एकर २ गुंठे भरलें.

(३) ठाणें, रत्नागिरी आणि सोलापूर या जिल्ह्यांत कांहीं खराब जमिनीचा उपयोग शाळा-मंदिरांसाठीं होणें शक्य होतें, म्हणून दात्यांच्या आणि गांवकऱ्यांच्या इच्छेनें ७ दात्यांची ४३ एकर १० गुंठे जमीन त्यांकरितां दिली गेली.

(४) २८ दाते असे होते कीं ज्यांची ७५ एकर १९ गुंठे जमीन कोणत्याहि कामीं उपयोगी आणणें शक्य नव्हतें म्हणून दात्यांना परत करण्याचा निर्णय घेण्यांत आला. परंतु या दात्यांना हें दान परत घेणें किंवा दुसरें चांगल्या जमिनीचें दान करणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं या जमिनी-दाखल संपत्तिदान म्हणून दरसाल देण्याचें ठरविलें.

(५) १३३ दाते असे निघाले कीं, त्यांच्या जमिनीचा कोणताच उपयोग नव्हता, आणि परत केल्यानंतर त्यांनीं त्याबद्दल कांहींच म्हटलें नाहीं. या परत केलेल्या दात्यांचें क्षेत्र ४१३ एकर ७ गुंठे आहे. या दात्यांच्या जमिनी कांहीं लहान लहान तुकड्यांमध्यें होत्या आणि थोड्यांच्या मोठ्या होत्या.

(६) ज्या ठिकाणीं खराब जमिनीसंबंधीं सरकारमार्फत मोबदला मिळण्याची शक्यता आहे, त्या ठिकाणीं या खराब जमिनीचीं दानपत्रें सरकारकडे नोंदीसाठीं पाठविण्यांत आलीं आणि नोंदीची व्यवस्था झाली. हीं दानपत्रें २१ दात्यांचीं होतीं आणि त्याचें क्षेत्र १०५२ एकर ३ गुंठे आहे. यापैकीं २० दात्यांची ९५५ एकर जमीन ही रत्नागिरी जिल्ह्यांत डोंगराळ अशी मिळालेली आहे. सरकारमार्फत जंगलवाढीसाठीं एकरीं ३० रुपये मोबदला देऊन जमिनी ताब्यांत घ्यायच्या आणि जंगल वाढविण्याचें काम करायचें अशी योजना बनली आहे आणि त्याप्रमाणें त्यांनीं काम सुरू केलें आहे. या दानांतील जमिनींचा त्या योजनेमध्यें समावेश होऊं शकतो. याप्रमाणें मोबदला घेऊन त्या रकमेचा उपयोग भूमिहीनांच्या करितां प्रदेश भूदान समितीला करतां येण्याजोगा आहे. दुसरी नाशिक जिल्ह्यामध्यें एका दात्यानें दिलेली ९७ एकर जमीन ही धरणाच्या पाण्याखालीं जात असल्यामुळें आणि धरणाच्या पाण्याखालीं जाणाऱ्या जमिनीबाबत सरकार मोबदला देत असल्यामुळें दानपत्राच्या नोंदीची व्यवस्था वरीलप्रमाणें केली आहे. या जमिनीचा दुसरा कोणताहि योग्य उपयोग नसल्याचें दिसलें.

(७) कांहीं जमिनी शहरालगत होत्या. त्यांच्या उपयोग शेतीव्यतिरिक्त इतर कांहीं खास कामासाठीं होण्याची शक्यता असल्यामुळें त्या जमिनींच्या किंमती वाढल्या असल्याचें दिसून आलें. त्या जमिनीचा मोबदला मिळण्याच्या दृष्टीनें व्यवस्था करण्याचा प्रयत्न झाला.

कोणत्याहि जमिनीचा उपयोग कांहींना कांहीं असतोच. रत्नागिरी जिल्ह्यांत मालवण, वेंगुर्ला, सावंतवाडी इ. तालुक्यांतूत अगदीं कातळाच्या जमिनी मिळाल्या आहेत. आज त्या जमिनींत शेतीखेरीज आंबे, काजू इ. झाडांची लागवड करून उत्पन्न काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. परंतु याहि पेक्षां जास्त उपयोगी म्हणजे त्यांतून खनिज द्रव्यें निघण्याचा संभव निर्माण झाला आहे. त्यामुळें शेतीपेक्षांहि जास्त उत्पन्न देणारी ही जमीन ठरण्याचा संभव आहे. अशा जमिनी भूदान-समितीच्या नांवानें करण्यांत आल्या आहेत. पुढें या जमिनीचा मोबदला मिळूं शकेल आणि त्या योगें

ज्यांना कमी जमिनी मिळाल्या त्यांना साधनें पुरविणें, उद्योग काढणें इत्यादि मदत देतां येईल

(८) कुलाबा, ठाणें आणि रत्नागिरी या जिल्ह्यामधून कांहीं खार जमिनी मिळाल्या होत्या. खारलँड बोर्डातर्फे ठाणें जिल्ह्यांतील ७५० एकरांच्या जमिनीची दुरुस्ती होऊन त्या जमिनी वाटतां आल्या. रत्नागिरी जिल्ह्यांतील जमिनीचें दानपत्र आल्यावर त्या कसल्याच उपयोगाच्या नाहींत म्हणून परत करण्यांत आल्या. कुलाबा जिल्ह्यांत पेण तालुक्यांतील २ दात्यांनीं ८७ एकर खार जमीन दिली होती. खारलँड बोर्डाच्या नियमाप्रमाणें गांवांतील भूमिहीनांची आणि गांवकऱ्यांची आर्थिक दृष्टीनें तयारी नसल्यामुळें उत्तम भातपिकाची जमीन असूनहि ती परत करण्यांत आली.

(९) कांहीं स्थानिक परिस्थितीमुळें आणि जमिनीचा योग्य निर्णय व्हावा एवढ्यासाठीं १०१ एकर २७ गुंठ्यांचे निर्णय घेण्याचें काम शिल्लक राहिलें आहे. या जमिनी ३० दात्यांच्या आहेत.

एकूण खराब क्षेत्र :– ४८३५ एकर २[illegible] गुंठे, दाते ४८०.

खराब जमिनीचें स्वरूप जिल्हावार खालीलप्रमाणें :–

| क्र. | जिल्ह्याचें नांव | दात्यांची संख्या | दानांतील क्षेत्र ए. गुं. |
|---|---|---|---|
| १ | पुणें | ३३ | ६५-०४ |
| २ | अहमदनगर | १९ | ३२-१६ |
| ३ | सोलापूर | २९ | १२४-१० |
| ४ | सातारा | ३८ | २३८-२१ |
| ५ | सांगली | १६ | ५०-०० |
| ६ | कोल्हापूर | १६ | २६-२३ |
| ७ | रत्नागिरी | ८० | १२६७-०० |
| ८ | कुलाबा | ७ | १०२-३५ |
| ९ | ठाणें | १६८ | १४११-२१ |
| १० | नाशिक | ६० | ३०३-२५ |
| ११ | धुळें | ४४ | १२१३-२३ |
| १२ | जळगांव | -- | — |
| | | ४८० | ४८३५-२८ |

(खराब जमिनीच्या निकालाचें जें काम झालें, त्याचें जिल्हावार एकत्र संकलन पुढें परिशिष्ट नं. ६ वर पहावें.)

## (३) मिराशी हक्काचें क्षेत्र

तीन जिल्ह्यांतून मिराशी हक्काच्या जमिनी मिळालेल्या होत्या. या मिराशी हक्काच्या जमिनीवरील मिराशी कुळें हींच जवळजवळ या जमिनीचे कायदेशीर मालक असतात. फक्त या कुळांना मिराशीवतन नष्ट होण्यापूर्वी मिरासदारांना खंड द्यावा लागत असे. हीं वतनें कायद्यानें नष्ट करण्यांत आलीं आहेत. त्यामुळें भूदान समितीला या जमिनीबद्दल फक्त मिराशी मोबदला घेण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे, जो कायद्यानें दात्याला मिळालेला होता. अशा जमिनीबाबत मालकी नसल्यामुळें वांटपाचा प्रश्नच निर्माण होत नाहीं. अशा जमिनींच्या निकालाचें काम करतांना ह्या जमिनी ज्या कुळांकडे आहेत त्यांपैकीं सधन कुळांकडून मोबदला घेणें आणि जो हक्क भूदान समितीकडे आला आहे तो गरीब कुळाला देऊन टाकणें (मोबदला न घेणें) इतकेंच काम करावें लागलें. ज्या कुळांकडून मोबदला घेणें वाजवी होतें तशीं दानपत्रें नोंदीसाठीं महसूल-अधिकाऱ्यांकडे पाठविण्यांत आलीं. हा मोबदला साऱ्याच्या सहापट रकमेइतका असतो आणि जर कुळें वतन नष्ट होण्याअगोदर दात्याला खंड भरत असल्याचें सिद्ध होत असेल तर साऱ्याच्या ३० पट रक्कम मिळूं शकते.

मिराशी हक्काचे जिल्हावार दाते आणि क्षेत्रः–

| | जिल्हा | दाते | क्षेत्र | |
|---|---|---|---|---|
| १ | सातारा | २६ | ४७१-१३ | एकर |
| २ | सांगली | ३ | ७३-१७ | ,, |
| ३ | धुळें | ७ | २५५-१६ | ,, |
| | | ३६ | ८००-०६ | |

हें मिराशी हक्काचें क्षेत्र एकूण जमिनीच्या २.० टक्के पडतें. आणि या जमिनीपैकीं २०० एकरांचा मोबदला भूदान समितीला मिळेल. या जमिनीचा सारा ३०२ रुपये आहे. या जमिनी चांगल्या प्रतीच्या आहेत.

## (४) एकसाली हक्काचें क्षेत्र

सरकारनें कांहीं जिल्ह्यांत–विशेषतः आदिवासी लोकांना–बऱ्याच वर्षांपासून सरकारी जमिनी एकसाली म्हणजे ११ महिन्यांच्या मुदतीनें व तुकडे न पाडण्याच्याशर्तीवर दिल्या आहेत. धुळे जिल्ह्यांत यांचें प्रमाण जास्त आहे. ज्यावेळीं या जमिनी दिल्या गेल्या, त्यावेळीं क्षेत्राचें निश्चित प्रमाण नसल्यामुळें कांहींना मोठ्या प्रमाणावर जमिनी मिळाल्या होत्या. त्यांतला कांहीं भाग ते स्वतः कशीत, कांहीं पड टाकीत, कांहीं गुजर वगैरेंना लागवडीला देत. या भागांत प्रचार करतांना 'वांटून घ्या, वांटून खा' हा विचार प्रामुख्यानें त्यांना समजावून दिला जाई. हा विचार मनाला पटल्यावर आपल्याला मिळालेला हक्क आपल्या गरीब भाऊबंदांना वांटून द्यावा ही भावना त्यांच्यांत निर्माण होई. सामुदायिक जीवनाची सवय असल्यामुळें व जमीन देण्याघेण्याची प्रथा त्यांच्यांत पूर्वीपासूनच असल्यामुळें त्यांना तें अवघड वाटत नसे. शिवाय ही जमीन त्यांच्या स्वतःच्या मालकीची नव्हती, फक्त कसण्याचा हक्क त्यांना मिळालेला होता, त्यामुळें या कसणुकीच्या हक्काच्या दानाला त्यांची तयारी होत असे. त्यांचीं अशीं दानपत्रें नोंदविण्यांत आलीं आहेत. हें क्षेत्र २४५८ एकर १३ गुंठे आहे. व तें ३९४ दात्यांचे आहे. त्यांत प्रामुख्यानें आदिवासीच आहेत.

या जमिनीचें वांटप करतांना कलेक्टर-मामलेदार यांची परवानगी लागते. तिचें हस्तांतर करण्याचा हक्क ज्यांना जमीन मिळालेली आहे त्यांना नसतो. भूदानामध्यें वांटप करतांना ज्यांना जमिनी नाहींत अशा योग्य गरजू लोकांना जमीन मिळते. याची कल्पना सरकारला असल्यामुळें त्यांनीं या वांटपाला संमति दिली आणि मदतहि केली. ८८७ एकरांचें वांटप झाल्यावर सरकारनें सर्वत्र एकसाली जमिनीचे फेर वांटप करण्याची घोषणा केली आणि त्यांची कामाला सुरुवात झाली. सरकारनें फेर वांटप करतांना ज्यांना जमीन नाहीं अशा आदिवासींना कुटुंबामागें १६ एकरांपेक्षां जास्त जमीन ठेवावयाची नाहीं आणि नव्या भूमिहीनाला १६ एकरांपेक्षां जास्त द्यावयाची नाहीं असा ठराव केला. आणि भूमिहीनांमध्यें वांटप करतांना चिठ्ठ्या टाकून निवड करण्याची पद्धति अवलंबिली. मूळच्या या

जमिनी सरकारी असल्यामुळें त्यांचें वांटप भूदान समितीमार्फत न करतां हक्क-दात्यांचीं नांवें फक्त सरकारकडे पाठविण्यांत आलीं आणि या दात्यांची अमुक जमिनीच्या हक्क-वांटपाला संमति आहे, यामुळें वांटप-काम सोपें होईल असें सरकारला कळविण्यांत आलें. सदर जमिनीपैकीं १५७० एकर जमीन 'एकसाली' या सदरांत दाखविली आहे. बाकीची वांटप-आंकड्यांत समाविष्ट आहे. एकूण जमिनीच्या ४.० टक्के क्षेत्र एकसाली होतें. हे दाते ४.० टक्के होते.

## (५) चौकशीकरितां पाठविलेलीं दानपत्रें–

मालकीच्या आणि कूळहक्काच्या संबंधांत जेथें कायदेशीर निर्णयाची आवश्यकता निर्माण झाली तेथें तीं दानपत्रें निर्णय लागेपर्यंत तशींच तहकूब ( Pending ) ठेवलीं आहेत. हें क्षेत्र ५२ दात्यांकडून मिळालेलें १०४९ एकर १२ गुंठ्यांचें आहे. यापैकीं धुळें जिल्ह्यांतील ८१० एकरांचें आहे. यांमध्यें ५०१ एकर जमीन श्री. ज. दौ. राउळ दोंडाईचे यांची आहे. त्यांच्या जमिनीच्या मालकीसंबंधीं निर्णय सरकारकडून मिळावयाचा आहे. जर ती जमीन मिराशी हक्काची नाहीं असें शाबीत झालें तर ती सर्व जमीन वांटली जाऊं शकेल. या जिल्ह्यांतील राहिलेलें ३०० एकरांचें क्षेत्र तुकडेबंदी-तुकडेजोड कायद्याच्या नांवाखालीं वांटतां येणार नाहीं असें सरकारी अधिकाऱ्यांनीं सांगितल्यामुळें वांटपाचें काम होऊं शकलें नाहीं. इतरत्र कोठें कसली अडचण आली नाहीं. कायदेशीरपणें वांटतां येईल अशी व्यवस्था होत आहे.

जळगांव, नाशिक, नगर, सांगली या जिल्ह्यांत २८ दात्यांच्या २३९ एकरांच्या जमिनी कूळहक्कामुळें सधन कुळांकडे आहेत आणि तीं कुळें त्या सोडायला तयार नाहींत. या जमिनी सधन कुळांना देणें योग्य होणार नाहीं. आणि कूळकायद्याच्या (८८-अ) कलमाप्रमाणें भूदानाच्या जमिनींना हा कायदा लागू केला गेलेला नाहीं. हा सरकारनें एक प्रकारें गरीबांना देऊ केलेला हक्क आहे. तोहि सधन कुळें त्यांना मिळूं देत नसतील तर आपण त्याबाबत त्यांना मदत केली पाहिजे असा विचार करून त्याबाबत कायदेशीर इलाज म्हणून तीं दानपत्रें महाराष्ट्र भूदान-समितीच्या नांवावर

सरकारांत नोंद करून घेण्याचें काम चालू केलें आहे आणि सरकारच्या मदतीनें या जमिनी वांटण्याचें काम होईल.

या कारणामुळें, ज्यांचें वांटप होणें शक्य आहे अशा जमिनी कायदेशीर चौकशीसाठीं वांटावयाच्या राहिलेल्या आहेत.

## (६) विक्री झालेलें क्षेत्र-

महाराष्ट्रांत मिळालेल्या जमिनीपैकीं १% जमीन ही दान केल्यानंतर दात्यानें विकून टाकलेली आढळली. जिल्हावार असे दाते आणि त्यांचें क्षेत्र माहितीसाठीं खालीं दिलें आहे.

विक्री झालेलें एकूण क्षेत्र-४०३ एकर २० गुंठे. या जमिनीचे एकूण दाते-८४

| क्रमांक | जिल्ह्याचें नांव | विक्री केली त्या दात्यांची संख्या | दानांतील क्षेत्र एकर-गुंठे |
|---|---|---|---|
| १ | पुणें | ८ | ५-१२ |
| २ | अहमद नगर | ११ | १३५-२८ |
| ३ | सोलापूर | ६ | ३२-०३ |
| ४ | सातारा | ९ | ५३-०० |
| ५ | सांगली | ३ | ९-०८ |
| ६ | कोल्हापूर | — | — — |
| ७ | रत्नागिरी | १ | १०-० |
| ८ | कुलाबा | — | — — |
| ९ | ठाणें | — | — — |
| १० | नाशिक | ५ | २८-२३ |
| ११ | धुळें | १३ | २७-२० |
| १२ | जळगांव | २८ | १०२-०६ |
| | | ८४ | ४०३-२० |

या विक्री करणाऱ्या दात्यांपैकीं कांहीं दाते असे आढळले कीं त्यांनीं जाणून बुजून जमिनीची विक्री करून टाकली. अशा दात्यांना भेटण्याचा

प्रयत्न केला त्यांतून ही गोष्ट अधिक लक्षांत आली. कांहीं थोडे दाते असे दिसले कीं त्यांनीं परिस्थितिविवश होऊन जमिनीची विक्री केली. आणि कांहीं दाते असे निघाले कीं त्यांना कूळकायद्यान्वयें जमिनीची विक्री करावी लागली. फक्त दोन दात्यांनीं जमीनविक्री केली ही गोष्ट आपण बरोबर केली नाहीं हें लक्षांत घेऊन त्याऐवजीं दुसरी जमीन दिली.

## (७) जमिनीवर मालकीच नाहीं असें क्षेत्र—

दात्यांनीं आपल्या मालकीच्या नसलेल्या ज्या जमिनी कळत वा न कळत दानांत दिल्या त्यांचे साधारणत: ४ प्रकार आढळले :–

१. जहागिरी, खोती, इनामी याखालील क्षेत्र.

२. वारसाहक्कानें दान दिलें परंतु वारसच नाशाबित झाला.

३. कायदेशीर दृष्टीनें मालकीची अत्यंत गुंतागुंत आढळली आणि त्यांतून मालकी सिद्ध झाली नाहीं.

४. दानपत्रांत नमूद केलेली जमीन दात्याच्या नांवावर नाहीं.

(१) विशेषत: नाशिक जिल्ह्यांत ज्या जहागिरदारांकडून जमिनी मिळाल्या होत्या त्या जमिनी सरकारनें सरकारजमा केलेल्या आढळून आल्या. दान देतेवेळीं या जमिनीबद्दल सरकारकडे ६ पट रक्कम 'नजराणा' म्हणून भरली गेली असती तर या जमिनी जहागिरदारांकडे राहिल्या असत्या. परंतु त्यांनीं तशा रकमा भरलेल्या नव्हत्या. दात्यांनीं ही ६ पट रक्कम आपण भरू शकणार नाहीं असें दान घेणारांना सांगितलें होतें. दान घेणारांनीं सरकारकडून अशा जमिनीबाबत योग्य ती व्यवस्था करून घेऊं असें आश्वासन दिलें होतें. परंतु त्याप्रमाणें पुढें कांहीं व्यवस्था झाली नाहीं. त्यामुळें वांटपाच्या वेळीं या जमिनींसंबंधीं कांहींच करतां आलें नाहीं. या सरकारजमा झालेल्या जमिनी आदिवासी कुळांच्याकडे आहेत आणि कूळकायद्यान्वयें थोड्याच वर्षांत कुळांच्या पूर्ण मालकीच्या होऊन जातील.

रत्नागिरी, कुलाबा या जिल्ह्यांतूनहि १०-१२ लोकांकडून खोतीच्या जमिनी मिळालेल्या होत्या. सरकारनें ही खोतीपद्धत कायद्यानें केव्हांच बंद केली आहे. आणि इतर २-३ जिल्ह्यांतून ज्या इनाम जमिनी मिळाल्या होत्या त्यावरहि त्यांची मालकी नसल्याचें दिसून आलें. अशा प्रकारें जहागिरी,

खोती आणि इनामी जमिनीचें क्षेत्र जवळ जवळ ९०० एकरांचें होतें आणि त्या ३३ दात्यांकडून मिळाल्या होत्या.

(२) दान देतेवेळीं आपल्याला वारसा-हक्कानें दान देतां येतें असें सांगून कांहीं दात्यांनीं दानपत्रें भरून दिलीं. पण पुढें त्यांचा जमिनीवर अधिकार आहे हें सिद्ध न झाल्यामुळें तीं दानें पुढें रद्द करावीं लागलीं. ४ लोकांनीं वारसाहक्कानें दान देण्याचा आपल्याला अधिकार आहे असें जरी म्हटलें होतें तरी कोर्टांतून कायद्यानें तें सिद्ध होऊं शकलें नाहीं. म्हणून त्यांची मालकी नाहीं हें स्पष्ट झालें. या ४ लोकांची जवळ जवळ २०० एकर जमीन होती.

(३) कांहीं दात्यांनीं कर्जापोटीं अल्प किंमतींत खरेदी केलेल्या जमिनी कर्ज-निवारण इ. कायद्यामुळें मूळ मालकालाच परत दिल्या होत्या. तरी भूदानामध्यें अशा जमिनींचें दानपत्र करून दिलेलें आढळलें. आणि कांहीं दात्यांची जमीन अशी होती कीं, ती जमीन त्यांची आहे हें सिद्ध करण्यासाठीं कोर्टांत गेल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. अशा स्थितींतल्या जमिनी दानामध्यें दिलेल्या आढळल्या. मालकीच्या दृष्टीनें अतिशय गुंतागुंत असल्यामुळें दात्यांना अशा प्रकारची जमीन बदलून दुसरी जमीन देण्यासंबंधीं मागणी केली. परंतु देणें शक्य असतांहि त्यांनीं तें टाळलें. त्या सदरांत जवळ जवळ ५२ दात्यांची ४०० एकर जमीन येते.

(४) कांहीं दाते असे निघाले कीं त्यांनीं दानपत्रांत नमूद केलेली जमीन प्रत्यक्षांत त्या ठिकाणीं नाहीं असें दिसलें; आणि कांहीं दाते असे दिसून आले कीं त्यांनीं दुसऱ्यांच्याच नांवावरची जमीन दिली. या जमिनीशीं त्यांचा कधींहि संबंध नव्हता. जवळपास त्यांच्या स्वतःच्याहि जमिनी नव्हत्या.

अशा प्रकारच्या जमिनी २५० एकर ३१ दात्यांच्याकडून मिळालेल्या दानपत्रांत नमूद झालेल्या होत्या. अशा दात्यांच्या बाबत जाहीर रीत्या शहानिशाहि झाली. त्यापैकीं कांहीं दाते सधन होते. या दात्यांना भेटून त्यांनीं दानाचा केलेला संकल्प पुरा करावा, ही गोष्ट त्यांची प्रतिष्ठा वाढविण्याला उपयोगी होईल हें त्यांच्या ध्यानांत आणून देण्याचा प्रयत्न केला.

एकूण जमिनीच्या ४.० टक्के जमिनीचें क्षेत्र असें भरतें आणि हे दाते १.३ टक्के होतात.

जमिनीवर दात्यांची मालकी सिद्ध झाली नाहीं अशा दात्यांची संख्या आणि त्यांचें क्षेत्र पुढें जिल्हावार दिलेलें आहे.

दात्यांची दानांतील जमिनीवर मालकी नाहीं असें एकूण क्षेत्र १७३९ एकर १२ गुंठे व दाते ११३.

| क्र. जिल्ह्याचें नांव | मालकी नसलेले दाते संख्या | दानपत्रांतील क्षेत्र ए. गुं. |
|---|---|---|
| १. पुणें | २ | ७-०८ |
| २. अहमदनगर | ३ | १०-३५ |
| ३. सोलापूर | ५ | २९-१५ |
| ४. सातारा | ४ | ७५-१९ |
| ५. सांगली | ४ | १९२-०२ |
| ६. कोल्हापूर | २ | ५-०० |
| ७. रत्नागिरी | ७ | ९७-३८ |
| ८. कुलाबा | ३ | ५४-०० |
| ९. ठाणें | – | – – |
| १०. नाशिक | ३९ | ९५३-२१ |
| ११. धुळें | १७ | ११३-३४ |
| १२. जळगांव | २७ | २००-०० |
| | ११३ | १७३९-१२ |

## (८) दात्यांना परत केलेलें क्षेत्र

जवळ जवळ २००० एकर म्हणजे एकूण जमिनीच्या ५ टक्के क्षेत्र दात्यांना परत करणें भाग पडलें. या दात्यांनीं आपलीं दानें मागें कां घेतलीं या कारणांची वर्गवारी लावणें बोधप्रद आहे. नमुन्याचीं कांहीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत. अर्थात् या सर्व वेगवेगळ्या कारणांच्या मुळाशीं मुख्य कारण जमीन देण्याची अनिच्छा हेंच दिसून येतें.

(१) कांहींनीं आपल्याला दान देण्याची इच्छा नाहीं असें स्पष्ट सांगितलें.

(२) दानपत्र भरलें त्यावेळीं सर्व्हे नंबर किंवा दिलेल्या जमिनीचा हिस्सा, चतु:सीमा वगैरे दानपत्रांत भरावयाचा तपशील लिहिला नव्हता. वांटपाच्या वेळीं या माहितीची अनेक वेळां मागणी करूनहि दात्यांनीं ती पूर्ण केली नाहीं, उलट ती देण्याचें टाळलें. अशीं दानपत्रें दात्यांना परत करण्यांत आलीं. हें क्षेत्र जवळ-जवळ ९०० एकरांचें भरेल आणि अशा दात्यांची संख्या ५२९ होईल.

(३) दान देतेवेळीं कांहीं शर्तींवर आपण दान देत आहोंत असें दानपत्र घेणाऱ्या भूदान-कार्यकर्त्याला जाणवून दिलें गेलें होतें आणि त्या शर्ती पुऱ्या न झाल्यामुळें 'आम्ही आमची जमीन द्यावयाला तयार नाहीं' असें चार पांच गांवांच्या ६०-६५ दात्यांनीं कळवून आपलीं दानें परत घेतलीं. हें क्षेत्र जवळ-जवळ ३०० एकरांचें होईल.

(४) कांहीं दाते वांटप होण्यापूर्वीं मृत्यु पावले. त्यांनीं जमीन भूदानांत दिली होती हें त्यांच्या वारसदारांनीं कबूल केलें पण 'आतां आमची इच्छा नाहीं' असें त्यांनीं सांगितलें आणि कांहींजणांनीं दानाबद्दल कानांवर हात ठेवले.

(५) वांटपाच्या वेळीं कांहीं दाते असे भेटले कीं ते म्हणाले दान दिलें हें खरें आहे, परंतु मुलाची आणि घरांतील लोकांची इच्छा नाहीं त्यामुळें माझा नाइलाज झाला आहे. अशा रीतीनें त्यांनीं आपलें दान मागें घेतलें. हें दाते २९ होते आणि त्यांचें क्षेत्र २१५ एकरांचे होतें.

(६) मला विचार पटला म्हणून मी माझ्या वांटयाला येणाऱ्या जमिनीपैकीं हिस्सा दिला. परंतु इतर हिस्सेदार वाटून देत नाहींत म्हणून ही दिलेली जमीन तुम्हांला वांटण्यासाठीं मला देतां येत नाहीं; ज्यावेळीं माझ्या हिश्शाची जमीन मला मिळेल त्यावेळीं देईन, असें आश्वासन देणारे कांहीं दाते निघाले. अशा दात्यांच्या जमिनी १०० एकरांच्या आसपास होत्या.

(७) कायद्यामुळें सर्व जमिनी मुलाच्या नांवावर करून टाकल्या त्यामुळें आतां माझ्या नांवावर द्यायला जमीन नसल्यामुळें देतां येत नाहीं, असें उत्तर देऊन जमिनीचें वांटप करण्याचें टाळलें. असे दाते ३२ निघाले.

(८) कांहीं ठिकाणीं असें दिसून आलें कीं दान देणारांनीं जमीन आपसांत वांटप करून घेतली. वांटपाचे वेळीं समाईक जमीन कोणती न ठेवल्यामुळें कोणाची कोणती जमीन द्यायची असा प्रश्न उभा राही. दात्यांनीं उत्तर देण्याची तयारी दाखविली नहीं. अशा तऱ्हेनें दान परत घेतलेले दाते १२ निघाले आणि त्यांनीं दिलेलें क्षेत्र ७० एकरांचें होतें.

(९) दान दिल्यानंतर भूदान समितीची सरकार-दप्तरी नोंद न झाल्यामुळें, कुळकायद्यान्वयें कांहीं दात्यांच्या कुळाकडील जमिनीच्या विक्रीचा व्यवहार झाला. अशा व्यवहारांतील रक्कम दात्यांच्या हातांत आली नव्हती, तरी "ही जमीन त्या कुळाला तशीच देऊन टाका किंवा ती विक्रीची रक्कम भूदानाच्या कामासाठीं देण्याची व्यवस्था करा" असें समितीकडून सुचविण्यांत आलें. परंतु कोणतीच तयारी दिसली नाहीं. अशा प्रकारें दानांतला संकल्प मागें घेणारे १०० एकरांचे २२ दाते होते.

(१०) कांहीं दात्यांनीं जमीन खरेदी करून दान देण्याचें जाहीर केलें होतें. त्या दात्यांना भेटून अशी जमीन वांटण्याला उपलब्ध करून द्यावी अशी विनंति करण्यांत आली. ज्यांना स्वतःची जमीन नव्हती त्यांनीं असा जो संकल्प केला होता त्यांना असें सुचविण्यांत आलें कीं जमीन खरेदी करून देणें, जमीन मिळत नसल्यामुळें म्हणा अगर अन्य कारणामुळें म्हणा शक्य नसेल तर जमीन खरेदी करण्यासाठीं जी रक्कम आपण वापरणार आहांत ती रक्कम तुम्ही ज्या लोकांना जमीन वांटलेली आहे त्यांना साधनें खरेदी करण्यासाठीं द्या. फक्त एका दात्यानें केलेला संकल्प पुरा केला. बाकीच्यांनीं उघड दान मागें घेतलें.

तीन दाते असे दिसले कीं, ज्यांना स्वतःची जमीन असतांनाहि जमीन विकत घेऊन दानाची पूर्तता करण्याचें त्यांनीं योजिलें होतें. त्यांना स्वतःच्याच मालकीच्या जमिनींतील थोडा कां होईना हिस्सा देण्याबद्दल सांगितलें. परंतु त्यांनीं स्वतःची जमिनहि दिली नाहीं, विकत घेऊनहि दिली नाहीं आणि जमिनीचे खरेदीसाठीं ठरविलेली रक्कमहि उपयोगांत आणली नाहीं.

(११) 'वांटप करण्यास उशीर झाला तेव्हां आतां दान देण्याची माझी तयारी नाहीं हें दानपत्र रद्द करा' अशा प्रकारची पत्रें २ दात्यांनीं

भूदान समितीला लिहिलीं. त्यांचा दान न देण्याचा आग्रही सूर असल्यामुळें हीं दानें परत केलेल्या सदरांत घातलीं आहेत.

निरनिराळ्या जिल्ह्यांमधून अशा दात्यांचें आणि त्यांच्या क्षेत्रांचे आंकडे काय आहेत याची कल्पना यावी म्हणून पुढें दिलेले आहेत.

दात्यांना परत झालेलें एकून क्षेत्र :– २०६४-४, दाते ७२१.

| क्रम जिल्ह्याचें नांव | दान परत झालेले दाते संख्या | त्यांनीं दिलेले क्षेत्र ए. गुंठे |
|---|---|---|
| १. पुणें | १० | २३-२२ |
| २. अहमदनगर | ५६ | १३७-३४ |
| ३. सोलापूर | ३४ | ८७-१६ |
| ४. सातारा | १६ | १५९-०५ |
| ५. सांगली | ८ | ३१-२४ |
| ६. कोल्हापूर | ७ | ५४-१७ |
| ७. रत्नागिरी | २४ | ३५-०९ |
| ८. कुलाबा | १३ | ४६१-३६ |
| ९. ठाणें | ३६ | १०८-०० |
| १०. नाशिक | ६८ | १५०-०६ |
| ११. धुळें | ३९ | ९९-३५ |
| १२. जळगांव | ४१० | ७१५-०० |
| | ७२१ | २०६४-०४ |

## : १५ :

# कार्य-संघटन

प्राप्त झालेल्या जमिनीपैकीं साधारणतः सव्वीस हजारावर जमीन जी वांटली गेली व जी वांटली गेली नाहीं तिचा तपशील येथवर दिला. आतां वांटपाच्या कामाची पद्धति व त्यांतून आलेल्या अनुभवासंबंधीं थोडें विवेचन करणें इष्ट होईल. यांतून लोक-मानस प्रदर्शित होण्याला मदत होईल असें वाटतें.

बांटपाचें काम उरकण्याकरितां अनुभवानें ज्या वेगवेगळ्या पद्धति मी हातीं घेत गेलों त्यांत प्रथम एक तालुका घेऊन तो पुरता करायचा असा तालुकापातळीवरचा प्रयोग नाशिक जिल्ह्यांत अजमावला.

नाशिक जिल्ह्यांत एकूण ३६०० एकरांचें भूदान झालें आहे. त्यांतील बागलाण तालुक्यांत मिळालेली ८९२ एकर ३ गुंठे जमीन प्रथम वांटायची ठरवली होती.

दान मिळालेल्या प्रत्येक गांवांतून कसें जातां येईल, त्यासाठीं किती काळ लागेल, इतरांची मदत कशी घेतां येईल व इतरांना मदत कशी देतां येईल, जमिनीबाबत कशा प्रकारच्या व कोणकोणत्या अडचणी काय प्रमाणांत उभ्या राहतात, हें सर्व लक्षांत यायचें असेल तर कामाला फार मोठें म्हणजे जिल्ह्याचें, किंवा फार लहान म्हणजे गांवापुरतें, क्षेत्र घेऊन उपयोगी नाहीं, तालुका घेणें जास्त उपयुक्त होईल हें ध्यानीं घेऊन या जिल्ह्यांतील बागलाण तालुका वांटपाच्या प्रयोगासाठीं प्रथम घेतला.

### (१) तालुका-पातळीवरचा बांटप-प्रयोग–

मिळालेली ही सर्व जमीन सलग अशा गांवांतून नसल्यामुळें दान मिळालेल्या गांवांचें सोयिस्कर असे ५ गट बनविले :

| | | |
|---|---|---|
| १. सटाणें गट : | गांवें | ९ |
| २. डांग-सौदाणें गट : | गांवें | १२ |
| ३. साल्हेर-मुल्हेर गट : | गांवें | १२ |

४. ताहराबाद गट : गांवें ९
५. नामपुर गट : गांवें १०

एकूण गांवें ५२

या तालुक्यांत जीं दानें झालीं आहेत त्यांचे दाते दान दिलेल्या जमिनीच्या गांवांतून किंवा वरील गट पाडलेल्या प्रमुख गांवांतून राहात असल्याचें दिसून आलें. त्यांना भेटणें, त्यांच्याकडून दानाची निश्चिती व जमिनीची माहिती करून घेणें, तसेंच वांटपाच्या कार्यक्रमाला त्यांनीं हजर राहावें असा प्रयत्न करणें, त्याशिवाय पाटील-तलाठी यांच्याकरवीं जमिनीचें क्षेत्र, सरकारी आकार, पीक-पाणी व कब्जा यांची माहिती गोळा करणें, त्या जमिनींत जर कुळ असेल तर त्याच्याकडे त्याची स्वत:ची अगर कूळहक्काची इतर जमीन किती आहे किंवा नाहीं ही माहिती पुरती मिळविणें, हीं कामें अगोदर आम्ही केलीं.

यानंतर दाते, पाटील-तलाठी व अन्य स्थानिक कार्यकर्ते यांची एक बैठक घेऊन त्यांना वांटप-पद्धति व कार्यक्रम समजावून देऊन त्या गटांतील सर्व गांवांतून जाण्याचा कार्यक्रम आंखून घेतला. ह्या मंडळीपैकीं जे जे बरोबर येतील त्यांना घेऊन ठरलेल्या गांवीं जायचें आणि वांटप-सभा घडवून आणायची. त्यापूर्वी प्रमुख गांवीं जर भूदान मिळालेलें असेल तर तेथें प्रथम वांटपाचा कार्यक्रम केल्यानें आजूबाजूच्या गांवांतून वांटपाच्या कार्यक्रमाची व वांटपाच्या पद्धतीची बातमी त्वरित सर्वत्र आपोआप पसरत असे. त्यामुळें कांहीं गांवांत वांटपाची पूर्वतयारी होण्याला मदत होत असे. अशा तऱ्हेनें वांटपाच्या पूर्वतयारीची पद्धत पडत गेली आणि ही पद्धत फार सोयीची झाली. गांवांत गेल्यावर दवंडी देण्यांत येई आणि त्यानंतर वांटपाच्या कार्यक्रमास सुरुवात होई.

या पद्धतीनें पांची गटांतील ५२ गांवें पुरीं करण्यास २१ दिवस लागले. ५२ सभा झाल्या. त्यांपैकीं ४८ गांवांतून वांटपाचें काम झालें. चार गांवांतून स्थानिक अडचणीमुळें वांटप होऊं शकलें नाहीं. या तालुक्यांत दानांत मिळालेल्या ८९२ एकर ३ गुंठे जमिनीसंबंधीं जो एकूण निकाल लागला तो असा--

अनुक्रम 33७८८ दि:
क्रमांक नों: दि: १७-१०-८२


| एकर गुंठे | |
|---|---|
| ६११–०५ | १३७ कुटुंबांना वांटली. |
| ९४–०९ | वांटण्याला योग्य नसलेली म्हणून दात्यांना परत. |
| १३–०८ | दात्यांनीं विकली म्हणून रद्द. |
| ११५–०० | दानपत्रांत चुकीची नोंद सबब कमी. |
| ३६–०० | दुसऱ्या तालुक्यांतील जमीन. |
| ४२–२१ | वांटावयाची राहिलेली जमीन. |
| ९१२–३ | |

( हा आंकडा एकूण दानपत्रांतील आंकड्यापेक्षां २० एकरांनीं जास्त दिसतो, ती अधिक जमीन वांटप-कार्यक्रमांत मिळाली आहे. )

एक महिन्याच्या अनुभवानंतर एका तालुक्यांतील प्रत्यक्ष वांटपाचें काम करीत असतांना दुसऱ्या तालुक्याचें पूर्वतयारीचें काम मी करवून घेऊं लागलों, यामुळें कामाचा उरक वाढला. अर्थात् त्याकरितां अधिक सहकारी जमा करावे लागले. जी पद्धति तालुक्यांत तीच पुढें वाढवून पुढें दिलेला जिल्हा पातळीवरचा प्रयोग अमलांत आणला. जिल्हा पातळीवरचा प्रयोग सोलापुर जिल्ह्यांत चांगला अमलांत आला. म्हणून तो नमुन्यादाखल पुढें देत आहें :

## (२) जिल्हा-पातळीचा प्रयोग–

पश्चिम महाराष्ट्रामध्यें सोलापुर, नाशिक, पुणें या तीन जिल्ह्यांत भूदानाचें काम सतत करणारा कार्यकर्ता नव्हता. या जिल्ह्यांत भूदानाचें काम तसे थोडेंफार झालें आहे, परन्तु कामाला जसें रूप यायला पाहिजे तसें येवू शकलेलें नाहीं. नाशिक जिल्हा संपल्यावर सोलापुर जिल्ह्याच्या कामाला सुरुवात केली. तिथल्या कलेक्टरना भेटलों. कूळकायदा लागू असतांना सुद्धां कायद्याला धरून भूदानांत मिळालेल्या जमिनीचें वांटप होऊं शकतें, या कायद्यानें जमीनमालक झालेल्या कुळाच्या ताब्यांतील भूदानाची जमीन काढून ती जमीन नसलेल्या भूमिहीनांना देता येतें, हें सर्व त्यांना माहीत नव्हतें; त्यांना ते समजावून दिल्यानंतर त्यांनी ताबडतोब वांटपाच्या कामासाठीं मागितली तेवढी सर्व मदत आम्हांला देण्याचे आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांना हुकुम दिले.

आम्ही त्यांच्याकडे दोन प्रकारची मदत मागितली–एक, तालुक्यांतल्या महसूल-अधिकाऱ्यांना कळवून, जमिनीची आवश्यक ती माहिती ताबडतोब आम्हांला पुरवावी, आणि दुसरी, ज्या गांवांत जमीन आहे, त्या गांवीं वाटपाच्या सभेची व्यवस्था आणि गांवांतल्या लोकांना दवंडी देऊन माहिती देण्याची व्यवस्था करावी आणि सरकारी प्रतिनिधी कोणी-ना-कोणी हजर ठेवावा. कलेक्टरमहाशयांनीं सर्व मामलेदारांना योग्य त्या सूचना ताबडतोब देण्याची व्यवस्था केली.

या जिल्ह्यांत वांटपाचें काम करतांना तीन उद्देश पुढें ठेवले होते (१)ठराविक मुदतींत योजनाबद्ध कार्यक्रम ठरवून तो पार पाडणें, (२)वांटपांचें काम लोकांच्या शक्तीवर–विशेषतः भूदाते, संपत्तिदाते आणि सहानुभूति राखणारे यांच्याद्वारा–पूर्ण करणें, आणि (३) या निमित्तानें भूदानयज्ञाच्या विचाराचा प्रचार करणें.

त्याप्रमाणें तालुकावार ४० दिवसांचा कार्यक्रम आंखून तो जिल्हाभर प्रसिद्ध केला. विनोबाजींच्या कामाबद्दल 'सोलापूर समाचार' या दैनिकाला विशेष आस्था वाटते. या दैनिकामध्यें सतत ३-४ दिवस जमिनीच्या वांटपासबंधींच्या माहितीचे लेख प्रसिद्ध केले. तिकडे मामलेदारांनीं त्यांना कळविल्याप्रमाणें त्या-त्या तालुक्यांतील गांवांतून कार्यक्रमहि कळवून टाकले. कार्यक्रम व्यवस्थित जाहीर झाल्यामुळें, भू-हीन, भूदाते, सरकारी कर्मचारी इत्यादींना वांटप-कार्यक्रमाची आगाऊ व नीट माहिती मिळाली. वांटपाच्या कार्यक्रमाबरोबरच वांटपाच्या पद्धतीसंबंधींहि योग्य ती माहिती वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यांत आल्यामुळें त्यासंबंधींहि कोणाचे आक्षेप राहिले नाहींत. जशी सरकारमार्फत मदत घेण्याची व्यवस्था झाली तशीच भूदात्यांनाहि त्यांच्या जमीन-वांटपाच्या कार्यक्रमाची तारीख कळविण्यांत आली. आणि 'तुमच्या हस्ते वांटपाचें हें काम होणार आहे; तेव्हां या कार्यक्रमाला अवश्य उपस्थित व्हावें आणि शक्य झालें तर सभेची आणि वांटप चांगल्या रीतीनें होईल अशी व्यवस्था करावी', अशी विनंति केली. त्याचा परिणामहि चांगला अनुभवाला आला. मोठ्या संख्येनें दात्यांनीं जमीनवांटपाच्या कामाची पूर्वतयारी केली आणि स्वतःहि हजर राहून वांटपाच्या

कामांत मदत केली. हा विशेष या जिल्ह्यामध्यें पहावयास सांपडला. खुद्द दात्यांच्या प्रयत्नांनीं वांटप या प्रकारें होऊं शकतें हा प्रयोग येथें सफल झाला.

रोज सामान्यपणें ३ गांवांतील वांटप व्हावें अशी दृष्टि ठेवूनच तालुकावार कार्यक्रम आंखले होते. पावसाळ्याचे दिवस आणि रस्त्यांचें स्वरूप लक्षांत घेऊन कार्यक्रम बनविले होते. त्यामुळें कार्यक्रम पार पडतांना अडचणीं येवूनहि नडलें नाहीं. गांवांतल्या कोणाचीहि ओळख नाहीं, दात्यांचा परिचय नाहीं; आणि तालुक्यांतील पुढाऱ्यांपैकीं कोणी मदतीला नाहीं अशी स्थिति असतांनाहि सगळीकडे गांवांतल्या मंडळींनीं अत्यंत आपुलकीची व प्रेमाची वागणूक दिली.

सभेंत वांटपाच्या कामाची पद्धति समजावून दिल्यावर व आंदोलनाची भूमिका मांडल्यावर हरतऱ्हेची मदत त्वरित मिळत असे. राजकीय पक्ष-प्रमुखांना किंवा त्यांच्या पक्षांतील कार्यकर्त्यांना अमुक राजकीय पक्षाचे म्हणून नव्हे तर व्यक्तिगत नात्यानें भूदानाचे चाहाते म्हणून त्यांनीं मदत करावी अशी व्यक्तिगत विनंति केल्यानंतर तिचा उपयोगहि चांगला होत असल्याचें दिसून आलें. अगोदर उदासीनता दाखविणाऱ्या जिल्हा-पुढाऱ्यांकडूनहि पुढें मदतीचें आश्वासन मिळालें.

या जिल्ह्यामध्यें ४० दिवसांचा कार्यक्रम जसा ठरविला होता तसा पार पडला. रोज ३०-४० मैलांचा प्रवास झाला. कधीं पायीं, कधीं सायकलनें, कधीं एस. टी. नें, कधीं होडीनेंहि. चंद्रभागेची मधून-मधून भेट व्हायची. रोज सकाळपासून रात्रीं एकदीड वाजेपर्यंत काम चालायचें. पावसामुळें कोठें-कोठें अडथळे आले, पण त्यानें सोयहि झाल्याचें दिसून आलें. कारण पाऊस पडलेला असला कीं, हटकून लोक सभेला मोठ्या संख्येनें जमायचे आणि वांटपाचें काम रंगायचें.

तिसरा हेतु आंदोलनाच्या प्रचाराचा होता. तोहि पुष्कळ साधला असें म्हणतां येईल. नवीन भूदानहि ६३ एकर मिळालें. आणि ४० दिवसांत १२०० रुपयांचें वाङ्मय विकलें. याशिवाय भूदान पत्रिकांचे ग्राहकहि नोंदविले गेले.

या जिल्ह्यांत वांटपाच्या कामाकरितां जो कांहीं थोडा फार खर्च आला तो भूदाते आणि संपत्तिदाते यांनींच केला. या जिल्ह्यांतील प्रयोगांतून आणि अनुभवांतून हें स्पष्ट झालें कीं, जनतेच्या सर्व थरांत या कामाविषयीं, अर्थात् विनोबाजींच्याविषयीं, अतिशय सद्भाव आहे, त्यामुळेंच हा सर्व कार्यक्रम जवळ-जवळ जनाधारित स्वरूपांत पार पडला.

### ( ३ ) तिसरा प्रयोग कोंकण विभागांतील–

वांटपाची वेगळी एक पद्धति कोंकण भागांत स्वीकारावी लागली. कोंकणची शेती इतर ठिकाणापेक्षां अगदीं भिन्न आहे. या भागांत कुळांच्या ताब्यांत असलेल्या जमिनीचें प्रमाण जास्त होतें. कूळ-कायद्यामुळें अनेक अडचणी सरकारपुढें, दात्यांच्या पुढें आणि कुळांच्या पुढें निर्माण होऊन त्या वाढू लागल्या होत्या. ही स्थिति लक्षांत आल्यावर प्रथम दानपत्रें सरकारी दप्तरांत नोंदीसाठीं पाठवून तीं नोंदून घेण्याची व्यवस्था केली. त्यामुळें कूळ-कायद्यान्वयें कुळाच्या ताब्यांतील जमिनीच्या विक्रीच्या किंमती ठरविण्याची जीं कामें चालू होतीं तीं थांबलीं. दात्यांची इच्छा नसतांनाहि त्यांनीं जमिनीची विक्री केल्याचा जो आक्षेप त्यांच्यावर येण्याची भीति होती ती दूर झाली आणि कुळांना अशा जमिनीचा (भूदानांतील जमिनीचा) मोबदला जमीन-मालकांना द्यावा लागणार होता त्याची गरज राहिली नाहीं. नोंदीनंतर वांटपाचें काम करण्यांत आलें. या प्रयोगांत, गांवगटाच्या मुख्य ठिकाणीं त्या गटांतील सर्व गांवांच्या लोकांना पाचारण करून आणायचें आणि त्या-त्या गांवचें वांटपाचें काम तेथेंच त्यांचे समक्ष करायचें, अशी रीत आम्हीं पत्करली. अर्थात् या पूर्वीची जमीनीसंबंधींची व जमीन घेणारासंबंधींची तयारी त्या गांवांतील दाते आणि कार्यकर्ते यांच्यावर सोपविली होती. या भागांतील वांटपाचा प्रश्न एक प्रकारें सोपा होता, कारण येथें बहुतांशीं बिनजमीनवाल्या कुळांच्याकडेच वहितीखालीं जमिनी होत्या व त्या त्यांनाच वांटायच्या होत्या. परंतु जमिनीच्या मालकी हक्काच्या दृष्टीनें रत्नागिरी जिल्ह्याइतका गुंतागुंतीचा आणि अवघड प्रश्न इतरत्र आढळला नाहीं म्हटलें तरी चालेल.

वांटपाच्या कामांत दात्यांच्याशिवाय कितीतरी निरनिराळ्या क्षेत्रांतील परिचित-अपरिचितांना सहकार्यासाठीं हांक द्यावी लागली, आणि या कामाच्या प्रेमामुळें आणि विनोबाजींविषयींच्या आदरामुळें सर्वांनीं आस्थापूर्वक या हांकेला ओ दिली.

एकंदर वांटपाच्या कामांत सरकारी खात्याचें साहाय्य आवश्यक असतें आणि सरकारचें धोरण भूदानाला साहाय्य करण्याचें असल्यामुळें सरकारी खात्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांचें साहाय्य व सहकार्य आम्हांला मिळत गेलें. परंतु त्यांतसुद्धां कांहीं सरकारी अधिकाऱ्यांनीं विशेष आस्थापूर्वक आणि स्वतः कष्ट घेऊन साहाय्य केलें ही लक्षांत घेण्याजोगी गोष्ट वाटली.

वांटपासाठीं बोलाविलेल्या सभांना लोक मोठ्या संख्येनें जमत आणि वांटपकार्यांत भाग घेण्यास तत्पर राहात. सभा चारचार, पांचपांच तास चाले. शेवटपर्यंत लोक न कंटाळता बसत, कसलाहि आवाज नाहीं, गोंधळ नाहीं, शांत चित्तानें सारें ऐकत आणि कामांत भाग घेत. अत्यंत शिस्तीनें हा कार्यक्रम पार पाडण्यास त्यांची मदत होत असे. यामुळेंच जमिनीचा ताबा नव्या भूमिधारकाला बिनतक्रार देता आला. अपवाद म्हणूनच कांहीं ठिकाणीं अडचणी आल्या. तसेंच जमिनीचा उभ्या पीकासह ताब देणारे दातेहि आढळून आले.

कांहीं गांवांतून जमीन मिळालेली असूनहि तिचें वांटप करतां आलें नाहीं, तरी भूमिहीनांच्या मनांत निराशा आलेली दिसली नाहीं. उलट गांवांतले भूदान देण्यासारखे लोक बोलून दाखवीत कीं 'बाबांनो, तुम्हांला आज ना उद्या जमीन मिळणारच आहे. आम्ही आज जरी देत नसलों तरी उद्या आमच्या जमिनींतलीच जमीन तुम्हांला द्यावी लागणार आहे.'

वांटपाच्या ज्या एकूण सभा झाल्या त्यांपैकीं ८० टक्के सभांतून भूमिहीनांनीं आपसांत एकमतानें निर्णय घेतले, २० टक्के सभांतून चिठ्या टाकून निर्णय घ्यावे लागले.

वांटपाच्या कामासाठीं येणाऱ्या खर्चाची व्यवस्था महाराष्ट्र सेवा संघानें केली होती. गेल्या दीड वर्षांत वांटपाच्या कामाला जो खर्च आला तो (एकूण झालेल्या वांटपाशीं) एकरीं सरासरी तीन आणे पडला. हा खर्च

त्या त्या जिल्ह्यांतील भूदाते व संपत्तिदाते यांचेकडूनच व्हावा असा प्रयत्न केला, परंतु तीन जिल्ह्यांतच तशी व्यवस्था होऊं शकली, इतरत्र नाहीं.

गांवांतील सज्जनांचा पाठिंबा घेऊन नैतिक शक्तीनें होत असलेलें हें वांटपाचें काम जनमानसावर चांगला परिणाम घडवितें. वाटपाचें काम चालू असतांना २०० एकर नवीन भूदान मिळालें आणि त्याचें तेथल्या तेथें वांटपहि करून टाकण्यांत आलें. याच काळांत पांच हजार रुपयांचें भूदान-वाङमय विकलें गेलें. या वांटपाच्या सभांमधून दारूबंदी, अस्पृश्यता-निवारण, कोर्टाची पायरी न चढण्याच्या प्रतिज्ञा, सहकारी चळवळ वगैरे विषयांवरहि भर दिला जाई. आदिवासी विभागांत सभेंतून "आम्ही आमच्या बायकांना मारहाण करणार नाहीं" अशा शपथा घ्यायला लावण्याचे कार्यक्रमहि घडवून आणण्याचा प्रयत्न झाला.

सर्वांगीण जागृतीच्या प्रयत्नाचाच जणूं जमीन-वांटप हा एक कार्यक्रम ठरला. मात्र येथें हें नमूद करणें अवश्य वाटतें कीं वांटपाच्या कामांत जी एक प्रकारची चालढकल किंवा उपेक्षा कांहीं कारणामुळें कां होईना झाली, तिच्यामुळें आंदोलन पुढें वाढवीत नेण्यास मदत झाली नाहीं. हें वांटपाचें काम यापूर्वी झालें असतें तर–

(१) आंदोलनाच्या (प्रयोगाच्या) व्यावहारिक उपयुक्ततेबद्दल विचारवंतांच्या मनांतील साशंकपणा दूर होण्यास बरीच मदत झाली असती.

(२) प्रचाराच्या कामाला आणि संकल्पसिद्धीसाठीं हें बळ उपयोगी आलें असतें.

(३) दाता व नवीन शेतकरी यांचें संघटन बनूं शकलें असतें.

(४) जमीन मिळणाऱ्यांना साधनदानाची अणि इतर मदत मिळ-ण्याच्या दृष्टीनें कांहीं निश्चित पाऊल पडलें असतें.

(५) वांटपाच्या कामांत अडचणींचें प्रमाण कमी आलें असतें. उदा. कूळकायद्यामुळें, कब्जा, विक्री इ. मुळें आलेल्या अडचणीं.

(६) त्यामुळें वांटप-क्षेत्राचें प्रमाण अधिक वाढलें असतें.

(७) दान दिलेल्या दात्यांकडून दान वाढवून मिळालें असतें.

वांटपाच्या त्या काळांत जें भूदान मिळालें त्यापैकीं निम्मे दात्याकडून वाढवून मिळालेलें आहे.

(८) भूदानांत भर पडली असती.

: १६ :

## वितरणांतून झालेलें मानस-दर्शन

भूदान यज्ञाच्या कामांत जमीन वांटपाचा विषय हा जरी मेहनतीचा आणि जिकीरीचा असला तरी तितकाच उद्‌बोधक, रोमहर्षक आणि क्रांतिकारी आहे हें आढळून आलें. लोक-जागृतीचें फार मोठें साधन जमीन-वांटपाचा कार्यक्रम हें आहे. यांत जमीन साक्षात्‌ ताब्यांत दिली जाते त्या क्षणापर्यंत जो अकिंचन, कंगाल, केवळ शेतमजूर म्हणून जीवन कंठणारा असतो, तो वांटप होतांच गांवांतील इतरांप्रमाणें एक जमीन-धारक बनतो. त्यामुळें त्याला लगेच प्रतिष्ठा प्राप्त होते. तिची जाणीव त्याच्या चेहऱ्यावर चमकते. गांवच्या लोकांची सहानुभूति आणि सहाय्य त्याच्याकडे वळतें. अनेक भूमिहीनांच्या अंतःकरणांत आशेची ज्योत तेवूं लागते. तसेंच अनेक जमिनवाल्यांच्या विवेकबुद्धीला कर्तव्याची आणि न्यायाची जाणीव स्पर्श करते.

जमीन-वांटपाची सभा आहे हें समजतांच गांवांत सर्वत्र कुतूहल निर्माण होतें. वर्षानुवर्षें जे दरिद्री शेतमजूर आहेत अशांना मोफत जमिनी मिळणार आहेत हें लोकांना खरेंच वाटत नाहीं. ज्या जमिनीपायी दोन सख्खे भाऊ वर्दळीला येतात, क्वचित प्रसंगीं खूनहि होतात, ती जमीन फुकटाफुकटी कोण कुणाला देणार असें लोकांना वाटतें. सारा गांवसमाज बायकांमुलांसह एकत्र जमतो. सभेला सुरुवात होते. ही जमीन कशी

मिळाली, ती देण्यांत दात्याच्या मनांतला काय हेतु आहे, ती कशी वांटायची आहे ही सर्व माहिती सभेला प्रारंभीं दिली जाते. सभेपुढें दोन प्रश्न येतात : एक, भूमिहीन म्हणून कोणाला म्हणायचें ? विनोबाजींनीं तीन शर्ती सांगितल्या आहेत– (१) ज्याला मुळींच जमीन नाहीं व ज्याला शेतीखेरीज दुसरा कसलाहि धंदा नाहीं, (२) ज्याची शेत करण्याची इच्छा आहे आणि (३) ज्याला कसता येतें अशा शेतमजुराचा तिच्यावर हक्क मानला आहे. असे भूमिहीन सभेच्या मान्यतेनें बाजूला एकत्र होतात : जेव्हां या भूमिहीनांची संख्या जास्त आणि वांटायची जमीन कमी असते तेव्हां दुसरा प्रश्न निर्माण होतो कीं, आतां निवड कोणाची करायची ? विनोबाजींनीं नियम घालून दिला आहे कीं, भूमिहीनांनीं आपसांत ठरवून जास्तींत जास्त गरजू असेल त्याची निवड करायची. निवड करतांनाच पक्षपात होण्याचा संभव असतो. सर्व भूमिहीनांवरच हें निवडीचें काम सोपविल्यामुळें पक्षपाताला अवकाशच राहात नाहीं. 'एकत्र बसून, आपसांत विचार करून निवडीचें काम करा' असें त्यांना सांगितल्यावर त्यांना वाटतें 'हें कसें काय जमणार ?' बसलेले सारेच गरीब असतात; सगळ्यांनाच जमिनीची गरज असते, इच्छा असते. आणि तसें ते बोलूनहि दाखवितात. गांववालेहि सांगूं लागतात: 'अहो, ते काय निर्णय घेणार?' परंतु भूमिहीनांना वरील शर्ती समजावून देऊन 'जास्तींत जास्त गरजूंची तुम्हीच निवड करायची आहे' म्हटल्यावर ते विचार करूं लागतात. प्रथम त्यांच्या मनांत आपल्यांतला जास्तींत जास्त गरीब कोण याचा शोध सुरू होतो. त्या शोधाबरोबर मनांतील स्वार्थभावना त्या प्रमाणांत विरघळूं लागते. स्वार्थ उसळून आपण खोटें बोलूं तर समोर आपलाच गांवसमाज बसला आहे याची जाणीव असते. त्यांच्या मनांत विचारांची अशी उलथापालथ होत असतांनाच जमलेल्या गांवसमाजाच्या मनांतहि जास्तींत जास्त गरजूचा शोध सुरू असतो. आपल्यापेक्षां जो जास्त गरजू त्याला आधीं मिळालें पाहिजे हें सर्वांना पटत असतें, तसें तें गरीबांनाहि पटतें. त्यांना समजायला वेळ लागतो, पण समजल्यावर ते उठतात आणि बोलायला लागतात: "मला जमीन नको, अमक्याला आधीं द्या." ही त्यांच्या अंतःकरणांतील प्रगट झालेली स्वार्थनिरपेक्षता, कारुण्य,

उदारता इतरांनाहि विचार करायला लावणारी ठरते. एकेक उभा राहून दुसऱ्याचें नांव सांगतो आणि आपलें नांव मागें घेतो. अशा रीतीनें अनेक भूमिहीन आपली नांवें मागें घेत जातात आणि शेवटीं योग्य त्या भूमिहीनाची निवड आपोआप होते. पुष्कळ वेळां तो बिचारा गप्पच बसलेला आढळतो. एकमत झालें नाहीं तर लहान मुलाच्या करवीं चिठ्ठ्या उचलून निर्णय लावला जातो. आतांपर्यंत एकूण वांटपाच्या ज्या सभा झाल्या त्यांपैकीं ८० टक्के सभांतून भूमिहीनांनीच एकमतानें निर्णय घेतले आहेत.

वांटपाच्या कामांत जे अनुभव आले त्यांतले कांहीं अगदीं निवडक व मनोरंजक अनुभव पुढें मुद्दाम दिले आहेत. या पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणांत चिनी कम्युनिस्टांनीं जमीन वांटपाकरितां भरविलेल्या सभा आणि हिंदुस्थानांतील भूदान-यज्ञाच्या वांटपाच्या सभा या दोहोंची तुलना लोकशाहीच्या अभ्यासूला बोधप्रद होईल.

## (१) न्यायडोंगरी येथील वांटप

सकाळची वेळ होती. जमीनवांटपाची पुन: एकवार दवंडी झाली. न्यायडोंगरी गांवचे लोक सभास्थानीं जमूं लागले. जमीन असलेले नसलेले सारेच मोठ्या संख्येनें जमले. गांवांत दोघा दात्यांनीं १२ एकर जमीन दिली होती. तेहि सभास्थानीं हजर झाले. मामलेदार त्या सभेसाठीं मुद्दाम आले होते. सभेला सुरुवात झाली. भूदानाचें आंदोलन कशासाठीं चाललें आहे हें समजावून सांगण्यांत आलें. दिलेल्या दोन जमिनींपैकीं एका जमिनीवर एक भिल्ल कूळ होतें. ही जमीन एका भाविक शेटजींनीं दान दिली होती. दुसरी श्री पाटील यांनीं दिलेली जमीन त्यांच्या स्वत:च्याच ताब्यांत होती. तिच्या वांटपाबद्दल अडचण नव्हती. ज्या जमिनीवर कूळ होतें तोहि शेतकरी सभेंत हजर होता. गांवकऱ्यांच्या हजेरींत स्वत:ला भूमिहीन म्हणविणारे ४२ लोक एका बाजूला झाले. ज्या जमिनीवर कूळ होतें व ज्याला स्वत:ची अन्य जमीन होती त्याला विनंति करण्यांत आली कीं, त्यानें दानांतल्या जमिनीवरील हक्क सोडावा. त्याचें म्हणणें काय आहे हें त्यानें सभेपुढें सांगावें असें आम्ही त्याला सांगितलें. तो उभा राहिला आणि सांगूं

लागला– दाताहि समोर बसला होता : "या शेटजीच्या घरांत माझी सारी हयात गेली. याच्या चांगल्या-वाईट कामांत मी आतांपर्यंत मदत केली आहे. अनेक उपकार त्यानें माझ्यावर केले आहेत आणि मी त्याच्यावर केले आहेत. त्याला मूलबाळ होत नव्हतं म्हणून माझ्या बायकोनं 'शेटजीला मूल होऊं दे, तुला पांच बकरीं देईन' असा देवीला नवस केला होता. पुढं मुलं झालीं म्हणून नवस फेडण्यासाठीं माझ्या बायकोनं शेटजीच्या घरांतून मिरवणूक काढून देवीला पांच बकरीं बळी दिलीं. मुलं झालीं म्हणून ह्या शेटजींनीं ही जमीन बक्षीस म्हणून मला दिली. आणि गेलीं आठ-नऊ वर्षं ती जमीन कसून मी जगतों आहे. त्याच्या वाईट कामांत मी मदत करीनासा झालों म्हणून ही जमीन ह्यानं दानांत देऊन टाकली ; ती दान देण्याचा ह्याला अधिकार नाहीं. परंतु जर हे शेटजी मुलाची शपथ घेऊन सांगत असतील कीं ही गोष्ट खोटी आहे, तर सर्व जमीन सोडून द्यायला मी तयार आहें." हें ऐकल्यावर शेटजींना खुलासा विचारण्यांत आला. दोन-तीन मिनिटें झालीं तरी शेटजी बोलेनात. सभेंतल्या लोकांना विचारलें : 'हा भिल्ल जें बोलला तें खरें आहे कीं खोटें, काय असेल तें मोकळेपणानें सांगा.' सभेंतले कोणीच बोलेना. ह्या सर्वाचा अर्थ हा कीं भिल्लाच्या सांगण्यांत सत्यांश बराच होता. या धनिक माणसाची नाराजी विनाकारण कां ओढून घ्यायची असें वाटून लोक गप बसले असावेत. मामलेदार हें सर्व ऐकत होते. त्यांनीं सरकारी कागदपत्र पाहून सांगितलें कीं दान देण्यापूर्वींहि शेतसारा हा भिल्लच भरत होता. तेव्हां जमिनीचा मालक हे शेटजी नसून हा भिल्लच आहे. यावरून ती जमीन शेटजींनीं केलेल्या उपकाराचें स्मरण ठेवून बक्षिस दिलेली आहे ही गोष्ट अधिकच स्पष्ट झाली. सभेमध्यें निर्णय घेण्यांत आला कीं शेटजींनीं आपल्या मालकीची दुसरी जमीन दानामध्यें द्यावी. शेटजींना विनंति करण्यांत आली कीं, "झाली ही गोष्ट चांगली झाली नाहीं. यांत तुमची प्रतिष्ठा कमी होत आहे याचें आम्हांला दुःख वाटतें. तुम्ही दुसरी जमीन द्यावी. पैशानें आणि जमिनीनें जसे तुम्ही श्रीमंत आहांत तसें मनानें आणि हृदयानेंहि श्रीमंत व्हा; औदार्य प्रकट करण्याची मोठी संधि आलेली आहे, ती साधल्यानें लोकांच्या आदराला पात्र व्हाल."

सर्व लोकांच्या संमतीनें पहिलें दानपत्र परत केल्याचें जाहीर करण्यांत आलें. लोक एकाग्र चित्तानें शेटजींच्या तोंडाकडे पाहात होते. गरीबांना न्याय मिळवून देणारें हें कार्य आहे, हें पाहून एकत्र बसलेले भूमिहीनहि आपसांत विचार करूं लागले होते. पण शेटजींचें मन मोठें झालें नाहीं. औदार्य प्रकट होण्याऐवजीं कृपणतेनेंच त्यांना घेरलें आणि भरल्या सभेंतून ते उठून चालते झाले. साऱ्या लोकांची निराशा झाली, पण जनतेच्या न्यायासनासमोर खोटें चालत नाहीं हें पाहून आशाहि बळावली.

आतां राहिलेल्या ५ एकरासाठीं एका भूमिहीनाची निवड करण्याचें काम भूमिहीनांना सांगण्यांत आलें. एकेक जण उभे राहिले आणि बोलूं लागले : 'ही जमीन मला नको, अमक्या गरीब माणसाला द्या.' १७ लोकांनीं एका शेतमजुराकरितां आपलें नांव मागें घेतलें. तरीहि अजून २४ लोक बसले होते; नंतर कोणी बोलेना. शेवटीं ज्याच्यासाठीं १७ लोकांनीं आपलें नांव मागें घेतलें होतें, तो उभा राहिला आणि सांगूं लागला : "ही जमीन मला न देतां हा जो कडेला बसला आहे त्याला द्या. माझ्यापेक्षां त्याला गरज जास्त आहे." बस्स ! एका क्षणांत बाकीचे सारे २४ भूमिहीन लोक एकदम उठले आणि बाजूला सरले. आपली नांवें त्यांनीं मागें घेतलीं. योग्य त्या गरजूची निवड झाली. सगळ्यांनीं आनंदानें टाळ्या वाजविल्या. एकीकडे पैशाच्या श्रीमंतीचें पण मनाच्या दरिद्रतेचें दर्शन, तर दुसरीकडे पैशाच्या दारिद्र्याचें पण मनाच्या श्रीमंतीचें दर्शन !

## (२) खंडाळीचें वांटप

'हा कोयना महार खरा वारकरी आहे. दर महिन्याला एकादशीला पंढरीला जातो. चांगला आहे. याला जमीन द्या." प्रत्येकाच्या ओठावर हेच शब्द उमटत होते, परंतु भूमिहीनाव्यतिरिक्त इतरांना नांव सांगण्याचा अधिकार नाहीं हें माहीत झाल्यामुळें कोणी मोठ्यानें बोलेना. ११ भूमिहीनांनीं आपसांत एकाची एकाच जमिनीसाठीं निवड करावयाची होती. दुसरी जमीन एका कुळाकडे होती. कूळ व भूदाते दोघेहि हजर होते. जमीनमालक म्हणाले, "ह्या कुळालाहि जमीन द्यायला हरकत नाहीं, पण हा एकटाच आहे. त्यापेक्षा एका हरिजनाला द्या." पण कुळाला

वाटलें, मी एकटा असलों तरी आज जमिनीचा मला आधार आहे, प्रतिष्ठा हि आहे, तेव्हां सोडावी कशी ? तेव्हां पुन्हां विचार होऊन ठरलें कीं त्यानें आपला एक भाऊ अगर मुलगा म्हणून एखाद्या भूमिहीनाला जवळ घ्यावें, आणि दोघांनीं मिळून ती जमीन करावी. भूदाता व कूळ या दोघांना हि हें पटलें. भूमिहीनाची निवड करण्याचें काम ह्या दोघांवरच सोंपविण्यांत आलें. ते दोघे एकमेकांस निवड करण्यास सांगूं लागले. दोघांचे संबंध सलोख्याचे होते. शेवटीं दोघांनीं एका हरिजन बंधूला 'आपला' म्हटलें व अर्धी जमीन त्याला दिली. इकडे ही चर्चा चालू होती त्या काळांत तिकडे अकरा भूमिहीनांपैकीं नऊ जणांना आपल्यापेक्षां दुसरा अधिक लायक हें पटलें व त्यांनीं आपलीं नांवें मागें घेतलीं. दोघे राहिले. दोघेहि हरिजन. त्यांपैकीं एकजण आपल्या सद्वर्तनामुळें लोकांच्या आदराला व प्रेमाला पात्र झालेला होता, तर दुसरा शहरी प्रवृत्तीचा, पोषाखी जीवनांत वाढूं इच्छिणारा होता. लोकांच्याकडे निवड करण्याचें काम सोपविलें नव्हतें तरी त्यांच्या मनानें केव्हांच निवड करून टाकली होती व आपली निवड योग्य असल्याचें ते दर्शवूं इच्छीत होते. परन्तु प्रत्यक्ष त्यांच्या हातांत कांहींच नसल्यामुळें इतर प्रयत्न व्हायला सुरुवात झाली. एकजण म्हणाला, "मग टाका आता चिट्ठ्या. परमेश्वर असल तर लावल न्याय !" शेवटीं दोघांपैकीं कोणीच बोलेना कीं हालेना. चिठ्ठ्या टाकल्या गेल्या. एका लहान मुलीनें चिठ्ठी उचलली. पंढरीच्या पांडुरंगानें आपल्या भक्ताला –कोयनाला–जवळ घेतलें. साऱ्या गांवानें आपला आनंद प्रगट केला.

जमीन चांगल्यापैकीं बागायती १$\frac{1}{2}$ एकर आहे. ज्यांनीं जमीन दिली ते शेजारच्या गांवींच राहात असतात. त्यांनीं आपल्याला लाभलेला हा नवा शेतकरी कसा काय आहे ? त्रास देणार नाहीं ना ? अशी शंका प्रदर्शित करतांच सारा गांव त्या कोयनाच्या बाजूनें वकिली करूं लागला !

## (३) हुपरीचें वांटप

हुपरी हे कोल्हापूर जिल्ह्यांतलें, एक संपन्न आणि जागृत गांव आहे. तेथें श्री येडगोंडा पाटील यांनीं २ एकरांचें दान दिलें होतें. त्या दोन एकर जमिनीचें वांटप करण्यासाठीं त्यांना भेटायला आम्ही गेलों. साठीच्या आस-

पास असलेल्या त्या पाटीलबाबांनीं आमचें प्रेमानें स्वागत केलें. मी त्यांना कशासाठीं आलों आहे हें सांगितलें. ते म्हणाले मी वाटच पहात होतों. दान देऊन सहा वर्षें झालीं तरी जमीन वांटायला कोणी कसें आलें नाहीं ? मी विचार करीत होतों कीं काय करावें ? तुम्ही आलांत तें बरें झालें. "आतां मला सांगा, ह्या जमिनीचें वांटप तुम्ही कसें करणार ? कां आमच्यावर सोंपविणार ?" मी त्यांना विनोबांनीं घालून दिलेली पद्धति समजावून दिली आणि म्हटलें, "या पद्धतीनें दात्यानें जरी वांटप केलें तरी चालेल. तुम्ही समंजस आहांत, तुम्हांला कांहीं सांगायचें असल्यास सांगू शकतां." त्यावर ते इतकेंच म्हणाले, "आजच्या आज वाटप केलं पाहिजे अशी घाई नाहीं ना ? जर तुम्ही दोन दिवसांनीं परत याल तर तोंपर्यंत माझ्या मुलाशीं बोलून घेईन आणि तुम्ही सांगितल्याप्रमाणें हें वांटप करून टाकूं. त्यासाठीं जाहीर सभेची व्यवस्थाहि करून ठेवीन. माझी एवढीच इच्छा आहे कीं योग्य माणसाची निवड व्हावी."

ठरल्याप्रमाणें दोन दिवसांनीं त्या गांवीं गेलों. दात्यांनीं गांवांत दवंडी देऊन सभेची व्यवस्था करून ठेवलेली होती. आम्ही सारेजण सभेकडे गेलों. गांवकरी जमलेले होतेच. जमीन-वांटपाची सभा म्हटल्यावर भूमिहीनांची गर्दी जास्त. कामाला सुरुवात झाली. भूदानाची आणि वांटपाची माहिती दिल्यावर ज्या पाटलांनीं जमीन दिली होती त्यांचा सुशिक्षित तरुण मुलगा बोलायला उभा राहिला. तो सांगू लागला, "आपल्या गांवांत सहा वर्षांपूर्वीं भूदान-पदयात्रा आली होती. पदयात्रेंतल्या कार्यक्रमा-प्रमाणें गांवकऱ्यांबरोबर यात्रिकांची चर्चा चालू होती. भूदानाची मागणी सुरू झाली. बराच वेळ गेला परंतु दान कोणी जाहीर करीना. माझ्यासुद्धां मनांत दान द्यावं हें आलं नाहीं. वडील त्या सभेंत बसले होते. ते एकदम उभे राहिले आणि त्यांनीं दोन एकर भूदान जाहीर केलं. तें ऐकून मात्र मला बरं वाटलं. स्वातंत्र्याच्या आंदोलनांत गांधींच्या हांकेला ओ देण्याची संधि मिळाली तशीच विनोबाजींच्या या पवित्र क्रांतिकार्यांत भाग घेण्याची संधि वडिलांच्यामुळं मिळाली म्हणून खूप समाधान वाटलं. वडिलांबद्दल आदर वाढला. दान दिल्यापासून माझ्या चित्तावरहि त्याचा बराच चांगला परिणाम झाला. पूर्वीं आमच्या शेतांत काम करणाऱ्या मजुरानं स्वतःच्या

घरच्या गाई-म्हशींसाठीं बांधावरचं थोडं गवत कापलं किंवा बायांनीं भाजीसाठीं जर ४-५ हिरव्या मिरच्या तोडल्या तर मला मोठा राग यायचा, परंतु दानानंतर असं कांहीं घडलं तर मनांत विचार येतो कीं, आपल्या वडिलांनीं एवढी हजारो रुपयांची जमीन दान दिली आणि आपण एवढयाशा लहान वस्तूकरितां कां रागवायचं ? त्या मजुराचाहि त्या शेतांत हक्क नाहीं का ? अशा तऱ्हेनें माझा राग कमी होत गेला." ते तरुण गृहस्थ सांगू लागले : "ही जमीन वडिलांनीं दान दिल्यावर भूदानाच्या पद्धतीनं वांटप होईपर्यंत आमच्या घरांतील मियालालला ती कसायला आणि त्यांतून पिकेल तें त्यानं खावं म्हणून दिली. या २ एकर जमिनीचा सरकारी सारा ७ रुपये आहे. जमीन चांगल्यापैकीं आहे हें तुम्हाला माहीतच आहे आणि मियालालहि तुम्हां लोकांच्या चांगल्या ओळखीचा आहे."

"जमीन कसायला ताब्यांत मिळाल्यानंतर २-३ वर्षांत खूप मेहनत मशागत करून चांगलं उत्पन्न काढून त्यानं दुसरी तीन एकर जमीन खरेदी केली. ही जमीन कसायला मिळण्यापूर्वीं तो ३०-३५ वर्षं आमची जमीन करीत होता. परंतु तो त्या जमिनीवरील लहानशा तुकडयाचाहि धनी बनूं शकला नाहीं, मजूरच राहिला. आतां आम्ही भूदानांत दिलेली जमीन त्याला कसायला मिळतांच स्वत:ची जमीन समजून त्यानं तिच्यावर कष्ट केले आणि स्वत:च्या हक्काची त्यानं जमीन घेतली."

"यावरून तुमच्या लक्षांत येईल कीं, भूदानाची क्रांति कशी येत आहे. आतां आमची अशी इच्छा आहे कीं, गेलीं सहा वर्षं ज्याच्याकडे ही जमीन आहे त्यालाच ही जमीन द्यावी. त्याला दुसरा कसला आधार नाहीं. विनोबांच्या नियमांत बसत असेल तर यालाच ती द्यावी अशी आमच्या घरांतील सर्वांची तुम्हांला विनंति आहे. हा गृहस्थ मुसलमान असला तरी त्याला कसलंच व्यसन नाहीं. मांसाहार करत नाहीं. दारू पीत नाहीं. फार काय तो हॉटेलांत गेल्याचं सुद्धां कोणी पाहिलं नाहीं. आम्ही जैन आहोंत, परंतु आमच्यापेक्षां तो अधिक स्वच्छ आहे. गेलीं ३५ वर्षं तो आमच्या घरांत आहे, आमच्या कुटुंबांतलाच एक तो आम्हांला वाटतो. तेव्हां अशा

प्रामाणिक आणि कष्टाळू इसमाला जमीन मिळाली तर आम्हांला खूप आनंद वाटेल."

सभेंतील सारे लोक शांतपणें ऐकत होते. सारा गांव त्या मियालालला जाणत होता. लोक आपसांत बोलायला लागले. वांटपाच्या नियमाप्रमाणें ही जमीन भूमिहीनांच्या संमतीनें वांटली जाणार. दात्यांच्या मुलानें आपली कहाणी ऐकवितांना आपली इच्छाहि व्यक्त केली. तेव्हां या दोन्ही गोष्टींचा मेळ कसा घालायचा असा प्रश्न होता, सभेंतल्या लोकांना विनंति केली कीं आपलें मत काय आहे तें सांगावें. समोर भूमिहीन मजूर आणि बाजूला भूमीवाले बसले होते. वांटपाच्या सभेंत प्रत्येकाला आपलें मत सांगण्याचा अधिकार असतो, म्हणून संकोच न करतां बोलावें असें मी सर्वांना म्हटलें. "आपल्याला या ठिकाणीं न्याय लावायचा आहे. एकाची निवड करायची आहे. भूमिहीनांचा तो हक्क आहे. ते एकमतानें जो निर्णय घेतील त्यालाच ही जमीन दिली जाईल. दात्यानें आपली इच्छा व्यक्त केली त्याबद्दलहि तुमचे मत तुम्ही सांगावें. दात्याविरुद्ध कसें बोलायचें असा विचार करूं नका. दात्यानेंहि नियमाप्रमाणें हा निर्णय तुमच्यावरच सोंपविला आहे". लोक एका निश्चयाच्या स्वरांत हुंकार देत होते. बसलेल्या लोकांमधून कांहीं निवडक निरनिराळ्या वर्गांतल्या लोकांना मी विचारायला सुरुवात केली. बाजूला बसलेल्या एका हरिजनाला विचारलें. तो चटकन् उभा राहिला आणि म्हणाला, "त्या मियालाललाच द्या. त्यानें आतांपर्यंत फार कष्टांत दिवस काढल्यात, खाऊंद्या त्याच्या पोराबाळाला. आम्हांला-बी मिळंल कवातरी !"

सभेतल्या लोकांकडे एकवार दृष्टि फिरवली आणि दूरवर बसलेल्या एका फेटेवाल्याकडे बोट दाखवतांच तो मोठ्या लगबगीनें उभा राहून सांगूं लागला–"आमच्या गांवांत भूदानाची जमीन घ्यायला एवढाच लायक माणूस हाय, लई मेहनती नि सरळ मनाचा हाय. याचीच निवड करा." दोनचार भूमिहीनांना विचारलें. साऱ्यांनीं मियालालचेंच नांव घेतलें. लहानापासून थोरापर्यन्त साऱ्यांनीं एकदम हात वर करून मियालालसाठीं साक्ष दिली. न्याय मिळतांच प्रमाणपत्र लिहिलें गेलें. दोन साक्षीदारांच्या सह्या झाल्या आणि दात्याच्या हस्ते कुंकुमतिलक लावून सन्मानानें

मियालालला दस्तैवज देण्याचा कार्यक्रम झाला. साऱ्यांनीं टाळ्या वाजवून आपला आनंद प्रगट केला. मुलाला दूध पाजण्यांत मातेला जसा आनंद होतो तसा आनंद जमीन देणाऱ्याला झाला. ते म्हणाले, "मी माझ्या ६५ एकरांतील दोन एकर दान केलें हें फार मोठं दान नाहीं. काळाची हाक ऐकून कर्तव्य बजावलं आहे. ज्याला जमीन मिळाली त्याच्या गुणाचा सर्वांनीं एकमुखानें दाखला दिला. याचा मला आनंद आहे."

शेवटीं नव्या भूमिपुत्रानें – मियालालनें–सांगितलें, "मी गेलीं सहा वर्षं ही जमीन कसत होतों, परंतु ती मला मिळाली नव्हती. आज साऱ्यांच्या कृपेनं मला ती कायमची कसायला मिळाली. गेल्या ६ वर्षांत जे मी पिकविलं त्यांतला एक हिस्सा म्हणून विनोबाजींच्या या कामाला– जें आम्हां गरीबांसाठीं चाललं आहे त्याला – दोनशें रुपये मी देत आहे." दात्यांच्या हस्तें त्यानें आम्हांला रोख २०० रुपये दिले.

भूदानयज्ञ-आंदोलनांत गरीबांचा पुरुषार्थ आणि अमिरांचा सहकार आहे. दोघे मिळून माणुसकी टिकवितात आणि वाढवितात !

## (४) कुंभोज गांवची गोष्ट

कोल्हापूर जिल्ह्यांत वांटपाचें काम चालू असतांना कुंभोज गांवीं जाण्याचा योग आला. त्या गांवांत ४ दात्यांनीं, १ एकर १३ गुंठे जमीन लहान लहान तुकड्यांत दिली होती. त्यांतील तीन दाते छोटे मालक होते. एक मोठा जमीनवाला होता. चारीहि जमिनीचे तुकडे चांगल्या प्रतीचे होते. गांवांत जमीन-वांटपाची दवंडी दिलेली होती. सूर्यास्ताच्या सुमारास आम्हीं गांवांत शिरलों. ठिकठिकाणीं लोक आपसांत वांटपाबद्दल चर्चा करीत असल्याचें दिसत होतें. "जमीन वांटायला तुम्ही आलात व्हय !" म्हणून एकानें आम्हांला हटकलें. त्याला "होय" म्हणून आम्ही पुढें सरलों. तपास करतां ग्रामपंचायती समोर वांटपाची सभा घ्यायची ठरली होती असें कळलें. आम्ही तिकडे वळलों. लोकहि हळूहळू जमा होऊं लागले. ग्रामपंचायतीच्या ऑफिसांत पोहोंचल्यावर सभा सुरू होईपर्यंत जमलेल्या लोकांबरोबर आमची चर्चा चालूच होती. साऱ्यांना मोठी उत्सुकता कीं ही जमीन वाटणार कशी ? कोणाला ? एक ना अनेक प्रश्न विचारून

लोक शंकेचें निरसन करून घेत होते. थोड्या वेळांत रीतसर सभेच्या कामाला सुरुवात झाली. भूमिहीनांपैकीं कोणी ना कोणी जमीन मिळावी म्हणून स्वतःसाठीं वकीली करूं पहात होता. मिळालेल्या दानाची आणि दात्यांची माहिती घेण्याचें काम सुरू झालें. कांहीं दान देणारे हजर होते. वांटपाची पद्धति समजावून दिल्यावर पुढच्या कामाला सुरुवात झाली.

या चार दात्यांपैकीं एकानें २१ गुंठे जमीन दिली होती. ते बोलायला लागले. ते म्हणाले, "१५-२० वर्षांपूर्वी ही जमीन गांवांतल्या एका दारुड्याला तो दारूच्या नशेंत असतांना फसवून मी विकत घेतली. जमीन चांगली आहे. मेहनत–मशागत चांगली केली तर तंबाखूचेंहि पीक येईल अशी ती जमीन आहे. मी ज्या दारुड्याला फसवून जमीन घेतली त्याला एक मुलगा आहे. जमीन गेल्यामुळें त्याला पोटापाण्याचे हक्काचें कसलेंच साधन न राहिल्यामुळें आणि गांवांत कायमचा कामधंदा मिळत नसल्यामुळें तो जयसिंगपूरला जाऊन तेथें हमालीचा धंदा करून कसेंतरी पोट भरतो आहे. जर ही जमीन तुम्ही त्या मुलाला दिली तर मला बरें वाटेल. मूळची जमीन त्याच्याच बापाची आहे. दान योग्य त्या ठिकाणीं गेलें याचें समाधान आम्हां तिघा भावांना होईल. आम्हां सर्वांची ती इच्छा आहे." दात्यानें केलेली ही सूचना सर्वांना योग्यच वाटली. सार्‍यांनीं त्या मुलाला जयसिंगपूरहून बोलावून आणून त्याला ती जमीन द्यायचें ठरविलें.

दुसर्‍या दात्यानें ९ गुंठे जमीन दिली होती. दान दिल्यावर त्या जमिनीवर आपला हक्क नाहीं, अशी त्याची भावना होती म्हणून त्यानें गांवांतल्या एका भूमिहीन हरिजनाला ती कसण्यासाठीं दिली होती. त्या दात्यानें आपली इच्छा व्यक्त करतांना म्हटलें कीं 'विनोबांच्या नियमाप्रमाणें जसें वांटप करावयाचें असेल तसें करा. मी दिली ती दिली. आज ज्या हरिजनाकडे आहे त्यालाच जर तुम्हाला देतां येत असेल तर त्यालाच द्या. तोहि भूमिहीन आहे आणि मेहनत मशागत चांगली करतो आहे.' दात्यानेंच योग्य ती निवड केलेली असल्यामुळें भूमिहीनांसह सर्वांनींच दात्याच्या या निवडीला साथ दिली. कसत असलेल्या हरिजनाला ती जमीन देण्यांत आली.

तिसरा ५ गुंठ्यांचा दाता २०० एकराचा मालक होता. ही दानांतली जमीन तंट्यांत पडलेली होती. शेजारच्या ज़मीन-मालकाचें म्हणणें असें कीं

ही जमीन माझी आहे आणि मालकी सिद्ध करण्यासाठीं तो कोर्टांत गेला होता. निकाल आपल्या बाजूनें लागला नाहीं म्हणून मूळ मालकाचा खून झाला होता. अशा या जमिनीच्या तुकड्याचें काय करायचें ? हा तुकडा भूदानांत दिल्यावर त्याची मालकी विनोबांची आणि पर्यायानें गांवाची झाली असें जाहीर केल्यावर जो 'ही जमीन माझी आहे' म्हणत होता त्यानेंहि आपला विचार बदलला आणि त्या मालकीच्या वादाचा शेवट झाला.

१८ गुंठ्यांचा जमीनमालक तर गरीब शेतकरी आहे असें सांगण्यांत आलें. परंतु आजारी असल्यामुळें तो सभेच्या ठिकाणीं येऊं शकत नाहीं असें कळलें. आम्ही सर्वांनीं विचार केला कीं आपणच त्याच्या घरीं भेटायला जाऊं. सर्‍यांना तें पटलें. सभेचें काम संपवून आम्ही गांवकर्‍यांसह त्याच्या घरीं जाण्यासाठीं निघालों. रात्रीं ९॥।–१० ची वेळ होती. पेट्रोमॅक्सच्या प्रकाशांत ज्यावेळीं आमची ही पदयात्रा सुरू झाली त्यावेळीं दुरून पहात असलेले लोकहि सामील झाले. ५-७ मिनिटांत त्या दात्याच्या घराजवळ आम्ही पोहोंचलों. आसपास सर्वत्र शांतता होती. शेजारचे लोक म्हणूं लागले "आजारी माणसाला कशाला त्रास देतां ?" माझ्याहि मनांत विचार आला 'खरंच, आजारी माणसाला कशाला त्रास द्यावा ?' पण दुसरा विचार उठला–'एवढ्या गरीब माणसानं दान दिलं आहे तर त्याला किंवा त्याच्या घरांतल्या माणसांना भेटणं हें आपलं कर्तव्य आहे.' घरांतली बायकामंडळी जागींच होती. घरांतल्या माणसांना भूदानाचीं माणसें आल्याची वर्दी दिली गेली. आजारी माणसाच्या आईनें 'या' म्हटलें. गरीब शेतकर्‍याचें तें घर. ज्यानें जमीन दिली तो जलोदराच्या रोगानें मृत्युशय्येवर पडला होता. खाटेवर अर्धवट झोपेंत असलेल्या त्या दात्याच्या डोक्याशी त्याची बायको उभी होती. आई म्हणाली, "इतक्या लांबून आला आहांत तर माझ्या मुलाशीं चार शब्द बोला. त्याला बरं वाटेल." बायकोनें एक हात मानेखालीं घालून व दुसरा हात हनुवटीला लावून त्याला हलकेंच जागें केलें. २-३ मिनिटांनीं त्यानें डोळें उघडले आणि हलक्या आवाजांत तो म्हणाला, "काय ?" मी त्याच्या पायाशीं उभा होतो. मी कां आलों आहे तें सांगूं लागलों. विनोबांचं काम कोठवर

आलं आहे तें त्याला सांगितलें. "तुम्हाला थोडी जमीन असूनहि या क्रांती-च्या कार्यांत तुम्ही सामील झाला. ही जी जमीन तुम्ही दिली ती विनोबांनीं स्वीकारली आहे. तुम्हांला अगदींच कमी जमीन आहे तेव्हां ही जमीन त्यांनीं प्रसाद म्हणून तुम्हांला परत दिली आहे. त्याचा स्वीकार करा" असें मी बोललों. मृत्यूच्या दारीं पडलेल्या त्या दात्याच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहूं लागले. हात जोडून तो बोलूं लागला, "माझी आणखी राहिलेली ३ गुंठे जमीन विनोबांना देतों ती बी घ्या." मी चट्कन त्याला म्हटलें, "होय, विनोबांच्या वतीनें आपलं हें दान मी घेतों. आणि त्यांच्या वतीनें ही जमीन तुमच्याकडेच कसण्यासाठीं त्यांचा प्रसाद म्हणून परत करतों. ती आपण स्वीकारा." सारे स्तब्धपणें ऐकत होते. सान्यांनाच गहिंवरून आलें. आईच्या आणि पत्नीच्या चेहऱ्यावर समाधान विलसत असल्याचें त्या अंधुकशा प्रकाशांत जाणवल्याशिवाय राहिलें नाहीं. माझे हात आपोआप जोडले गेले.

## (५) मालक छोटे, मन मोठें

५-६ हजार वस्तीच्या हेलें गांवीं दात्यांना भेटायला गेलों होतों. २०-२२ दाते त्या गांवांत होते. पहिल्या दात्याची भेट झाली. ४-४॥ एकर जमिनीचा तो मालक होता. त्यांतून त्यानें एक एकर दान दिलें होतें. ही जमीन एका गरीब विधवा बाईला त्यानें दिली होती. त्या बाईची दात्यानें भेट करविली तेव्हां आपण आनंदानें मेहनत करून आपल्या लहान मुलासह पोट भरत असल्याचें तिनें सांगितलें तो दाता सांगत होता— 'या गांवचें ग्रामदान होईल तर पहिली जमीन मी द्यायला तयार आहे.' पुढें ते गृहस्थ आपला एक अनुभव सांगतांना म्हणाले, "मी पुरीच्या सर्वोदय संमेलनाला गेलों होतों. लोक आपसांत 'गीता-प्रवचनें' या पुस्तकाबद्दल कांहीं बोलत होते. मी मोठ्या जिज्ञासेनें ऐकत होतों. तीं पुस्तकें तेथें विक्रीला ठेवलेलीं दिसतांच मी एक विकत घेतलें. गांवीं आल्यावर वाचूं लागलों. विचारहि सुरू झाला, त्याचा परिणाम माझ्या चित्तावर खूप झाला."

आज गांवांत या व्यक्तीविषयीं सर्वांना आदर आहे.

दुसरा दाता वाटेंतच भेटला. कुंभार जमातींतला फक्त १८ गुंठ्यांचा धनी. दोन वेळां त्या गांवात भूदान-पदयात्रा गेली होती. एका वेळीं ११ गुंठे आणि दुसऱ्या वेळीं राहिलेली ५ गुंठे जमीन त्यानें देऊन टाकली होती. त्याची गांठ पडली त्यावेळीं तो मोठ्या खुषींत बोलत होता : "विनोबांचं सांगणं पटतं. माझं माझं म्हणण्यांत तर सारा घोटाळा झालांय्. त्यांत गरीबाचं फार नडतंय् बगा. म्हणून साऱ्या गरीबांनीं दिली की आपसुक जमीनदार बी देतील. म्हणून माझी ही जमीन कोणालाबी वांटून टाका. आमच्या बायका-मुलांनाबी हें पटलंय्." जेव्हां त्याला म्हटलं कीं विनोबांनीं ही जमीन तुम्हांलाच परत कसून खाण्यासाठीं दिली आहे तर तो गृहस्थ म्हणाला "मला कशाला देतां ? कोणा गरजूला द्या. मी तर करतोय दुसरा धंदा. मुलगाबी थोडं कामबीम करतो. ठीक चाललंय् आमचं देवाच्या कृपेनं."

एकेक दात्यांना भेटत चाललों तसतसे भेटलेले दातेहि या आमच्या गांवपदयात्रेंत सामील होत गेले, रात्रींच्या वेळीं हातांत कंदील घेऊन आम्ही बरेचजण इकडूनतिकडून फिरत असलेले पाहून गांवातहि सर्वत्र कुतूहल आणि चर्चा सुरू झाली. दोन दाते एकाच ठिकाणीं भेटले. त्यांतील बऱ्यापैकी म्हणजे ७-८ एकरांच्या धन्यानें सांगितलें : "मी दिलेली जमीन माझ्याच घरीं बरीच वर्षं मजूर म्हणून काम करणाऱ्या महाराला दिली आहे. दरवर्षीं तिच्या मशागतीचें काम मीच करून देतों." दुसरा दाता म्हणाला : "माझी दिलेली जमीन दोन अलग तुकड्यांत आहे ती एकत्र करून आणि कायदेशीर बनवून देतों." २०-२२ एकरांचा हा शेतकरी (जो पूर्वी जयसिंगपुरला व्यापारी होता) पुढें सांगत होता: "आज सकाळीं-च माझ्या शेतावर काम करणाऱ्या हरिजनांना गोळा करून 'गांवचे गोकूळ' हें पुस्तक मी त्यांना वाचून दाखवीत होतों. पोचमपल्लीच्या हरिजनांना जमीन मिळाली तशी तुम्हांला मिळायला पाहिजे आणि ती तुम्हांला जमिनवाल्यांकडून लवकर मिळेल असें मी या महारांना सांगत होतों."

दात्यांच्या भेटी होत होत्या. जमिनीचा निकाल चालू होता. २२ दात्यांपैकीं २० दात्यांच्या भेटी झाल्या. त्यांपैकीं कोणाची जमीन वांटता

आली, कोणी उत्पन्न देण्याचें ठरविलें, पण दान मागें घेणारा कोणी गरीब दाता भेटला नाहीं. मात्र शेवटीं एका मोठ्या जमीनवाल्या दात्याकडे भेटायला गेलों त्यावेळीं त्यांनीं दिलेल्या दानाचा कांहीं उपयोग नाहीं म्हणून तें दान परत करावें लागलें !

चंदुर गांवची गोष्ट आहे. ४-५ हजार वस्तीच्या या गांवांत ३० गुंठ्यांचा मालक गणू कोळी, भूदानाची माणसें गावांत आल्याचें समजतांच आम्हांला येऊन भेटला. छोट्या-छोट्या जमिनीच्या निकालाचें काम चालू होतें. गांववाल्यांना या लहान-लहान तुकड्यांचा कसा निकाल लागणार हें समजून घेण्याची मोठी उत्सुकता दिसली. गणू कोळ्यानें दिलेल्या जमिनीची चौकशी चालू होती. "या जमिनीचा सारा चार रुपये सहा आणे आहे," तलाट्यानें कागद बघून सांगितलें. या ३० गुंठ्यांच्या तुकड्यांतून गणूनें ५ गुंठ्यांचें दान दिलें होतें. तो म्हणाला, "ही ५ गुंठे जमीन थोडी आहे, पण कोणाहि गरीब, गरजू, कष्टाळू माणसाला वांटून द्या." भोंवतालच्या लोकांना वाटले, काय याची जमीन वांटायची ! आश्चर्यानें ते पाहूं लागले. आमच्या बरोबरचे सहकारी त्यांना म्हणाले, "होय, ही जमीन वांटायची. विनोबाजींनीं घालून दिलेल्या नियमानुसार ही जमीन गांवच्या मालकीची राहील आणि वहिवाटीचा हक्क म्हणून ह्या गणू कोळ्याला दुसरा कसलाहि धंदा (आधार) नाहीं म्हणून त्यालाच ही जमीन परत दिली जाईल." सर्वांनीं योग्य न्याय होत असल्याचें प्रगट केलें.

लोकांत जागृति आणि शेतीची वाढती समृद्धि ज्या भागांत आहे तेथील जनतेंत भूदान-यज्ञाच्या विचारानें प्रगट झालेली मानव्याची ज्योत त्यांना जुन्या जमान्यांतील अन्याय्य व्यवस्थेचे जूं फेकून देण्याची शक्ति देते असें वाटतें. या भागांत संपत्तिदातेहि भूमिहीन मजूरच पुष्कळसे आहेत. त्यांनाहि संपत्तिदान कां दिलें असें विचारतां ते म्हणाले, "आमची गरीबी जायला आणि श्रीमंताचं मन बदलायला आम्हीच प्रथम तयार झालं पाहिजे. आमच्याच आधारावर ते आहेत. मारण्या-लुटण्याचा कांहीं उपयोग नाहीं. त्यानं तर पोलीसांचं राज्य येतं, आमचं राज्य होत नाहीं. आमचं राज्य यायचं असलं तर आम्हीच शहाणं झालं पाहिजे." आजचा समाज तोडायला

जर छोटया मालकीच्या त्यागाची कुऱ्हाड उपयोगी येत असेल तर ती चालवायची त्यांची तयारी आहे.

एक गोष्ट या भागांत स्पष्ट नजरेला आली कीं, भूदानाला विरोध म्हणजे गरीबांच्या सहानुभूतीला विरोध असें लोकांना वाटतें. भूदान केलें नाहीं हे चांगलें केलें नाहीं याची जाणीव व कबूली हि अनेक गांवांतून ऐकायला मिळाली.

## (६) नातीं बदलणारें वांटप

नातेपुतें हें सोलापुर जिल्ह्यांतील एक व्यापारी गांव आहे. गांवांतल्या चार इसमांनीं दानें दिलीं होतीं. त्यापैकीं दोन जमिनी नातेपुतें गांवांत होत्या आणि दोन शेजारच्या दोन गांवांतल्या होत्या. या तीन्ही गांवांची वांटप-सभा एकाच ठिकाणीं नातेपुतें येथें घेतली होती. तीन्ही गांवचे लोक सभेला जमले. गांवांतील व्यापारी, डॉक्टर, वकील इ. सर्व व्यवसायांतील मंडळीहि मोठ्या प्रमाणांत होतीं.

यांपैकीं तीन जमिनींचें वांटप रीतसर झालें. चौथी जमीन शेजारच्या गांवांतली साधारण प्रतीची २२ एकर होती. त्यावरचें कूळहि बऱ्या स्थितींतलें होतें आणि त्याला स्वतःच्या मालकीचीहि थोडी जमीन होती. कूळ आणि दाता दोघेहि सभेला हजर होते. कुळाची इच्छा कीं जमीन आपल्यालाच मिळावी. पण धार्मिक वृत्तीच्या दात्याची अशी इच्छा कीं जमीन दुसऱ्या गरजू भूमिहीनाला मिळावी. या जमिनीच्या बांधावर असलेल्या आंब्यांच्या झाडावरील मालकी-हक्कावरून कुळाचें व मालकाचें भांडण होतें आणि हा वाद थेट हायकोर्टापर्यंत पोचून तेथें वादाचा निकाल लागला होता. परंतु दुभंगलेलीं मनें जोडलीं गेलेलीं नव्हतीं. त्यांच्यांत एकमेकां-संबंधीं शत्रुत्वाचें नातें उत्पन्न झालेलें होतें. वांटपसभेच्या वेळींच ते दोघे प्रथम एकत्र येऊन एकमेकांसमोर बसले होते.

त्या कुळाकडे जर स्वतःची जमीन नसती तर कुळालाच ही दानाची जमीन देतां आली असती. बरें, ती कुळाला न देतां इतर कोणाला द्यावी तर कुळाला जमीन तशी फार कमी होती; शिवाय मालकाच्या इच्छे-प्रमाणें जमीन दुसऱ्याला दिली असती तरी हें कूळ ताबा सुखासुखी

सोडील कीं नाहीं हाहि प्रश्न होता. सर्वांना, हें वांटप कसें होणार, या संबंधींची उत्कंठा लागून राहिली होती.

दात्याला आणि कुळाला अगोदर समजावून देण्याचें काम करावें लागलें. मी दात्याला म्हटलें, "तुम्ही विनोबाजींना ही जमीन त्यांचें कार्य सत्कार्य आहे असें समजून दिली आहे. विनोबाजींनीं वांटपाची एक पद्धति घालून दिली आहे त्या पद्धतीप्रमाणें वांटपाचें काम होत असतें. म्हणून तुम्ही स्वतःचा कसलाच आग्रह न ठेवतां आणि कुळाविषयीं शत्रुभाव न बाळगतां कांहीं सुचवायचें असल्यास सुचवा."

कुळाला सांगितलें कीं, "ही जमीन भूदानांत मिळालेली आहे. कायद्यानें भूदानाच्या जमिनीला कूळ-हक्काचीं कलमें लागू केलेलीं नाहींत, हें तुम्हांला माहीत आहे का ? येथें असलेले सरकारी अधिकारीहि तुम्हांला तेंच सांगतील. तुम्ही मनगटाच्या बळावर तो हक्क टिकवूं म्हणाल तर तोहि चालू शकणार नाहीं. तुम्हांला जमीन पाहिजे असें वाटत असेल तर त्याकरितां शक्ति एकच आहे–प्रेमाची. दात्याशीं तुमचे प्रेमाचे संबंध झाले तर ही गोष्ट शक्य आहे. दात्याची इच्छा आहे त्याप्रमाणें ही जमीन इतर कोणाला जरी दिली, तरी चालेल अशी भावना तुम्ही धरलीत तर तुमच्याविषयीं सर्वांना सहानुभूति वाटूं लागेल. पण मलाच पाहिजे असा आग्रह धराल तर दात्यावरहि कांहीं परिणाम होणार नाहीं आणि इतरांची सहानुभूतिहि तुम्ही गमावून बसाल."

लोक शांतपणें हें सर्व ऐकत होते. दाता शांत बसला, कूळहि शांत झालें. दोघेहि विचारमग्न दिसूं लागले. थोडया वेळानें कुळानें सांगितलें, "मी जमीन सोडायला तयार आहें. पण मीहि गरीब आहें, माझा विचार सुद्धां करावा". दाता म्हणाला, "२२ एकरांपैकीं निम्मी जमीन याला द्या आणि निम्मी आम्हां दोघांच्या संमतीनें एखाद्या भूमिहीनाला द्या."

सर्वांनाच हा निकाल योग्य वाटला. प्रमाणपत्र लिहिलें गेलें. दाता आणि कूळ दोघांनीं एकमेकांच्या कपाळाला कुंकवाचा टिळा लावला. तो लावतांना दोघांच्याहि डोळ्यांत अश्रू उभे राहिले होते. जमिनीचें प्रमाणपत्र कुळाच्या हातांत देतांना दाता उद्गारला–"जमीन चांगली कर आणि


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सुखानें राहा. कधीं कांहीं गरज लागली तर माझें घर तुला उघडें आहे!"

## (७) 'जमीन काय संग न्हेयाची हाय ?'

"असं बघ जानू. खोतांनीं जमिनीवरील मालकी सोडल्यावर आतां तूंच मालक झालास हें अगदीं खरं, पण तुझ्याजवळ आणखी किती जमीन आहे सांग बरं ?"

"हाय तीनेक रुपये दस्ताची. पर निमीशिमी वरकसंच हाय सायबानू."

"पण तेवढी तरी आहे ना ? आणि हा शिदबा तुझ्या शेजारींच राहतो, त्याला तर अगदींच जमीन नाहीं हें खरं ना ? तुझ्या भाकरींतला चतकोर त्याला तूं नाहीं द्यायचास तर कोण देईल रे ? खोतांनीं तुझ्यासाठीं जमीन सोडली. आतां गड्या, तुझी पाळी आली आहे. तुझ्या मनानं ठरीव."

रत्नागिरी जिल्ह्यांतील एका गांवांत जमीन वांटपाचा कार्यक्रम चालु असतांनाचा वरील संवाद आहे. गांवांत ३-४ ब्राह्मणांची घरें होतीं आणि तेच गांवचे जमिनदारहि. बाकी सर्व कुणबी, महार. दोन वर्षांपूर्वीं झालेल्या एका भूदानाच्या सभेंत सर्व जमीनदारांनीं थोडी-थोडी जमीन दान दिली होती. बहुतेक सर्व कुळांकडेच असलेली जमीन होती. ज्या कुळांना अन्य जमीन नव्हती त्यांना त्यांच्या कूळ-वहिवाटीला म्हणून असलेली जमीन आतां त्यांच्या मालकीची म्हणून देण्यांत आली. जमीन वांटपाची पार्श्वभूमि, भूदानाचा विचार सांगितला गेला होताच. इतर जमिनीचीं प्रमाणपत्रें दिलीं गेलीं. आतां जानूकडे असलेल्या जमिनीबाबत विचार सुरू झाला. त्याच्याकडे स्वतःची कांहीं जमीन होती. जमीन कसली ? २-३ गुंठे भातशेती, बाकी सर्व वरकस डोंगराळ. २-३ वर्षांनीं त्यांत एकदां वरी-नाचणी पेरून द्यायची. पुनः दोनतीन वर्षें पड ठेवायची. पण पुऱ्या तीन रुपये दस्ताच्या जमिनीचा मी मालक आहे याचा त्याला अभिमान होता. १०-१२ माणसांचें कुटुंब होतें त्याचें. आणखीहि दुसरी जमीन तो खंडानें करीत असे, पण आतां स्वतःच्या मालकीची अशी आणखी जमीन आपल्याकडे येणार या विचारानें त्याचें मन मोहरून गेलें होतें.

एकदम दुधांत मिठाचा खडा पडावा तसें त्याला झालें. आपली होणार असलेली जमीन आतां सोडून कशी द्यायची ? ती दुसऱ्याला द्यायची? कां म्हणून ? त्याला वाटलें, हे सफेत कपडेवाले आपल्याला कायदा शिकवीत आहेत. कुठचा कायदा माझ्या वहिवाटीखालीं असलेली जमीन काढून घेतो तें पाहत्तों, असें त्याच्या मनांत आलें असावें. तो म्हणाला, "नाहीं द्यायची जमीन मला." सर्वांनीं त्याच्या करुणाभावनेला आवाहन करण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा एकच प्रतिप्रश्न होता : "माजी पोरांबालां बगताव खोतानूं तुमी, मी रातदिन कष्ट करतां तरीबी पोटांत दोन टाईम भाकरी नाय मिलत. ही मानसां सगळी भायली. पर तुम्हीबी असां म्हनतांव ? घ्येतांव तर घ्येवा बापडी जमीन, पर यकास उपासी मारून दुसऱ्यास देनारा खंयचा असा कायदा हाय तां मला सांगा."

जानूचें म्हणणें खरें होतें. त्याचीच नव्हे तर गांवांतील एकूण एकाची हीच अवस्था होती. जमीनवाले आणि बिनजमीनवाले—मालक आणि कुळें—या पदव्या फक्त सांगण्यापुरत्या, एकमेकांना वेगळे करण्यापुरत्या. कुणाचें दारिद्र्य गहूंभर जास्त, कुणाचे तीळभर कमी इतकाच फरक, करायचा झाला तर, करता आला असता. कुळांच्या केंबळी–झोपड्या युगानुयुगें होत्या तशाच आजवर आहेत. त्यांच्या दारिद्र्यांत कांहीं फरक झालेला नाहीं, कांहीं कसूर नाहीं; जमीनदारांचे वाडे मात्र, पूर्वी कुठें होतों आणि आज कुठें आलों, हें दाखवीत होते. काप गेले होते आणि भोकें राहिलीं होतीं. त्या भोंकामधून होणारें दारिद्र्याचें प्रदर्शन अधिकच भेसूर होतें. कुळांना जमीन पुरत नाहीं म्हणून ते दरिद्री आणि मालकांना जमीन स्वतः कसतां येत नाहीं, खंडाचें उत्पन्न कमी कमी होत गेलें म्हणून ते दरिद्री. अशा अवस्थेंत कुठचा कायदा त्यांना दानांत जमीन द्या म्हणून सांगूं शकला असता ?

पण तरीहि जमीनदारांनीं दान दिलें होतें.—मनापासून दिलें होतें. कुठल्या कायद्याला मान तुकवून नव्हे. त्यांच्या माणुसकीनें त्यांना सांगितलें आणि त्यांनीं दिलें. आतां पाळी होती कुळाची. तो का मागें राहणार ? पुन्हां त्याच्या अंतःकरणाला हाक घातली :"खोतांनीं तुझ्यासाठीं जमिनीची

मालकी सोडली. उदारपणा दाखविला. शेजारधर्म पाळला. आतां तुझी पाळी आहे-कायदा पाळण्याची नव्हे,धर्म पाळण्याची-शेजारधर्म पाळण्याची." असें म्हणतांच त्याचा चेहरा बदलला. 'उपाशी असलों तरी धर्म पाळला पाहिजे' ही भावना तर त्याला आईच्या दुधाबरोबरच मिळाली होती. "शेजाऱ्याला जगविण्यासाठीं देणं तुझं कर्तव्य आहे कीं नाहीं तें तुझं तूंच ठरव" या वाक्याबरोबर जानूची कायद्याची भाषा विरघळून गेली. तो क्षण-दोन क्षण विचारमग्न झाला आणि लगेच म्हणाला,"म्हनतांव तां बराबर हाय. घेवा जमीन शिदबास- जमीन काय संग न्हेयवाची हाय ? माजी बी पोरां आन् त्येची बी पोरांच. माजीं एक टाईम भाकर खातील, पर त्येच्या पोरांस बी आतां एक टाईम मिळंल !"

## (८) ओझरचें वांटप

ओझर गांवच्या सभेंत भूमिहीन एका बाजूला झाले. जमीन दोन कुटुंबांना पुरेल एवढी मिळालेली. भूमिहीनांची संख्या ३० च्या वर, ह्यांत हरिजन व कोळी अशा दोन जमातींचे लोक होते. भूमिहीनांना आपसांत विचार करून निर्णय घ्यायला सांगण्यांत आलें. सर्व भूमिहीन विचार करूं लागले. त्यांच्यातला एकजण, जो स्वतः हरिजन होता, तो **बोलला, "काय रे गड्यांनो, ही जमीन कुणाला मिळावी ? आपण चटकन निर्णय घेतला पाहिजे."** त्यावर सगळ्यांनीं त्याला साथ दिली : 'तूंच जमीन घे.' त्यावर तो म्हणाला : "मला ही जमीन नको. माझ्यापेक्षां ज्याला जास्त गरज आहे त्याला मिळाली पाहिजे. मला इतकी नड नाहीं." पुन्हां एकवार सगळ्यांचा आग्रह झाला.-'जमीन तूंच घे.' त्यावर तो मोठ्यानें बोलला : "मी घेतली तर हा काय न्याय होईल ? आपल्याला न्याय लावायचाय्. माझ्यापेक्षां हे दोघे गरजू आहेत. त्यांना नको कां मिळायला ? यांना आपण जमीन देऊं या." आणि मग त्यांना उद्देशून तो म्हणाला, "जमीन चांगली कराल कां रे बाबांनो ? चांगली केली नाहींत तर आमचा अपमान होईल बरं कां ?" सगळ्या भूमिहीनांनीं त्या दोघांना संमति दिली आणि सर्व जण सभेंत येवून बसले. जमलेले सर्व लोक हें सर्व पाहत होतें. अगोदर ते आपसांत बोलत होते कीं हे लोक काय ठरविणार आहेत ?

मारामाऱ्या करतील, भांडणें होतील झालं. पण १०-१२ मिनिटांच्या आंत त्या सर्व भूमिहीनांनीं आपसांत विचार करून योग्य त्या लोकांची निवड केली हें कांहींना खरेंच वाटेना. ज्या भूमिहीन म्होरक्यानें 'मला जमीन नको, त्याला द्या' असें म्हटलें त्यानें सभेंत उठून ज्या दोघांना जमीन मिळावी असें ठरलें होतें त्यांचीं नांवें सांगितलीं. लोकांना तीं एकदम पटलीं आणि त्यांनीं टाळचा वाजवून हर्ष व्यक्त केला. दात्यानें कुंकुमतिलक लावून प्रमाण-पत्र नव्या शेतकऱ्यांना दिलें.

## (९) उपळे गांवची गोष्ट

उपळे गांवची वस्ती ३००० ची आहे. हें बार्शी तालुक्यांतील एक सधन गांव आहे. तेथील २०० एकरांच्या एका जमीन-मालकानें २० एकरांचें भूदान दिलें होतें. दात्याला अगोदर कळविल्याप्रमाणें त्यानें गांवांत दवंडी देऊन वांटपाच्या कामाची सारी व्यवस्था करून ठेवली होती. रात्रीं ९॥ च्या सुमारास लोक सभागृहांत जमा व्हायला लागले. पाऊस झीम-झीम पडत होता, तरी जागा अपुरी पडली. सभेच्या कामाला सुरुवात झाली. दात्यांनीं दानपत्रांत दोन भूमिहीनांचीं नांवें सुचविलीं होतीं. ते दोघे वर्षानुवर्षें त्या दात्याच्या जमिनींत राबत होते. त्यांना जमीन नसल्यामुळें ती त्या दोघांना मिळावी अशी इच्छा त्यानें व्यक्त केल्यावर आणि ती वाजवी आहे हें दिसल्यावर त्या दोघांना १३ एकर क्षेत्र देऊन राहिलेल्या ७ एकरांच्या वांटपाचें काम सुरू झालें. गांवांतील ४२-४३ लायक भूमिहीनांचा प्रश्न गांवानें आजच्या सभेंत सोडवून टाकावा अशी गांवकऱ्यांना समजावून देऊन विनंति केली. लोकांना तर हें योग्य आहे असें वाटत होतें, परंतु दानाची तयारी मात्र होत नव्हती. गांवानें निवडलेल्या ४३ भूमिहीनांना जमीन द्यायची आवश्यकता होती परंतु वांटपाची जमीन तर ७ एकर. तेव्हां ही किती लोकांना द्यायची हा प्रश्न उभा राहिला. कांहींनीं सुचविलें कीं ती एकाला द्या. कांहींनीं सुचविलें कीं तीन चार जणांना वांटून द्या. शेवटीं ही ७ एकर जमीन दोघांना द्यावी असें ठरलें.

आतां त्या दोघांची निवड कशी करावयाची हें जमलेल्या भूमिहीनांना समजावून दिल्यावर लोकांची चुळबुळ सुरू झाली. हे कसें काय वांटप

करणार? गांवांतील पुढारी हें नांव तें नांव सुचविण्याचा प्रयत्न करूं लागले. दात्यांनीं सर्वांना सुचविलें कीं विनोबाजींची जी पद्धति असेल त्या पद्धतीनें वांटप होऊं द्या.

पावसामुळें भूमिहीनांनीं बाजूला जाऊन एकमेकांत विचार करावा अशी सोय नव्हती. सर्वांना शांत बसण्याची विनंति केली आणि लोक शांत झाले. भूमिहीनांमध्यें निवड करायचा सवाल आला तेव्हां सगळ्या भूमिहीनांची तोंडें गप्प झालीं. प्रत्येकाला वाटूं लागलें, आपण ही संधि कां दवडायची? त्यांच्यांतून एक उठला व म्हणाला, 'मला ही जमीन नको, अमक्याला द्या.' भूमिहीनांच्यांतून तो बाजूला जाऊन बसला. भूमिहीन एकेक उठूं लागले आणि दुसऱ्या भूमिहीनांचीं नांवें सुचवून बाजूला जाऊन बसूं लागले. सारे लोक मोठ्या कुतूहलानें पाहात होते. जिज्ञासा वाढत होती. शेवटीं जमीन कोणाला मिळणार? मध्यरात्रींचा १॥ वाजला. १३ भूमिहीन बसून होते. गाडी थोडी अडली. पुन्हां समजावलें: 'विचार करा, आज जमीन नाहीं मिळाली तर उद्यां मिळेल. आज जो जास्त गरजू आहे त्यालाच ती मिळूं दे. त्याच्याकरितां तुम्ही नांव मागें घेतलें तर तो तुम्हांला दुवा देईल.' बसलेल्या लोकांनीं साथ दिली. पुन्हां सात भूमिहीन उठले आणि बाजूला जाऊन बसले. सहा जण शिल्लक राहिले. पुन्हां समजाविलें, तेव्हां या सहांतून एक हळूंच उठला आणि मागें सरला आतां राहिले पांच पांडव. आतां तुमच्यांत कोण धर्मराज होणार? ते पांडव आपल्यांतल्या ल्हान असलेल्या नकुल-सहदेवांची नव्हती का काळजी घेत? जरा विचार करा आणि नकुल-सहदेवाची निवड करा. तें ऐकतांच शरीरानें स्थूल असलेला एक गृहस्थ उठला आणि बाजूला बसूं लागला. लोक म्हणूं लागले भीम बाजूला बसला. धर्मराजाची भूमिका शोभेल असा चारांपैकीं एक उभा राहिला आणि म्हणाला 'मिळूं दे जमीन त्या दोघांना, मी माझें नांव मागें घेतों.' या तिघांच्यासाठीं बाकीच्या भूमिहीनांनीं आपलीं नांवें मागें घेतलीं. आतां मात्र कोणीच कांहीं बोलेना. प्रत्येकाला वाटत असावें-'जमीन घ्यायला आपणच लायक आहोंत.' लोकांतून सुचवायला सुरुवात झाली. 'चिठ्ठया टाका' मी लोकांना म्हटलें. आतांपर्यंत चाळीस लोकांनीं आपलीं नांवें मागें घेतलीं होतीं. त्यांना जी

बुद्धि देवानें दिली ती बुद्धि यांना देव देणार नाही कां ? किंवा या बसलेल्या तुम्हां लोकांपैकीं कोणी हरीचा लाल असा नाहीं कां कीं जो उठून म्हणेल कीं दोघांना जमीन मिळणार आहे तर तिसऱ्यालाहि मी तीन चार एकर देईन. गरीबाविषयीं प्रेम प्रगट करायला यापेक्षां आणखी कोणती संधी तुम्हांला लाभणार आहे ? लोकांमधून भूमिहीनाबद्दल कसलीच हालचाल दिसेना, या तिघांपैकीं कोणी उठेना, तेव्हां काय करावें या विचारांत होतों. एवढ्यांत त्या तिघांतील एक उठून बोलूं लागला : "माझी अशी इच्छा आहे कीं त्या खंडूला एकट्याला ही जमीन मिळत असेल तर माझें नांव मी मागें घ्यायला तयार आहे. पण त्याला एकट्याला मिळाली पाहिजे." त्याला बाजूला जाऊन बसायला सांगितलें. खंडू खेरीज जो दुसरा होता तो उठला आणि म्हणाला, "ह्या खंडूलाच एकट्याला मिळूं द्या, मला नको!" सभागृहांत टाळ्यांचा एकच कडकडाट सुरू झाला. लोकांचें आपापसात बोलणें सुरू झालें--'निवड चांगली झाली. खंडूच्या आजोबाचीच ती जमीन होती. त्याची त्यालाच ती परत मिळाली. काय देवाचा न्याय आहे पहा!' सार्‍यांच्याच तोंडांतून हे उद्‌गार निघाले.

दात्याच्या हस्तें खंडूला कुंकुमतिलक लावून प्रमाण-पत्र दिलें गेलें. दाता बोलूं लागला : "मीं दोनशें एकरांपैकीं वीस एकर जमीन दिली आहे. त्यांत मीं फारसें कांहीं केलें असें नाहीं. काळाची मागणी आहे त्याला अनुसरून माझें दान आहे, मी फार मोठें मन करून दान दिलें असें लोक म्हणतात, परन्तु माझ्यापेक्षांहि या ठिकाणच्या ४२ भूमिहीन लोकांनीं आपल्या तोंडाजवळचा घांस दुसऱ्याकरितां मोठें मन करून दिला. त्यांचें आपण कौतुक केलें पाहिजे. आज आपल्याला या गांवांतील भूमिहीनांचा प्रश्न सोडविता आला असता तर मीहि त्यांत आणखी सामील झालों असतों. आपण गांवकरी याचा विचार करून हा प्रश्न सोडवूं या!"

## (१०) कुंभारी वांटप

सोलापूर तालुक्यांतील कुंभारी गांवची गोष्ट. सायंकाळच्या सुमारास गांवांत पोहोचलों. पाटील-तलाट्यांनीं गांवांत वांटपाची माहिती दिली होती. परंतु सगळ्यांना हें वांटपाचें काम जाहीर सभेंत होणार आहे हें

लक्षांत आलें नव्हतें. तेव्हां गांवांतल्या प्रमुखांना म्हटलें, "गांवांत रात्रीच्या सभेची दवंडी द्या." लोक कुरकुरत सांगूं लागले, "आमच्या गांवांत सभेला लोक येत नाहींत हो, २०-२५ माणसं जमतील झालं ! यापेक्षां आम्ही कांहीं नांवें सुचवितों, त्यांनाच जमीन देऊन टाका ना." पण आम्ही सभेचा आग्रह धरल्यावर दवंडी देण्याचें लोकांनीं ठरविलें. परंतु नेहमी दवंडीचें काम करणाऱ्यानें दवंडी देण्याचें नाकारलें. आम्हालाहि वेळ भरपूर होता. लोकांना म्हटलें, "जरा तुमचा गांव तर पाहूं या." चांगला ४-५ हजार वस्तीचा तो गांव, फिरायला तास दोन तास गेले. पण त्याचबरोबर रात्रीच्या सभेची आणि जमीन वांटपासंबंधींची माहिती ठिकठिकाणीं बसलेल्या लोकांना समजावून देतां आली. भूमिहीन लोकांना भेटून सभेची माहिती दिल्यावर त्यांनीं सभेच्या प्रचाराचें काम अंगावर घेतलें. दवंडी-वालाहि मग तयार झाला. त्याचा व्हायचा तो योग्य परिणाम झाला. मोठ्या संख्येनें लोक हजर झाले. रात्रीं १० ला सभेचें काम सुरू झालें. सरकारी अधिकारीहि बरेच हजर होते. सभेच्या सुरुवातीला सभेचे तीन भाग करण्यांत आले. एक, ज्यांना जमिनी किंवा धंदा आहे अशांचा, दुसरा ज्यांना जमिनी नव्हत्या अशांचा, आणि तिसरा मुलांचा.

जवळजवळ ९० भूमिहीन जमिनीसाठीं येऊन बसले होते. २१ एकर जमीन ४ दात्यांनीं दिली होती. ती फक्त चार कुटुंबांना देण्याइतकीच होती. दात्यांनीं सुरवातीला नांवें सुचविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना जरा सबूरी करण्याचा सल्ला दिल्यावर पुन्हां त्यांनीं आग्रह धरला नाहीं. भूमिहीन एकेक उठून त्यांना लायक वाटेल त्याचें नांव सांगत व आपलें नांव मागें घेऊन बाजूला जाऊन बसत. ४०च्या आसपास संख्या राहिली. एक तरुण उठला व म्हणाला, "माझ्यांत काम करण्याची शक्ति जास्त आहे, तेव्हां जमीन मला द्या." दुसरा उठला आणि म्हणाला, "मी चार लोकांचीं नांवें सांगतों त्यांना जमीन द्या." त्यानें नांवें सांगायला सुरवात केली. तिघांचीं नांवें सांगितल्यावर चवथें नांव त्यानें स्वतःचेंच पुढें केलें. कांहींना पटलें, तर कांहींना रुचलें नाहीं. कांहींना हंसायला आलें. एक तगडा तरुण उठला आणि म्हणाला, 'माझ्यांतहि शेतीचें काम करण्याची हिम्मत आहे, परंतु या पोराबाळांच्या म्हाताऱ्याला जमीन मिळूं द्या. मी कुठंहि काम करून पोट

भरेन." असें होतां-होतां १८ लोक शिल्लक राहिले. रात्रीचा ११। झाला, परंतु लोकांमध्यें कसलीहि चुळबुळ दिसली नाहीं. आणि ते घाईहि करीत नव्हते. हें सारें वांटपाचें महाभारत १८ अध्यायाच्या गीतेवर येऊन ठेपलें होतें. आणखी किती वेळ लागणार याचा अंदाज येईना. लोकांच्या सहन-शक्तीचा तरी किती अंत पहायचा! शेवटीं गीतेंत सांगितल्याप्रमाणें निर्णयाचें काम भगवान् श्रीकृष्णावरच सोपवून द्यावें लागलें. १८ चिठ्या तयार झाल्या. समोर बापाच्या मांडीवर बसलेल्या एका ८-९ वर्षांच्या मुलाला बोलावून त्यांतील चार चिठ्या उचलण्यास सांगितलें. त्यानें एकेक चिठ्ठी उचलण्यास सुरुवात केली. पहिली चिठ्ठी उचलली नांव जाहीर झालें. दुसरें व तिसरें नांव बोलले गेलें, तिघांच्यासाठीं ज्या ४०-४५ लोकांनीं आपलीं नांवें मागें घेतलीं होतीं व गांववाल्यांचें मनांत जी नांवें होतीं, तींच हीं नांवें आलेलीं पाहून सर्वांनाच समाधान वाटलें. चवथें नांव जाहीर होतांच मात्र सर्वत्र टाळ्यांचा कडकडाट झाला. तें नांव चिठ्या उचलणाऱ्या मुलाच्या बापाचें होतें!

दिवसभर शेतीच्या आणि ताली बांधण्याच्या कामानें आलेला त्या सर्वांचा शीण वांटपाच्या या पावन व गोड प्रसंगानें हरला. बाकीचे भूहीन लोक आपसांत बोलत घरीं जात होते, "आज त्यांना जमिनी मिळाल्या, उद्या आपल्यालाबी मिळाल्याशिवाय राहतील व्हय?"

## (११) अन्तापुर वांटप

मोसम नदीच्या खोऱ्यांत काम चालू होतें. कडक उन्हाळ्याचे ते दिवस होते. अन्तापुरला दुपारीं पोचल्यावर ठरल्याप्रमाणें दुपारची सभा घ्यायची होती. लोक घराघरांतून बसलेले दिसत होते. गांवांत अगोदर दवंडी झाली असल्यामुळें लोकांच्या पुढें चर्चेचा हाच एक विषय होता.

अर्ध्या–पाऊण तासांत नदीकांठीं माणसें जमूं लागलीं. सुट्टीचे दिवस व इतर कांहीं वेळ घालविण्याचें साधन नसल्यामुळें या सभेला मुलांची सेनाहि भरपूर हजर झाली. लोक जमल्यावर सभेच्या कामाला आम्ही सुरुवात केली. एका दात्यानें २१ एकरांचें दान दिलें होतें. आणि दुस-ऱ्यानें २० गुंठ्यांचें. हा लहान तुकडा होता पण बागायत होता. २१ एकर

जमीन एका भिल्ल कुटुंबाकडे कूळहक्कानें होती, तोहि हजर झाला. दाते मात्र परगांवचे असल्यामुळें येऊं शकले नाहींत. २२ भूमिहीन उठून बाजूला जाऊन बसले. ज्या भिल्लाकडे कूळहक्कानें ही जमीन होती त्याला स्वतःची अशी कसलीच जमीन नव्हती परंतु त्याचबरोबर सारी जमीन स्वतःला मिळावी अशीहि त्याची इच्छा दिसली नाहीं. त्यानें स्वतः व कांहीं लोकांनीं सुचविलें कीं, १० एकर या भिल्लाला ठेवा आणि ११ एकर इतरांना वांटून द्या. त्याप्रमाणें त्या भिल्लानें साऱ्या जमिनीवरचा कूळहक्क सोडल्याचें लिहून दिलें आणि त्याचे १० एकरांचे जमीन-वांटप-प्रमाणपत्र लिहिण्यांत आलें. राहिलेली ११ एकर जमीन व २० गुंठे बागायत जमीन किती लोकांना मिळावी असा प्रश्न उभा झाला. सगळ्यांनीं ठरविलें कीं ११ एकर तिघांना व अर्धा एकर बागायत एकाला अशी चारांची निवड करून टाका." त्या लोकांना समजावून द्यावें लागलें कीं ही निवड आम्ही करणार नसून भूमिहीनांनींच करायची आहे. त्यांनींच एकमतानें ठरवावें. सारे भूमिहीन लोक उभेच होते. त्यामध्यें बहुतेक सर्व भिल्ल आणि २-३ हरिजन होते. भिल्लांच्यांत दोन भाग होते. एक गांवच्या वरच्या भागांत राहणाऱ्यांचा आणि दुसरा गांवाच्या खालच्या भागांत राहणाऱ्यांचा. भिल्लांच्या वस्तीला 'भिलाटी' असें म्हणतात. त्यांतील कांहीं भिल्लांनीं सुचविलें कीं दोन भिलाटयांवरील आम्ही लोक आहोंत. तुम्ही या भिलाटींतील दोघांची आणि त्या भिलाटींतील दोघांची निवड करा. त्यांच्या सूचनेप्रमाणें आम्ही निवड न करितां त्या भिल्लांना आपापसांत विचार करून तुम्हीच प्रत्येकीं दोन दोन नांवें सुचवा असें सांगितलें. दोन्ही वस्तींतले लोक अलग अलग बसून विचार करूं लागले. निश्चय कांहीं होईना. ते निवड न करतांच सभेच्या ठिकाणीं परत आले. बराच वेळ अशा प्रकारें जाऊन कांहीं निश्चित निर्णय होत नाहीं हें पाहून सारेजण म्हणूं लागले, चिठ्ठ्या टाकूं या. चिठ्ठ्या लिहिल्या जाऊं लागल्या. एवढ्या वेळांत त्यांतील ६ लोकांनीं आपलीं नांवें मागें घेतलीं. राहिले १६ जण. चिठ्ठ्या तयार झाल्या आणि या चिठ्ठ्या उचलण्यासाठीं एका ७-८ वर्षांच्या शेजारच्या मुलीला म्हटलें 'ए पोरी, जरा इकडे ये.' तों तिच्या मागें असलेली १७-१८ वर्षांची एक भिल्ल नववधू तरुणी पुढें आली. साऱ्यांनाच हसूं आलें. तिची कांहींच चूक नव्हती. मोठ्या

मुलीला किंवा बाईला 'पोरी' म्हणूनच हांक मारण्याची त्या भागांत पद्धत आहे. त्या तरुणीला वाटलें आपल्यालाच बोलाविलें आहे. भोंवतालच्या साऱ्या लोकांनीं सांगितलें कीं "त्या पोरीनें (बाईनें) उचलल्या तरी चालतील. चांगली निर्मळ पोरगी आहे."

एक चिठ्ठी उचलली, दुसरी उचलली, तिसरी आणि चौथी उचलून ती मागें सरली. चिठ्ठींतील एकेक नांव जाहीर होऊं लागलें. पहिलें नांव जाहीर झालें तें वरच्या भिलाटींतील एका भिल्लाचें. दुसरें नांव खालच्या भिलाटींतील भिल्लाचें, तिसरें एका हरिजनाचें आणि चौथ्या चिठ्ठीतलें नांव पूर्ण वाचून होण्यापूर्वींच सगळे आनंदानें ओरडूं लागले. हा हर्षनाद बराच वेळ चालला. याचें कारण माझ्या कांहींच लक्षांत येईना. चटकन् एकजण म्हणाला, "तें त्या बाईच्या नवऱ्याचें नांव आहे." साऱ्या गांवकऱ्यांची पहिल्यापासून इच्छा होती कीं या भिल्ल तरुणाला जमीन मिळालीच पाहिजे. नुकतेंच गांवानें आपल्या खर्चानें मोठ्या थाटानें त्याचें लग्न करून दिलें होतें. सगळ्यांचा त्याच्यावर मोठा लोभ होता. त्यामुळें प्रत्येकाला वाटत होतें कीं, या भिल्ल तरुणाला जमीन मिळावी. गांवावर आलेल्या एका संकट-प्रसंगीं त्यानें आपला जीव धोक्यांत घालून तो धोका टाळला होता, त्यामुळें साऱ्या गांवाचें प्रेम त्याला मिळालें होतें. त्याचमुळें त्याची बायको ज्यावेळीं पुढें आली त्यावेळीं कोणीच आक्षेप घेतला नाहीं. उलट सारे जण म्हणूं लागले कीं, तिलाच चिठ्ठी उचलूं द्या. आणि एकजण म्हणाला त्याप्रमाणें ती खरीच लक्ष्मी ठरली. लग्न झाल्यावर या भिल्ल तरुणाचा संसार सर्वांना गौरव वाटेल अशा प्रकारें तिनें चालविलेला होता. अशा या गृहलक्ष्मीनें आज या तरुणाची खरी भाग्य-लक्ष्मी उजळली. तिचें नांवहि 'लक्ष्मीच' होतें.

कोणाला कोणती जमीन द्यायची म्हणून प्रमाण-पत्र लिहितांना गांवकऱ्यांना विचारलें तेव्हां या लक्ष्मीला बागायत तुकडा द्या आन् ११ एकर बाकीच्या तिघांत वांटा, असें सर्वांनीं सांगितलें. अशा प्रकारें ती जमीन एकूण पांच कुटुंबांमध्यें वांटण्यांत आली. 'न मागे तयाची रमा होय दासी' याप्रमाणें कांहींनीं बैल, कांहींनीं अवजारें त्या भिल्ल तरुणाला पुरविलीं.

## (१२) माडगूळ वांटप

सांगली जिल्ह्यांत वांटपाचें काम चालू होतें. आटपाडी भागांतील माडगूळ गांवीं दिवाळींत आम्ही गेलों होतों. दिवेलागणीची वेळ असेल. गांवांत पोंचतांच आमच्या सभेच्या कामाला सुरुवात झाली. प्रांतअधिकारी, मामलेदार सारे सरकारी अधिकारी मुद्दाम वांटपांचें काम पहाण्यासाठीं कुतूहलानें आले होते. भूमिहीन बाजूला झाले. ते नऊजण होते.

दिवाळी सर्वांच्याच घरांत चांगली साजरी व्हावी त्याकरितां सर्वांना जमीन कशी मिळाली पाहिजे त्यासंबंधीं प्रथम मी समजावून सांगितलें. सारे लहान थोर आमचें बोलणें शांतपणें लक्ष लावून ऐकत होते. साऱ्यांच्या चेहेऱ्यावर एक प्रकारची प्रसन्नता दिसत होती. 'आज आपल्या गांवांमध्यें ८ दात्यांकडून २० एकर२०गुंठे जमीन मिळालेली आहे. तिचे सहा तुकडे पडत आहेत, म्हणजे ६ लोकांना ही जमीन मिळूं शकेल. परंतु तिघांचा प्रश्न राहतो. तिघांसाठीं लोकांनीं आणखी थोडी जमीन द्यावी; अशी आम्ही मागणी केली.

भूमिहीनांना आपसांत विचार करून सहांची निवड करावयास सांगितल्यावर त्यांच्यापैकीं एकजण उठला आणि म्हणाला, "माझा सुतारीचा धंदा थोडा चालतो, तेव्हां कमें तरी मी माझें भागवीन. या सहाजणांना त्या जमिनी मिळू द्यात." इकडे भूमिवाल्यांमध्यें एकजण उभा झाला आणि त्यानें" "एक एकर जमीन घ्या" असें सांगितलें. त्यांच्या पलिकडे बसलेले एक वृद्ध गृहस्थ उठले व त्यांनीं आपलें अर्धा एकर दान जाहीर केलें. त्यांचा मुलगा उठला आणि म्हणाला, "माझी बैलजोडी घेऊन ज्याला ही आमची जमीन मिळेल त्याला मदत करायला मी जाईन." भूमिहीन पाहातच होते. त्यांच्यामधून एकजण उठला आणि त्यानें इतरांकरितां आपलें नांव मागें घेतलें. एका बाजूनें दान दिलें जात होतें आणि दुसऱ्या बाजूनें भूमिहिन दुसऱ्यासाठीं आपले नांव मागें घेत होते. दोन्हीकडे त्यागाचें दर्शन होत होतें. इकडे भूमिवाल्यांनीं राहिलेल्या तिघांच्या करितां ६ एकर १८ गुंठे दान जाहीर करून भूमिहीनांचा प्रश्न सोडविण्याचें कर्तव्य बजावलें. आणि दुसरीकडे भूमिहीनांनीं ६ लोकांच्या

निवडीच्या जबाबदारीचें कर्तव्य पार पाडलें. भूमिवाल्यांना भूमिहीनांकडून प्रेम मिळालें आणि भूमिहीनांना मोबदल्यांत जमीन मिळाली.

## (१३) सावरोली वांटप

कुलाबा जिल्ह्यांतील सावरोली गांवांत ठोसर कुटुंबाकडून १०० एकर जमीन मिळाली होती व ती सर्व जमीन नसलेल्यांना व कमी जमीनवाल्यांना वांटली गेली होती. तरी शेवटीं ४-५ कुटुंबें भूमिहीन उरलींच. इतक्या जमिनीचें वांटप करण्यांत ४-५ दिवस गेले. हें सगळें होत असतांना भूदानाची कल्पना जनमनांत बरीच रुजून गेली, म्हणून या गांवांत कोणीहि भूमिहीन राहणार नाही, असें वाटू लागलें. हळूं-हळूं एक-एक भूमिहीनास आपल्या थोड्या जमिनीपैकी थोडी जमीन देणारे दाते पुढें येऊं लागले. एकानें तर जपानी पद्धतीनें लावलेली एक चोंडास उभ्या पिकासह एका भूहीन बाईला दिली. तरीही एक भूमिहीन उरला. मग परीक्षाच पहायचें ठरलें, शेवटच्या दिवशीं वांटपाचें काम करून मी झोपलों असतां रात्री ११ वाजता एका गृहस्थानें येऊन उठविलें.

त्याच्या बरोबर तो उरलेला भूमिहीन होता. तो म्हणाला, "मी माझ्या जमिनीपैकी कांहीं जमीन देण्यास तयार आहे. करा दानपत्र आणि द्या ती जमीन त्याला." दान आणि वांटप एकांच क्षणीं होऊन गांवांत बेजमीन कोणीच शिल्लक राहिला नाहीं !

## (१४) निफाडचें वांटप

चार एकरांचें वांटप आणि गांव तालुक्याच्या ठिकाणचें. तेव्हां सभा कोठें भरवावी असा प्रश्न उपस्थित झाला. मी सुचविलें, ज्या भागांत भूमिहीन राहतात तेथें सभा जाहीर करा. ग्रामपंचायतीच्या माणसांनीं दवंडी दिली. गांवांतील भूदात्यांना भेटायचें काम चालू होतें. गांवची माहिती असलेल्या एका मित्रानें पोलीस सबइन्सपेक्टरकडे भेटण्यासाठीं मला नेलें. भूदानाच्या कामासंबंधी ते सहानुभूति राखणारे होते. त्यांच्याबरोबर चर्चा झाली. ते गृहस्थ म्हणाले, "तुम्ही या जमिनी घेता पण वांटप कसें काय करतां? चांगल्या जमिनी तुम्हाला मिळतात कां?" इन्सपेक्टर-

साहेबांना वांटपाची पद्धति समजावून दिली. त्यावर ते म्हणाले, "भूमिहीन आपसांत एकमत करून वांटप करतात हें शक्य नाहीं. जमीन कां कोणी आपसांत वांटून घेतील ? जो तो मला पाहिजे असें म्हणणार. गेल्या १५-१६ वर्षांच्या माझ्या अनुभवावरून सांगतों. भांडणाशिवाय वांटप होणें शक्य नाहीं. सगळीकडे जमिनीसाठीं तर एवढ्या मारामाऱ्या आणि कोर्टकचेऱ्या. आणि तुम्ही म्हणतां लोक प्रेमानें वांटून घेतात. हें मला खरेंच वाटत नाहीं." मी त्यांना एवढेंच म्हटलें कीं, 'रात्रीच्या सभेला आपण जरूर या.' यापेक्षां त्यांना जास्त कांहीं सांगणें शक्य नव्हतें. ते अर्थात् त्यांच्या व्यवसायाच्या अनुभवावरून बोलत होते.

रात्री वांटपाच्या सभेला सबइन्सपेक्टरसाहेब माझ्याबरोबर आले. भिल्लांची ती वस्ती. सभेला फार लोक आले नव्हते. वांटपाच्या कामाला सुरुवात झाली. जमीन नसलेले अकरा लोक बाजूला झाले. जमीन एकट्याला देण्यापुरतीच होती. भूमिहीनांनीं आपसांत विचार करून एकाची निवड करायची आहे हें त्यांना पटवून द्यायचा प्रयत्न झाला. दोघांनीं आपलीं नांवें मागें घेतलीं. नऊ लोक राहिले. त्यांच्यापैकीं कोणी पुढें कांहीं बोलेना. बरोबर आलेले हे पोलीस सबइन्सपेक्टर मित्र त्यांना सांगूं लागले : "हें पहा, आतां या दोघांनीं दुसऱ्यासाठीं आपलें नांव मागें घेतलें. त्यांनीं जसा तुमच्यांतला गरीब गरजू माणसाचा विचार केला तसा तुम्ही आपसांत विचार कराना आणि ठरवून टाका एकाचें नांव". दोन तीन भूमिहीन आपसांत विचार करूं लागले. सबइन्सपेक्टर साहेब पुनः पुनः त्या भूमिहीनांना समजावूं लागले : "जमीन कोणाला तरी एकाला मिळणार आहे. तुम्हीच एकाची निवड केली तर तुम्हालाहि अभिमान वाटेल आणि ज्याला जमीन मिळेल त्यांचीं पोरंबाळं तुम्हाला दुवा देतील. जरा विचार करा." सबइन्सपेक्टर साहेब बोलत होते आणि एकेक भूमिहीन उठत होता आणि आपलें नांव मागें घेत होता. अखेरीस चार जण शिल्लक राहिले. थोडा वेळ चार जण गप्प बसले. हें पहातांच सबइंन्सपेक्टरसाहेब त्यांना पुन्हा म्हणाले, "चौघे जण जरा बाजूला जा आणि आपसांत विचार करून नांव ठरवा." ते चौघे उठले आणि बाजूला जाऊन त्यांनी एकाच्या नांवाचा निर्णय केला व तें नांव सांगितलें. जमलेल्या लोकांनीं त्या नांवाचें

स्वागत केलें. सन्मानपूर्वक पोलीस सब-इंन्सपेक्टरसाहेबांच्या हस्तेंच त्याला प्रमाणप्रत्र देण्यांत आलें.

आणि वांटपाची सभा संपली. घराकडे आम्ही परतत होतों. तेथील मदत करणारे मित्र सबइन्सपेक्टरना म्हणाले, "अहो, वांटप समजावून देण्याचें अन वांटप करण्याचें काम तुम्हीच केलेंत कीं." ते गृहस्थ त्यावर उत्तरले, "होय. विनोबांचें काम हें वेगळेंच काम आहे. इथे दुसऱ्याचा विचार करायला शिकविलें जातें. माणसाच्या सद्‌भावनेवर विश्वास ठेवला पाहिजे ही गोष्ट खरी आहे. माणसाला ज्या पद्धतीनें वागवावें त्या पद्धतीनें तो वागूं शकतो. प्रेमाची देखील एक शक्ति आहे."

## (१५) कुपखेडें वांटप

सकाळची वेळ होती, या लहानशा गांवांतील सारे गांवकरी गांवच्या पारावर सभेसाठी जमले होते. गांवामध्ये ७ एकरांचें भूदान झालेलें होतें. जी मिळालेली जमीन होती ती कूळहक्कानें शेजारच्या गांवांतील एका सधन अशा इसमाकडे वहिवाटीला होती. त्या कुळाला हि निरोप पाठविण्यांत आला होता, परन्तु ते गृहस्थ हजर राहिले नाहींत. जमीन उत्तमपैकीं होतीं. आपल्याकडे ती जमीन राहावी ह्या हेतूनें त्या कुळानें आपल्या नांवावरचें खातें बदलून तें भावाच्या नांवावर केलें होतें आणि स्वतः कृत्रिम भूमिहीन बनला होता. त्याचे इतरहि कांहीं धंदे होते, त्यामुळें या जमिनीचें वांटप करतांना ती या कुळाला देणें न्याय्य होणार नाही, कूळ हजर नाहीं, त्यामुळें वांटप करावें कीं न करावें असा प्रश्न उपस्थित झाला. गांववाले आणि भूदाते म्हणाले, ही जमीन भूमिहीनांच्या मध्यें वांटून टाका. तें कूळ आपला कब्जा सोडून देईल.

शेजारीं शाळा चालू होती, सारे गांवकरी बोलताहेत, चर्चा करीत आहेत याकडे साऱ्या मुलांचें लक्ष वेधलें होतें. शिक्षकांना समजलें कीं ही जमीनवाटपाची सभा आहे. तेव्हां शिक्षकांनीं येऊन विचारलें कीं 'आमचीं मुलें तुमच्या सभेला आणून बसवूं कां? मुलांना भूदानाची आणि जमीन-वांटप कसें करतात याची आयतीच माहिती मिळून जाईल.' मी त्यांना होकार दिला. समोर बसलेले गांववाले म्हणाले, 'मुलें गोंधळ करतील, मुलांचें काय

काम आहे.' गांवकऱ्यांना समजावलें कीं 'ही विनोबांची चळवळ मुलांनाच समजली पाहिजे. या मुलांना समजेल आणि तीं शिकतील कीं आपण सारे भाऊ-भाऊ आहोंत, तेव्हां वांटून घेतलं पाहिजे आणि वांटून खाल्लं पाहिजे.'

रीतीप्रमाणें भूमिहीन बाजूला होऊं लागले. त्या लहानशा गांवांत असें कितीकसे भूमिहीन असणार? एकूण सातजण बाजूला बसले. दोन तीन मुलांची आपसांत कुजबूज चालू होती. एक मुलगा शेजारच्या मुलाला म्हणत होता कीं "अरे, तूंहि उठून तिथें बैस कीं ; तुझा बाप आला नाहीं म्हणून काय झालं ?" मुलाला मीं विचारलें, "तूं काय बोलत होतास? " तो मुलगा धीटपणें म्हणाला, "या माझ्या मित्राला मुळींच जमीन नाहीं. याचा बाप मजुरी करतो, पण तोहि पायानें लंगडा होऊन घरांत बरेंच दिवस पडला आहे, त्याच्या आईलाच पोटा-पाण्याचा धंदा करावा लागतो. त्याला म्हटलें कीं तुलाबी जमीन नाहीं तेव्हा तूं बेजमीनवाल्यांच्यांत जाऊन बैस." "बरोबर आहे," गांवकरी म्हणाले, "त्याच्या बापाला जमीन मिळालीच पाहिजे, तो लई चांगला मनुष्य हाय. तो भिल्ल आहे पण त्यानं आपल्या आयुष्यांत कधीहि चोरी केली नाहीं." त्याच्या योग्यतेचा दाखला देण्यासाठीं साऱ्यांची धडपड पाहून त्या माणसाबद्दलचें कौतुक आणि त्याची भेट घेण्याची इच्छा झाली. सगळे शांत झाले. तो भिल्ल मुलगा भूमिहीनांच्यामध्यें येऊन बसला. साऱ्यांना पुन्हा एकदां विचारलें, 'गांवांत ज्यांना जमीन नाहीं असे सगळे लोक आले कां ?" एक मुलगा उठून बाजूच्या एका मुलाकडे बोट दाखवून म्हणाला, "त्याच्या बापाला कसलीच जमीन नाही." त्याचा बाप सभेला आलेला नव्हता. याहि मुलाच्या वडिलाचें नांव गांवकरी विसरले होते. पहिल्या भिल्ल मुलाप्रमाणें हा दुसरा हरिजन मुलगाहि भूमिहीनांच्यामध्यें येऊन बसला.

भूमिहीनांची संख्या एकूण ९ झाली. ही सात एकर जमीन किती कुटुंबांना देतां येईल हें ठरवावयाचें होतें. जमीन चांगली असल्यामुळें, कांहींनीं सात जणांना, कांहींनीं पांचांना आणि कांहींनीं दोघांना द्या, असें सुचविलें. तुकडेबंदी-बिलाप्रमाणें त्या जमिनीचा तुकडा दोन एकराच्या आंत पडू शकत नव्हता. आणि एकेक एकर वांटूनहि जमीन चांगली असली तरी

फारसा उपयोग झाला नसता म्हणून ती तिघांना द्यावी ही सूचना सर्वांना पसंत आली. आतां तीन लोकांची निवड करावयाची.

मीं मुलांशीं प्रश्नोत्तरांना सुरुवात केली. मुलांना विचारलें "ही जमीन कोणीं निर्माण केली ?"

"देवानं." मुलें मोठ्यानें म्हणालीं.

"कोणासाठीं निर्माण केली ?"

"माणसासाठीं."

"सर्व माणसांसाठीं कीं थोड्या माणसांसाठीं ?"

"साऱ्यांसाठीं"

"जमीन सगळ्यांची आहे आणि सगळ्यांचा या जमिनीवर हक्क आहे. आज आपण प्रेमानं, ज्यांना जमिनीवर हक्क नाहीं अशांपैकीं तिघांना, जमिनीचा हक्क देणार आहोंत. पहिल्यांदा भाकरी आपण कोणाला द्यायची रे ? ज्याच्या पोटांत भूक आहे त्याला कीं ज्याचं पोट भरलं आहे त्याला ?"

"ज्याच्या पोटांत कांहीं नाहीं त्याला" सारीं मुलें बोललीं. त्यावर एका मुलाला विचारलें–

"तुला गोळ्यांचा डबा दिला तर तूं काय करशील ?"

"मी माझ्या भावांना वांटून देईन."

"आणि जर तूं वांटून द्यायचं नाहीं म्हटलं तर ?"

"तर भांडण होईल."

"मग हें तुमच्या लक्षांत आलं असेल कीं आज समाजांत भांडण कां होतं ? ज्याचा जो हक्क आहे त्याला तो दिला पाहिजे. आपल्या इथं नऊ भूमिहीन बसले आहेत, ते नऊहि लोक लायक आहेत, गरजू आहेत. यांच्या-जवळ जमीन नाहीं आणि बाकीच्यांच्या जवळ जमीन आहे. तेव्हां ज्यांना जमीन आहे त्यांनीं, ज्यांना जमीन नाहीं अशांना नको कां द्यायला ?"

"द्यायला पाहिजे," सारीं मुलें एकदम म्हणालीं.

सारे गांवकरी शांतपणें बसून ही प्रश्नोत्तरें ऐकत होते. त्यांना कौतुक वाटत होतें. मुलांना म्हटलें "गरीबांना जमीन मिळाली पाहिजे ही गोष्ट खरी, पण त्यांना देणार कोण ?"

"आम्ही देणार" मुलें बोललीं.

"तुम्हांला हक्क आहे कांरे देण्याचा ?"

"नाहीं." पुढें तीं म्हणालीं, "आम्ही आमच्या घरांतल्या माणसांना सांगूं."

मोठया माणसांना म्हटलें कीं "पहा, मुलांची तयारी आहे. जमीन तीन लोकांना देतां येण्याइतकीच आहे. बाकीच्या सहा लोकांकरितां प्रत्येकानं आपला एकेक हिस्सा किंवा सहा लोकांनीं आपला एकेक हिस्सा दिला तर ह्या लोकांचा प्रश्न सुटून जाईल." एकदोन मिनिटें वाट पाहिली पण कोणी तयार होतांना दिसलें नाही.

बसलेले ते लहान थोर नऊ भूमिहीन हें सर्व ऐकत होते. त्यांना सांगितलें, "तुम्हा सर्व लोकांना जमीन मिळावी ही या साऱ्या बसलेल्या लहान मुलांची इच्छा आहे. तसें त्यांनीं बोलूनहि दाखविलें आहे, लहान मुलांच्या रूपानें परमेश्वर बोलत असतो असें आपण मानतों आणि आज कालहि तसा अनुकूल आलेला आहे. तुम्हां सगळयांना आज जमीन मिळाली नाहीं तरी उद्यां मिळेल. पण तुम्ही हाच विचार करून आपल्यामध्यें जास्तींत जास्त जे तीन गरजू असतील त्यांची निवड करा.

नऊ लोकांनीं तीन-चार मिनिटांच्या अवधींत तिघांची निवड केली. त्यांत एक तो भिल्ल मुलगा होता, दुसरा हरिजन मुलगा आणि तिसरा मराठा होता. तिघांना प्रमाणपत्रें देण्यांत आलीं आणि समारंभ संपवून त्या भिल्ल मुलाच्या बापाला भेटण्यासाठीं सारा गांव त्याच्या झोपडीकडे लोटला. सारीं मुलें मोठया आनंदानें–

"सबै भूमि गोपालकी, नको कुणाची मालकी,
द्यारे द्यारे वांटून द्या, घ्यारे घ्यारे वांटून घ्या"

अशा घोषणा करीत शाळेंत परतलीं.

## १६. साकोरे वांटप

रात्रींची ८॥-९ ची वेळ होती. गांवांत पुनः एकदा दवंडी देऊन वांटपाचें निमंत्रण गांवाला दिलें. चावडीच्या ओट्यावर सभेसाठीं टेबल खुर्ची मांडली गेली. लोक पटांगणांत व्यवस्थित बसले. वांटपाच्या सभेला सुरुवात झाली. सभेचें अध्यक्षस्थान तालुक्याच्या मामलेदारांनीं घेतलें होतें.

गांवांत मिळालेल्या ९ एकरांच्या वांटपाचें काम त्या सभेमध्यें करावयाचें होतें. गांवासमक्ष भूमिहीनांनीं एका बाजूला होऊन आपसांत आपल्यांतल्या जास्तींत जास्त गरजूची निवड करावयाची अशी वांटपाची पद्धत गांवाला समजावून दिल्यावर त्या १५०० वस्तीच्या गांवांत २४ भूमिहीन बाजूला झाले. त्यांनीं एकमतानें आपला निर्णय घ्यावा म्हणून त्यांना समजावून द्यायला सुरुवात झाली. ही मिळालेली जमीन मध्यम प्रतीची असल्याकारणानें ती एकाच कुटुंबाला पुरेशी होईल असें सर्वांच्या संमतीनें ठरलें. त्या एकाच भूमिहीनाची निवड या ठिकाणीं करावयाची होती.

बसलेल्या भूमिहीनांत निरनिराळ्या जाती-जमातींचे लोक होते. तसेच अलग-अलग वयाचेहि होते. १० वर्षाच्या मुलापासून तों ६० वर्षाच्या म्हाताऱ्यापर्यंत निरनिराळ्या विचारांचे आणि पक्ष मानणारेहि लोक त्यांमध्यें होते. कोणाच्या डोक्यावर पांढरी टोपी होती; कोणीं लाल टोपी घातली होती. कोणाच्या डोकीला जीर्णशीर्ण झालेलें पागोटें लोंबत होतें. "बाजूला जाऊन आम्ही आपसांत ठरवूं शकणार नाहीं. तुम्हीच कोणाचं तरी नांव नक्की करा," असें ते भूमिहीन सांगूं लागले. मीं त्यांना म्हटलें, "तुमच्यांतल्या गरजू माणसाची निवड आम्ही कशी काय करणार ? माझ्यापेक्षां तुम्हांलाच एकमेकांची माहिती जास्त असणार. रोज एकमेकांना तुम्ही जवळून पाहत असता, कोणाची स्थिति काय आहे याची बारीक-सारीक माहिती तुम्हांला असते. म्हणून तुम्ही आपला आणि दुसऱ्याचा असा दोघांचा विचार करून निर्णय घ्या."

भूमिहीनांच्या मधून एकेक उठून बोलूं लागला. तो आपल्याला योग्य वाटेल त्या दुसऱ्या गरजूचें नांव सांगत असे आणि आपलें नांव मागें घेऊन

दुसरीकडे जाऊन बसे. अशा प्रकारें सोळा भूमिहीन इतरांची नांवें सांगून अलग बसले. सतरावा म्हणाला, "जमीन करायला मी लायक आहे. माझ्या मनगटांत ताकत आहे. मला जमीन मिळाली पाहिजे." मीं त्याला विचारलें "बसलेल्या सात जणांची तुला संमति आहे कां ?" तो त्यांना विचारूं लागला. राहिलेले भूमिहीन कांहींच बोलेनात, उघडच होतें कीं इतरांची त्याला मान्यता नव्हती. त्याला खालीं बसविण्यांत आलें. इतर सातांपैकीं कोणी कांहीं बोलेना. भूमिहीनांमध्यें एक दहा वर्षांचा मुलगा बसला होता. त्यानें एका चाळीशींतल्या गृहस्थाचें नांव सांगितलें आणि आपलें नांव मागें घेऊन तो आमच्या शेजारी येऊन बसला. या मुलानें 'मला नको, त्याला द्या' असें सांगतांच बसलेल्यांपैकीं चार लोक उठून त्या मुलानें ज्याचें नांव सुचविलें होतें त्याचेंच नांव सांगून बाजूला जाऊन बसले. उरले तिघे. तिघांमधला एक जण उठला आणि म्हणाला "मलाहि जमिनीची फार गरज आहे. कित्येक वर्षं झालीं दुसऱ्याच्या जमिनीवर मी कष्ट करतों आहे. दोन तीन पोरं कर्ती झालींत, म्हटलं जमीन मिळाली तर शेतांत बसून पोरं काम करतांना आंनदानं बघीन अशी आशा वाटत होती. परंतु ही जमीन कोणाला तरी एकालाच मिळणार म्हणतां तेव्हा मला मिळेल तेव्हां मिळूं द्या, आता त्याला मिळूं द्या." मुलानें ज्याचें नांव सांगितलें होतें तेंच नांव याहि म्हाताऱ्या-बाबानें सांगून काठी टेकत टेकत तो बाजूला जाऊन बसला. नंतर उरले दोघे. त्यांतील एक, ही जमीन मला मिळाली पाहिजे असें म्हणत होता. परन्तु त्याच्याबद्दल कोणालाच सहानुभूति दिसली नाहीं. दुसऱ्याच्या मनगटांत ताकत कमी होती परन्तु भूमिहीनांचा आणि बसलेल्या गांववाल्यांचा त्याला पाठिंबा दिसत होता. लोकांमधून नांव सुचवायला चुळबुळ सुरू झाली. ज्याला साऱ्यांचा पाठिंबा होता तो बोलत नव्हता आणि ज्याला जनतेची सहानुभूति नव्हती तो मात्र सारखा बोलण्याचा प्रयत्न करीत होता. आपसांत दोघांचा निर्णय लागणें शक्य नव्हतें.

सभेमध्यें गडबड व्हावयास सुरुवात झाली. पुन: एकवार शांत होण्याची मी विनंति केली. लोक शांत झाले. शेजारीं बसलेल्या त्या लहान भूमिहीन मुलाला उभें केलें. त्याच्यासाठीं १०-१२ भूमिहीन लोकांनीं आपलीं नांवें मागें घेतलीं होतीं आणि भूमि घ्यायला लायक असलेल्या व

घरांत गरीबी असतांना मिळू शकणारी ही जमीन दुसऱ्याला द्या असें त्यानें म्हटलें त्यामुळें साऱ्यांनाच त्याचें कौतुक वाटलें. मीं त्याला म्हटलें कीं, "पुढें जें कांहीं होणार आहे तें तूं नीट ऐकून घे आणि मी विचारीन त्या प्रश्नांचीं उत्तरें दे." त्यानंतर त्या दोघा भूमिहीनांपैकीं 'जमीन मला पाहिजे' म्हणणाऱ्याला उभें राहण्यास सांगितलें. ही जमीन आपल्यालाच मिळणार अशा झोकांत आणि थाटांत तो उभा राहिला. त्याला विचारलें, "तुझी जरा माहिती आम्हांला सांगतोस कां? तुझ्या मनगटांत ताकत आहे. जमिनींत उत्पन्न वाढवावयाचें तर त्याला मनगटांत ताकत पाहिजे ही गोष्ट खरी आहे," त्याला वाटलें कीं जमीन आतां आपल्यालाच हे देणार आणि त्यानें मोकळेपणानें माहिती देण्यास सुरुवात केली.

गांवांतल्या लोकांना त्याच्या परिस्थितीची कल्पना चांगली होती. तो सांगूं लागला, "मी लाल झेंड्याचा सभासद आहें. आम्ही चार भाऊ आहोंत आणि घरांत पांचवी आई आहे. आम्ही चारहि भाऊ शेतांत काम करतों. शिवाय एकजण दुधाच्या विक्रीचेंहि काम करतो. प्रत्येकाला सव्वा रुपया तरी पडतो. चारहि भाऊ आम्ही काम करण्यासारखे असल्यामुळें तुम्ही आम्हांला जमीन दिली पाहिजे." इतके सांगून तो खालीं बसला. दुसरा उभा राहिला. त्याच्याकडून माहिती कळली कीं त्याच्या घरांत तो धरून पांच माणसें आहेत. वडील आंधळे आहेत, आई पांगळी आहे, बायको आणि एक लहान मूल आहे. घरांत कमावता हाच एकटा होता. आणि खाणारे मात्र पांचजण. रोजमजुरी फार तर सव्वा रुपया पडायची.

त्या लाल झेंड्याच्या सभासदाला विचारलें, "तूं ज्या पक्षाचा आहेस त्या पक्षाचे लोक असें म्हणतात कीं साऱ्या श्रीमंतांची श्रीमंती काढून घेतली पाहिजे आणि गरीबांना वांटून दिली पाहिजे. ज्याच्याजवळ जें जास्त आहे तें काढून घेऊन दुसऱ्याला दिलें पाहिजे तरच न्याय आहे. तुला तर बिलकूल जमीन नाहीं, ती मिळाली पाहिजे ही गोष्ट खरी. पण जो दुसऱ्यापेक्षां श्रीमंत आहे त्याची श्रीमंती काढून दुसऱ्याला दिली पाहिजे हें तुला मान्य आहे ना?" तो म्हणाला "होय, हें मला मान्य आहे."

लोकांच्या समोर दोन चित्रें उभीं राहिलीं. तो मुलगाहि अत्यंत सावधानतेनें ऐकत होता. लोकांना म्हटलें, "पहा, या दोघांच्या घरच्या स्थितीची तुलना करा, दोघांनाहि जमिनी नाहींत. एकाच्या कुटुंबांत चार मिळवतीं माणसें आहेत आणि दुसऱ्याच्या कुटुंबांत एकच मिळविता आहे. या दोघांत अधिक गरजू कोण ?" त्या भूमिहीन मुलासह साऱ्या सभेनें तत्काळ उत्तर दिलें, " ज्याच्या घरांत एकच कमावता आहे त्यालाच जमीन मिळाली पाहिजे. तोच पात्र आहे." ही सर्व चर्चा चालू असतांनाच जमीन मलाच मिळाली पाहिजे म्हणणारा मित्र उठून बाजूला बसला. भूमिहीन एकच शिल्लक राहिला व त्याला सर्वांच्या संमतीनें जमिनीचें प्रमाणपत्र देण्यांत आलें. शेजारीं उभा असलेल्या मुलाच्या डोळ्यांत अश्रू उभे होते. ते अश्रू जणू बोलत होते कीं, लोक हो ! माझा आणि एकटी कमावणारी जी माझी आई आहे तिचा विचार तुम्ही करणार नाहीं कां ? किती दिवस आम्ही धरतीवांचून राहायचं ?

## : १७ :

## वांटपानंतरचे नवे भूमिधारक

भूदानांत ज्याला जमीन दिली जाते, त्यानें त्या जमिनीची बांध-बंदिस्ती करून, चांगली मशागत करून तिचें उत्पादन वाढवावें, भूदानाचा विचार म्हणजे सहकारी भावना वाढीस लागेल असा यत्न करावा, भूदानाचें प्रचारकार्य चालू ठेवावें आणि त्यानें आदर्श शेतकरी-भूमिपुत्र बनावें अशी अपेक्षा असते.

या दृष्टीनें प्रथम पासून कांहीं संघटना उभी राहिली असती व या नव्या भूमिपुत्रांना कांहीं मार्गदर्शन मिळालें असतें तर अशा तऱ्हेनें वांटप झाल्यामुळें शेतीसुधार व सहकार या दृष्टीनें नक्की किती फायदा झाला याचा अदमास लावता आला असता. दुर्दैवानें अशीं कांहीं पद्धतशीर पाहणी

होऊं शकलीं नाहीं. पण त्यासंबंधींची साधारण कल्पना यावी म्हणून शिरपुर (धुळें), मालेगांव, बागलाण, येवले (नाशिक), दक्षिण व उत्तर सोलापुर, नगर, वाडा (ठाणें), फलटण (सातारा) या निरनिराळ्या तालुक्यांतील ३५ गांवांतून पाहणी केली. त्या पाहणीमधून जी माहिती मिळाली ती थोडक्यांत अशी :—

(१) दात्यांकडून, आणि जेथें कोठें मोठ्या कुळाकडे दानांतील जमीन होती तेथें त्या कुळांकडून, नव्या भूमिधाऱ्याला जमीन ताब्यांत मिळाली होती. या ३५ गांवांत फक्त ४ लोकांना जमीनवांटपानंतर जमिनीचा ताबा मिळाला नव्हता.

(२) ज्यांना जमिनी मिळाल्या तेच भूमिधारी आज स्वत: कसत आहेत. एका ठिकाणीं मात्र ती जमीन दुसऱ्याला लावलेली दिसली.

(३) एकूण ३५ गांवांपैकीं ३० गांवांतील भूमिधाऱ्यांनीं कसणूक करून चालू वर्षीं थोडें उत्पन्न वाढविल्याचें सांगितलें. उदा. पूर्वीं त्या जमिनींतून तीन साडेतीन मण ज्वारी होत होती, तर चालू वर्षीं चार-साडेचार मण काढली. बाजरी, भुईमूग या पिकांतहि वाढ झाली.

(४) या भूमिधारी लोकांना मशागतीसाठीं गांवकऱ्यांनीं साधनें दिलीं होतीं. भूमिधाऱ्यांनीं प्रामाणिक श्रम केले. त्यामुळें जरी पावसाच्या अभावीं पीक हातीं आलें नसलें तरी गांववाल्यांचा आदर त्यांनीं संपादन केला असल्याचें दिसलें. त्या गांवांतल्या दात्यांनीं दानाच्या जमिनीचा योग्य उपयोग झाल्याचें समाधान व्यक्त केलें.

(५) जमीन वांटलेल्यांपैकीं फारच थोड्यांजवळ साधनें आढळलीं, ज्यांच्याजवळ होतीं तीं त्यांनीं भूमि प्राप्त झाल्यावर जोडलेलीं होतीं. साधनांची गरज अतिशय आहे. मात्र तीं त्यांना उपलब्ध करून देण्यासाठीं व्हावें तितके प्रयत्न झालेले नाहींत.

(६) दानांतून मिळालेल्या जमिनीवर ताली घालणें, बागाईत बनविण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करणें अशी ४ गांवांत हालचाल झाली. त्यांनीं जमिनीचा मगदूर वाढविल्यामुळें त्या जमिनीची किंमतहि वाढली असल्याचें आढळलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३३७६८ दि:

(७) जेथें एकापेक्षां जास्त भूमिधारी होते तेथें ते मशागतीसाठीं एकमेकांना मदत करीत असल्याचें पाहायला मिळालें. ही मदत व्यक्तिगत स्वरूपाची होती . संस्थेच्या द्वारां त्यांना एकत्र आणण्याचे प्रयत्न झाले तर हे लोक एकत्र येतील.

ज्या गांवांतून सलग असे मोठे जमिनीचे तुकडे मिळाले होते तेथें त्या भूमिधाऱ्यांच्या सोसायटचा स्थापन करण्याचा प्रयत्न झाला. त्यापैकीं १० सोसायटचा रजिस्टरहि झाल्या, ५-६ आणखी होतील ( यांमध्यें कांहीं 'ग्रामपरिवार' आणि ग्रामदानेंहि आहेत).

(१) सातारा जिल्ह्यांत महाबळेश्वर भागांत टाटा ट्रस्टकडून १५० एकर जमीन भोसे आणि गुरेघर या दोन गांवांत सलग तुकडयांत मिळाली आहे. तेथील सर्वोदययोजनेंतील कार्यकर्त्यांनीं प्रयत्न करून सरकारकडून त्या डोंगराच्या जमिनीवर साधारण १२५ एकरांच्यावर टेरेसिंग करून घेतलें. सरकारनेंहि भूदानाची जमीन म्हणून व त्या भागांतल्या लोकांना या प्रयोगाचें प्रात्यक्षिक दाखविण्याकरितां म्हणून २२-२३ हजार रुपये खर्च करून हें काम करून दिलें.

या दोन्ही गांवच्या अलग सामुदायिक शेती-सोसायटचा स्थापन होऊन या वर्षीं कसणूक सुरू झाली. यांतील कांहीं जमिनींतून स्ट्रॉबेरी सारखीं पिकेंहि काढलीं जातात. गेल्यावर्षीं टेरेसिंग केलेल्या शेतीमधून कांहीं फायदा झाला नाहीं. एकतर पहिलें वर्ष होतें; जमीन नवीन दुरुस्त झालेली; खत नाहीं आणि पाऊस अतिशय झाला. त्या जमिनीपैकीं $\frac{३}{४}$ जमीन दुपिकी होईल अशी पाण्याची व्यवस्था होऊं शकते. सोसायटीद्वारा हें काम हातीं घेतलें जाईल.

(२) ठाणें जिल्ह्यांत भूदान-जमिनीवर ४ सोसायटचा आहेत. जेथें खार जमीन होती तेथें तिची 'खार लॅण्ड बोर्डा'कडून व्यवस्थित दुरुस्ती होऊन मिळाल्यावर ती भूमिहीनांच्या बनविलेल्या सोसायटचांच्या हातीं देण्यांत आली आहे. भिवंडी-पालघर या तालुक्यांत अशा दोन सोसायटचा आहेत. दुसऱ्या दोन मोखाडा-वाडा तालुक्यांत आहेत.

(३) सांगली, कुलाबा, रत्नागिरी या जिल्ह्यांत अनुक्रमें गुडे, पेंडूर या ठिकाणीं आदात्यांनीं आपल्या सहकारी सोसायट्या बनवून त्या-मार्फत शेतीचीं व अन्य कामें ते करतात.

जेथें सलग जमीन नाहीं तेथें सोसायटीहि बनूं शकत नाहीं आणि नव्या भूमिधाऱ्याला मदत मिळवून देणें कठिण जातें.

आर्थिक दृष्टीनें जे परिणाम पहायला मिळाले ते वर दिले आहेत. जमीन हें पोटाचें साधन तर आहेच परंतु तिला कांहीं सामाजिक मूल्यहि आहे. जमीन धारण केल्यावर त्या लोकांची गांवांत प्रतिष्ठा वाढली. जशी देणारांची वाढली तशी घेणारांचीहि वाढली. हा फरक तर चटकन् नजरेला आला.

एका गांवांत ३२ एकर जमीन तर अगदीं दगड-धोंड्यांची मिळाली होती. त्या जमिनीचा कांहीं उपयोग नाहीं असें सर्वजण सांगत होते. जमीन दात्यांना परत करायचें ठरलें. त्याच गांवांतील फिरत्या भूमिहीन धनगरांनीं त्या जमिनीकरितां आग्रहाची मागणी केली. त्यांचा हा आग्रह का याची चौकशी केल्यावर समजलें कीं त्यांच्या समाजांत ज्यांना जमीन नाहीं त्यांचीं लग्नें होण्याला अडचण पडते. लग्न व्हायचें असेल तर गुंठा कां होईना जमीन हवी असते.

वांटलेली जमीन ही राज्यभर विखुरलेली असल्यामुळें उत्पादन-वाढीच्या दृष्टीनें कोठे काय प्रयत्न झाले याची एकूण एक माहिती आणि आंकडे काढणें हें संघटित प्रयत्नाशिवाय शक्य नाहीं. जमीन विखुरलेली त्यामुळें भूमिधारीहि विखुरलेले, बहुसंख्य सामाजिक आणि आर्थिक दृष्टीनें मागासलेले असें असल्यामुळें ह्या एकूण वांटपाचा परिणाम काय झाला, हें दाखविणें शक्य नाहीं.

## साधनदान

जमिनी ज्यांना वांटल्या त्यांना कसणुकीसाठीं साधनांची गरज मोठ्या प्रमाणांत आहे. वांटप करीत असतांना या नव्या भूमिपुत्रांना मदत मिळावी असा प्रयत्न आम्ही करीत असूं. लोकहि कसणुकीसाठीं साधनें

पुरविण्याचा आपला संकल्प जाहीर करीत आणि त्याप्रमाणें साधनांची मदत ते देत, हें पाहणीच्या वेळीं दिसून आलें. मात्र भूदान-प्राप्तीच्या वेळीं साधनदान म्हणून औजारांच्या स्वरूपांत जें दान जाहीर झालें होतें त्यांतील फारच थोड्या वस्तू प्रत्यक्ष हातीं आल्या. गाईबैलांचें दानहि नाशिक, धुळें, जळगांव, सोलापुर या जिल्ह्यांत जाहीर झालें होतें. पण त्याचा कांहीं उपयोग होऊं शकला नाहीं. सरकारकडून मिळालेल्या मदतीनें धुळें जिल्ह्यांत आणि ठाणें व नगर जिल्ह्यांत साधन-संपत्तिदान-दात्यांकडून मिळालेल्या पैशांतून बैलजोड्या वांटण्याचें काम झालें.

शेती सुधारण्यासाठीं भूदानांतील जमिनींना प्राधान्य देण्याची सरकारी भूमिका आहे. सरकारी मदतीचा ओघ या नवीन शेतकऱ्यांकडे ओढून घेण्यासाठीं पद्धतशीर यत्न करावा लागेल. तो कोण व केव्हां करणार हें सांगणें कठिण आहे.

### दात्याघेत्यांचें सहकार्य

प. महाराष्ट्रामध्यें ज्यांची जमीन वांटली आणि ज्यांना मिळाली असे ८-८॥ हजार लोक दाते आणि नवे भूमिधारक आहेत. ती एक शक्ति आहे. या शक्तिद्वारा निर्माणाचें आणि आंदोलनाच्या प्रगतीचें प्रयत्न होणें शक्य आहे.

ही दृष्टि ठेवून वांटपानंतरचें पाठपुराव्याचें (फॉलो अपचें) काम या स्वरूपांत कसें करतां येईल याचा विचार करतांना १९६० च्या डिसेंबर महिन्यांत रत्नागिरी जिल्ह्यांतील ८ तालुक्यांत एक प्रयोग करण्यांत आला. या आठ तालुक्यांत तालुकावार दान देणारे व नवे भूमिधारक यांचीं संमेलनें घेण्यांत आलीं. त्यांतून पांच तालुक्यांत दात्या-घेत्यांच्या इच्छेनें त्यांनीं आपले संघ स्थापन केले आणि त्यांतील कांहींनीं आपल्या कामाला सुरुवात हि केली. एकूण संमेलनांतील जो अनुभव आहे तो बराच उत्साहदायी वाटतो. नवे भूमिधारक शेंकडा ८० टक्के हजर राहिले. त्यांना भूदानांतून कशी आणि कशासाठीं जमीन मिळाली आहे याची जाणीव आहे हें दिसून आलें. ज्यांना जमीन मिळाली नाहीं त्यांच्यासाठीं कांहीं करायला त्यांची

तयारी आहे. दात्यांची उपस्थिति फार नव्हती, परन्तु जी होती त्यावरून या कामामध्यें आपला उपयोग करून देण्यास ते उत्सुक असल्याचें दिसलें. शेतीच्या दृष्टीनें असलेल्या अडचणी दूर होण्यासाठीं अशा संघांची उपयुक्तता आहे हें लक्षांत येतांच त्यांनीं या कामाला सुरुवात केली. अशा प्रकारची 'प्रान्तभर ठिकठिकाणीं संघटना उभी राहूं शकली तर ती एक आंदोलनाला मोठी पूरक शक्ति होईल. जळगांव आणि नगर या ठिकाणीं जमीन देणाऱ्या-घेणाऱ्यांना एकत्रित आणण्याचा प्रयत्न झाला. त्यांतून त्यांची स्थिति आणि अडचणी समजल्या.

: १८ :

## उपसंहार

'जमीन सर्वांची आहे' म्हणजे सर्व समाजाच्या हितासाठीं ती वापरली गेली पाहिजे हा विचार भारतांत मान्यता पावूं लागला आहे. तो प्रत्यक्षांत उतरण्यासाठीं जें वातावरण गांवोगांव निर्माण व्हावें लागेल तें अद्याप झालेलें नाहीं. कायद्यानें तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालला आहे. स्वेच्छेनें तो सुटावा असा भूदान-यज्ञाचा वेगळा प्रयत्न आहे.

जगामध्यें लोकशाहीचें मूल्य स्थिर झालें आहे. वसाहती, संरक्षित देश ( protectorates ) वगैरेंच्या स्वरूपांत असलेले पराधीन समाज स्वतंत्र होत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघासारखी स्वतंत्र राष्ट्रांची जागतिक संघटना हळू हळू शक्तिशाली बनत आहे. हीं सर्व चिह्नें लोकशाहीच्या वाढीचीं आहेत. भारतानें सर्व विकासाचे प्रश्न लोकशाहीचें व्रत घेऊन सोडविण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळेंच जगांतल्या लहान-मोठ्या सर्व राष्ट्रांचे डोळे भारताच्या या प्रयोगाकडे लागलेले आहेत. इतर देशांनीं जे मार्ग अवलंबिले, त्यांनीं एक प्रश्न सोडवितांना दुसरे अधिक अवघड प्रश्न निर्माण करून ठेवले, आणि विशेष म्हणजे 'मनुष्य' गौण करून टाकला, हें त्यांनीं पाहिलें आहे.

व्यक्ति-स्वातंत्र्य हा लोकशाहीचा आत्मा आहे. ज्या कृतीनें व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आघात होतो ती कृति लोकशाहीला मारक ठरते. वास्तविक लोकशाहीचें सरकार हें नागरिकाच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याकरितां योजलेलें असतें. लोकशाही म्हणजे केवळ नागरिकांनीं मतें देऊन उभें केलेलें सत्तायंत्र नव्हे, तो त्यांतील अत्यंत ढोबळ आणि लहानसा भाग आहे, जगांत लोकशाही अजून बाल्यावस्थेंत आहे म्हणूनच या बाह्य रूपाला महत्त्व आलें आहे. पण लोक जसजसे जागृत आणि सज्ञान होतील तसतसे लोकशाहीचें सत्यस्वरूप प्रकट होत जाईल तें त्या रीतीनें विकसित करणें हेंहि लोकशाहीच्या सरकारचें एक महत्त्वाचें कर्तव्य आहे.

पण उपासमार काढणारा नागरिक–स्त्री आणि पुरुष–ज्ञान घेण्याला आणि पचविण्याला समर्थ तरी राहतो काय ? दारिन्द्य हें लोकशाहीला मारक आहे. कारण सक्तीचें दारिन्द्य भोगणारा माणूस मनानें गुलाम असतो आणि गुलामाला मतच नसतें. भारतांत आज लोकशाहीची राज्यपद्धति आहे आणि मताचा अधिकार सर्वांना मिळालेला आहे. पण ही लोकशाही आज पोकळ आहे. शेंकडा ९० टक्यांच्यावर समाज हा मताची किंमत न जाणणारा आहे, आणि त्याचें कारण मुख्यतः अज्ञानाबरोबरच लोकांचें दारिन्द्य आणि बेकारी हें आहे. येथें भरीव लोकशाही निर्माण व्हावयाची असेल तर बेकारी आणि कंगाली नाहींशी झाली पाहिजे, आणि ती शक्य तितक्या लोकांची नव्हे तर यच्चयावत् सर्वांची नाहींशी झाली पाहिजे.

या दृष्टीनें जमिनीच्या फेरवांटपाच्या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे. देशांतले विचारवंत आणि नियोजनकार त्या दृष्टीनें त्याकडे पाहत आहेत. परंतु जोंवर राजकारण चालविणारे सर्व पक्ष–म्हणजे पक्षांतील लोक–या बाजूकडे आस्थापूर्वक लक्ष देण्याइतके जाणते आणि तत्पर होणार नाहींत, त्याकरितां करावा लागणारा प्रत्यक्ष त्याग ते करणार नाहींत, समतेची वागणूक व्यक्तिगत जीवनांत उतरविणार नाहींत, तोंवर निवडणुका पुनः पुनः झाल्या, नागरिकांना मतप्रदर्शनाचें व संघटनेचें स्वातंत्र्य मिळालें, तरी लोकशाहींत प्राण भरणार नाहीं. ज्या समाजांत उपजीविकेचें साधन हातीं नाहीं असे करोडो लोक असतात त्या समाजाला लोकशाही पेलणेंच शक्य नाहीं.

म्हणून जमिनीच्या न्याय्य वांटपाचा प्रश्न अगोदर सुटला पाहिजे. जमीन-सुधारणा, धंद्यांचें राष्ट्रीयीकरण, नियोजन या सर्वांचा मध्यबिंदु 'मनुष्य' हा असला पाहिजे. या सर्व प्रयत्नांतून मानवी संबंध ( human relations ) निर्माण होत आहेत हें पाहिलें पाहिजे. वस्तूंची केवळ विपुलता झाली म्हणजे असे संबंध निर्माण होतात असें नाहीं. वस्तूंच्या उत्पादनाच्या कामीं प्रत्येकाचा पुरुषार्थ लागण्यांत आणि प्रत्येकाला त्या पुरेशा मिळण्याची व्यवस्था करण्यांत जो सहकार निर्माण होतो त्यांत मनुष्यत्व आहे.

या दृष्टीनें उत्पादन-साधनें प्रत्येकाला उपलब्ध आहेत अशी समाजाची व्यवस्था झाली पाहिजे. त्यांतून वस्तूंच्या वितरणाचा प्रश्न तर सुटेलच, पण सहकार, उत्पादनाची वाढ आणि नागरिक-जीवनाची संपन्नता साधेल. 'जमीन कुटुंबागणिक वांटल्यानें तिचे बारीक बारीक तुकडे होतील,' 'अर्थ-वाढीच्या योजना साधतां येणार नाहींत' असे संशय माणसाच्या उपजत बुद्धीवरील अविश्वासाचे निदर्शक आहेत. उत्पादन-वाढीकरितां मोठे कारखानदार एकत्र होऊं शकतात आणि लहान-लहान शेतकऱ्यांत ती बुद्धि नसते असें कां मानावें ? आपला अंतिम स्वार्थ उत्तम रीतीनें कसा साधतां येईल याची अक्कल त्यांनाहि असणारच. गांवांत कोणीहि बिगर जमीनवाला राहिला नाहीं असें एकदां झालें म्हणजे प्रत्येकाची जमिनीची आणि जमिनीच्या द्वारें मिळणाऱ्या प्रतिष्ठेची भूक भागेल. ती भागणार नाहीं तोंवर सहकाराच्या आणि विकासाच्या योजना मूळच धरणार नाहींत. पण जर ही भूक भागली तर त्यांतून थोड्याच अनुभवानें जमिनीची कसणूक सहकारी पद्धतीवर करण्याचें आपोआप सुचेल. आणि त्याहिपुढें जाऊन सहकार यशस्वी व्हायचा तर तो अर्धामुर्धा न करतां पूर्णपणें केला तरच त्याचा पूर्ण फायदा मिळेल हें अनुभवानें किंवा शिक्षणानें लक्षांत येऊन जमीन सर्वांची एकत्र केली जाईल, आणि उत्पादन-वाढीच्या कामीं सह-कार्याची सर्व शक्ति-बुद्धि वेचली जाईल. हें व्हायला फार काळ जाईल असेंहि नाहीं. आजहि कित्येक ठिकाणीं तें घडू लागलेलें आहे आणि त्यांतून लोकांना लाभ होत असलेला आढळून येत आहे. तो 'ग्रामदाना'चा विचार आहे.

भूदानांतून नैसर्गिकपणें 'ग्रामदाना'चा विचार विकसित झाला. भूदानांत गांवच्या कांहीं जमीनवाल्यांनीं गांवांतल्या भूमिहीनांना आपल्यासारखे करण्याकरिता आपल्यांतल्या जमिनी काढून देणें याच्या पुढची पायरी म्हणजे सर्वांनीं आपल्या जमिनी गांवच्याच मालकीच्या करून टाकणें आणि सर्वांनीं मिळून योजनापूर्वक ती जमीन कसून त्यांतून गांवाच्या गरजा भागविणें व गांवाचें भांडवल वाढविणें हा सहज पुढें येणारा कार्यक्रम होतो. याहि विचाराचा प्रत्यक्ष प्रयोग भारतांत ठिकठिकाणीं झाला आहे, चालू आहे. जरी लोकमानस यांतून होणारा अंतिम लाभ ग्रहण करण्याइतकें अजून प्रगल्भ बनलें नसलें तरी ज्या जमातींत पूर्वापार जमीन जमातीची मानण्याची प्रथा आहे त्या जमातींनीं हा विचार चट्कन् उचलून घेतलेला आढळून येतो. अर्थात जेथें कोठें हा प्रयोग प्रत्यक्षांत अमलांत येईल आणि त्याचे कांहीं सुपरिणाम इतर समाजांच्या दृष्टोत्पत्तीस येतील तेथून तो इतरत्रहि मग पसरेल. तशीं चिह्नेंहि अत्यंत अस्पष्ट स्वरूपांत कां होईना, दिसतात.

अशा रीतीनें उपलब्ध असलेली सर्व जमीन जर उत्तम रीतीनें कसणुकीखालीं आली तर आजच्या लोकसंख्येला पुरेल इतका अन्नसांठा आणि कच्चा माल मिळूं शकतो हें शास्त्रज्ञांनीं मान्य केलें आहे.

"भारतांत दर चौरस मैलास सरासरी २५० लोक राहतात. इंग्लड, बेल्जियम, हॉलंड यासारख्या संपन्न देशांत लोकसंख्येचें चौरस मैलाचें प्रमाण भारतापेक्षां जास्त आहे. युरोपमधील दाट लोकवस्तीच्या या देशांहून भारताच्या लोकसंख्येची एक विशेष भिन्नता आहे. आणि ती म्हणजे लोकसंख्येचें ग्रामीण स्वरूप. येथें शे. ८० टक्के लोक लहान-लहान खेडयांत राहतात. जवळ-जवळ ३३ कोटी एकर जमिनींत हे लोक शेती करतात. पण भारताच्या शेतकऱ्यानें जवळ-जवळ १५ कोटी एकर शेतीयोग्य असलेली जमीन अजून लागवडीखालीं आणलेली नाहीं. म्हणजे जवळ-जवळ $\frac{1}{3}$ जमिनीकडे कोणी अजून लक्षच दिलेलें नाहीं. सगळी दाटी गंगेचें खोरें, बंगाल-बिहार तसेंच ओरिसा आणि केरळ या भागांत झाली आहे. भारतांतील शेतीचें दर एकरीं उत्पन्न फारच कमी आहे. त्यामुळें येथें पिकणाऱ्या

अन्नांतून माणशीं वार्षिक ८ लक्ष कॅलरीज मिळतात, तर इटाली आणि जर्मनी या देशांत हें प्रमाण अनुक्रमें १० व २० लक्ष कॅलरीज इतकें आहे. भारतांत जितक्या जमिनींत १४ क्विंटल तांदूळ पिकतो तितक्याच जमिनींत इटालींत ५०, स्पेनमध्यें ४५, जपानांत ३५, आणि रुमानियांत २४ क्विंटल पिकतो. जमिनीचा दर्जा निकृष्ट आहे म्हणून येथें पीक कमी येतें असें नाहीं, तर त्याचें कारण शेतकीची पद्धति जुनाट आहे, अवजारें इत्यादि प्राथमिक अवस्थेंतील आहेत. येथील शेतीला मान्सूनच्या लहरी पावसावर अवलंबून राहावें लागतें. शिवाय बी-बियाणांची नीट निवड होत नाहीं आणि खताचा–प्रामुख्यानें शेणखताचा–पुरेसा उपयोग केला जात नाहीं.

शेतीशिवाय भारतांत खनिज द्रव्यांचा सांठा फार मोठ्या प्रमाणावर आहे. जगामध्यें तेलांचा पुरवठा करण्याची जी शक्ति आहे तिच्या शेंकडा ३ टक्के पुरवठा भारतांतून होण्यासारखा आहे असा अंदाज करण्यांत आला आहे. भारतांतील संभाव्य जलशक्ति २ कोटी ७० लक्ष अश्वशक्ति इतकी असल्याचा हिशोब करण्यांत आला आहे. आणि हा आंकडा चीन व कॅनडा यांच्या २ कोटी अश्वशक्तीहून जास्त होतो आणि अमेरिकेच्या केलेल्या अंदाजाशीं समान आहे. भारताच्या सुप्त साधन-शक्तीकडे पाहतां त्याची लोकसंख्या वाजवीपेक्षां जास्त आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं."

("जॉग्रफी ऑफ हंगर"–जे. डी. कॅस्ट्रो)

म्हणून गांधीजींचे पुढील उद्गार निव्वळ स्वप्नदर्शी माणसाचे उद्गार नाहींत. ते म्हणाले:—

"Not that there is not enough land to feed our 35 crores. It is absurd to say that India is overpopulated and that the surplus population must die. I am sure that if all the land that is available was properly utilised and made to yield upto its capacity, it would maintain the whole population."

(आमच्या ३५ कोटी लोकसंख्येला अन्न देण्याला पुरेशी जमीन आपल्याकडे नाहीं असें नाहीं. भारतांत लोकसंख्या भरमसाट वाढली आहे आणि

वाढलेली लोकसंख्या मेली पाहिजे असें म्हणणें मूर्खपणाचें आहे. उपलब्ध असलेली सर्व जमीन जर योग्य रीतीनें उपयोगांत आणली गेली आणि तिच्यांत असलेल्या जास्तींत-जास्त कुवतीइतकें तिच्यांतून पीक मिळेल असा प्रयत्न केला गेला तर साऱ्या लोकसंख्येला ती सहज जगवूं शकेल.)

जमीन उत्तम रीतीनें कसली जावयाची तर ती स्वत: कसणाऱ्याकडे राहिली पाहिजे; याचाच अर्थ गैरहजर मालकी नाहींशी झाली पाहिजे. त्याकरितां "कमाल क्षेत्र-धारणा" ( ceiling ) चें नव्हे तर "किमान क्षेत्रधारणे" ( flooring ) चें तत्त्व अमलांत आणलें पाहिजे. जमिनीच्या वेगवेगळ्या मगदुराप्रमाणें किमान क्षेत्राचें वेगवेगळें युनिट केलें तरच उत्पादनवाढीच्या व भरपूर अन्न-पुरवठ्याच्या दृष्टीनें निश्चितपणा येऊं शकेल.

म्हणून उत्पादन-वाढीच्या दृष्टीनें जमिनीच्या फेरवांटपाचा नियोजनाशीं सबंध जडतो. नियोजन-मंडळानें याचकरितां जमीन भूमिहीनांना उपलब्ध करून द्यावी असे राज्यसरकारांना आदेश दिले आहेत. पण "कमाल क्षेत्रधारणा"-योजनेनें हा उद्देश साधणार नाहीं हें मागील पानांतून दाखवून दिलेंच आहे. नियोजन-मंडळाला नियोजनाशीं लोकांचा प्रत्यक्ष आणि सक्रिय संबंध यायला हवा आहे तो जमिनीची कुटुंबागणिक वांटणी केल्यानेंच येऊं शकणार आहे, कारण शेतकरी सामूहिक प्रयत्नाला तयार होतांना आपसुकच गांवाच्या आर्थिक नियोजनाचा विचार करूं लागेल किंवा त्याला तसा विचार करावाच लागेल. यांतून गांवचें नेतृत्व या कामीं निर्माण होऊं लागेल. पुरुषार्थाला प्रेरणा मिळाल्यामुळें नवीन रक्त गांवच्या कारभारांत येऊं लागेल. नवें नेतृत्व आणि त्याचें नवें कर्तृत्व यांनीं गांवचा कारभार प्रगतिपर व्हायला मदत होईल. भारतांत आजच्या काय किंवा उद्यांच्या काय समाजव्यवस्थेचें याहून आदर्श उद्दिष्ट व्यावहारिक शक्यतेच्या दृष्टीनें दुसरें असूं शकत नाहीं असें वाटतें.

आतांपर्यंत जमीन-वांटपाचें जें निरीक्षण मी केलें, जो अनुभव मला आला, त्यावरून वांटपाच्या कामाची जबाबदारी सरकारनें उचलली तरच तें

काम होईल असें माझें तरी मत बनलें नाहीं. किंबहुना आज लोकांनीं आपसांत न्याय्य जमीन-वांटप करून घ्यावें या संबंधांत सरकारांनीं जेवढी सर्वस्वी अनुकूल वृत्ति आणि भूमिका घेतली आहे, तेवढ्यावर जमिनीचें वांटप लोकांकरवीं पुरतें होऊं शकतें, गांवांत सर्वांना जमीन मिळते, इतकेंच नव्हे तर या आर्थिक लाभाव्यतिरिक्त एका अपूर्व शक्तीचा प्रादुर्भाव लोकांत होतो. हीच ती 'लोकशक्ति.' राज्यसत्तेला अधिष्ठान देणारी हीच ती शक्ति आहे. हा लाभ लोकांनीं जमिनीच्या बाबतींत स्वयंप्रेरणेनें केलेल्या न्याय-भावनायुक्त दानांतून निर्माण होणार आहे. हे परिणाम सरकारकडून कधींच साध्य होऊं शकणार नाहींत याची सरकारलाहि जाणीव आहे.

यासंबंधांत बिहारमधील 'बिघेमें-कठ्ठा' चळवळीचा उल्लेख करावा लागेल. 'कठ्ठा' म्हणजे १ बिघ्याचा $\frac{1}{20}$ भाग. बिघ्यामागें १ कठ्ठा जमीन प्रत्येकानें द्यावी अशी विनोबाजींनी बिहारी जनतेकडे बिहारच्या आपल्या दुसऱ्या पदयात्रेंत मागणी केली आणि लोकांकडून या आंदोलनांत हजारो एकर जमीन पुन्हां मिळूं लागली आहे. ता. ३ डिसेंबर '६१ रोजीं राष्ट्रपति श्री. राजेंद्रबाबूंना त्यांच्या ७८ व्या वाढदिवशीं बिहार तर्फे ८००० एकर जमिनीचा जो पुरस्कार दिला गेला तो या 'बिघेमें-कठ्ठा' आंदोलनांतून मिळालेल्या जमिनीचा होता.

सरकारनें अशा रीतीनें भूदान-आंदोलनाला कायद्याची प्रत्यक्ष मदत केली आहे व तेवढी पुरेशी आहे.

लोकांना आपसांत हें काम उरकून टाकणें सहज शक्य आहे ही गोष्ट, मला वाटतें, मागील पानें ज्यांनीं वाचलीं असतील त्यांना सहज पटण्या-सारखी आहे. गेल्या दोनशें वर्षांत जमिनीची थिजून राहिलेली मालकी दहा वर्षांच्या भूदान-यज्ञाच्या प्रक्रियेनें वितळूं लागली ही लहानसान गोष्ट नाहीं. म्हणून भूदान-यज्ञाला यशस्वी भविष्यकाळ आहे, असें वाटतें. फक्त लोकांना समजावून देणाऱ्यांची गरज आहे. कायदा नको, सक्ती नको, शिक्षा नको, दहशत नको, द्वेष नको. विनोबाजींनीं प्रत्यक्ष प्रयोग करून दाखविला, वेगवेगळ्या साधनांनीं वेगवेगळ्या परिस्थितींत तो अजमावून पाहिला आणि तो यशस्वी होत असल्याचें अनुभवाला आलें म्हणूत 'काळ अनुकूल आहे,

काळाची ही मागणी आहे' असें ते म्हणत असतात. आतां या प्रयोगाची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी केली गेली पाहिजे. हें काम विनोबाजींचें, 'सर्वोदयवाद्यां' चें, 'भूदानवाल्यां' चेंच आहे असें समजणें चुकीचें होईल. हा कांहीं त्यांचा ठेका नव्हे, ती सर्वांची जबाबदारी आहे. ती जर आपण पार पाडली नाहीं तर दुर्दैव विनोबाजींचें नाहीं तर आपलें—लोकांचें—आहे.

"It will be tragic if the idea suffers as a result of apathy on the part of those who are ln a position to help but do nothing."

(मदत करण्याची शक्ति असून जे कांहींच करीत नाहींत, त्यांच्या अनिच्छेमुळें जर या कल्पनेला धक्का पोहचला तर ती एक दुःखद घटना ठरेल.) असें यासंबंधीं लिहितांना खुद्द टाईम्सकारांनीं उद्‌गार काढले आहेत.

भारतीय शेती-अर्थशास्त्र-संस्थेच्या कटक येथील वार्षिक परिषदेंतील अध्यक्षीय भाषणांत डॉ. डी. जी कर्वे यांनीं म्हटल्या प्रमाणें—

"भारतीय राज्य-घटना आणि पहिली पंचवार्षिक योजना यांत निर्देशिल्याप्रमाणें उत्पादन-वाढीसाठीं भूमि-स्वामित्वाच्या हक्काची वांटणी करण्याच्या बाबतींत व्हावी तेवढी प्रगति झालेली नाहीं. जनतेच्या व्यापक पाठिंब्यानें जर जमिनीच्या फेर वांटपाची चळवळ जोरांत चालली नाहीं तर अशी भीति वाटते कीं समाजवादी राज्यव्यवस्थेला आधारभूत असलेल्या आपल्या शेतीप्रधान लोकशाहीचा पायाच दुबळा राहून जाईल."

१९६० च्या डिसेंबर महिन्यांत भारत सरकारनें देशांतील दुर्बल समाजांच्या कल्याणाच्या प्रश्नाची पाहणी करून सल्ला देण्याकरितां एक अभ्यास मंडळ (Study group) श्री. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालीं नेमलें होतें. या मंडळानें निरीक्षण करून समाज-विकास-योजना आणि पंचायत राज्यसंस्था यांनीं या दुर्बल समाजांचा आर्थिक विकास आणि सर्वांगीण कल्याण कसें करावें या संबधींच्या सूचना भारत सरकारला करावयाच्या होत्या.

या मंडळानें नुकत्याच फार महत्त्वाच्या व दीर्घ परिणामकारी सूचना केल्या आहेत व त्या भारत सरकारनें मान्यहि केल्या आहेत. त्या सूचनांमध्यें पुढील एक सूचना संबंधित विषयाला अनुलक्षून असल्यामुळें येथें देत आहें:

'असमर्थ' कुटुंबांची व्याख्या करतांना मंडळानें म्हटलें आहे कीं १०००रु. वार्षिक उत्पन्नाहून कमी उत्पन्न असलेलीं तीं असमर्थ कुटुंबें होत. ग्रामीण कुटुंबसंख्येशीं त्यांचें प्रमाण ८० टक्के आहे. ५०० रु. पेक्षां कमी वार्षिक उत्पन्न असलेलीं कुटुंबें शें. ५० टक्के आहेत आणि मदतीचा अग्रहक्क त्यांना मिळाला पाहिजे. वार्षिक २५० रु. हून कमी उत्पन्न असलेलीं कुटुंबें 'उध्वस्त' ( tes) या सदरांत मंडळानें घातलीं आहेत.

'या सामाजिक-आर्थिक रोगावर जबरदस्त उपाय करण्याची जरूर आहे. आणि तो उपाय म्हणजे जमिनीची मालकी व कारभार ग्रामसमाजाच्या हातीं सोपविणें हा आहे. यामुळेंच सामाजिक न्याय होईल, शेतीचा विकास होईल व ग्रामीण औद्योगीकरणाकरितां अनुकूल परिस्थिति निर्माण होईल,' असें या मंडळाचें स्पष्ट मत आहे.

एका देशांतील अंतर्गत शांततेचा संबंध जागतिक शांतीशीं असतो हे भूमिसमस्येच्या द्वारा विनोबाजी वरचेवर दाखवून देत आहेत आणि जगांतील मोठे विचारवंतसुद्धां याच विचाराचा जोरानें पुरस्कार करूं लागले आहेत. विनोबाजी म्हणाले—

"जगाचा सारा इतिहास संकल्परूप आहे, एकेक संकल्प साऱ्या जगांत उठत असतो. आज जगभर शांततेचा, समत्वाचा संकल्प उठला आहे. भूदान, ग्रामदान हा या संकल्पाच्या लाटेंतला एक तरंग आहे. ज्याला उठलेल्या लाटेचें भान आहे तो तरंगांच्या लांबीरुंदीवर त्याचें यश मोजणारच नाहीं. त्याचें लक्ष संकल्पाच्या उठलेल्या प्रचंड लाटेकडे असेल."

इति शम्

परिशिष्ट क्र. १

# भूदान-यज्ञ दानपत्र

## आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान-यज्ञाच्या आवाहनानुसार

मी /आम्ही ........................................................

........................................................

पत्ता .......................मालकीची एकूण जमीन (अक्षरी) .........

............आहे. त्या जमिनीपैकीं ............एकर..................गुंठे

................गांव.................तालुका...............जिल्हा येथील

| सर्व्हे नंबर | पोट-हिस्सा | क्षेत्र | प्रकार* | सारा | ठिकाणाचें गांवठी नांव | चालू कब्जेदार |
|---|---|---|---|---|---|---|

‡ विशेष माहिती--

ही जमीन / ह्या जमिनी / श्री. विनोबांनीं सुरू केलेल्या भूदान-यज्ञा-प्रीत्यर्थ विचारपूर्वक आपल्या राजीखुषीनें दान देत आहें / आहों. या दान दिलेल्या जमिनीवर यापुढें माझा / आमचा किंवा माझ्या / आमच्या

घराण्यांतील किंवा वारसांतील कोणाचाहि हक्क राहणार नाहीं. ही जमीन / ह्या जमिनी श्री. विनोबांनीं गरीबांच्या हिताकरितां स्वतःला योग्य वाटेल त्याप्रमाणें उपयोगांत आणावी / आणाव्या.

मुक्काम.................तारीख.......... **दात्याची सही वा सह्या**

..............................

**साक्षीदारांचीं नांवें व सह्या**

१................................ ..............................

सही............................ ..............................

२................................

सही............................

**स्वीकृत**

..............................

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत.
अनुक्रम 33०७६ वि: निबंध
क्रमांक 9२७५ नों दि 9७-9०-...

* कोरडवाहू, बागाईत, जिराईत (भातपिकी), वरकस, खडकाळ, इ. असेल तें वर्णन लिहावें.

† जमिनीच्या चालू कब्जेदाराच्या हक्काचें स्वरूप, अन्य कांहीं अडचणी इ. संबंधीं येथें लिहावें.

परिशिष्ट क्र. २

## जमीन-वांटणी-प्रमाणपत्र

श्री. यांना

आचार्य श्री. विनोबा भावे यांनीं सुरू केलेल्या भूदान-यज्ञ-आंदोलनामध्यें दान मिळालेल्या जमिनीपैकीं गांव तालुका जिल्हा येथील रि. स. नं. ची खालील चतुःसीमा असलेली कोरडवाहू /बागायती /भातपिकी / वरकस जमीन एकर गुंठे तुम्हांला आज रोजीं देण्यांत येत आहे. या जमिनीचे आजपासून तुम्ही कबजेदार झाला आहां आणि म्हणून जमीन कसण्याचा, पीक काढण्याचा व पिकाचा उपभोग घेण्याचा सर्व हक्क–अधिकार तुमच्याकडे आला आहे. योग्य त्या कायद्यानें खालील शर्तींवर यापुढें तुमचें नांव जमिनीचा खातेदार म्हणून लागेल व ती जमीन वंशपरंपरा तुमच्याकडे चालेल. यासंबंधींचें हें प्रमाणपत्र आचार्य विनोबा भावे यांच्यातर्फें महाराष्ट्र प्रदेश भूदान समितीकडून तुम्हांला देण्यांत येत आहे. तुम्ही ह्या जमिनीची उत्तम कसणूक करून जमीन चांगली राखाल आणि आपलें व आपल्या देशाचें उत्पन्न वाढवाल अशी आम्हांला उमेद आहे. ता.

कार्यवाह,

महाराष्ट्र प्रदेश भूदान समिति

साक्षीदार नांव

सही

साक्षीदार नांव

सही

जमिनीची चतु:सीमा

---

शर्ती:—

१. सारी जमीन गांवाची या तत्त्वानुसार भूदान-यज्ञांत मिळालेली सर्व जमीन गांवाच्या मालकीची समजली जाते.

२. जमीन ज्याला दिली त्याला ती विकतां येणार नाहीं; पडित किंवा गहाण टाकतां येणार नाहीं; तिच्यावर कर्ज काढतां येणार नाहीं; किंवा कसलाहि बोजा करतां येणार नाहीं, किंवा दुसऱ्या कोणाला पोटकूळ म्हणून (Sub Lease) भाडयानें देतां येणार नाहीं.

३. दिलेली जमीन दोन वर्षेपर्यंत पडित पडलेली आहे किंवा तिचा यथायोग्य वापर केला नाहीं असें म. प्र. भू. समितीच्या मतानें ठरलें तर ती काढून घेण्याचा अधिकार श्री. विनोबा भावे यांच्यातर्फे म. प्र. भू. समितीला राहील.

४. जमीन दिल्या तारखेपासून तिचा सरकारी सारा व लोकल सेस भरण्याची जबाबदारी जमीन घेणारावर आहे.

५. या सर्व शर्ती जमीन घेणाराच्या वारसांसहि लागू आहेत.

वरील शर्ती मला मान्य आहेत.

जमीन दिली त्यांचें नांव साक्षीदाराचें नांव

अंगठा /सही अंगठा /सही

परिशिष्ट क्र. ३

जमीन ज्यांना

(जिल्हावार

| क्रमांक | जिल्हा | वांटलेली जमीन एकर-गुंठे | जमीन मिळालेलीं कुटुंबें | त्यांना मिळालेलें सरासरी क्षेत्र | आदिवासी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कुटुंबें | क्षेत्र ए. गुंठे |
| १ | पुणें | ४२०-२४ | १२८ | ३। | – | – – |
| २ | अ. नगर | ४४४-३५ | ८० | ४॥ | ३ | ९-०० |
| ३ | सोलापुर | ८४०-३९ | १६९ | ५ | – | – – |
| ४ | सातारा | १९८२-२० | ४५३ | ४॥ | – | – – |
| ५ | सांगली | ६०५-३१ | १६४ | ४ | – | – – |
| ६ | कोल्हापुर | १०१४-०४॥. | १६८ | ६ | – | – – |
| ७ | रत्नागिरी | ३६८५-३७ | १००० | ३॥ | – | – – |
| ८ | कुलाबा | २९६३-०२ | ९५० | ३ | ६३० | १८००-०० |
| ९ | ठाणें | ५३३८-१२ | १२०६ | ४। | ११०० | ५०००-०० |
| १० | नाशिक | २०१०-१९ | ३९९ | ५ | १९९ | ९८७-०० |
| ११ | धुळे | ४२५१-०५॥ | ८४४ | ५ | ४१३ | १९४५-२१ |
| १२ | जळगांव | २६५०-०८ | ४४० | ६ | ५५ | ३५७-०० |
| | | २६२०७-३७ | ६००१ | | २४०० | १००९८-२१ |
| | | | | | ४०.०% | ३८.०% |

## वांटली तो वर्ग

वांटप-तक्ता)

| हरिजन | | मागासलेल्या जमाती | | इतर समाज | |
|---|---|---|---|---|---|
| कुटुंबें | क्षेत्र ए. गुंठे | कुटुंबें | क्षेत्र ए. गुंठे | कुटुंबें | क्षेत्र. ए. गुंठे |
| ६० | १७३-३२ | १७ | ४६-३० | ५१ | २००-०२ |
| १९ | ११९-०० | १३ | ८५-०० | ४५ | २१३-३५ |
| ६२ | ३५५-१९ | १२ | ७२-०० | ९५ | ४१३-२० |
| १९५ | ८७३-२० | – | – – | २५८ | ११०९-०० |
| ७२ | २९५-३१ | – | – – | ९२ | ३१०-०० |
| ६४ | ३१४-०४॥. | – | – – | १०४ | ७००-०० |
| ४३७ | १६००-०० | ४११ | १४००-०० | १५२ | ६८५-३७ |
| २१५ | ८००-०० | – | – – | १०५ | ३६३-२ |
| – | – – | – | – – | १०६ | ३३८-१२ |
| १११ | ६१३-०० | – | – – | ८९ | ४१०-१९ |
| ८५ | ४४१-३६ | १०८ | ८४३-०० | २३८ | १३२०-१८॥. |
| ६५ | ४०४-०८ | १२० | ७२४-०० | २०० | ११६५-०० |
| १३८५ | ५९९१-२७॥ | ६८१ | २८७१-१० | १५३५ | ७२४६-२८॥. |
| २३.५ | २३-०% | ११.५% | ११.३% | २५.०% | २७.७% |

## वांटप जमिनींचें

(जिल्हावार

| क्र. | जिल्हा | वांटप जमिनीचे दाते | वांटप क्षेत्र | दात्यांच्या स्वतःच्या ताब्यांतील क्षेत्र | | वांटलेल्या- गैरहजर (यांच्या जमिनी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकर-गुंठे | दाते | एकर-गुंठे | दाते |
| १ | पुणें | ११६ | ४२०-२४ | ७१ | २३१-१७ | ४५ |
| २ | अ. नगर | ७३ | ४४४-३५ | ३४ | १४०-१७ | २३ |
| ३ | सोलापुर | १५२ | ८४०-३९ | ५२ | ३५०-०० | ७२ |
| ४ | सातारा | १०७ | १९८२-२० | १२ | १००-०० | ७० |
| ५ | सांगली | ८५ | ६०५-३१ | ३५ | ३००-०० | ३४ |
| ६ | कोल्हापुर | १९८ | १०१४-०४॥ | ११० | १५०-०० | १८ |
| ७ | रत्नागिरी | ६३१ | ३६८५-३७ | ३२ | १८५-०० | ४६४ |
| ८ | कुलाबा | २३२ | २९६३-०२ | १५ | १६३-०२ | १८५ |
| ९ | ठाणें | ३११ | ५३३८-१२ | ९० | १८३८-१२ | २२१ |
| १० | नाशिक | ३५४ | २०१०-१९ | १२५ | ७१०-०९ | १९४ |
| ११ | धुळें | ९७९ | ४२५१-०५॥ | ६३५ | २६००-०० | २१९ |
| २१ | जळगांव | ३१५ | २६५०-०८ | १७१ | १२००-०० | ९० |
| | | ३३८३ | २६२०७-३७ | १३८२ | ७९७५-१७ | १६३५ |
| | | | | ४१.% | ३०.५% | ४९.% |

तक्ता)

| —जमिनीपैकीं मालक-दाते कुळांनाच दिल्या) एकर-गुंठे | रहजर मालक-दाते (यांच्या कुळांनीं ताबा सोडल्यामुळें जमिनी दुसऱ्यांना दिल्या) हक्क सोडणारीं कुळें | दाते | एकर-गुंठे | जमिनीचा सरकारी सारा रुपये |
|---|---|---|---|---|
| १८९- ७ | – | – | – | २९३ |
| ११७-२६ | १४ | १६ | १७९-३२ | २१७ |
| ३८१-३९ | ३० | २८ | १०९-०० | ४७५ |
| १४७०-२० | २६ | २५ | ४१२-०० | १६१५ |
| २००-३१ | १६ | १६ | १०५-०० | ५१४ |
| ८६४-०४॥ | – | – | – | ८१५ |
| ३३००-३७ | ३५ | ३५ | २००-०० | २५०० |
| २४००-०० | ४१ | ३२ | ४००-०० | २४४५ |
| ३५००-०० | – | – | – | ३८९० |
| ११५०-१० | ३९ | ३५ | १ ५-०० | १६६५ |
| १२५१-५॥ | १२० | १२५ | ४००-०० | २६०० |
| १०००-०८ | ५४ | ५४ | ४५०-०० | २३०० |
| १५८७६-२८ | ३७५ | ३६६ | २४०५-३२ | १९३२९ रु. |
| ६०.५ | | १०.०% | ९.०% | |

## तुकड्यांचे स्वरूप-

| अ. क्र. | जिल्हा | दाते | क्षेत्र एकर-गुंठे | दात्याच्या दृष्टीनें शेजारच्या लहान जमीनवाल्यास करायला दिलेलें क्षेत्र | कायद्यामुळें दात्याच्या नांवावर ठेऊन भूमीहीनाला कसायला दिलेलें क्षेत्र | दात्याला स्वतःला अगदीच कमी जमीन होती तेथें त्यालाच कसायला परत दिलेलें क्षेत्र |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | | | ए. गुं. | ए. गुं. |
| १ | पुणें | १४१ | ६२-२० | – | ३-२६<br>४ | २-२४<br>४ |
| २ | अ. नगर | १९ | ५५-०७ | – | – | २-२२<br>३ |
| ३ | सोलापुर | १२६ | १०५-०७ | २/१* | – | ४-३ |
| ४ | सातारा | ६५८ | १८४-१३ | ६-१३<br>१२ | १-५<br>२ | २<br>१४३-७<br>५५९ |
| ५ | सांगली | १० | ९-२९ | – | – | ३-९<br>४ |
| ६ | कोल्हापुर | ३०२ | १६४-३२॥ | ४-१५<br>६ | – | १२०<br>२४२ |
| ७ | रत्नागिरी | १७४ | ९४-२१ | – | – | – |
| ८ | कुलाबा | २७४ | ७१-३० | – | – | ६४-०<br>२४५ |
| ९ | ठाणें | २२ | ३०-०० | – | – | – |
| १० | नाशिक | १७६ | १३४-१० | – | १-२३<br>२ | ४३-३१<br>६० |
| ११ | धुळें | ४२० | २६४-३९॥. | – | – | – |
| १२ | जळगांव | ३११ | ५००-११ | – | – | – |
| | | २६३३ | १६७७-२० | १२-२८<br>२६ | ६-१४<br>८ | ३८३-१६<br>११२५ |

* नोट–रेषेखालील आंकडे दात्यांची संख्या दाखवितात.

| तुकडे जोड विलान्वये जेथें जोडण्याचें काम चालू आहे तेथें नोंदीं-साठीं दिलेलें क्षेत्र | दात्यांनीं तुकडा वांटता येत नाहीं म्हणून तुकडघाद्यावल उत्पन्न द्यावयाचें ठरविलेलें क्षेत्र | हरिजनांना घरासाठी मंदिरें, शाळा, ग्रामपंचायती व इतर संस्थांना दिलेलें क्षेत्र | दान-स्वीकाराच्या शर्तीला अनसरून नसल्यामुळें परत केलेलें क्षेत्र | निर्णय द्यावयाचें शिल्लक असलेलें क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ए. गु | ए. गुं. | ए. गुं. | ए. गुं. | ए. गु |
| ३२-२६<br>९७ | १२-१४<br>१६ | -२०<br>१ | १०-११<br>१६ | -१९<br>३ |
| १-१९<br>२ | ४३-३६<br>११ | ८-३०<br>३ | – | – |
| – | ४९-७<br>५८ | १५-५<br>१९ | १८-१२<br>१८ | २०-२०<br>२२ |
| – | ९-१६<br>३१ | – | २४-१२ | – |
| – | ६-२०<br>६ | – | – | – |
| – | ५-३८॥<br>७ | – | ३४-२<br>४७ | – |
| ३४-२८<br>६४ | – | १२-२२<br>१७ | १७-३२॥.<br>५६ | २९-१८॥<br>३७ |
| – | – | – | ७-३०<br>२९ | – |
| – | – | – | – | ३०<br>२२ |
| – | १३-१२<br>१५ | – | ७५-२४<br>९९ | – |
| १८५-२७<br>२७४ | ३९-७॥.<br>६२ | – | ५-२५<br>२६ | ३४-२०<br>५८ |
| ५००-११<br>३११ | – | – | – | – |
| ७५०-३१<br>७४८ | १७१.-३१<br>२०६ | ३६-३७<br>४० | १८९-२८॥.<br>३३८ | ११४-३७॥<br>१४२ |

परिशिष्ट क्र. ६ **खराब जमिनीचें क्षेत्र आणि**

| अ. क्र. | जिल्हा | दाते | क्षेत्र | ग्रामपंचायती किंवा अन्य सार्वजनिक संस्थाना गांवच्या कामासाठी (ग्रामराज, वृक्षसंवर्धन इ.) दिलेले क्षेत्र | हरिजनांना घरासाठी दिलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकर गुंठे | एकर गुंठे | ए.–गुंठे |
| १ | पुणें | ३३ | ६५–२० | १०–२० | १०<br>१ |
| २ | अहमदनगर | १९ | ३२–१६ | १०– ०*<br>१ | – |
| ३ | सोलापुर | २९ | १२४–१० | ३६–६<br>१४ | – |
| ४ | सातारा | ३८ | २३८–२१ | – | – |
| ५ | सांगली | १६ | ५०–०० | – | – |
| ६ | कोल्हापुर | १६ | २६–२३ | – | – |
| ७ | रत्नागिरी | ८० | १२६७–०० | २१८–५<br>२२ | २९–२<br>८ |
| ८ | कुलाबा | ७ | १०२–३५ | – | – |
| ९ | ठाणें | १३८ | १४११–२१ | ४००–०<br>२ | – |
| १० | नाशिक | ६० | ३०३–२५ | – | ९<br>३ |
| ११ | धुळें | ४४ | १२१३–२३ | १०७३–३०<br>१० | ६<br>४ |
| १२ | जळगांव | – | – | – | – |
| | | ४८० | ४८३५–२७ | १७४८–२१<br>५७ | ५४–२<br>१६ |

* रेघेखालील आंकडे दात्यांची संख्या दाखवितात.

## त्याच्या निकालाचें स्वरूप

| दात्यांनी स्वत:कडे जमीन ठेवून उत्पन्न देण्याचे कबूल केले असे क्षेत्र | डोंगराचे व धरणाखाली जाणारे क्षेत्र नोंदीसाठी (मोबदला मिळेल असे क्षेत्र) | शाळा व मंदिरें याकरितां दिलेले क्षेत्र | कसलाच निर्णय (उपयोग) होऊं शकत नाही अशी दात्यांना परत | खार जमीन सरकारकडे जमा क्षेत्र | निर्णय घ्यायचे शिल्लक असलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| ए. गुंठे | ए. गुंठे | ए. गुंठे | ए. गुंठे | ए. गुंठे | ए. गुंठे |
| १५–१६<br>२ | – | – | २९–२४<br>१५ | – | – |
| ७–३६<br>४ | – | – | १४–२०<br>१४ | – | – |
| ९<br>२ | – | १०<br>२ | ५०<br>५ | – | १९–४<br>३ |
| – | – | – | २३८–२१<br>३८ | – | – |
| – | – | – | – | – | ५०<br>१६ |
| – | – | – | २६–२३<br>१६ | – | – |
| – | ९५५–३<br>२० | ३–१०<br>२ | ६१–२०<br>२८ | – | – |
| – | – | – | १५–२७<br>५ | ८७–८<br>२ | – |
| – | – | ३०<br>३ | ९८१–२१<br>१३३ | – | – |
| १३–११<br>६ | ९७<br>१ | – | १८४–१४<br>५० | – | – |
| ३०–६<br>७ | – | – | ७०–३८<br>१५ | – | ३२–२३<br>८ |
| – | – | – | – | – | – |
| ७५–२९<br>२८ | १०५२–३<br>२१ | ४३–१०<br>७ | १६७३–०८<br>३१९ | ८७–८<br>२ | १०१–२७<br>३० |

## पश्चिम महाराष्ट्रांतील भूदान-वांटप

| क्रमांक | जिल्ह्याचे नांव आणि तालुक्यांची संख्या (कंसांत) | दान मिळालेले तालुके | दानांची गांवें | दाते | दानांतील क्षेत्र एकर–गुंठे | वाटप किती गांवांतून झालें | दाते वाटप झालेले | आदाते कुटुंबे | वाटलेले क्षेत्र ए.–गुं. | ग्राम-दानांत सामील झालेले क्षेत्र | न वाटलेल्या तुकड्यांचे क्षेत्र | खराब क्षेत्र | मिराशी क्षेत्र | एकसाली क्षेत्र | विक्री क्षेत्र | दान परत झाल्याचे क्षेत्र | मालकी नाही असे क्षेत्र | चौकशी | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| १ | पुणें (१३) | १२ | १२३ | ३१० | ५८४–१० | ५३ | ११६ | १२८ | ४२०–२४ | – | ६२–२०<br>१४१ | ६५– ४<br>३३ | – | – | ५–१२<br>८ | २३–२२<br>१० | ७–८<br>२ | – | – |
| २ | अहमदनगर (१३) | १३ | ११५ | १८१ | ८१७–३५ | ५१ | ७३ | ८० | ४४४–३५ | – | ५५– ७<br>१९ | ३२–१६<br>१९ | – | – | १३५–२८<br>११ | १३७–३४<br>५६ | १०–३५<br>३ | – | – |
| ३ | सोलापूर (११) | ११ | १४२ | ३५२ | १२१९–१० | ९० | १५२ | १६९ | ८२०–३९ | – | १०५– ७<br>१२६ | १२४–१०<br>२९ | – | – | ३२–३<br>६ | ८७–१६<br>३४ | २९–१५<br>५ | – | – |
| ४ | उ. सातारा (११) | ११ | १९२ | ८५८ | ३१६४–११ | ७९ | १०७ | ४५३ | १९८२–२० | -- | १८४–१३<br>६५८ | २३८–२१<br>३८ | ४७१–१३<br>२६ | – | ५५– ०<br>२ | १५९– ५<br>१६ | ७५–१९<br>४ | – | – |
| ५ | द. सातारा (८) | ८ | ६६ | १३२ | ११७१–३१ | ४४ | ८५ | १६४ | ६०५–३१ | २००<br>३ | ९–२९<br>१० | ५०–००<br>१६ | ७३–१७<br>३ | – | ९–८<br>३ | ३१–२४<br>८ | १९२– २<br>४ | – | – |
| ६ | कोल्हापूर (१२) | ११ | १४२ | ४५५ | १२६४–३७ | ५५ | १२८ | १६८ | १०१४–४॥ | – | १६४–३२॥<br>३०२ | २६–२३<br>१६ | – | – | – | ५४–१७<br>७ | ५–००<br>२ | – | – |
| ७ | रत्नागिरी (१५) | १५ | ३९० | ९२१ | ५५९९– ७ | २२० | ५३१ | १००० | ३६८५–३७ | ८–१३<br>४ | ९४–२१<br>१७४ | १२६७–००<br>८० | – | – | १०–००<br>१ | ३५–०९<br>२४ | ९७–३८<br>७ | – | – |
| ८ | कुलाबा (१४) | १३ | २४८ | ५३२ | ३७३८–१२ | १५४ | २३२ | २५० | २९६३–०२ | ८४–२९<br>३ | ७१–३०<br>२७४ | १०२–३५<br>७ | – | – | – | ४६१–३६<br>१३ | ५४–००<br>३ | – | – |
| ९ | ठाणें (१३) | १२ | ३०० | ५०७ | ६८८७–३३ | १९१ | ३११ | १२०६ | ५३३८–१२ | – | ३०–००<br>२२ | १४११–२१<br>१३८ | – | – | – | १०८–००<br>३६ | – | – | – |
| १० | नाशिक (१३) | १३ | २७० | ७०२ | ३५८०–२४ | १७५ | ३५४ | ३९९ | २०१०–१९ | – | १३४–१०<br>१७६ | ३०३–२५<br>६० | – | – | २८–२३<br>५ | १५०–०६<br>६८ | ९५३–२१<br>३९ | – | – |
| ११ | प. खानदेश (१०) | ९ | ३९३ | १९४३ | ८७२९–३६ | २१३ | ९७९ | ८४४ | ४२५१–५॥ | १२३–१९<br>६० | २६४–३९॥<br>४२० | १२१२–२३<br>४४ | २५५–१६<br>७ | १५७०–३५<br>३११ | २७–२०<br>१३ | ९९–३५<br>३९ | ११३–२४<br>१७ | ८१०–९<br>५२ | – |
| १२ | पू. खानदेश (१३) | १३ | ४४४ | ११०९ | ४४०५–०८ | २१५ | ३१५ | ४४० | २६५०–०८ | – | ५००–११<br>३११ | | – | | १०२– ६<br>२८ | ७१५–००<br>४१० | २००–००<br>२७ | २३९–२३<br>२८ | – |
| | (१४६)<br>वांटप तालुके –१३७ | १४१ | २८२५ | ८००१ | ४११६३–१४ | १५४० | ३३८३ | ६००१ | २६२०७–३७ | ४१६–२१<br>७० | १६७७–२०<br>२६३३ | ४८३५–२८<br>४८० | ८००–०६<br>३६ | १५७०–३५<br>३११ | ४०३–२०<br>८४ | २०६४–०३<br>७२१ | २१३७–१२<br>३१२ | १०४९–३२<br>८० | |

(१)–रेषेखालील आकडा हा दात्यांच्या संख्येचा आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३३७६६ ......... दि: १७/९६
क्रमांक ... ९०९५ ...... नों दि: ....
१६.१०६

# भूदान यज्ञ मंडळ, विदर्भ विभाग, ( महाराष्ट्र राज्य ) गांजा खेत, नागपूर-२

## प्राप्ति-वितरणाचा तपशील

| अ. | जिल्ह्याचें नांव | भूदानांत मिळालेली जमीन | | दानपत्र संख्या | वितरण झालेली जमीन | | भूमिधारी संख्या | सरकारी कायद्यानुसार नामंजूर झालेली जमीन | | सरकारजमा केलेली जमीन | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकर | डेसि. | | एकर | डेसि. | | एकर | डेसि. | एकर | डेसि. |
| १ | २ | ३ | | ४ | ५ | | ६ | ७ | | ८ | |
| १ | नागपूर | ८४०१ | ७८ | — | ४८५१ | ०५ | — | ७८१ | ४० | ७६७ | २७ |
| २ | भंडारा | ५१३२ | ०८ | २३४६ | ३३२८ | १७ | [illegible]११२० | २०५ | ७७ | २६४ | ४२ |
| ३ | वर्धा | १२७६८ | ०५ | ३७२६ | ८४६२ | १२ | २२५४ | १२२५ | ६४ | ४१८ | ६६ |
| ४ | चांदा | ५१२६ | ४७ | १६४७ | २५११ | ८१ | ८११ | ७६६ | ०३ | ११७ | ३२ |
| ५ | अमरावती | ५५०३ | ०३ | १४३२ | ३५८३ | ३५ | ६६६ | ५४५ | ६८ | १४१ | ०४ |
| ६ | अकोला | ५३७८ | ४३ | ७०१ | २६४२ | ५८ | ५५८ | १३६४ | ६२ | ४० | १२ |
| ७ | बुलढाणा | ३३५२ | ३२ | ४०३ | २२३८ | ३४ | ४५१ | ११२८ | ६५ | १३ | ३० |
| ८ | यवतमाळ | ६१२७० | ५४ | ६४२२ | ३४१८० | ६१ | ४१६३ | ३६४४ | ४२½ | ५६५ | ८० |
| | | शिवाय सरकारी ३०,००० | | | | | | | | | |